मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

## मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

भारतीय सौर वैशाख–ज्येष्ठ १९४०

एप्रिल–जून २०१८ / खंड ४२, अंक १



आनंदयात्री अण्णासाहेब डॉ. जी. डी. बेंडाळे
जन्मशताब्दी वर्ष..

**७४** वर्षांची परंपरा असलेली

सात दशकांपासून अविरत,
अविश्रांत सेवा...

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| मू. जे. महाविद्यालय. | स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय | इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च. | एस.एस. मणियार लॉ कॉलेज | शिक्षणशास्त्र महाविद्यालय | अध्यापक विद्यालय | कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड आय.टी. |
| ए.टी. झांबरे विद्यालय | ओरिऑन सीबीएसई इंग्लिश मिडियम स्कूल | ओरिऑन इंग्लिश मिडियम स्कूल | किलबील बालक मंदीर | ओजस्विनी कला महाविद्यालय | ओजस्विनी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर ॲन्ड डिझाईन | |
| इन्स्टिट्यूट ऑफ मल्टीमिडिया, प्रिंटींग टेक्नॉलॉजी | जलश्री पाणलोट सर्वेक्षण व संशोधन संस्था. | पोस्ट ग्रॅज्युएट कॉलेज ऑफ सायन्स टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च | ज्ञानज्योत इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्पिटेटीव्ह एक्सलन्स | एकलव्य शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय. | स्पार्क डिझाईन ॲन्ड प्रिन्ट सर्व्हिसेस | |
| विविधता संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र. | एकलव्य क्रीडा संकुल. | | | | | |

ESTD : 1944

# खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटी, जळगाव

एम. जे. कॉलेज परिसर, जळगाव - ४२५००१ फोन/फॅक्स : ०२५७-२२३९८००
वेबसाईट - www.kces.in | ईमेल - kcesociety@gmail.com

**प्रज्ञावंत नंदकुमार जी. बेंडाळे**

अध्यक्ष आणि सन्माननीय व्यवस्थापन मंडळाचे सदस्य व के.सी.ई. परिवार, जळगाव

SPARK-2251918

केसीई... एक प्रगल्भ शैक्षणिक चळवळ...

सौजन्य : श्री. चारुदत्त गोखले

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।
www.marthpari.org

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

# अर्थसंवाद

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

एप्रिल-मे-जून २०१८ / खंड ४२ / अंक १

प्रमुख संपादक
राहुल शं. म्होपरे
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

सहाय्यक संपादक
चंद्रकांत जाधव
(य.च.वारणा महाविद्यालय,वारणा नगर)

सल्लागार मंडळ
(२०१८-२१)
जनार्दन काकडे
राजू शिंदे
अजय दरेकर
मोहन सदामते

संपादकीय पत्रव्यवहार
राहुल शं. म्होपरे
विद्यापीठ क्वार्टर नं. डी-३४,
सायबरसमोर,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
ता. करवीर, जि. कोल्हापूर
पिन : ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

लेखातील मते लेखकांचीच

## अनुक्रमणिका

१. राहुल शं. म्होपरे : संपादकीय ..... ३

२. श्रीनिवास खांदेवाले :
मंदीमुक्त भांडवलशाही असू शकेल का? ..... ५

३. जे. एफ. पाटील :
मानव कल्याण का राजकीय सत्ता / मत्ता? ..... १३

४. अनिल पडोशी : शेती विकासाचे दोन उपाय-
आधार किंमती व घटक अनुदान ..... ३३

५. संतोष दास्ताने :
भारतातील बँकींग उद्योग व बॅसल आव्हाने ..... ४०

६. एम. एन. शिंदे : दुसऱ्या हरितक्रांतीच्या
उंबरठ्यावर भारतीय शेतकऱ्यांचा आक्रोश ..... ५४

७. विनायक श्रीधर देशपांडे :
सर्वेऽपि सुखिनः सन्तु की सधनः सन्तु? ..... ६१

८. आ. गो. पुजारी :
अर्थशास्त्रातील संशोधनपर लेखन : काही पथ्ये ..... ७१

९. रामचंद्र रसाळ : महाराष्ट्राच्या शेतीचे अर्थशास्त्र ..... ८९

१०. चारुदत्त गोखले : सार्वजनिक क्षेत्रातील बँकांपुढील
आर्थिक संकट : खासगीकरणाची चर्चा! ..... १०५

११. शिवाजीराव मुरलीधर भोसले : ग्रंथ परिक्षण
प्रेषित अर्थशास्त्री : कार्ल मार्क्स ..... १११

१२. शि. ना. माने : अर्थ शब्दांची वाट पाहे
डिझास्टर मायोपिआ ..... ११६

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## कार्यकारी मंडळ २०१७-१८

- **अध्यक्ष**

**चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)**

- **कार्याध्यक्ष**

**कैलास के. पाटील (परभणी)**

- **कार्यवाह खजिनदार**

**रामदास बापूराव भांडवलकर (यवतमाळ)**

- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

**राहुल शंकरराव म्होपरे (कोल्हापूर)**

- **विश्वस्त**

**बालाजी शिंदे (परभणी)**
**जगन्नाथ पाटील (सातारा)**
**आप्पासाहेब पुजारी (मंगळवेढा)**

- **सदस्य**

**दिनकर मोरे (इस्लामपूर)**
**वामन सावंत (रत्नागिरी)**
**जीवन सोळुंके (नाशिक)**
**महादेव पाटील (मिरज-सांगली)**
**संतोष कदम (सोलापूर)**
**सुभाष पाटील (पुणे)**
**विनोद गावंडे (अमरावती)**
**अशोकगीर गोस्वामी (भुसावळ)**
**मारोती तेगमपुरे (अंबड)**
**विजय भोपाळे (नांदेड)**
**स्नेहा देशपांडे (नागपुर)**

- **स्विकृत सदस्य**

**सुरेश पाटील (जळगाव)**
**अरूण पिसे (धुळे)**

- **स्थानिक कार्यवाह**

**शरयू पोतनुरवार (चंद्रपूर)**



### कार्यालयीन पत्रव्यवहार:

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **आर. बी. भांडवलकर**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गजानन नगर, पिंपळगाव रोड, यवतमाळ - ४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६


### अर्थसंवाद वर्गणी :

- **परिषदेचे सदस्य :**
  आजीव सदस्य : रु.३०००/- (एकरकमी)
- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**
  शैक्षणिक संस्था : रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था : रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये : रु.१५००/-(पंचवार्षिक)
- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.


### अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

टिप: म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

हे त्रैमासिक, प्रकाशक आर. बी. भांडवलकर (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर, पिंपळगाव रोड, यवतमाळ - ४४५ ००१ येथे प्रसिद्ध केले.

# संपादकीय

खरेतर आपल्या सभोवतालची आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थिती खूपच गुंतागुंतीची असून, यातील गुंतागुंत दिवसेंदिवस वाढतच चाललेली आहे. या सभोवतालच्या परिस्थितीचे जे विविध घटक आहेत, त्यातील अर्थव्यवस्था हा एक महत्त्वाचा घटक आहे. जागतिक अर्थव्यवस्था असो वा आपल्या देशाची अर्थव्यवस्था असो, त्यामध्ये सातत्याने उलथापालथ ही होतच असते; किंबहुना जिवंत अर्थव्यवस्थेचेच हे एक प्रमुख लक्षण मानले जाते. अशा या अर्थव्यवस्थेमध्ये नानाविध प्रश्न निर्माण होत असतात आणि हे प्रश्न सोडविण्याचे उपाय सुचविणे, त्यावर भाष्य करणे, अर्थव्यवस्थेतील आर्थिक प्रश्नांची सोप्या भाषेत उकल करणे, त्याची कारणे शोधून काढणे इ. कामे धोरणकर्ते, अर्थशास्त्रज्ञ, विचारवंत, प्राध्यापक आणि संशोधक आपापल्या परीने सातत्याने करत असतात. थोडक्यात, अर्थव्यवस्थेत निर्माण होणारे प्रश्न आणि त्यावरील विविध बाजूंनी होणारे भाष्य ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. अर्थव्यवस्थेतील अशाच प्रकारच्या विविध प्रश्नांवर लेखन तथा विचारविनिमय करण्याचे एक दर्जेदार माध्यम म्हणून मराठी अर्थशास्त्र परिषदेमार्फत चालविल्या जाणाऱ्या अर्थसंवादच्या अंकाकडे पाहिले जाते. अर्थसंवादच्या प्रस्तुत अंकातदेखील अर्थव्यवस्थेच्या विविध प्रश्नांवर मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विद्यमान व माजी अध्यक्षांमार्फत भाष्य करण्यात आलेले आहे.

अर्थसंवादचा (एप्रिल-जून, २०१८) हा अंक विशिष्ट आणि वेगळ्या स्वरूपाचा काढण्याचा प्रमुख संपादक या नात्याने माझा जाणीवपूर्वक प्रयत्न होता. खरेतर पूर्वी अर्थसंवादच्या सल्लागार मंडळावर काम करत असल्यापासूनच माझ्या मनातील ही मनीषा होती, जी या अंकाद्वारे प्रमुख संपादक झाल्यावर पूर्णत्वास जात आहे. अर्थसंवादचा हा चालू अंक म्हणजे एकंदरीतच अर्थसंवादच्या आजपर्यंतच्या ४० वर्षांच्या इतिहासातील एक मैलाचा दगड ठरावा, अशा पद्धतीने झाला आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. अर्थातच, हा संपूर्ण प्रयत्न मी सन्माननीय विद्यमान अध्यक्ष व माजी अध्यक्षांसह सर्व कार्यकारिणी सदस्यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनानेच केलेला आहे. सदर अंकाचे अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या अंकातील सर्वच्या सर्व लेख हे मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सन्माननीय आजी-माजी अध्यक्षांनी स्वतंत्र स्वरूपात स्वत: लेखन केलेले आहेत. यातील प्रत्येक लेखाला एक वेगळी उंची व वेगळे वजन आहे. अर्थसंवाद या दर्जेदार त्रैमासिकात कशा पद्धतीने लेख लिहावेत, त्यांचा दर्जा काय असावा, संशोधनपर लेख कसे असतात याचे दीर्घकालीन दिशादर्शन या अंकाच्या प्रत्येक लेखातून प्राप्त होते. विद्यमान अध्यक्षांसह प्रत्येक माजी अध्यक्षाने अत्यंत परिश्रमपूर्वक व भरपूर वेळ खर्च करून लेख तयार केलेला आहे, याची साक्ष अर्थसंवादाच्या प्रत्येक वाचकाला लेखाचे वाचन करताना निश्चितच पटेल.

अर्थशास्त्रातील संशोधनपर लेखन कसे करावे, त्यासाठी कोणती प्रमुख पथ्ये पाळावीत, मंदीमुक्त भांडवलशाही, मानव कल्याण व राजकीय सत्ता, शेती विकास : पैलू व सद्य:स्थिती, हरितक्रांती, मानव विकास निर्देशांक, बँकिंग व आव्हाने अशा विविध पैलूंवर सन्माननीय आजी-माजी अध्यक्षांनी अद्ययावत सांख्यिकीय माहिती; तसेच इत्यंभूत विश्लेषणाद्वारे प्रकाशझोत टाकला आहे. या अंकातील प्रत्येक शब्द आणि पृष्ठ नाविन्याची निर्मिती असून, अर्थशास्त्राच्या साहित्यात मौलिक भर टाकणारे आहे. अत्यंत व्यस्त कार्यक्रम आणि वयोमान याचा विचार करता, अर्थसंवादसाठी सन्माननीय आजी-माजी अध्यक्षांनी केलेले हे लेखन म्हणजे त्यांचे अर्थसंवाद आणि मराठी अर्थशास्त्र परिषदेवर असलेले अतोनात प्रेम परावर्तित करते. अनेक माजी अध्यक्षांना लेख लिहिण्याची खूप इच्छा होती; परंतु प्रकृती अस्वास्थ्य व व्यस्तता यांमुळे त्यांना शक्य झाले नाही. परंतु, त्यांनीदेखील मला या अंकासाठी मौलिक मार्गदर्शन केले आहे. साधारणत: ५५ ते ८५ वर्षांदरम्यानच्या सन्माननीय आजी-माजी अध्यक्षांनी अर्थसंवादच्या या अंकात लेखन केलेले आहे, हे विशेष होय. या अंकातील जे काही चांगले आहे, ते सर्वस्वी तज्ज्ञांचे असून, ज्या काही उणिवा आहेत, त्या पूर्णत: संपादकांच्या आहेत, हेदेखील याठिकाणी नमूद करणे मला गरजेचे वाटते. अर्थसंवादचा हा अंक मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांबरोबरच अर्थसंवादचे सर्व वाचक, संशोधक, विद्यार्थी इ.बरोबरच भविष्यकालीन पिढीला दीपस्तंभासारखा सदैव मार्गदर्शक ठरेल, असे प्रमुख संपादक या नात्याने मला मनापासून वाटते. त्यामुळेच हा अंक वाचकांच्या हाती सुपूर्द करताना मला मनस्वी आनंद होऊन, खूप समाधान वाटत आहे.

**- राहुल शं. म्होपरे**

◆

## निवेदन - अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना आवाहन करण्यात येते की, अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखांवर आपण ५० ते १०० शब्दांची आपली प्रतिक्रिया संपादकांकडे पाठवावी. याबरोबरच आपण अर्थशास्त्रीय विनोदी चुटकुले तसेच अर्थशास्त्रीय प्रबोधनात्मक लहान गोष्टी देखील पाठवू शकता. निवडक योग्य प्रतिक्रिया, अर्थशास्त्रीय विनोदांना व प्रबोधनात्मक अर्थशास्त्रीय गोष्टींना अर्थसंवाद मधून प्रसिद्धी देण्यात येईल.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# मंदीमुक्त भांडवलशाही असू शकेल का ?

**श्रीनिवास खांदेवाले** †

माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

संचालक, रुईकर श्रमसंस्था, नागपूर.

नुकतीच बातमी प्रकाशित झाली ती अशी की, आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीच्या ताज्या सहामाही अहवालानुसार सर्वच देशांमध्ये सार्वजनिक व खाजगी कर्जे इतक्या उच्च पातळीवर पोहोचली आहेत की, ती परत कमी करणे अशक्य होईल. त्यामुळे जगभरात मंदीची शक्यता आहे.[१] हा संबंधित अहवाल दि. १८ एप्रिल रोजी प्रकाशित झाला आहे. ही जागतिक कर्जे २०१६ पर्यंत १६४ ट्रिलियन डॉलर्स (१६४ लाख कोटी डॉलर्स म्हणजे १०,६६० लाख कोटी रुपये) इतकी आहेत. त्याचे जागतिक उत्पन्नाच्या तुलनेत प्रमाण २२.५ टक्के आहे. ही सर्वोच्च पातळी मोठ्या संकटाला निमंत्रण देणारी आहे. कारण, त्यामुळे आर्थिक प्रगतीकरीता पैसा उभारणे अशक्य होईल. याआधी २००९ मध्ये अशी परिस्थिती निर्माण झाली होती, असे आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीच्या एका अधिकाऱ्याने म्हटले आहे.

वरील बातमीच्या आधारे आपण शीर्षकात लिहिलेला शोधप्रश्न तयार केला आहे. भारताच्या अर्थ-राज्यव्यवस्थेचे स्वरूप पाहून गेल्यास असे दिसते की, भारतीय अर्थव्यवस्था सुमारे १८२० पासून १९४७ पर्यंत ब्रिटिश भांडवलशाहीचा भाग होती. परंतु, साम्राज्यवादी अर्थव्यवस्था पूर्णपणे बाजाराधिष्ठित नसते. त्यात राज्यव्यवस्थेला प्राधान्य असते व तिचे आर्थिक निर्णयांवर नियंत्रण असते. १९४७ ते १९९१ पर्यंत भारतात भांडवलशाही व समाजवादाचे काही अंश असलेली मिश्र अर्थव्यवस्था होती. १९९२ पासून कोणतीही राजकीय गटबंधने असली तरी समाजवाद नाकारलेली, समाजवादाचे काही निर्जीव अवशेष (उदाहरणार्थ, सार्वजनिक क्षेत्रांतील उद्योग) शिल्लक असलेली बाजारव्यवस्था कार्यरत आहे. हे अवशेष असल्यामुळे आंतरराष्ट्रीय मुद्रानिधी व जागतिक अधिकोषाच्या व्यवस्थेनुसार भारताला उगवती बाजार-व्यवस्था 'इमर्जिंग मार्केट इकॉनॉमी' म्हटले जाते. हे अवशेष नष्ट झाले (जसे, नियोजन नष्ट होऊन 'नीती आयोग' नावाची संस्था आली) म्हणजे ती पूर्णपणे बाजारव्यवस्था होईल. पण पूर्ण बाजारव्यवस्थेतसुद्धा महत्त्वाचे निर्णय उत्पादक संस्था घेत नसून त्यांच्यावतीने राज्यव्यवस्थाच घेते, असे आजपर्यंत तरी दिसून आले आहे. अशा अर्थव्यवस्थांमध्ये (ज्यांच्यामुळे युरोपमध्ये औद्योगिक भांडवलशाही सुरू झाली) आलटून-पालटून तेजी व मंदी येत असल्यामुळे, त्यांना आपण अर्थव्यवस्थेची अंगे किंवा अंगभूत वैशिष्ट्ये मानतो. त्यानुसार ही वैशिष्ट्ये सामान्य मानून आपण ती शिकतो,

† आजीव सभासद क्र. : १०९, भ्रमणध्वनी : ०७४४७५६१५४४, ई-मेल : shreenivaskhandewale12@gmail.com

शिकवितो आणि त्यांची चर्चाही करतो. अशा स्थितीत 'मंदीयुक्त' अर्थव्यवस्था 'मंदीमुक्त' कशी काय असू शकेल, असा प्रश्न वाचकांच्या मनात निर्माण होणे शक्य आहे. मंदी आली काय आणि गेली काय, इतके सोपे असते, तर आपणही तिची दखल घेतली नसती. पण अनुभव असा आहे की, अशी अर्थव्यवस्था मंदगती (स्लो डाऊन, रिसेशन, डिप्रेशन इत्यादी विशेषणांनी ओळखली जात असली तरी ती) अधोमुख असते. त्यात उत्पादन, रोजगार, उत्पन्न, नफ्याचे दर, गुंतवणूक इत्यादी सगळेच घटक उत्तरोत्तर घसरतात. त्या स्थितीतून पुन्हा आपोआप संतुलन स्थापन होण्याचे कार्य अर्थशास्त्र करू शकत नाही. समाजाच्या सगळ्याच प्रकारच्या व्यवहारांमध्ये अवरुद्धता येते. त्यामुळे लोक अर्थ-व्यवस्थेबद्दल, तिचे संचलन करणाऱ्या राज्यव्यवस्थेच्या संरचनेबाबत, कार्यप्रणालीबाबत, उद्दिष्टांबाबत व क्षमतेबाबत शंका व्यक्त करू लागतात व पर्यायी व्यवस्थेबाबत विचार करू लागतात. तीच वैचारिक अवस्था कदाचित सध्या निर्माण झाली आहे, म्हणून ही चर्चा.

### भांडवलशाही: उद्‌भव व अनुभव

प्राचीन व मध्ययुगातही काही वस्तू व सेवांमधील वैविध्य, अपर्याप्त स्थानिक मागणी किंवा पुरवठ्यामुळे व्यापार सुरू झाला. तो चालण्यासाठी दळणवळण, चलन, विमा, सावकारी पेढ्या (म्हणजे आजचे बँकींग) ह्या प्रणाली विकसित झाल्या. खासगी संपत्ती, बाजार संकल्पना विकसित झाल्या. त्यांना खरी गती आली ती ब्रिटनमध्ये यांत्रिकी उत्पादन सुरू होऊन औद्योगिक आयात-निर्यात क्रांती झाल्यानंतरच. फ्रान्स, जर्मनी इत्यादी देशांनी ह्या प्रणालींचा अवलंब केल्यामुळे ती युरोपीय क्रांती बनली. उद्योग रात्रंदिवस चालवून आणि यंत्रांचे आकार व वेग वाढवून उत्पादन (म्हणजेच संपत्ती) कितीतरी पटींनी जलद गतीने वाढविणे शक्य झाले. उत्पादन व व्यापारातून वाढीव कर उत्पन्न मिळत असल्यामुळे राज्य ही संस्था कारखानदारी भांडवल-शाहीला अनुकूल झाली. तिला हवे असणारे कायदे, प्रशासन, शिक्षण, आरोग्य प्रणाली निर्माण करण्यास राज्यव्यवस्था तत्परता दाखवू लागली.

औद्योगिक भांडवलशाहीने १८व्या व १९व्या शतकात इंग्लंडमधील व युरोपातील सरंजामशाही मोडून काढली. उद्योजकांना शक्य असेल तेवढी संपत्ती कमावण्याचे स्वातंत्र्य राज्यव्यवस्थेने दिले. खेड्यांमधून शेतीत गुंतलेला मजूरवर्ग शहरांमध्ये कारखानी मजूर म्हणून आणण्यास मदत केली. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे औद्योगिकरणाला एकीकडून स्वत:च्या देशातील नैसर्गिक संसाधने व दुसरीकडून तेवढ्या मोठ्या उत्पादनाच्या (स्थानिक मागणी अत्यंत अपुरी असल्यामुळे) इंग्लंड व युरोपच्या कंपन्यांना जगभर मुक्तपणे जाता यावे, उत्पादन साधने वापरता यावी, माल अनिर्बंधपणे विकता यावा म्हणून साम्राज्ये स्थापन केली गेली. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, हॉलंड, स्पेन, पोर्तुगाल ह्या देशांनी आशिया, आफ्रिका, लॅटिन, अमेरिका या खंडांमध्ये अनन्वित हिंसाचाराच्या साहाय्याने लोकांना गुलाम बनवून स्वत:ची साम्राज्ये विकसित केली. वसाहतींमधून गेलेल्या संपत्तीमधून इंग्लंड व युरोपची शहरे, संस्था, कला इत्यादींची गुणवत्ता व भव्यता निर्माण झाली. ह्या सर्व देशांची वसाहती वाढविण्यासाठी आपसात युद्धे चालत होती.[२] साम्राज्यांच्या आतही नफ्याचे महत्तमीकरण करण्यासाठी औद्योगिक कंपन्यांमध्ये स्पर्धा आणि स्पर्धा जिंकण्यासाठी उत्पादनांचे महत्तमीकरण करणे, उत्पादन खर्च कमी ठेवण्यासाठी कमी मजुरी देऊन मजुरांचे शोषण करणे या गोष्टी प्रकर्षाने चालत होत्या.

साम्राज्यवादी देशांतील कमी लोकसंख्येमुळे स्वत:ची अपुरी मागणी आणि प्रत्येकाच्या वसाहतींमध्ये

होणाऱ्या शोषणातून घटलेल्या क्रयशक्तीमुळे होणारी कमी मागणी ह्यातून सतत निर्माण होणाऱ्या मंदीची दखल मार्क्सने खूप आकडेवारी उपलब्ध नसताना, परिस्थितीच्या व गतितत्त्वाच्या आधारे घेतली होती.[३] लेनिनने १९१४ पर्यंतच्या अनुभवाच्या आधारावर 'साम्राज्यवाद: भांडवलशाहीची सर्वोच्च अवस्था' (इंपिरिॲलिझम: द हायेस्ट स्टेज ऑफ कॅपिटॅलिझम) हा ग्रंथ लिहिला होता.

१९२९ पासून सुरू झालेली महामंदी १९३९ पर्यंत चालली. परंतु, अमेरिकेत त्याआधी सुमारे १९२१ पासूनच ४ वेळा अल्प ते मध्यम काळाची मंदी येऊन गेली होती. त्याकाळीसुद्धा अमेरिकेत गव्हाच्या किमतींपेक्षा गव्हाच्या कापणीचा खर्च जास्त होता. म्हणून अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी कापणी न करता गव्हाची पिके जाळून टाकली होती. केन्सप्रणीत सरकारी परिपूरक खर्चाच्या (काँपेन्सेटरी स्पेंडिंग) तत्त्वाने नव्हे तर दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात होऊन युद्ध-मागणी झपाट्याने वाढू लागल्यामुळे ती महामंदी हटली.

१९७० पासून तंत्रविकासातील प्रगतीमुळे उत्पादन वाढू लागले. पण त्या गतीने मागणी वाढत नव्हती व मंदी येऊ लागली होती. म्हणून स्पर्धा व जागतिक मुक्त व्यापारातून मागणी वाढविण्यासाठी (मंदी घालविण्या-साठी) खासगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण १-१-१९९५ पासून आणले गेले. तरी २००८ मध्ये पुन्हा मंदी आलीच.

१९३६ च्या केन्सच्या 'द जनरल थियरी ऑफ एम्प्लॉयमेंट, इंटरेस्ट अँड मनी' ह्या ग्रंथात सुचविल्या-नुसार स्थूल स्तरावर पूर्वी इतकीच उपभोग, रोजगार, किमती ह्यांची पातळी टिकवून ठेवण्यासाठी खासगी क्षेत्रात जेवढी घट झालेली असेल तेवढी, सार्वजनिक कर्ज काढून, भरून काढल्यास अर्थव्यवस्था स्थिर राहील असे म्हटले गेले. उद्योजकांना उत्पादन वाढ करण्यासाठी प्रलोभन म्हणून बँकानी अतिशय कमी (म्हणजे शुन्याच्या आसपास) व्याज दर आकारावे, असेही केन्सने सुचविले होते. ह्या विचाराला भांडवलशाही टिकवून मंदीपासून मुक्ती देणारा क्रांतिकारक विचार असे म्हटले गेले. त्यानुसार अनेक सरकारांनी लहानमोठे, अल्प व मध्यम काळासाठी प्रतिपूरक सार्वजनिक खर्चाचे प्रकल्प अहवाल तयार करून ठेवले, तरी २००८ची मंदी आलीच. स्वान आणि पिडकॉक आपल्या अत्यंत वाचनीय ग्रंथात म्हणतात, '२००८च्या आर्थिक संकटांसबंधी २१ ऑक्टोबर २००८ रोजी बँक ऑफ इंग्लंडचे प्रभारी गव्हर्नर ह्यांनी एका बैठकीत असे सांगितले की, '१९१४ मधील पहिल्या महायुद्धाच्यावेळी जशी कठीण आर्थिक परिस्थिती होती, तशीच २००८ मधील परिस्थिती आहे. सगळ्यांचे पगार कमी होणार, बँकांकडून कर्जवाटप कमी होणार आणि देशातील मागणीमध्ये तीव्र आणि प्रदीर्घ मंदी येण्याची जोखीम आहे. तीन दिवसांनंतर त्याच बँक ऑफ इंग्लंडच्या डेप्युटी गव्हर्नररांनी म्हटले की, ह्या वेळचे संकट मानव जातीसाठी आतापर्यंतच्या इतिहासात आलेल्या अशा संकटांपेक्षा वाईट आहे. असे संकट बँक ऑफ इंग्लंड १६९४ मध्ये स्थापन झाल्यापासून १७ वेळा आले आहे.'[४] हे लेखक पुढे म्हणतात की, 'व्यापार चक्राला बँकींग व वित्ततज्ञ आणि बरेचसे विद्वान असे मानतात की, ती टाळता येऊ शकत नाही आणि ह्या चक्रांना काही (सामाजिक) उत्तरदायित्व नाही. ती चक्रे दोन्हीकडे हलणारा झोपाळा आहेत. पण त्यांची हलण्याची गती समान नाही. त्यामध्ये तेजीनंतर मंदी निश्चितपणे येते आणि आलेली मंदी पुढे येणाऱ्या तेजीची नांदी असते. पण ह्या प्रक्रियेत सगळ्याच उद्योजक व्यापाऱ्यांचा आत्मविश्वास कमी होऊन जातो आणि सगळेच त्वरित श्रीमंत होण्याकरिता सट्टेबाज आणि व्यापार चक्रवादी बनतात.'[५]

बाजारातील सततच्या उच्चावचनांमुळे बाजारातील बदलांचा अंदाज घेण्याची पद्धतीसुद्धा आता अल्पकालीन झालेली आहे. आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीच्या २०१८च्या वार्षिक अहवालाचे शीर्षकच 'चक्रीय उद्दोलन आणि संरचनात्मक बदल' (सायक्लिकल अपस्विंग अँड स्ट्रक्चरल चेंज) असे आहे. त्या अहवालाचे मुख्य आर्थिक सल्लागार मॉरिस ऑफ्सफेल्ड त्यांच्या प्रस्तावनेच्या पहिल्या वाक्यापासूनच २००८-२००९ नंतरच्या उच्चावचनांबद्दल काय म्हणतात ते आपण मुळातून समजावून घेतले पाहिजे. ते म्हणतात, "The global economic upswing that began around mid 2016 has become broader and stronger. This new World Economic Outlook report projects that advanced economies... will continue to expand above their potential growth rates this year and next before decelerating, while growth in emerging markets and developoing economies will rise before levelling off. For most countries current favourable rates will not last. Policy makers... should.. equip their governments... to encounter the next downturn... encouraging investments and healing labour market scars... scepticism will only be reinforced-with negative political consequences down the road-if economic policy does not rise to the occasion of enacting reforms and building buffers. The multilateral rule-based trade system that evolved after world war II and that nurtured unprecedented growth in the world economy needs to be strengthened. Instead, it is in danger of being torn apart... the renewed populatity of nationalistic policies is another after-effect of the financial crisis and its prolonged aftermath."[६]

वरील उदाहरणे थोडी लांब वाटतात. परंतु, त्यातून तेजी-मंदीयुक्त आर्थिक उलथापालथीचे यथातथ्य चित्रण होते. त्यांचे पूर्ण भाषांतर येथे न देता त्यातून ध्वनित होणारे मुख्य मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

१. २०१६ च्या मध्यापासून तेजी आली ती २०१९ (डिसेंबर) पर्यंत टिकेल व नंतर मंदी सुरू होईल.

२. ही प्रक्रिया आधी विकसित व नंतर विकसनशील देशांमध्ये येईल.

३. पलीकडल्या संभावित मंदीविरूद्ध व श्रमिकांना होणाऱ्या नुकसानाकरिता आतापासून वित्तीय संसाधने गोळा करावी. अन्यथा, लोकांच्या मनातील (बाजार अर्थव्यवस्थेबद्दलचा) संशय दृढ होईल.

४. दुसऱ्या महायुद्धानंतर जी बहुदेशीय व्यापार प्रणाली निर्माण झाली आहे तिची (२००८-०९) वित्तीय संकटामुळे शकले होण्याची वेळ आली आहे. त्याचा दीर्घकाळ चाललेला दुष्परिणाम म्हणून आर्थिक राष्ट्रवाद वाढला आहे.

ह्याचा अर्थ असा की, २००९ ते २०१९ ह्या एका दशकातसुद्धा आपल्याला २-३ वेळा मंदी अनुभवाला येत आहे. किंबहुना, आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीचे अर्थशास्त्रज्ञसुद्धा तेजी म्हणजे दोन मंदींमधील काळ असे विश्लेषण करताना दिसत आहेत.

ह्यामध्ये दडलेला मुद्दा श्रमिकांच्या बेरोजगारीचा व शेतकरी-श्रमिकांच्या राहणीमानाचा आहे. अर्थव्यवस्थेत जितके चढउतार जास्त तितकी बेरोजगारीची वारंवारता आणि श्रमिक जीवनातील अर्थिक अनिश्चितता जास्त. लोकसंख्येत श्रमिक हाच घटक प्राधान्याने असल्यामुळे वारंवारची मंदी बहुसंख्य जनतेच्या कल्याणावरच सतत आघात करीत असल्याचे वस्तुनिष्ठरित्या दिसून येते. बरीचशी गुन्हेगारी व हिंसा ह्यामधून निर्माण होते.

जागतिक अर्थव्यवस्थेत व विविध देशांमध्ये विकास प्रक्रियेबाबत काय घडते आहे, ह्याचे विस्तृत आकडेवारीवर आधारित विश्लेषण थॉमस पिकेटी ह्यांच्या 'कॅपिटल इन द ट्वेंटी फर्स्ट सेन्चुरी' ह्या ग्रंथात उपलब्ध झाले आहे. जगातील वाढत्या उत्पन्न विषमते (त्यातूनच मंदी येते ) बाबत पिकेटी ह्यांची महत्त्वाची

निरीक्षणे, निष्कर्ष व उपाययोजना थोडक्यात अशा :

१. संपत्तीच्या वाटपाचा प्रश्न प्रामुख्याने आर्थिक नसून राजकीय आहे. १९१० आणि १९५० ह्या मधील काळात जगभर विषमतेत घट झाली. त्याचे कारण दोन महायुद्धांचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी आखलेली धोरणे हे होते. १९८० नंतर विषमता वाढली, त्याचे कारण पूर्वीच्या समानता आणण्याच्या कर आणि वित्तीय धोरणांमध्ये केलेले राजकीय बदल हे आहे. विषमतेकडे आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील महत्त्वाचे निर्णयकर्ते आणि समाजातील विषमतेबाबत चूक-बरोबरच्या त्यांच्या मान्यता ह्यांचा संयुक्त परिणाम विषमता ठरवितो.[७]

२. पिकेटींच्या मते, त्यांच्या पुस्तकाचा गाभा असा आहे की, आळीपाळीने समतावादी व विषमतावादी यंत्रणा उत्पन्नाच्या वाटपावर प्रभाव टाकताना दिसतात. कायमच अस्थिरता आणि विषमता वाढविणाऱ्या शक्तींना प्रतिबंध करील, अशी कोणतीही नैसर्गिक किंवा उत्स्फूर्त अशी प्रक्रिया उपलब्ध नाही.[८]

३. आताच्या काळात वाढणाऱ्या विषमतेत भांडवलाच्या मालकीचा वाटा (उत्पन्नाच्या वाट्यापेक्षा) व प्रभाव जास्त आहे.[९,१०]

४. जगभर निर्माण होणाऱ्या काळ्या पैशामुळे व भांडवलापासून मिळणाऱ्या उत्पन्नात अनेक प्रकारच्या उत्पन्न करातील सवलतींमुळे भांडवलाची भूमिका पूर्णपणे प्रकाशात येत नाही.[११] त्यामुळे उत्पन्न कराच्या केवळ सरकारी आकडेवारीवरून विषमतांचे पूर्ण चित्र लक्षात येत नाही.

५. उत्पन्नाच्या अति विषमतांमुळे आणि श्रीमंतांच्या श्रीमंतीचे अनेक संस्था, मंच, अर्थशास्त्रज्ञांतर्फे समर्थन होत असल्यामुळे जागतिकीकृत अर्थव्यवस्थेमध्येही आदर्श असमतावादी प्रारूप विसरले गेले आहे आणि ह्या नव्या जगात जुन्या युरोपचे अल्पजनसत्ता प्रारूप पुन्हा जन्म घेताना दिसत आहे.[१२]

६. भांडवलावर जागतिक कर, लोकशाहीवादी आणि वित्तीय पारदर्शकता, संपत्तीवर वाढीव कर, पेट्रोलवर मिळणाऱ्या खंडाचे फेरवाटप, स्थलांतरित लोकांच्याद्वारे होणारे उत्पन्नाचे फेरवाटप इत्यादी मार्गांनी विषमता काही प्रमाणात कमी करता येईल.[१३]

७. उत्पादन वाढीच्या व उत्पन्न वाढीच्या दरापेक्षा भांडवलाला मिळणाऱ्या मोबदल्याचा दर जास्त आहे. ही भांडवलशाहीची मूळ विसंगती आहे.[१४]

पिकेटींचे विश्लेषण व निष्कर्ष सर्वांना आवडतील असे आहेत. परंतु, त्याने वर (क्र. ६ मध्ये) सुचविलेल्या उपायोजनांचा क्र. १ ते ५ मधील त्या विश्लेषणाशी मेळ बसत नाही. उदाहरणार्थ, विषमतांचा (व त्या अनुषंगाने मंदीचा) प्रश्न आर्थिक नसून तो आर्थिक, सामाजिक व राजकीय आहे, असे म्हणून पिकेटी उपाययोजनेमध्ये आर्थिक उपाययोजनाही पर्याप्त सुचवीत नाही आणि राजकीय व सामजिक उपाययोजनांना स्पर्शही करीत नाही. पिकेटी मार्क्सवादी नाही हे तो स्वत:च जाहीर करतो. त्यामुळे पिकेटींच्या एवढ्या सखोल (दोन-तीन शतकांच्या) सांख्यिकी विश्लेषणानंतर उपाययोजनेच्याबाबत असमाधानच हाती येते.

मार्क्सने स्वत:च्या ग्रंथाला 'दास कॅपिटल' (म्हणजे जर्मन भाषेत 'हे भांडवल', जर्मन भाषेत 'दास' म्हणजे इंग्रजीत 'धिस') असे नाव दिले व पिकेटीनेही त्यांच्या ग्रंथाला 'भांडवल' हेच नाव दिल्यामुळे पिकेटींच्या ग्रंथातून मार्क्सच्या मांडणीची पर्यायी मांडणी वाचावयास

मिळेल अशी जी अपेक्षा निर्माण होते, ती बिलकूलच पूर्ण होत नाही. पिकेटींच्या ग्रंथानंतर एवढे मात्र झाले की, विविध देशांमधील सर्वात श्रीमंत अशा १ टक्के अतिश्रीमंतांजवळ त्या त्या देशातील संपत्ती किती केंद्रीत झाली आहे, ह्याचे अंदाज मोठ्या प्रमाणावर प्रसारित होऊ लागले आहेत. एका प्रकाशनानुसार इतर देशांच्या तुलनेत भारतातील १ टक्का अतिश्रीमंतांजवळ संपत्तीचे केंद्रीकरण सर्वाधिक (७३टक्के) आहे.

बोस्टन कन्सल्टिंग ग्रुपने तयार केलेल्या ग्लोबल वेल्थ रिपोर्ट २०१८ (इंडियन एक्सप्रेस, दि. १६।६।२०१८, पृ. १२) नुसार जागतिक संपत्ती विक्रमी ८१ ट्रिलीयन डॉलर, जागतिक स्थूल घरेलू उत्पन्नाच्या २.५ पट झाली आहे. या अहवालाच्या अंदाजात ९७ देश आणि ९८ टक्के स्थूल घरेलू उत्पन्न समाविष्ट आहे. २०१६ मध्ये या संबंधित उत्पन्नात पूर्वीच्या वर्षाच्या तुलनेत ४ टक्क्यांनी वाढ झाली होती. २०१७ मध्ये १२ टक्क्यांनी वाढ झाली.

श्रीमंतांच्या ५ श्रेणींपैकी सर्वोच्च दोन श्रेणींमधे {(१) वरील श्रेणी उच्च नक्त मत्ता : हाय नेटवर्थ आणि (२) अतिउच्च श्रेणी नक्त मत्ता : अल्ट्राहाय नेटवर्थ} सर्वात जास्त उत्पन्नात वाढ झालेली दिसून आली. पुढील ५ वर्षात याच दोन श्रेणींच्या उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे. उच्च परतावा (नफ्याचा दर) देणेऱ्या स्रोतांमध्येच ते गुंतवणूक करीत असल्याने ते सर्वाधिक श्रीमंत राहतात.

प्रस्तुत चर्चेच्या दृष्टीने याचा अर्थ असा होतो की भांडवलशाहीत सगळ्याच देशांमधे उत्पन्नातील विषमता वाढत आहे. मोजक्या अतिश्रीमंत लोकांजवळ राष्ट्रीय उत्पन्नाचा मोठा वाटा केंद्रित झाल्यास बहुसंख्य लोकांकडे अपुरी क्रयशक्ती राहते. त्यामुळे बाजारात मागणी कमी होऊन मंदीसारखी परिस्थिती निर्माण होते. अशी विषमता दीर्घकाल चालू राहते व सगळेजण नकळत अशा परिस्थितीला सामान्य संतुलन स्थिती समजतात, हा सैद्धांतिक धोका आहे.

### मार्क्सचे प्रतिपादन

मार्क्सने तत्त्वज्ञानाच्या आधारे असे म्हटले की, सर्व माणसे समान आहेत, म्हणून त्याला गुलामी मान्य नाही (ॲरिस्टॉटल मोठा तत्त्ववेत्ता असून त्याने सामाजिक संरचनेत गुलामी प्रथा मान्य केली होती).

औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लंड व युरोपमध्ये सर्व उत्पादन यंत्रांद्वारे चालू होऊन मजूर त्या यंत्रांशी बांधला गेला. मजूर जेवढे उत्पादन - मूल्य निर्माण करीत होता, त्यापैकी सुमारे निम्म्या तासांचेच मूल्य त्याला मिळत होते. उरलेले अतिरिक्त मूल्य (तासांच्या रूपाने) शोषण दर्शवित होते. उत्पादकांमध्ये नफा वाढविण्यासाठी स्पर्धा चालते. स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी उत्पादन खर्च कमी करण्याचा महत्त्वाचा मार्ग (इतर खर्च बांधलेले किंवा नियंत्रणाबाहेरचे असल्यामुळे) श्रमिकाला त्याच्या उत्पादकतेपेक्षा कमी मूल्य देणे, हाच राहतो. तो मार्ग सुमारे इ.स. १७०० पासून अवलंबिला जात आहे. असे अतिरिक्त मूल्य उत्पादनाच्या सर्व क्षेत्रांमधून एकत्र करून ते भांडवल म्हणून वापरले जाते. हाच भांडवल संचय (ॲक्युम्युलेशन ऑफ कॅपिटल) भांडवलशाहीचा आत्मा आहे. प्रत्येक भांडवलदाराला मोठे व्हायचे असते, जमले तर एकाधिकारी व्हायचे असते. म्हणून बाजारावर अधिकार मिळविण्यासाठी एकूण मागणीचा विचार न करता सगळेच आपल्या क्षमतेनुसार उत्पादन वाढवितात. सगळ्यांच्या एकूण वाढीव उत्पादनासाठी मागणी नसल्याने आणि बहुसंख्य श्रमिकांचे उत्पन्न भांडवलशाही व्यवस्थेने कमी ठेवल्यामुळे बाजारात अतिरिक्त पुरवठा जाणवू लागतो. त्यामुळे श्रमिकांना रोजगारातून कमी केले जाते व उत्पादन कमी करण्याचा सर्वांचा प्रयत्न

सुरू होतो. आहे तो पुरवठा इतरांपेक्षा किमती कमी करून विकण्याचा प्रयत्न सुरू होतो. सगळ्या क्षेत्रांत उत्पादन घटकांचीसुद्धा मागणी कमी होऊ लागल्याबरोबर अर्थव्यवस्थेत मंदी व बेरोजगारी एकदमच दिसू लागतात. हे सगळ्या क्षेत्रांत सुसूत्रपणे किंवा एकाचवेळी घडत नाही. कार्यकारण शृंखलेनुसार आणि कोणी, किती जोखीम स्वीकारली होती, त्यानुसार त्यांची प्रतिक्रिया सखोल व दीर्घकाळ चालते. अनेक कारखाने (प्रतिष्ठाने) बंद पडतात. त्या प्रक्रियेतून पुरवठा संपून बाजारात चणचण जाणवू लागल्यामुळे किमती थोड्या वाढू लागल्यानंतर नव्याने गुंतवणूक पुरवठा वाढू लागतो. जे कारखाने कायमचे बंद केले जातात ते भंगारात विकले जातात. वस्तुनुसार, पुरवठ्याच्या अतिरिक्ततेनुसार व उत्पादकांमधील स्पर्धेच्या तीव्रतेनुसार ह्या मंदीचा पूर्ण प्रक्रियेचा काळ ठरतो. अनेक वेळा परिस्थिती ताळ्यावर आणण्यासाठी सरकारला कर उत्पन्नातला पैसा खर्च करावा लागतो. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत मंदी वारंवार येते. त्यातून स्थिरता आणि संतुलन आणण्याची क्षमता उत्तरोत्तर कमी होत जाते व त्यातच ती नष्ट होते.

मार्क्सने वरीलप्रमाणे भांडवलशाहीबद्दल भाकित केल्यापासून स्पर्धा टाळून मागणी-पुरवठ्याचे व विकासाचे नियोजन करणारी व संपूर्ण समाजाला रोजगार, लोकशाही अधिकार देणारी समाजवादी व्यवस्था प्रतिपादित केल्यापासून भांडवलशाही उत्पादक, राजकीय पक्ष, विचारवंत, पत्रकार, अर्थशास्त्रज्ञ (मार्शल, केन्सपासून ते पिकेटीपर्यंत) समाजवादाला विरोध कसा करायचा व भांडवलशाही कशी टिकवायची ह्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहेत. त्या प्रयत्नांत आंतरराष्ट्रीय मुद्रानिधी, जागतिक बँक, मुक्त व्यापाराचे १९४८ व १९९४ चे करार, जागतिक आर्थिक मंच (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम) हे सगळे प्रयोग चालू आहेत. परंतु, त्यातून भांडवलशाहीची मंदीतून मुक्तता करणारा सैद्धांतिक व व्यावहारिक पर्याय निर्माण झाला नाही. त्याचे मुख्य कारण असे की, भांडवलशाही प्रणाली चालविणारे श्रीमंत/अतिश्रीमंत आहेत. ते कारखाने, दवाखाने, विद्यापीठे, राजकीय पक्ष, सरकारे, विविध प्रकारच्या सामाजिक संस्था ह्यात कार्यरत आहेत. त्यांना उच्च पदांवरील उत्पन्न व अधिकार थोडाही कमी होणे मान्य नाही. त्यामुळे भांडवलशाही (तिच्या वाढत्या विषमतांसह) कशी टिकून राहील आणि तरी तिला मुक्त बाजारामुळे लोकशाही कसे म्हणता येईल, ह्याचे प्रयत्न चालू आहेत.

प्रश्न केवळ एवढाच आहे की प्रत्येक मंदी, ही बहुसंख्य असलेल्या श्रमजीवींवर निम्न उत्पन्न, बेरोजगारी, निम्न प्रकारचे शिक्षण, आरोग्य, आवास व्यवस्था सतत लादत आहे आणि त्याकडे समाज पाहून न पाहिल्यासारखे करीत आहे. प्रस्तुत लेखात मंदी म्हणजे केवळ मंदगती परिस्थिती नव्हे तर तिच्या पोटात असलेल्या मानवी यातनाही आहेत.

ह्या मांडणीतील मुद्दे प्रथमच मांडले गेले आहेत असे नाही. ती मांडणी मार्क्सच्या आधीही झाली होती. परंतु, औद्योगिक भांडवलशाहीचा आकार, ती नीट चालावी म्हणून तिची बदलती कार्यप्रणाली, जगाच्या प्रत्येक कोपऱ्यातील व्यक्तीच्या मनावर ती मूल्ये ठसविणे, हे सतत केले जात आहे. जे प्रश्न निर्माण होत आहेत ते व्यवस्थेचे अंगभूत नसून तात्पुरते आहेत, असे सांगितले जात आहे. प्रामुख्याने निर्माण होणाऱ्या संपत्तीच्या सदोष वाटपामुळे मागणी कमी होऊन आधुनिक गरीबी व बेरोजगारी येते. त्याचे आव्हान स्वीकारणे भांडवलशाही राजकारणाला व सरकारांना शक्य नसल्यामुळे प्रत्येक बेरोजगाराला 'तू नोकरी मागणारा नव्हे देणारा बन' असा सल्ला दिला जातो आणि जणू काही उद्योजकतेच्या कमतरतेमुळे बेरोजगारी

आहे, असे दाखविले जाते. सार्वजनिक बँकांची कर्जे मोठे उद्योजक बुडवित, तो तोटा भरून काढण्यासाठी इतरांच्या पैशातून मिळालेला नफा त्याकरिता (प्रोव्हिजनिंगच्या नावाखाली) वळविला जात आहे. माजी रिझर्व्ह बँक गव्हर्नर डॉ. रघुराम राजन म्हणाले होते की, त्यांना सगळ्या बँकांचे ताळेबंद स्वच्छ पाहिजेत. चोरांना सोडून संन्याशाला बळी देण्यात कोणती नैतिकता आहे?

सारांश, ह्या व्यवस्थेत गंभीर संरचनात्मक दोष आहेत, हे पूर्णपणे माहिती असून तिला तसेच चालविण्याचा हट्ट धरला जात आहे. त्यामुळे उद्योजकांमध्ये अनिश्चितता, बँकांमध्ये पैसा ठेवणाऱ्या जनतेत घबराट आणि सामान्य जनतेत चिंतेचे वातावरण निर्माण होऊन मंदीसदृश्य परिस्थितीमुळे निराशा निर्माण होत आहे.

आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीचा २०१८ चा अहवाल आपल्याला सांगत आहे की, डिसेंबर २०१९ नंतर पुन्हा मंदी येण्याची शक्यता आहे. म्हणून शीर्षकात मंदीमुक्त भांडवलशाही असू शकेल का असा जो शोधप्रश्न उपस्थित केला आहे, त्याचे वरील चर्चेतून निर्माण होणारे उत्तर 'नाही' असेच आहे. कदाचित अन्य उत्तर असेल तर ते शोधावे लागेल.

## संदर्भ व टिपणे


१. महाराष्ट्र टाइम्स, नागपूर, 'जग पुन्हा मंदीच्या छायेत', दि.२२-४-२०१८.

२. भारतावर प्रभुत्व स्थापित करण्यासाठी एकाच वेळी भारतात डच, फ्रेंच, पोर्तुगीज व ब्रिटिश साम्राज्ये आपसात लढत होती, हे अधोरेखित व्हावे.

३. Cornforth, Maurice: Reader's Guide To The Marxist Classics, National Book Agency, Calcutta, 1952, Reprint 1993, pp. 14-16.

४. स्वान आर्थर व पिडकॉक डेव्हिड: 'द क्रॅश ऑफ २००८', श्री बुक सेंटर, माटुंगा (प.) मुंबई, २००९, पुनर्मुद्रण २००९, पृ. ११.

५. तत्रैव, पृ. १५.

६. International Monetary Fund: World Economic Outlook: Cyclical Upswing, Structural Change; April 2018, p. xiv-xv.

७. Piketty, Thomas: Capital in the Twenty First Centrury, The Belknap Press of Harvard University Press, England, 2014, p. 20.

८. तत्रैव, पृ. २१.

९. तत्रैव, पृ. १८३.

१०. स्वान - पिडकॉक- पूर्वोल्लेखित, पृ. १३.
उच्च उत्पन्नाच्या व्यक्तींच्या उत्पन्नाच्या रचनेबद्दल १९१०-१९ मध्ये १९३९पर्यंत अन्य महत्त्वाच्या पदांवर असलेले व्हिन्सेंट व्हिकर्स ह्यांनी त्यांच्या 'इकॉनॉमिक ट्रिब्युलेशन' (आर्थिक यातना) या ग्रंथात लिहिले आहे की, त्यांचे सुमारे १० टक्के उत्पन्न हे अर्जित आहे व बाकीचे उत्पन्न औद्योगिक संस्था देशी-विदेशी सरकारची ऋणपत्रे इत्यादींमध्ये भांडवल गुंतवून मिळते. त्या अर्थाने ते भांडवलदार आहेत. त्यांनी लिहिले की, तत्कालीन ब्रिटिश वित्तीय व्यवस्था राज्याला घातक आहे, दारिद्र्य आणि बेरोजगारी निर्माण करते आणि युद्धाचे मूळ कारण आहे, असा माझा विश्वास आहे. (त्यात मंदी अध्यात आहे.)

११. पिकेटी, पूर्वाल्लेखित, पृ. २८२.

१२. तत्रैव, पृ. ५१४.

१३. तत्रैव, पृ. ५१५-५३९.

१४. तत्रैव, पृ. ५७१.


◆

# मानव कल्याण का राजकीय सत्ता / मत्ता ?

**जे. एफ. पाटील**[†]
माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष व विश्वस्त
मराठी अर्थशास्त्र परिषद.

## १. प्रास्ताविक

राष्ट्र या अर्थाने समाजाची उत्क्रांती एक विलक्षण गुंतागुंतीची पण अत्यंत मनोवेधक, गतीच्या चढउताराची, रंगाच्या विविधतेची व परिणामांच्या क्लिष्टतेची, निर्मिती व विध्वंस करणारी प्रक्रिया असते.

राष्ट्र चालविण्यासाठी पूर्वी वंशपरंपरा राजा आवश्यक असे. आता लोकनियुक्त प्रतिनिधीची लोकशाही राज्यव्यवस्था लागते. लोकशाही स्पर्धात्मक राजकीय पक्षांच्या माध्यमातून चालते.

पारंपारिक अर्थाने राजकीय पक्षांचा उदय व कार्य एका विचारपूर्वक स्वीकारलेल्या ''विचारसरणीवर, तत्त्वांच्या चौकटीत तथा राजकीय तत्त्वज्ञानाच्या (Political Ideology) आधारावर होत राहते. एक काळ होता, जेव्हा हुकूमशाही (राजेशाही), सरंजामशाही, साम्यवाद व समाजवाद तथा मिश्र अर्थव्यवस्था, बाजार समाजवाद अशा पर्यायी स्वरूपात राज्यव्यवस्था काम करीत.''

**२)** विसाव्या शतकाच्या दुसऱ्या अर्धात व सध्या २१ व्या शतकाच्या १ ल्या अर्धात या पर्यायी, स्पर्धात्मक, संघर्षात्मक समाजव्यवस्थांचे अत्यंत बेमालूम पध्दतीने, धिम्यागतीने एकात्मिकरण होत गेले. सध्या कोणत्याही राष्ट्रांत शुध्द भांडवलशाही (स्पर्धात्मक बाजार व्यवस्था) शुध्द समाजवाद वा केंद्रीय नियोजन अशी एकांगी व्यवस्था आहे असे म्हणता येणार नाही. अशा पार्श्वभूमीवर आपण या व्यक्तिनिष्ठ निबंधात प्रथमः

१. राजकारण, धोरण व प्रशासन या संकल्पना स्पष्ट करू व त्यानंतर
२. सध्या (गेल्या काही वर्षांत) भारताच्या सामाजिक उत्क्रांतीच्या प्रक्रियेत निर्माण झालेल्या काही तात्त्विक संघर्षाचा आढावा घेवू व अखेरीस
३. अलीकडच्या काळातील काही महत्त्वाच्या प्रस्तावित / घटित आर्थिक धोरणांचा आढावा घेवू.

## ३. धोरण, राजकारण व प्रशासन

स्वातंत्र्यपूर्व काळात राजकारण हे त्यागाचे क्षेत्र होते. त्रासाची व्यवस्था होती. आज राजकारण भोगाचे व स्वार्थाचे क्षेत्र झाले आहे. राजकारण भोगाचे व स्वार्थाचे करत असताना, सेवा व त्याग यांचे भान व समन्वय ठेवणारे अपवादात्मक राजकीय नेते मिळतात. ही सुखदायक (सीमांत) अशी बाब आहे.

म. गांधी स्वत:चे जीवन जगणे सर्वार्थाने दरिद्री नारायणाशी जुळवून घ्यायचे. सर्व सुखासीन जगण्याचा त्याग त्यांनी केला. पं. नेहरूंनी अनेक वर्षे कारावास भोगला. याचेच मिश्रण देशातल्या अनेक राजकीय

[†]आजीव सभासद क्र. : ६२, भ्रमणध्वनी : ९४२२०४६३८२, ई-मेल : jfpatil@rediffmail.com

नेत्यांनी 'भोगले.'

राजकारण व त्यासाठी धोरण ठरविताना, सर्वात दरिद्री माणसाच्या / कुटुंबाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक प्रश्नांची सोडवणूक करणे, त्याच्या कल्याणात भर पडेल असे धोरण, कार्यक्रम, योजना ठरविणे व त्यांची कार्यवाही करणे हाच एकमेव निकष असावा, असा एक मंतरलेला ताईत म.गांधींनी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना दिल्याचे सर्वांनाच माहीत आहे.

याठिकाणी आपला हेतू मुख्यत: राजकारण धोरण तथा प्रशासन या संकल्पना व्यावहारिक अर्थाने स्पष्ट करणे, त्यांचा परस्पर संबंध, त्यांच्यातील संलग्नता व त्या सर्वांचा समाजावर होणारा परिणाम याचे विवेचन करणे हा आहे.

प्रथम आपण संकल्पना स्पष्ट करू. असे करताना आपण ओघानेच संकल्पनाच्या व्याख्याही देण्याचा प्रयत्न करू. प्रथम राजकारण हा शब्द लक्षात घेऊन या शब्दाची उत्पत्ती राजा या शब्दाशी जोडली जाते. स्वीकृत अर्थाप्रमाणे प्रजेचे रंजन करणारा तो राजा. म्हणजेच प्रजेचे रंजन करण्यासाठी जे करावे लागते ते राजकारण. प्रजेचे रंजन करणे म्हणजे प्रजेचे जगणे चांगले करणे. प्रजेच्या गरजा भागविणे किंवा आधुनिक अर्थाने सर्वसामान्यांचे कल्याण वाढवत समाजाच्या एकूण कल्याणचे कमालीकरण करणे असा अर्थ होतो. म्हणजेच राजकारण या शब्दाचा अर्थ समाजप्रमुखांनी समाजाच्या कल्याणाची वाढ करण्यासाठी जे जे केलेले असते ते सगळे सामान्यत: जगण्यासाठी, चांगले जगण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य व समाजधारक करमणूक यांची आवश्यकता असते. अर्थात, या गोष्टी प्रत्येक कुटुंबाला राज्यव्यवस्थेमार्फत मोफत उपलब्ध करून देणे, असा राजकारणाचा अर्थ होत नाही. तर समाजाच्या प्रत्येक कुटुंब प्रमुखाला त्यांच्या कौशल्याप्रमाणे व क्षमतेप्रमाणे रोजगार उपलब्ध करून देणे. त्यासाठी आवश्यक ती उत्पन्नाची साधने उपलब्ध करून देणे हे अत्यंत महत्त्वाचे असते. म्हणजेच व्यक्ती स्वाभिमानाने व स्वावलंबनाने स्वत:चा व आपल्या कुटुंबीयांचा उदरनिर्वाह करू शकते. अर्थकारण ही राजकारणाची दुसरी बाजू आहे, हे लक्षात घेतल्यास, राजकारण या संकल्पनेचा सर्वात नेमका अर्थ राजकीय नेत्यांनी आपल्या धोरण योजना आणि कार्यक्रम यातून राष्ट्राच्या प्रत्येक नागरिकाला सुयोग्य रोजगार (स्वयंम रोजगार किंवा वेतन रोजगार) मिळवून देणे असाच मानला पाहिजे.

धोरण ही दुसरी संकल्पना. आपण नेहमीच्या व्यवहारात धोरण हा शब्द सहज ओघाने, अर्थ नेमका न लक्षात घेता वापरत असतो. या शब्दाचा अर्थ समजून घेणे महत्त्वाचे आहे. उद्दिष्ट्य पूर्तीसाठी, उपलब्ध साधनसामग्रीचा विशिष्ट कालमर्यादेत कसा वापर करायचा याची योजना व कार्यक्रम ठरविणे म्हणजे धोरण, अशा अर्थाची व्याख्या बेन्ट हॅनसेन या स्वीडिश अर्थशास्त्रज्ञाने केलेली आहे. या निबंधाच्या मर्यादेत धोरणाचा अर्थ साहजिकच सरकारने किंवा राज्यकर्त्यांनी राष्ट्राच्या नागरिकांना रोजगार उपलब्ध करून स्वाभिमानाचे व समाधानाचे जगणे उपलब्ध करून देण्यासाठी उपलब्ध साधनसामग्रीचा विशिष्ट कालमर्यादेत वापर करण्याची योजना व कार्यक्रम असाच अर्थ घेतला पाहिजे.

प्रशासन ही तिसरी संकल्पना. राज्यव्यवस्था राबविण्याची रचना व पध्दत म्हणजे प्रशासन. असे प्रशासन राबविण्यासाठी लोकनियुक्त प्रतिनिधी, सरकारी अधिकारी, त्यांच्या हाताखालचे कर्मचारी या सर्वांना शास्त्रशुध्द सल्ला देणारे तज्ञ व जेथे जेथे संघर्ष निर्माण होतो, त्यातून अन्याय किंवा हिंसा निर्माण होते, तेव्हा योग्य व अयोग्य ठरविण्याची कायद्याची व्यवस्था, पोलीस व्यवस्था, संरक्षण व्यवस्था व कायदे करणारी

विधिमंडळ व्यवस्था या सगळ्यांना आपण एकत्रितपणे प्रशासन म्हणू.

सुरुवातीच्या परिच्छेदामध्ये आपण प्रजेचे रंजन करणारा, जे करतो, त्याला राजकारण म्हणावे अशी नोंद केली आहे. रंजन याचा अर्थ करमणूक नव्हे तर चांगले जगण्याची सुरक्षित व्यवस्था. राजकारण या अर्थाने धंदा किंवा रोजगार मानता येणार नाही. चांगल्या राजकीय नेत्याचा अनुभव लक्षात घेता, राजकारण मुख्यत: त्यागाची जीवनपध्दती असावी असे अभिप्रेत आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये अशाप्रकारचे त्यागाचे जीवन जगत. स्वतंत्र राष्ट्राच्या राज्यव्यवस्थेमध्ये देखील ती व्यवस्था चालविणाऱ्या राजकीय नेत्यांनी त्यागाच्या जीवनपध्दतीतूनच राजकारण करावे हे गृहीत आहे. त्या प्रक्रियेत त्याचे जगणे सन्मानाचे, समाधानाचे व सामाजिक आदराचे आपोआप होते. दुर्दैवाने, आजकाल राजकारण त्यागावर अवलंबून नसून स्वार्थावर, संग्रहावर, लाभावर अवलंबून असावे असेच चित्र दिसते.

सामान्यत: राजकीय व्यवस्था राबविण्यासाठी जी उद्दिष्ट्ये ठरवावी लागतात, त्यासाठी जी योजना करावी लागते, त्यासाठी जे कार्यक्रम ठरवावे लागतात, या सगळ्या गोष्टींना एकत्रितपणे धोरण (Policy) असे म्हणतात. असे धोरण काही उघड उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी व काही प्रछन्न उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी राबविले जातात. लोककल्याण हे उघड उद्दिष्ट असते. त्यासाठी शेती, उद्योग, व्यापार या माध्यमातून रोजगार निर्माण करणे हे राजकारणाचे उघड उद्दिष्ट असते. पण राज्यव्यवस्थेच्या सत्तापदावर सातत्यपूर्ण राहणे व त्यासाठी ज्या मार्गाने सत्तापदावर यायचे असते, ती निवडणूक प्रक्रिया सोयीस्कर पध्दतीने, स्वत:ला चाट न लागता करणे, याला प्रछन्न उद्दिष्ट म्हणावे. जेव्हा प्रछन्न उद्दिष्ट हे उघड उद्दिष्टांपेक्षा अधिक महत्त्वाचे किंवा तेवढेच लक्षात राहते, तेव्हा राजकारणाचे विकृतीकरण सुरू होते.

सामान्यत: धोरण पुढील पाच घटकांवर अवलंबून असते.

१. सत्तेवर असणाऱ्या राजकीय पक्षाचे तत्त्वज्ञान.

२. विधिमंडळावर काम करणाऱ्या सत्ताधारी तसेच विरोधी पक्षातील लोकप्रतिनिधींची सामान्य माणसांच्या कल्याणाप्रती असणारी बांधिलकी.

३. धोरण योजना व कार्यक्रम यांची प्रत्यक्ष कार्यवाही करणारे प्रमुख अधिकारी किंवा प्रशासक यांची वस्तुनिष्ठता.

४. राजकीय नेते व प्रशासक यांना शास्त्रीय स्वरूपाचा सल्ला देणाऱ्या त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांची आपल्या विषयांशी असणारी प्रामाणिकता.

५. माध्यम व्यवस्थेचे स्वातंत्र्य.

या गोष्टी लक्षात घेतल्या तर आजची परिस्थिती काय आहे, याचा सर्वसाधारण जाणत्या माणसाला सहज अंदाज येऊ शकतो.

पहिली गोष्ट अशी की राजकारण करणाऱ्याला त्यागाच्या बैठकीवर आपली कर्तबगारी उभी करावी लागते. हे स्वप्नवत झाले आहे, इतिहास जमा झाले आहे.

राजकारणी लोकांच्या संघटनातून निर्माण झालेल्या राजकीय पक्षांचे यवच्छेदक लक्षण म्हणजे त्यांचा वैचारिक पाया (Ideology). राज्यशास्त्राच्या पुस्तकात या राजकीय विचारांबद्दल भरपूर वाचायला मिळते. त्यातूनच स्पर्धा, स्वातंत्र्य, भांडवलशाही, समाजवाद, साम्यवाद आणि अलीकडच्या काळात बाजार समाजवाद या प्रकारच्या विचारसरणी निर्माण झाल्या. दुर्दैवाने, आजच्या बहुसंख्य राज्यकर्त्यांमध्ये अशा प्रकारच्या विचारसरणीचा किंवा त्यातून निर्माण होणारे धोरण, योजना तथा कार्यक्रम याबद्दल फारशी शास्त्रीय जाण आहे असे वाटत नाही. सत्तेचा उपभोग घेणे, स्वार्थाचे कमालीकरण करणे व तसे करत असताना

झाल्यास लोकांचे कल्याण करणे, अशी व्यवस्था आजकाल सरसकट सगळीकडे दिसते.

वेगवेगळ्या पातळीवर विधिमंडळात काम करणाऱ्या लोकप्रतिनिधींमध्ये सर्वसामान्यांच्या कल्याणाच्या कमालीकरणाशी कोणतेच देणेघेणे असत नाही. तशी बांधिलकी असावी लागते तरच तो राजकारणी, अशा प्रकारची जाणीव राज्यकर्त्यांमध्ये अजिबात नाही. साहजिकच, विधिमंडळामध्ये धोरण व योजना, कार्यक्रम राबविण्यासाठी जे कायदे केले जातात, त्याचे महत्त्व योग्य अर्थाने व पूर्ण प्रमाणात या लोकप्रतिनिधींना कळलेले असत नाही.

त्याहीपेक्षा अधिक दुर्दैवाची बाब अशी की, वेगवेगळ्या जीवनाच्या अभ्यासविषयामध्ये ज्यांना तज्ञ म्हणून प्रतिष्ठा मिळालेली असते, ते राजकीय नेत्यांना किंवा राज्यव्यवस्थेला सल्ला देत असताना शास्त्रीय निकष तथा सामाजिक कल्याणाची गरज यापेक्षा सत्तेची सोय, नेतृत्वाची आवडनिवड व स्वत:चे कल्याण या निकषांवर काम करत असतात.

माध्यम व्यवस्था-वृत्तपत्रे, दूरदर्शन, आकाशवाणी, चित्रपट तसेच ग्रंथ यांच्या स्वतंत्र अभिव्यक्ती स्वातंत्र्यामुळे राज्यव्यवस्था निर्धास्त चालू शकते, अशी भूमिका राज्यशास्त्रज्ञांची होती. दुर्दैवाने, माध्यमाच्या या वेगवेगळ्या प्रकारांचे स्वातंत्र्य, स्वायत्तता, लोक कल्याणाची भावना या गोष्टी कमी होत चालल्या आहेत. राज्यव्यवस्थेकडून उत्पन्न कसे मिळेल? प्रतिष्ठा कशी मिळेल? तसेच दर्जाहीन किंवा लोकरंजन करणारे आविष्कार या माध्यमातून आपला खप कसा वाढेल? यावरच अलीकडे माध्यमे लक्ष देत असतात. लोकांच्या स्वातंत्र्याचे व लोकशाही कामकाजाचे रक्षक ही त्यांची भूमिका मागे पडत चालली आहे.

उपरोक्त वर्णन केलेल्या सर्व मांडणीचा परस्परपूरक परंतु, समाजघातक असा परिणाम दिसतो. तो भ्रष्टाचाराच्या अनेक प्रकारच्या आविष्कारांमध्ये.

साहजिकच, लोकशाही नावापुरती राहते. लोकप्रतिनिधीही लोकांचे प्रतिनिधित्व करत नाहीत. त्यांच्याकडून केले जाणारे कायदे बऱ्याचवेळा विशिष्ट हितसंबंधांना झुकते माप देण्यासाठीच केले जाते. होणाऱ्या कायदेबाह्य किंवा नियमबाह्य वर्तवणुकीला शिक्षा होईलच अशी न्यायव्यवस्था कमी कमी होत जाते. बहुसंख्य प्रशासक स्वार्थ कमालीकरण व आत्मप्रौढी यातच गुंग होऊन जातात. हजारो वर्षांच्या प्रवासानंतर लोकशाहीच्या टप्प्यावर आलेली समाजव्यवस्था कळत नकळत राजेशाही तथा हुकूमशाही या मार्गाने पुढे जावू लागते असे जेव्हा घडते, तेव्हा समाजाच्या कल्याणाचा कार्यक्रम हा राजकारणाचा अर्थ कथाविषय होतो.

### ४. काही धोरणात्मक निर्णय / प्रस्तावाचा आढावा

राज्यव्यवस्था आपल्या कार्यकारी प्रशासनाच्या माध्यमातून धोरणांची कार्यवाही करते. गेल्या २/३ वर्षांत धोरणांच्या पातळीवर मान्य होऊन प्रत्यक्ष कार्यवाही झालेले व सध्या प्रस्तावित असलेले काही धोरणात्मक प्रस्ताव आपण चर्चेसाठी याठिकाणी लक्षात घेत आहोत. ते पुढीलप्रमाणे :

१. नोटाबंदी - कार्यवाही पूर्ण
२. वस्तू व सेवाकर - कार्यवाही चालू
३. निवडणूक रोखे - सध्या प्रस्तावित
४. वित्तीय सोडवणूक व ठेवी विमा विधेयक-२०१७ - सध्या प्रस्तावित
५. आधार सक्ती- सध्या प्रस्तावित - न्याय प्रविष्ट

उपरोक्त धोरणात्मक निर्णयाची आणखी थोडी चिकित्सा करणे गरजेचे आहे.

सामान्यत: आर्थिक धोरणांच्या रचनेत पुढील घटक येतात. चलन धोरण, राजस्व धोरण, औद्योगिक धोरण, व्यापार धोरण, शेती धोरण, श्रम धोरण, सामाजिक धोरण, शिक्षण, आरोग्य.

चलन धोरणात चलन पुरवठा व व्यवस्था, व्याज दर, बँकींग धोरण यांचा समावेश होतो. राजस्व धोरणात कर धोरण, खर्च धोरण, कर्ज धोरण यांचा समावेश होतो. औद्योगिक धोरणात औद्योगिक स्थान, परवाना, व्यवस्थापन यांचा (कंपनी कायदा) समावेश होतो. व्यापार धोरणात आयात, निर्यात, संबंधित कर व मर्यादा, व्यापारी करार, घटक व नियंत्रण यांचा समावेश होतो. शेती धोरणात सिंचन, धारणा क्षेत्र, जमीन खरेदी, पीक रचना, कृषिमाल किंमती, कृषी आदान किंमती, पुरवठा व अंशदाने यांचा समावेश होतो. सामाजिक धोरणात मुख्यत: शिक्षण व आरोग्य यांचा समावेश होतो.

यापैकी चलन धोरण तसेच राजस्व धोरण मुख्यत: 'साधन' प्रधान असतात. त्यातील बदल सर्वस्पर्शी, वास्तव, व्यक्ती निरपेक्ष असतात. याउलट उर्वरित धोरणांचा संबंध संस्थासापेक्ष, व्यक्तीसापेक्ष असण्याची शक्यता अधिक असते. राजकीय आशीर्वादासाठी नंतरची धोरणे अधिक सोयीची, निवडक निर्णय प्रक्रियेची असतात. पण चलन वा राजस्व धोरण राज्यव्यवस्था व नागरिक यांच्यात प्रत्यक्ष वन टू वन संपर्क निर्माण न करता समर्थक हितसंबंध जोपासणे व विरोध हितसंबंध सामोहरम करणे यादृष्टिने अधिक सोयीचे असतात. त्यात राजकारणाचे हिशोब अधिक प्रछन्न असतात. गेल्या काही काळात झालेले धोरणात्मक बदल (उपरोक्त) या प्रकरात बसतात. अशा बदलांना आपण ''निरागस धोरणात्मक बदल'' (Innocuous) असे नाव देवू. सामान्यत: अशा धोरणात्मक बदलाचे स्वरूप साकलिक (Macro) असते. त्यात आंशिक/ आंशिक घटकांचा /क्षेत्रांचा विचार केला जात नाही. होणारे आंशिक परिणाम राष्ट्रीय उत्पन्न बदल दर, रोजगार भाववाढ, विनिमय दर यांच्यात होणाऱ्या बदलांच्या माध्यमातून अप्रत्यक्ष प्रकारे होत असतात. साहजिकच, अशा धोरणात्मक बदलासंबंधी अधिक सार्वत्रिक, सखोल चिकित्सा होणे गरजेचे आहे. अन्यथा 'आपला काय संबंध?' या पध्दतीने धोरणकर्त्यांचे उद्देश लोकशाही चर्चेशिवाय व योग्य त्या विरोधाशिवाय/ समर्थनाशिवाय अंमलात येत जातात. त्याचे दुष्परिणाम जेव्हा लक्षात येतात, तेव्हा उशीर झालेला असतो!

## ५. नोटाबंदी

दि. ८ नोव्हेंबर, २०१६ हा भारताच्या चलन व्यवस्थेच्या इतिहासात एक 'काळा दिवस' म्हणून नोंदविला जाईल. अर्थात, इतिहासकार वस्तुनिष्ठ, शास्त्रशुध्द, प्रामाणिक व कण्याचा असेल तर? ५०० व १,००० रुपयाच्या कागदी नोटा (वैध कागदी चलन) रद्द करतानाच २,००० रुपयाच्या अधिक किंमतीच्या नोटा चलनात आणण्याचा निर्णय धोरणाच्या प्रभावी परिणामाबद्दल संभ्रम निर्माण करणारा आहे. या निर्णयाने काळा पैसा धारकांचा एक गट काही कालावधीसाठी अडचणीत येणार, पण काही काळाने काळ्या पैशाचे नवे धारक अधिक क्षमतेने निर्माण होणार. हे लक्षात घेता नोटाबंदीचे खर्च-लाभ विश्लेषण लक्षात घेणे आवश्यक आहे. नोटाबंदीसाठी विमुद्रिकरण हाही शब्द वापरता येईल.

८ नोव्हेंबर, २०१६ हा भारताच्या आर्थिक इतिहासात एक धक्कादायक निर्णयाचा अविस्मरणीय दिवस ठरणार असे दिसते. त्या दिवशीच्या रात्रीपासून रु.५००/- व रु.१०००/- च्या चलनी नोटांचे विमुद्रिकरण लागू होणार होते. ३० डिसेंबर, २०१६ पर्यंत या जुन्यानोटा सर्व सूचीकृत बँकामध्ये बदलून घेण्याची, जमा करण्याची व्यवस्था करण्यात आली.

त्यातही रक्कम मर्यादा, कालमर्यादा घालण्यात आल्या. देशहिताचा 'निर्णय' तो अत्यंत चुकीचा, नुकसानकारक 'निर्णय' अशा लोकांच्या प्रतिक्रिया या निर्णयावर व्यक्त झाल्या. आतापर्यंत विस्तृत माहिती अनाधिकृत तथा अन्वयाच्या स्वरूपाची, माध्यमातून उपलब्ध झाली आहे. सत्ताधारी पक्ष या निर्णयाचे समर्थन करणार तर विरोधी पक्ष या निर्णयावर प्रतिकूल टीका करणार हे स्वाभाविक आहे.

प्रस्थापित/प्रचलित आर्थिक विश्लेषण पद्धतीमध्ये कोणत्याही निर्णयाचे फायदे काय, तोटे काय, निव्वळ फायदे काय अशी चिकित्सा करता येते. यालाच तांत्रिक भाषेत खर्च-लाभ विश्लेषण (Cost-Benefit-Analysis) असे नाव दिले जाते. त्याच पद्धतीने परवाच्या विमुद्रिकरणाच्या निर्णयाचे शास्त्रशुद्ध, वस्तुनिष्ठ खर्च-लाभ विश्लेषण करणे आता शक्य आहे. हे विश्लेषण राजकीय सोयीचे वा गैरसोयीचे नसते, तर ते राजकारण तटस्थ असते.

आता प्रथम विमुद्रिकरणाचे संभाव्य लाभ/फायदे लक्षात घेवू. सर्वसाधारणपणे विमुद्रिकरणामुळे :

- काळा पैसा (बिनहिशोबी पैसा - बेकायदेशीर पैसा) मोठ्या प्रमाणात कमी होईल. कर न भरता, कायद्याचे उल्लंघन करून, भ्रष्टाचार करून जो पैसा, नोंद न करता, जवळ बाळगला जातो / विविध कारणासाठी वापरला जातो त्यास ''काळा पैसा'' असे नाव दिले जाते. खरेतर सर्व पैसा हा अधिकृत रंगाचाच असतो. तो काळा नसतो. तो काही लोकांनी बेकायदेशीर पध्दतीने मिळविलेला असतो. असा पैसा साठविण्यासाठी मोठ्या दर्शनी मूल्याच्या नोटा सोयीचे साधन असते. म्हणून रु. ५००/- व रु.१०००/- च्या नोटा ज्यामध्ये अंदाजे ८६.४५% चलन आहे. त्या रद्द केल्यास बहुतांश काळा पैसा नष्ट होईल, असा अंदाज होता. पणा ८०% काळा पैसा सोने, चांदी, जमीन, निवासस्थाने, इतर टिकावू वस्तूंमध्ये गुंतविलेला असतो याकडे दुर्लक्ष होते.
- याच अर्थव्यवस्थेमध्ये खोट्या चलनी नोटा, त्याही मोठ्या मूल्याच्या हा एक कटकटीचा प्रश्न असतो. अशा चलनाला 'फेक नोटा, जाली नोटा' असेही नाव दिले जाते. उपरोक्त नोटाबंदीच्या निर्णयामुळे अशा खोट्या नोटाही आपोआप रद्द होतात, अशी धारणा आहे. रद्द झालेल्या नोटांची प्रतिकृती करता येते, तर नव्या नोटांची प्रतिकृती करता येणे शक्य आहे, याकडे आपले दुर्लक्ष होते. सध्या अनेक ठिकाणी नव्या नोटा सापडताहेत. त्या खऱ्या किती, खोट्या किती?
- मोठ्या नोटांच्या आधारे पोसला जाणारा दहशतवाद व हिंसा कमी करण्यास विमुद्रिकरणाचा उपयोग होईल असे वाटते. पण दहशतवाद व हिंसा या गोष्टी मौलिक धातू, नशाकारक द्रव्ये, शस्त्रांची देवाणघेवाण व मूलतः विध्वंसक प्रवृत्तीचा परिपाक असतो.
- मोठ्या नोटाबंदीमुळे सरकारच्या कर महसुलात वाढ होईल, असा अंदाज आहे. अंदाजे २.५ लाख कोटी रुपये जमा होणाऱ्या नोटांतून उघड होणाऱ्या अघोषित (पूर्वी) उत्पन्नावरचा कर, उपकर व दंड अशा स्वरूपात महसुली उत्पन्न वाढेल.
- या वाढीव कर महसुलाचा वापर १. बँकांच्या भांडवलीकरणासाठी, २. पायाभूत सुविधांच्या विस्तार / विकासासाठी तथा ३. गरिबांच्या निवासाच्या बांधकामासाठी वापरला जाईल, अशी शक्यता आहे.
- या निर्णयामुळे बँकांच्या कारभारात दीर्घकाळात घट होईल असा अंदाज आहे.

- मध्यवर्ती बँकेचा (RBI) चलन निर्मितीचा खर्च कमी होईल. अर्थात, हे मुख्यत: रोखरहित व्यवहारांच्या वाढीवर अवलंबून असेल.
- लोकांच्या जवळील रोख नोटांचे प्रमाण कमी झाल्यास, लोकांची सीमांत उपभोग प्रवृत्ती कमी होईल, बचत वाढेल व गुंतवणूक वाढेल. साहजिकच, राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा वेग वाढेल, अशीही धारणा आहे.
- नोटाबंदीमुळे उत्पन्न व विशेषत: संपत्ती विषमता कमी होण्यास मदत होईल असाही अंदाज आहे.

एका बाजूला हे लाभ दिसत असताना, विमुद्रिकरणाच्या निर्णयाचे काही गंभीर दुष्परिणाम (खर्च) तथा तोटेही लक्षात घ्यावे लागतील.

- काही जाणत्या अर्थशास्त्रज्ञांच्या अंदाजाप्रमाणे विमुद्रिकरणामुळे राष्ट्रीय उत्पन्नात किंवा त्याच्या वृध्दीदरात २% वार्षिक घट येऊ शकेल. म्हणजेच अंदाजे वार्षिक २.७ लाख कोटी रुपयांनी राष्ट्रीय उत्पन्न घटू शकेल. परिणामी, मागणीची घट, रोजगाराची घट व नंतर आणखी मंदी असे दुष्टचक्र निर्माण होऊ शकते.
- विमुद्रिकरणाच्या निर्णयाचे दोन प्रत्यक्ष खर्च असतात. रद्द केलेल्या (पूर्व मुद्रित) नोटांचा खर्च तसेच पर्यायी नव्या नोटा छापण्याचा खर्च. याचा अंदाज सध्या प्राप्त नाही.
- विमुद्रिकरणामुळे नोटा बदलण्यासाठी, जमा करण्यासाठी व नव्या नोटा मिळविण्यासाठी लोकांना जो त्रास झाला / होणार (रांगा, गमावलेले कामाचे त्रास, वृध्दांचे हाल इ.) त्याचे मौद्रिक मूल्य. खरे तर दशलक्षावधी लोकांच्या हालाचे मौद्रिकीकरण करणे शक्य नाही.
- दि.१५.१२.२०१६ पर्यंत विमुद्रिकरणाच्या निर्णयाचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष परिणाम म्हणून ८० च्या वर मृत्यू झाले होते. त्याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्च याचे वास्तव मापन करणे अशक्य आहे.
- नोटाबंदीनंतर निर्माण झालेल्या चलन टंचाईवर उपाय म्हणून अनेक रोखरहित विनिमय पध्दतींचा पुरस्कार सुरू आहे. त्याचा वापर करण्यासाठी कर सवलती तसेच अंशदाने प्रस्तावित करण्यात आली आहेत. त्यांचाही खर्च हजारो कोटी रुपयांचा होऊ शकतो.
- नोटाबंदीच्या काळात बँक कर्मचाऱ्यांवरही ताण पडला आहे. काही कर्मचाऱ्यांचे मृत्यू झालेत. याचेही मौद्रिक मापन सध्या उपलब्ध नाही.
- या सर्व प्रक्रियेत लोकांचा चलनावरचा विश्वास, बँकांवरचा विश्वास यांना प्रचंड धक्का बसला आहे. चलन व बँकींग या दोन्ही १००% लोक विश्वासाच्या संस्था आहेत. त्याला कोणताही धक्का बसू नये. मा.सर्वोच्च न्यायालयानेही 'बँकांनी विश्वास टिकविला पाहिजे' असे निरीक्षण नोंदवले आहे.
- या सर्व प्रक्रियेत संसदीय लोकशाही पध्दतीच्या काही परंपरा मोडल्या जाताहेत असे वाटते. 'चलन विधेयक' या नावाखाली राज्यसभा टाळली जात आहे, अशी भावना आता निर्माण झाली आहे.
- भारतीय चलनाबद्दल निर्माण झालेल्या साशंकतेमुळे डॉलर तथा पौंडाच्या स्वरूपात रुपयाचा विनिमय दर घसरत आहे. त्याचा परिणाम चालू खात्यावरील तूट वाढण्यात होऊ शकतो.
- या सर्व परिस्थितीमध्ये सर्वच पक्षांकडून राजकीय सभ्यतेचा बळी पडत आहे. यातून राजकीय अस्थैर्य निर्माण होणार नाही, हे पाहणे महत्त्वाचे आहे.

या सर्व लाभ-खर्च घटकांचा समन्वित विचार करता हे उघड होते की, याबाबतीत (नोटाबंदी) खर्च-

लाभ गुणोत्तर प्रतिकूल ठरण्याचीच शक्यता अधिक दिसते. म्हणूनच हेतूशुध्दता गृहीत धरूनही, विमुद्रि-करणाचा निर्णय, माजी पंतप्रधान व अर्थशास्त्रज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांच्या मते, 'व्यवस्थापनाचे अवाढव्य अपयश' या सदरातच समाविष्ट करावे लागेल. राष्ट्रीय संरक्षण सल्लागार श्री.अजित के.डोवल, स्वदेशी जागरण मंचचे एस.गुरूमूर्ती, महेश जेठमलानी व प्रा.आर.वैद्यनाथन यांच्या एक शोध निबंधाप्रमाणे (२०११) परदेशात गेलेला काळा पैसा राष्ट्रद्रोह मानला पाहिजे. पण देशातील काळा पैसा उत्पादक असतो, असा निष्कर्ष भारतीय जनता पक्षाने आयोजित केलेल्या अहवालाप्रमाणे (Indian Black Money Abroad - In Secret Banks and Tax Haven) काढावा लागतो. परदेशातील काळा पैसा आणता येत नाही, म्हणून हा देशांतर्गत केलेला ''उपद्व्याप'' अल्प काळात त्रासाचा, अनुत्पादक तर दीर्घकाळात लाभापेक्षा खर्च अधिक करणारा ठरेल असे वाटते.

## ६. सिद्धांत व व्यवहार

राज्यव्यवस्थेचे प्रधान लक्षण म्हणून कर व्यवस्थेचा विचार करावा लागेल. विधीसिध्द चलन हे दुसरे लक्षण. राज्यव्यवस्थेमध्ये राजेशाही, सरंजामशाही, हुकूमशाही, तथा लोकशाही अशा विविध व्यवस्था येतात. या प्रत्येक व्यवस्थेत 'राज्यव्यवस्था' सामाजिक कराराच्या (लेखी वा अभिप्रेत) आधाराने नागरिकांकडून सक्तीची काही वर्गणी गोळा करते. त्यांच्या बदल्यात राज्य व्यवस्थेने प्रत्येक कर दात्यास स्वतंत्रपणे एखादी वस्तू वा सेवा देण्याचे बंधन नसते. पण सामूहिक वस्तू वा सेवा दिली जाते. प्रख्यात जर्मन अर्थशास्त्रज्ञ जोसेफ शुंपीटर यांच्या मते, प्रत्येक राष्ट्राचा, राज्यव्यवस्थेचा इतिहास एका अर्थाने त्या राज्यव्यवस्थेच्या कर पध्दतीचा इतिहास असतो.

राज्यावर नागरिकाला वस्तू व सेवा देण्याचे व्यक्तिगत बंधन न घालता, नागरिकांकडून वसूल केली जाणारी चलनातील (प्रारंभी वस्तू व सेवा) सक्तीची वर्गणी म्हणजे कर अशी व्याख्या अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ प्रा. सेलिग्मन यांनी केली आहे. राज्यव्यवस्था चालविण्यासाठी, सरकारचा खर्च भागविण्यासाठी सरकारने नागरिकांकडून घेतलेली सक्तीची वर्गणी असा कराचा अर्थ होतो.

करामुळे - सरकारला महसूल मिळतो.

- नागरिकत्वाची पूर्तता
- आयात-निर्यात नियंत्रण करता येते.
- किंमत पातळीवर नियंत्रण ठेवता येते.
- विषमता कमी करणे शक्य असते.
- समाज, आरोग्य, शांतता घातक उत्पादन / उपभोग प्रतिबंधित करता येतो. (Sumptuary Taxation)
- समाज धारक उपभोग / उत्पादनास प्रोत्साहन देता येते.

शांततेच्या काळात कर महसूल हे सरकारचे उत्पन्नाचे प्रमुख साधन असते.

कर सामान्यत: दोन प्रकारचे असतात. अ) प्रत्यक्ष कर, ब) अप्रत्यक्ष कर. भारताचा विचार करता प्रत्यक्ष करामध्ये प्राप्तीकर, संपत्तीकर, देणगीकर, निगमकर, वारसाकर, जमीन महसूल, मत्ता कर इ. चा समावेश होतो. तर अप्रत्यक्ष करामध्ये आयात / निर्यात कर, उत्पादन शुल्क, दारू कर, विक्री कर इ. चा समावेश होतो. प्रत्यक्ष कर ज्याने भरावा अशी कायद्याची अपेक्षा असते, त्यांच्याकडूनच वसूल होतो. त्याचा भार दुसऱ्यावर ढकलता येत नाही. अप्रत्यक्ष कर मात्र असतो एकावर व त्याचा प्रत्यक्ष भार मात्र दुसऱ्यावर (सामान्यत: ग्राहक, उपभोक्ता यांच्यावर) ढकलता येतो. प्रगत देशात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कर महसुलाचा एकूण महसुलात जवळजवळ समान हिस्सा असतो.

अविकसित देशात, अप्रत्यक्ष कराचा हिस्सा एकूण महसुलात अधिक (७०-८०%) पर्यंत असतो. वस्तू व सेवाकर हा अलीकडचा जगभर सर्वात महत्त्वाचा अप्रत्यक्ष कर आहे.

प्रत्यक्ष कर व्यक्तीच्या कर देय क्षमतेवर (उत्पन्न, संपत्ती, जमीन, मत्ता, वारसा हक्क इ.) अवलंबून असतो. क्षमतेच्या प्रमाणात तो वाढतो. बहुधा तो पुरोगामी असतो. अप्रत्यक्ष कर मात्र व्यक्तिच्या उपभोगावर अवलंबून असतो. परिणामी, ते प्रतिगामी असतात. त्यातल्या त्यात त्यांच्यात पुरोगामित्व आणण्यासाठी आवश्यक गोष्टी / सेवांवर अल्प कर तर सुखाच्या, चैनीच्या गोष्टी / सेवांवर अधिक कर असा ढोबळ नियम अप्रत्यक्ष कर दराच्या बाबतीत असतो.

म्हणूनच -

१. जीवनावश्यक / अत्यावश्यक वस्तू / सेवा यांवर अप्रत्यक्ष कर शून्य दराने घेतात.

२. दैनंदिन गरजेच्या, पण अत्यावश्यक अशा वस्तू व सेवा सोडून इतर सामान्य वस्तू / सेवांच्यावर अप्रत्यक्ष कर कमी दराने (Merit Rate) (सामान्यतः सरासरी ५%) असतात.

३. यापेक्षा वरच्या स्तरावरच्या सुखदायक वस्तू/ सेवांवर मात्र १०% ते १५% दराने (Standard Rate) अप्रत्यक्ष कर आकारावेत अशी पध्दत, परंपरा आहे.

४. ऐषोआरामाच्या/चैनीच्या वस्तू व सेवांवर मात्र १५% ते २०% असा उच्चस्तर अप्रत्यक्ष कर आकारला जातो.

५. ज्या वस्तू व सेवा घातक (Demerit) असतात, त्यांच्या बाबतीतच २५% ते ३०% असा उच्चस्तर अप्रत्यक्ष कर आकारला जातो.

६. वस्तू / सेवा कर कायद्यात राष्ट्रीय आपत्तीच्याप्रसंगी अधिक महसूल संकलनासाठी काही वस्तू व सेवांवर अतिरिक्त कर दराने (४०%) कर आकारण्याची तरतूद आहे.

साहजिकच, भारताचा वस्तू / सेवा कर 'अनेक दर' पद्धतीवर अवलंबून आहे. इतर पाश्चात्य देशात वस्तू / सेवा कर एकाच दराने सर्वच वस्तू / सेवा करांसाठी आकारला जातो. जेव्हा समाजात उत्पन्न पातळीची विषमता अल्प प्रमाणात असते व सर्वांच्याच उपभोगात 'एक जिनसीपणाची' शक्यता वाढते / असते. तेव्हा एकाच दराची वस्तू / सेवा कर व्यवहार्य तसेच उत्पादक तसेच अधिक प्रमाणात समन्यायी ठरतो. दुर्दैवाने, भारताच्या आर्थिक व्यवस्थेत मोठी विषमता असल्यामुळे विविध वस्तू / सेवा गटांसाठी वेगवेगळे कर दर महसूल कमालीकरणासाठी व समन्यायासाठी आवश्यक ठरतात.

भारताच्या वस्तू / सेवा कर परिषदेने याबाबतीत उपरोक्त शास्त्रीय व सामाजिक वास्तवाचे भान ठेवून, कराचे दर ०, ५, १२, १८, २८% असे अनेक ठेवले आहेत. अनेक दर व्यवस्थेमुळे कर पूर्तता करताना अनेक प्रश्न निर्माण होतात. क्लिष्टता वाढते. वस्तू / सेवांचे स्वरूप, त्यांच्या उपभोगाची सामाजिक रचना, त्यांचा उत्पादन, रोजगार यावर होणारा परिणाम, व्यापारी वर्गाची कडवट प्रतिक्रिया, कर सल्लागारांची भूमिका, तज्ञांचे मत व वस्तू / सेवा कर परिषदेत झालेल्या साधकबाधक चर्चेनंतर अनेक वस्तू / सेवांवरील कराचे दर अलीकडेच लक्षणीय प्रमाणात - २८% वरून १८% पर्यंत कमी केले आहेत. (काही बाबतीत अधिकही)

त्यानंतर भारताच्या प्रमुख आर्थिक सल्लागार श्री. अरविंद सुब्रमणियन यांनी दिलेल्या जाहीर मुलाखतीत पुढील गोष्टी स्पष्ट केल्या आहेत.

१. जमीन, इमारती व नैसर्गिक वायू या गोष्टीही वस्तू व सेवा कर पात्र ठरतील.

२. १२% व १८% या दोन दरांचे सरासरी मिश्र दर - १५% सुरू करण्यात येईल.

३. २८% चा कर दर मुख्यत: चैनीच्या घातक, अगुणात्मक (Demerit) वस्तू / सेवा यासाठीच वापरला जाईल. म्हणजेच सध्याच्या चार टक्के कर दराऐवजी फक्त ५%--१५%--२८% अशीच कर दर रचना असेल.

वस्तू व सेवा कर दर रचनेतील अनेकत्वाचे स्पष्टीकरण करताना श्री. सुब्रमणियम् म्हणाले की, In India, we will never get one slab. कारण, भारताच्या राजकीय संस्कारात समाजवादी प्रभाव, योग्य कारणासाठी (Good Reason), विषमता मोठी आहे.

अनेक वस्तू व सेवांच्या कर दरात लक्षणीय कपात केल्यानंतर 'सेंट्रल बोर्ड ऑफ एक्साईज अँड कस्टमर्स'च्या अध्यक्षांनी - श्री. वनाजा सरणा यांनी देशातील प्रमुख उत्पादक, व्यापारी कंपन्यांना कर कपातीचा लाभ घटलेल्या किंमतीत ग्राहकांना द्यावा असे मार्गदर्शन केले आहे.

तसे न करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी पाच सदस्यांचे नफेखोरी प्रतिबंध राष्ट्रीय अधिमंडळ (NAPA) स्थापन करण्याचे निर्देश जारी केले आहेत. वस्तू व सेवा करांची गाडी नेमक्या वेगाने योग्य रूळावर येण्याची प्रक्रिया सुरू झाली ही आनंदाची व राष्ट्रहिताची बाब आहे.

## ७. वित्तीय सोडवणूक व ठेवी विमा विधेयक - २०१६

गेल्या काही वर्षांतील उत्क्रांत झालेला व दि.१ जुलै, २०१७ ला अंमलात आलेला एक राजस्व बदल म्हणजे वस्तू व सेवा कराचा प्रत्यक्ष प्रारंभ. एक राष्ट्र, एक (अप्रत्यक्ष) कर व एक बाजारपेठ (मोठी) परिणामी अधिक श्रम विभागणी अधिक तंत्रविज्ञान, अधिक गुंतवणूक, अधिक उत्पादकता, अधिक रोजगार व अधिक कल्याण या गृहीतावर हा कर (पूर्वीचे केंद्राचे आठ व राज्यांचे नऊ अप्रत्यक्ष कर रद्द करून) संघ राज्यीय सहमतीने लागू झाला. त्याच्या प्रत्यक्ष कार्यवाही संबंधी निर्माण झालेल्या अनेक अडचणी जी.एस.टी. परिषदेमार्फत सोडविल्या जात आहेत. वाढत्या दुरूस्तीबरोबर वस्तू व सेवा कराची महसुली उत्पादकता झपाट्याने वाढत आहे. कालौघात तो देशाच्या, नागरिकांच्या (उपभोक्त्यांच्या) व उत्पादकाच्या हिताचा ठरणार अशी लक्षणे आहेत. वस्तू व सेवा कराच्या दर रचनेबद्दल अजूनही चर्चा चालू आहे. वस्तू व सेवा कर एकदरीय असावा की बहुदरीय असावा, अशी चर्चा आहे. कालांतराने आर्थिक विषमता कमी झाल्यानंतर एकदरीय वस्तू व सेवा कर योग्य ठरेल. पण सध्याची टोकाची विषमता लक्षात घेता, सध्याची वस्तू व सेवा कराची बहुदरीय व्यवस्था समन्यायी वाटते.

संसदेमध्ये 'वित्तीय सोडवणूक व ठेवी विमा विधेयक-२०१६' (Financial Resolution and Deposit Insurance Bill-2016) ऑगस्ट १७ मध्ये मांडले गेले. त्याची सखोल चिकित्सा संसदेची संयुक्त समिती करीत आहे.

या विधेयकाच्या तरतुदीसंबंधात अनेक प्रश्न, शंका, भीती व्यक्त केल्या जात आहेत. लाखोंच्या सहीने मा.अर्थमंत्र्यांच्याकडे निवेदन सादर झाल्याचे कळते. मुद्रित माध्यमातून प्रश्न उपस्थित करणारे तसेच 'सर्व काही ठीक आहे' अशी भूमिका मांडणारे लेख व बातम्या येत आहेत. बँकींग व्यवस्थेचे आरोग्य व स्थैर्य एकूण अर्थव्यवस्थेच्या आरोग्यासाठी व देशाच्या चलन, पतव्यवस्थेबद्दलच्या लोकविश्वासासाठी महत्त्वाची असतात.

बँकींग व्यवस्थेचा पायाच मुळी 'विश्वास' या संकल्पनेवर आधारित आहे. बँकांचे स्वत:चे भांडवल अल्प असते. लोकांच्या ठेवीवर बँका चालतात.

ठेवलेली ठेव, पूर्णत: वा भागश:, मागताक्षणी बँका ठेवीदाराला परत करतील, अशा विश्वासावर लोक ठेवी ठेवतात. सर्व ठेवीदार एकाच वेळी सर्व ठेवी परत मागत नाहीत. या विश्वासावर बँका इतरांना कर्ज पुरवठा करतात. दिलेली कर्जे, सव्याज योग्य हप्त्यांनी वेळोवेळी परत येतील, असाही विश्वास असतो. ठेवीदारांनी मागताक्षणी ठेव रोखीने परत करण्याची बँकेची कुवत म्हणजे रोखता (Liquidity) तर दिलेल्या कर्जाच्या परतफेडीच्या खात्रीवर मिळणारे, जादा व्याजाच्या स्वरूपातील उत्पन्न म्हणजे लाभप्रदता. जोपर्यंत बँका कर्जदारांना कर्जे देताना त्यांचे चारित्र्य, क्षमता, भांडवल व पत या निकषावरच निर्णय घेतात, तोपर्यंत काळजी नसते. दुर्दैवाने, सध्या भारतात अनेक सरकारी व खाजगी व्यापारी बँकांच्या अलाभदायी मत्ता ८-९ लाख कोटी रुपयांच्या घरात गेल्या आहेत.  थकबाकी वाढत आहे. परिणामी, अनेक बँका व उद्योगसंस्था नादारी/कर्ज-बाजारीपणाच्या कड्यावर आलेल्या आहेत.  अंतर्गत कर्जे, वशिलेबाजी, भ्रष्टाचार, राजकीय दबावाखालचे कर्ज निर्णय या गोष्टी याला कारणीभूत आहेत.

दुसऱ्या बाजूस नव्या आर्थिक धोरणाच्या नशेत, व्यवसाय सोपेपणाच्या हव्यासापोटी कंपनी कायदा तसेच नादारी/कर्जबाजारीपणाची संहिता (२०१६) याच्या फेररचना झाल्या आहेत.  हे करत असताना कल्याण-कमालीकरण (कामगार, उपभोक्ता इ.) या गोष्टी दुय्यम व उद्योजक, भांडवलदार यांचे कल्याण म्हणजेच नफा प्रधान अशी धारणा दिसते.

मधल्या काळात, १९६५ नंतर प्रथम सामाजिक नियंत्रण (१९६६) व नंतर १९६९ ला पतव्यवस्था राष्ट्रीय आर्थिक विकासासाठी वापरण्यासाठी बहुतांश बँकांचे राष्ट्रीयकरण झाले.  राष्ट्रीयकृत बँकांच्या संदर्भात ठेवीदारांच्या प्रती सरकारची जबाबदारी संपूर्ण झाली व १९६१ चा ठेवी विमा व कर्ज हमी कायदा मर्यादित महत्त्वाचा झाला. आता तर ज्या दिवशी 'वित्तीय सोडवणूक व ठेवी विमा' विधेयक २०१६ संसदेत मंजूर होईल, त्या दिवशी १९६१ च्या ठेवी विमा कायद्याचा अंमल रद्द होईल. साहजिकच 'वित्तीय सोडवणूक व ठेवी विमा विधेयक २०१६' च्या पोटात काय आहे, त्याचे नावीन्य काय, त्यात निर्माण होणारे प्रश्न कोणते व काही महत्त्वाचे पर्याय काय आहेत, याची प्राथमिक मांडणी करणे आवश्यक आहे. 'वित्तीय सोडवणूक व ठेवी विमा विधेयक २०१६'च्या प्रास्ताविकात पुढील उद्देश स्पष्ट केले आहेत.

१. अडचणीतील, वित्तीय सेवा देणाऱ्या संस्थांना बँका, (विमा कंपन्या इ.) सोडवणूक (Resolution) उपलब्ध करणे.

२. विशिष्ट वित्तीय सेवा उपभोक्त्यांना ठेवी विमा उपलब्ध करून देणे.

३. व्यवस्थेसाठी महत्त्वाच्या असणाऱ्या वित्तीय संस्था निश्चित करणे. (अडचणीतील वित्तीय संस्था)

४. संबंधित वित्तीय सेवा संस्थांच्या उपभोक्त्यांना व सार्वजनिक निधींना जमेल त्या प्रमाणात संरक्षण देण्यासाठी व वित्तीय व्यवस्थेला स्थैर्य व लवचिकता (Resiliernce) देण्यासाठी एका निगम संस्थेची स्थापना करणे.

५. इतर तद्जन्य गोष्टी करणे.

या गोष्टी करण्यासाठी विधेयकाच्या भाग-३ प्रमाणे 'सोडवणूक महामंडळ' (Resolution Corporation) सरकारी अधिसूचनेने स्थापन केले जाईल. वित्तीय सेवा पुरवठादार याची व्याख्या नादारी व दिवाळखोरी संहिता (२०१६) कलम (१७) मध्ये दिल्याप्रमाणे असेल (तशी अधिकृत मान्यता असलेली कोणतीही संस्था). 'सोडवणूक महामंडळ' यांचे कार्य पाहण्यासाठी / करण्यासाठी संचालक मंडळ (Board) असेल व त्यात

११ सदस्य असतील. (वित्त खाते एक, भारतीय रिझर्व बँक एक, सेबी, विमा नियमन व विकास अधिकार मंडळ एक, पेन्शन फंड नियमन व विकास मंडळ एक, तीन पूर्णवेळ केंद्र सरकारचे अधिकारी व दोन स्वतंत्र संचालक) अशी या संचालक मंडळाची रचना असेल.

सोडवणूक महामंडळ पुढील कार्ये करेल.

- ठेवी विमा पुरविणे.
- वित्तीय सेवा पुरवठादार यांचा 'व्यवहार्यता धोका' (Risk to Viability) ठरविणे.
- वित्तीय सेवा पुरवठादार याची तपासणी करणे.
- अडचणीतील वित्तीय सेवा पुरवठादार याची सोडवणूक करणे.
- टोकाच्या परिस्थितीत दिवाळखोरी प्रक्रिया राबविणे.
- अधिकार मंडळाचे निधी 'महामंडळ विमा निधी'मध्ये गुंतविले जातील.

या मंडळाला नागरी न्यायालयाचा दर्जा व अधिकार असेल.

वित्तीय सोडवणूक मंडळ व ठेवी विमा कायद्याचे कलम २५ अत्यंत महत्त्वाचे आहे. या कलमाखाली आकार, क्लिष्टता, व्यवहार प्रमाण, इतर वित्तीय संस्थांशी संबंधता इ. घटक लक्षात घेऊन महामंडळ एखाद्या वित्तीय सेवा पुरवठादाराचे स्थान 'व्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाची वित्तीय संस्था' आहे किंवा नाही हे ठरवेल. अशा संस्थांवर महामंडळाचे अधिक कडक नियंत्रण / पर्यवेक्षण असेल. महामंडळ योग्य नियामक संस्थेच्या सल्ल्याने ठेवीदाराला त्याच्या ठेवीबद्दल एकूण किती रक्कम द्यायची हे ठरवेल? ही रक्कम मूळ ठेवी इतकी वा कमी असू शकेल. कलम २२ (२) (ल) प्रमाणे :

- एखाद्या संस्थेचा कारभार दुसऱ्या वित्तीय संस्थेला देणे.
- एखाद्या संस्थेच्या ठेवी दुसऱ्या संस्थेकडे हस्तांतरीत करणे.
- मालमत्तेचे हस्तांतरण करणे.
- गरजेप्रमाणे जोड संस्था (Bridge Institution) स्थापन करणे.

हेही अधिकार महामंडळाला असतील. या सर्व बाबतीत ठेवीदारांच्या हक्कावर व हितावर अतिक्रमण होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे.

### व्यवहार्यता धोका (Risk of Viability)

योग्य नियामकाच्या साहाय्याने महामंडळ संरक्षित वित्तीय सेवा पुरवठादारांचे धोका वर्गीकरण करण्यासाठी भांडवल पर्याप्तता, मत्ता, गुणवत्ता, व्यवस्थापन क्षमता, प्राप्त कार्यक्षमता, तरफ क्षमता, रोखता, संस्थेची प्रतिकूल बाजार संवेदनशीलता, कायद्याचे अनुपालन तसेच वित्तीय सेवा संस्थेच्या पालक संस्थेची (Holding Company) देशातील व परदेशातील, अपयशी ठरण्याची शक्यता (धोका) हे घटक लक्षात घेऊन, गांभीर्याच्या वाढत्या प्रमाणात पुढीलप्रमाणे वर्गीकरण करेल.

अ. अल्प धोका संस्था (Low Risk) - स्वीकार्य पातळीच्या खाली अपयशाची शक्यता असणारी संस्था.

ब. सर्व साधारण धोका संस्था (Moderate Risk) - जेव्हा अपयश शक्यता स्वीकार्य अपयश संभाव्यतेच्या बरोबर किंवा किंचित खाली असणारी संस्था.

क. ठोस धोका संस्था (Material Risk) - जेव्हा अपयश शक्यता स्वीकार्य अपयश संभाव्यतेच्या किंचित अधिक असते तेव्हा धोका ठोस असतो.

ड. विशेष धोका संस्था (Immineat Risk) - जेव्हा अपयश शक्यता स्वीकार्य संभाव्य धोक्यापेक्षा लक्षणीय जास्त असते तेव्हा विशेष धोका असतो.

इ. अरिष्टात्मक तात्काळ धोका (Critical Risk) - जेव्हा वित्तीय सेवा संस्था अपयशी होण्याची शक्यता स्वीकार्य अपयश संभाव्यतेपेक्षा बरीच अधिक असते. व संरक्षित वित्तीय संस्था आपल्या ग्राहकांची देणी देऊ शकणार नाही, अशी परिस्थिती निर्माण होते. तेव्हा धोका अरिष्टात्मक तात्काळ स्वरूपाचा होतो.

**पुनर्प्रस्थापना योजना (Restolation Plan) तथा सोडवणूक योजना (Resolution Plan)**

जेव्हा संरक्षित वित्तीय सेवा पुरवठादार व्यवहार्यतेसाठी ठोस धोका किंवा विशेष धोका (Material or Immineat) या वर्गात मोडतात. तेव्हा अशा वित्तीय संस्थांनी योग्य नियामकाकडे 'पुनर्रचना योजना' त्यांचे तसे वर्गीकरण झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सादर करायच्या आहेत. पुनर्प्रस्थापना योजनेची एक प्रत सोडवणूक महामंडळाला व सोडवणूक योजनेची एक प्रत नियामक संस्थेसही १५ दिवसांच्या कालावधीत सादर करावी लागेल.

**पुनर्प्रस्थापना योजनेत**

- मत्ता व देयकांची नेमकी माहिती.
- इतर तद्जन्य देयता.
- सर्वसाधारण धोका गटात वर्गीकृत होण्यासाठी नियोजित उपाय योजना.
- किमान साधारण धोका गटात वर्गीकृत होण्यासाठी उपाय योजना.
- उपाय योजनेची कालमर्यादा वा वेळापत्रक.
- इतर संबंधित माहिती द्यावी लागेल.

त्याचप्रमाणे प्रत्येक 'सोडवणूक योजने' मध्ये पुढील तपशील नेमका असावा.

- संरक्षित वित्तीय सेवा पुरवठादाराच्या मालमत्ता व देयकांची नेमकी माहिती.
- तद्जन्य देयतांची माहिती.
- विमा देणाऱ्या संस्थेच्या आवश्यक जबाबदाऱ्या.
- सहभागात सेवांची नेमकी माहिती.
- प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे 'वित्तीय बाजार पायाभूत यंत्रणे'चा वापर करण्याची शक्यता.
- इतर आवश्यक / पूरक वैधानिक माहिती.

याचबरोबर विमा कंपन्या (त्यांची स्थिती अडचणीची असल्यास) पुनर्विम्याच्या संरक्षणाचे हस्तांतर, कार्यात्मक व व्यावहारिक निकषावर विम्याचे संरक्षण आणि सातत्य टिकविण्याच्या तरतुदी, तसेच विम्याच्या संरक्षणाची उपलब्धता याचीही माहिती देणे आवश्यक आहे.

उपरोक्त पुनर्प्रस्थापना योजना तसेच सोडवणूक योजनांची अद्यावत रचना दर ६ महिन्यांनी झाली पाहिजे.

जेव्हा वित्तीय संस्थेला अरिष्टात्मक तात्काळ धोक्याची स्थिती निर्माण होते, तेव्हा सोडवणूक महामंडळावर आपोआप रिसिव्हरची जबाबदारी येते. सोडवणूक महामंडळ, स्थापन केलेल्या 'कार्पोरेशन इन्शुरन्स फंडातून' कलम ४८ प्रमाणे संरक्षित वित्तीय सेवा पुरवठादाराला पुढील पध्दतीने सोडवणूक देवू शकेल :

- संस्थेची सर्व मत्ता व देयता महामंडळाच्या मान्यतेच्या दुसऱ्या 'व्यक्ती'ला देऊ शकेल.
- कलम ५० प्रमाणे 'ब्रिज सर्व्हिस प्रोव्हायडर' निर्माण करू शकेल.
- कलम ५२ मधील 'बेल इन' पध्दतीचा (भरपाई) वापर करू शकेल.
- एकत्रीकरण किंवा समावेशन करून.
- संस्था ताब्यात घेणे.
- प्रकरण १४ च्या तरतुदीप्रमाणे संस्था दिवाळखोरीत काढणे.

वरीलपैकी कोणत्याही पर्यायांचा एकत्रीकरणाने वापर करणे.

या नव्या प्रस्तावित वित्तीय कायद्याचे कलम ५२ महत्त्वाचे आहे. या कलमाप्रमाणे :

- अडचणीतील वित्तीय सेवा पुरवठादाराला / संस्थेला- बेल-इन साधन किंवा भरपाई साधन तरतूद करून सोडवणूक करू शकेल. भरपाई तरतूद पुढीलपैकी एक किंवा त्यांचे एकत्रीकरण असू शकेल.
- संरक्षित वित्तीय सेवा संस्थेचे एखादे देणे रद्द करणे.
- संबंधित संस्थेच्या देण्याची रचना, स्वरूप बदलून.
- संबंधित संस्थेचे कर, समझोते रद्द करून.

म्हणजेच कलम ४८ व कलम ५२ मधील तरतुदी ठेवीदारांच्या संरक्षणाचे किती काम करतात हे यामध्ये ठेव विमा संरक्षित ठेवी, ग्राहकांची संस्थेकडील मालमत्ता पाहणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांची देणी याचा यात समावेश नाही. सोडवणूक योजनेची कार्यवाही कमाल दोन वर्षांच्या आत पूर्ण झाली पाहिजे, अशी प्रस्तावित कायद्यात तरतूद आहे. प्रस्तावित कायद्याच्या प्रकरण १३ मध्ये (कलम ५७) 'अरिष्टात्मक, तात्काळ धोका' असे वर्गीकरण झाल्याचे सूचनापत्र संस्थेला मिळाल्यापासून सोडवणूक महामंडळ 'दिवाळखोरी हस्तक' म्हणून (Receiver) काम पाहतील. सोडवणूक महामंडळाकडे दिवाळखोरी हस्तकाचे अधिकार आल्यावर सकारण, अधिकारी व इतर कर्मचारी वर्गास कार्यमुक्त करू शकेल. तसेच प्रचलित संचालक मंडळ बरखास्त करण्याचे तसेच नवीन संचालक नेमण्याचा अधिकारही सोडवणूक महामंडळास असेल. दिवाळखोरी हस्तक म्हणून काम करणाऱ्या या अधिकार मंडळास, देणे हक्क तपासण्याचे व पूर्ण करण्याचे मोठे अधिकार आहेत. कलम ७६ प्रमाणे कर्जदार वा / ठेवीदार त्यांचे हक्क नाकारले गेल्यास 'नॅशनल कंपनी लॉ ट्रायब्युनल'कडे अपील करू शकतात. या कायद्याच्या मंजुरीच्या दिवशीच १९६१ च्या ठेवी विमा कायदा रद्द होणार आहे व त्या खालच्या सर्व संस्था नव्या कायद्याखाली नोंदीत असतील.

या कायद्यातील कलम ७९ प्रमाणे, दिवाळखोरीच्या प्रक्रियेत मत्तांच्या विक्रीपासून मिळवणारी जमा -

- ठेवीदार - (ठेव विम्याखाली) - त्या प्रमाणात.
- सोडवणूक खर्च.
- कर्मचारी देणी (प्रक्रिया सुरू होण्यापूर्वीच्या २४ महिन्यासाठी).
- कर्मचारी पगार (पूर्वीचे १२ महिने).
- विमारहित ठेवीदार.
- कर्जदार (असुरक्षित).
- सरकारी देणी.
- इतर कर्जे.
- प्राधान्य समभाग.
- समभागधारक.

यांच्यात त्या प्राधान्य क्रमाने वाटल्या जातील.

या कायद्याच्या तरतुदी मान्यता प्राप्त सहकारी बँकांनाही लागू आहेत.(कलम १३०)

## महत्त्वाचे मुद्दे

सध्याच्या बँकींग व्यवस्थेतील वाढत्या थकबाक्या, अलाभदायी मत्ता तसेच नागरी व दिवाळखोरी संहिता (२०१६) मुळे उद्योग/ संस्था बंद करण्याचा सोपेपणा लक्षात घेता, वित्तीय सेवांच्या ग्राहकांचे, विशेषत: ठेवीदारांचे हितसंबंध लक्षात घेता, अधिक समावेशक व प्रभावी सोडवणूक व ठेवी विमा व्यवस्था निर्माण करण्यासाठी 'वित्तीय सोडवणूक व ठेवी विमा' कायदा- २०१६ प्रस्तावित आहे.

या विधेयकाचे रूपांतर कायद्यात होण्यापूर्वी पुढील

प्रश्नांची उत्तरे स्पष्टपणे मिळणे गरजेचे आहे.

१. वित्तीय संस्थेच्या ठेवीदाराला किती रकमेपर्यंत विमा संरक्षण व नुकसान - भरपाई मिळेल त्याची रक्कम स्पष्ट नाही. पूर्वीच्या (१९६१) कायद्यात कमाल १ लाख - एक ठेवीदार - सुरक्षित होता. मधल्या काळातील भाववाढ, उत्पन्न वाढ या गोष्टी लक्षात घेता, सुरक्षित रक्कम किमान भाववाढीच्या प्रमाणात वाढली पाहिजे. प्रस्तुत लेखकाच्या मते, सध्या ही रक्कम किमान १ कोट रुपये असली पाहिजे.

२. भरपाई साधन (Bail - in - Instrument) तयार करण्याच्या कलमाचा अधिक काळजीपूर्वक विचार झाला पाहिजे. त्यादृष्टीने कलम ४८ व ५२ चा फेरविचार आवश्यक आहे.

३. कोणत्याही परिस्थितीत ठेवीदार/ कर्जदार/ ग्राहक संस्था यांच्या खाजगी मालमत्तेच्या हक्कावर अतिक्रमण होऊ नये याची खबरदारी घेतली पाहिजे.

४. व्यवस्थेच्यादृष्टीने महत्त्वाची संस्था ठरविण्याची शास्त्रीय वस्तुनिष्ठ पध्दतीची संख्यात्मक रचना कायद्यातच समाविष्ट असावी.

ठेवीदारांचा विश्वास, बचतीच्या व गुंतवणुकीच्या प्रेरणा, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे हितसंबंध यांना कमाल प्राधान्य व संरक्षण देऊनच वित्तीय सोडवणूक व ठेवी विमा कायदा-२०१६ चे विधेयक कायद्यात रूपांतरित होईल, यावर लक्ष ठेवणे लोकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रत्येक खासदाराची नैतिक जबाबदारी व राजकीय कर्तव्य आहे.

## ८. निवडणूक रोखे : एक दृष्टीकोन

देशाच्या अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार आहे. त्यालाच काही लोक समांतर अर्थव्यवस्था म्हणतात. अशा भ्रष्टाचाराची अभिव्यक्ती प्रत्यक्ष व्यवहारात तथाकथित 'काळ्या पैशाच्या' स्वरूपात होते. काळा पैसा, शब्दश: काळा असत नाही. त्याची गुणवैशिष्ट्ये काही असतात. तांत्रिक पद्धतीने व्याख्या करायची झाल्यास :

''ज्या वैधानिक चलनाच्या (नोटा) उगमाबद्दल प्राप्तीबद्दल, मालकीबद्दल, संबंधित व्यक्ती व संस्था योग्य, विश्वसनीय, कायदेशीर पुराव्यानिशी माहिती घेऊ शकत नाहीत. जेव्हा तो पैसा काळा पैसा म्हणजे बेहिशोबी पैसा म्हणून ओळखला जातो. असा पैसा एकतर दडविण्याकडे, उडविण्याकडे वा गुप्त पद्धतीने/ अनामिक स्वरूपात दान देण्याकडे व ऐषोआरामी उपभोग करण्याकडे वळविला जातो. तशी काळा पैसा धारकांची प्रवृत्ती असते.''

सामान्यत: काळा पैसा आणि त्या माध्यमातून होणारा भ्रष्टाचार पुढील पद्धतीने निर्माण होतो, असा बहुतांश अभ्यासकांचा दावा आहे.

१) चोरी, दरोडा, लूट व बळजोरी या मार्गाने मिळविलेला पैसा किंवा मिळविलेल्या मालमत्तेचे पैशातील रूपांतर.

२) उत्पादन किंवा वितरण व्यवस्थेत हिशोब न ठेवता ज्या रकमा निर्माण होतात, त्या रकमा किंवा मालमत्ता.

३) ज्या प्राप्तींवर किंवा मत्तेवर प्रचलित कर दिला जात नाही, त्यातून काळा पैसा निर्माण होतो.

४) जहाज वाहतुकीची बंदरे तसेच आंतरराष्ट्रीय विमानतळ किंवा सरहद्दीवरचे जाळे टाळून व चुकवून केल्या जाणाऱ्या आयात व निर्यातीच्या माध्यमातून (मौलिक धातू, मौलिक माणके (खड्डे) तसेच नशेच्या वस्तू) निर्माण होणारा पैसा.

५) सत्तेच्या पदावर निर्णयाचे अधिकार असणाऱ्या पध्दतीने (मंत्री, अधिकारी) झुकते माप देऊन किंवा सोयीचा निकाल देऊन जे उत्पन्न मिळविलेले असते, त्यातूनही काळा पैसा निर्माण होतो.

६) लोकशाही व्यवस्थेत निवडणुका महत्त्वाच्या असतात. राजकीय पद प्राप्त करण्यासाठी निवडणुकीत मोठा खर्च करावा लागतो. असा मोठा खर्च नेहमीच्या वैध उत्पन्नातून करता येणे बहुसंख्य उमेदवारांना शक्य असत नाही. साहजिकच, त्यांना काळ्या पैशाचा वापर करावा लागतो आणि दुर्दैवाने काळा पैसा निर्माण करण्याचे दुष्टचक्र सतत चालू राहते.

७) ज्या राज्यव्यवस्थेत लोकांच्या प्राप्तीवर व मालमत्तेवर वाजवीपेक्षा अधिक प्रमाणात कर बसविले जातात, तेव्हा अशी प्राप्ती किंवा मालमत्ता दडविण्यातून काळा पैसा निर्माण होतो.

सर्वसामान्यपणे असे म्हणता येईल की, गुन्हेगारी, अतिरिक्त कर आकारणे आणि निवडणुका ही काळा पैसा व भ्रष्टाचार निर्माण होण्याची मुख्य कारणे मानावी लागतील.

जगातील बहुतांश सर्व राष्ट्रांत भ्रष्टाचार किंवा काळा पैसा हा प्रकार दिसतो.  पण ज्या राष्ट्रांमध्ये लोकसंख्येची घनता जास्त आहे. दारिद्र्याचे प्रमाण मोठे आहे. लक्षणीय बेरोजगारी आहे. प्रशासन व्यवस्थेत अनावश्यक सत्ता केंद्रे आहेत. अज्ञानाचे मोठे प्रमाण आहे व बाजारव्यवस्थेमध्ये मक्तेदारी घटकांची गर्दी आहे, अशा रचनेत सत्तेवर जाण्यासाठी निवडणुकीचा मार्ग वापरावा लागतो. त्या व्यवस्थेत काळा पैसा निर्माण होण्याची कमाल शक्यता निर्माण होते.

भारतीय अर्थव्यवस्थेतील काळा पैशाचा अभ्यास करणाऱ्या सर्व समितींनी, खासगी संस्थांनी व व्यक्तिगत तज्ज्ञांनी काही महत्त्वाचे निष्कर्ष काढले. त्यात निवडणुकीमुळे राजकीय पक्ष व उमेदवार यांना वाढत्या निवडणूक खर्चाची तरतूद करण्यासाठी व्यापारी, उद्योजक, कारखानदार, वित्तीय भांडवलदार यांच्याकडून निवडणूक निधी गोळा करावा लागतो व त्याच्या बदल्यात आणखी पैसा मिळविण्यासाठी संबंधितांना राजकीय सत्ताधीश कायदेबाह्य मार्गाची सवलत देतात किंवा त्यांच्या गुन्हेगारीकडे दुर्लक्ष करतात, असे म्हटले आहे.

ही साखळी तोडण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्री ना.जेटली यांनी आपल्या २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय भाषणात 'निवडणूक रोख्यां'ची संकल्पना मांडली. त्या प्रस्तावाची कार्यवाही आता सुरू होत आहे. या निवडणूक रोख्यांची योजना तपशीलवार पुढीलप्रमाणे आहे.

१) ज्या राजकीय पक्षांनी किमान एका निवडणुकीत भाग घेतला आहे. त्यांनाच असे 'रोखे' घेऊन निवडणूक निधी उभारता येईल.

२) कोणत्याही देणगीदाराला असे रोखे (बंधपत्रे) बँकेच्या खात्यातून किंमत देऊन त्याच्या निवडीच्या, वरील अटीत बसणाऱ्या राजकीय पक्षाला देऊ शकेल.

३) निवडणूक रोख्यांवर कुणाचेही नाव असणार नाही. त्याचे स्वरूप सार्वजनिक आश्वासन पत्राचे असेल.

४) राजकीय पक्षांनी रोख्यांचे नगदीकरण रोखा घेतल्यापासून १५ दिवसांच्या आत करायचे बंधन आहे.

५) असे निवडणूक रोखे, त्याच अर्थाने रोखे विकत घेणाऱ्यांनीही असे रोखे त्यांच्या आवडीच्या राजकीय पक्षांना देणे बंधनकारक असावे, अशी धारण कालमर्यादा या रोख्यांचे रूपांतर पर्यायी किंवा समांतर चलन व्यवस्थेमध्ये होऊ नये अशी असावी.

६) निवडणूक रोख्यांचे दर्शनी मूल्य हजारच्या पटीमध्ये १० हजार, १ लाख, १० लाख व १ कोटी रुपयांचे असेल.

७) अशा निवडणूक रोख्यांची विक्री स्टेट बँक ऑफ इंडियाच्या विशिष्ट निर्देशित शाखांकडून जानेवारी, एप्रिल, जुलै व ऑक्टोबर महिन्याच्या प्रत्येकी पहिल्या १० दिवसांसाठी केली जाईल. लोक-सभेच्या निवडणुकीच्या वर्षात १० ऐवजी ३० दिवस (सूचीत प्रत्येक महिन्यात) केली जाईल.

८) या रोख्यांवर कोणतेही व्याज असणार नाही.

९) अशा रोख्यांची खरेदी फक्त भारतीय नागरिक वा भारतात स्थापन झालेल्या कंपन्या/ संस्थाच करू शकतील.

१०) अशा रोख्यांचा वापर ज्या राजकीय पक्षांची नोंदणी (कलम २९ क) रिप्रेझेंटेशन ऑफ पीपल्स ॲक्ट या कायद्याखाली झाली असेल, त्यांनाच करता येईल.

११) निवडणूक रोख्यांवर खरेदी करणाऱ्या नागरिकांचे, व्यक्तीचे, संस्थेचे नाव असणार नाही.

वर वर पाहता निवडणूक प्रक्रियेच्या माध्यमातून निर्माण होणारा काळा पैसा थांबविण्याच्या दृष्टिकोनातून निवडणूक रोखे हा मार्ग योग्य वाटतो. कायदेशीर नाव झालेल्या राजकीय पक्षांना बँकेच्या अकाउंट माध्यमातून कोणत्याही भारतीय व्यक्तीला किंवा संस्थेला राजकीय पक्षांना देणग्या देणे शक्य होणार आहे. अशा रोख्यांचे नगदीकरण राजकीय पक्षांना त्यांच्या रीतसर बँक अकौंटमधून करावे लागणार आहे. रोख्यांचे धारण कालखंड फक्त १५ दिवसांचा असल्यामुळे व्यक्ती, कायदेशीर संस्था किंवा राजकीय पक्ष अशा निवडणूक रोख्यांचा वापर पर्यायी चलन किंवा मालमत्तेचा एक नमुना करू शकणार नाहीत. अशा निवडणूक रोख्यां-खेरीज व इतर लेखापात्र मत्तेखेरीज जास्त पैसा राजकीय पक्षांकडे असल्यास तो काळा पैसा, भ्रष्टाचारी पैसा असे मानले जाईल आणि साहजिकच संबंधित राजकीय पक्षांची व तसा पैसा देणाऱ्यांची विश्वनीयता शंकास्पद होईल. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करता येऊ शकेल.

काळा पैसा व भ्रष्टाचार कमी करण्याचा एक मार्ग म्हणून निवडणूक रोख्यांचा विचार योग्य वाटतो. पण त्यामुळे काळ्या पैशाची समस्या काही प्रमाणात कमी होईल. ती संपूर्णपणे संपेल असे वाटत नाही. बुध्दिमान लोक या निवडणूक रोख्यांचा आणखी कसा वापर करतील, याचा अंदाज करणे आवश्यक आहे.

## ९. आधारची सक्ती

सध्या देशाच्या सर्वोच्च न्यायालयात ५ न्यायमूर्तींच्या पीठापुढे आधारकार्डाचा वापर सक्तीचा करण्याच्या विरोधातील एक याचिका निर्णयासाठी मांडली गेली आहे. सरन्यायाधीश मा. दीपक मिश्रांच्या नेतृत्वाखाली हे न्यायपीठ सुनावणी घेत आहे.

आधारकार्ड सक्ती विरोधात युक्तिवाद करणाऱ्या वकिलांचे नेतृत्व ज्येष्ठ विधिज्ञ शाम दिवाण करीत आहेत. त्यांची सर्वोच्च न्यायालयापुढे जी विनंती आहे, तिचे स्वरूप पुढील प्रकारचे द्विस्तरीय आहे.

अ) २०१६चा आधार कायदा ज्यामुळे सर्व नागरिकांना आपली जैविक मापे (Biometrics) उपयोगासाठी राज्य व्यवस्थेला देणे बंधनकारक आहे, तो रद्दबातल करावा.

ब) दुसरी विनंती अशी की, उपरोक्त कायदा प्रभावी होण्यापूर्वी म्हणजेच २००९ ते २०१६ या काळात संकलित केलेली सर्व नागरिकांची सर्व माहिती नष्ट केली जावी. कारण, ती कार्यकारी आदेशाखाली कायद्याच्या मान्यतेशिवाय गोळा केली होती.

आपल्या उपरोक्त मागण्यांच्या समर्थनार्थ वकील श्री. शाम दिवाण यांनी अनेक महत्त्वाची कारणे न्यायपीठापुढे मांडली. त्यांची संक्षिप्त चर्चा पुढीलप्रमाणे

आहे.

१) आधारकार्ड सक्तीचे करणाऱ्या आदेशात्मक कायद्यामुळे राज्यव्यवस्थेचे रूपांतर संपूर्ण हुकूमशाहीमध्ये होते. अशी हुकूमशाही समावेशकतेऐवजी वंचितत्वाला अधिक महत्त्व देते. याउलट, भारतीय संविधान समावेशकतेच्या तत्त्वाला प्राधान्य देते.

२) नागरिकांच्या जीवनाच्या सर्व आयामावर अशा सर्वंकष पद्धतीने झडप घालणारी व्यापक कायदे व्यवस्था, जगाच्या इतर कोणत्याही लोकशाही व्यवस्थेत (अमेरिकादेखील) अस्तित्वात नाही.

३) आधार योजनेमुळे व्यक्ती (नागरिक) व राज्य व्यवस्था यांच्यातील नात्याचा समतोल, राज्य व्यवस्थेच्या बाजूने पूर्णतः झुकेल.

४) आधार योजनेमुळे देशातील प्रत्येक नागरिकाची अवस्था सरकारचा पट्टा बांधलेल्या जनावरासारखी अस्तित्वात होईल. या पट्टा बांधणीचा वापर व्यक्तीचा सर्व व्यवहारावर नजर ठेवण्यासाठी व त्याची प्रत्येक क्षणाची, स्थान निश्चिती करण्यासाठी होऊ शकते.

५) आधारकार्डमुळे प्रत्येक नागरिकाचे शरीर 'दर्शक' (Marker) म्हणून राज्यव्यवस्थेच्या गरजेप्रमाणे वापरले जाऊ शकते.

६) आधारकार्डाच्या सक्तीमुळे व्यक्तीचा स्वतःच्या शरीरावर संपूर्ण मालकी हक्क ठेवण्यावर अतिक्रमण होते.

७) आधारकार्डाच्या सक्तीमुळे नागरिकांच्या निवड स्वातंत्र्यावर मर्यादा येतात.

८) आधारकार्डाच्या सक्तीमुळे व्यक्तिगत माहितीच्या संदर्भात स्वतः निर्णय घेण्याच्या अधिकारावर व स्वातंत्र्यावर मर्यादा येतात.

९) आधारकार्डासाठी संकलित केलेली करोडो लोकांची व्यक्तिगत माहिती असुरक्षित होते.

या सर्व गोष्टी लक्षात घेता, वकील महोदयांनी उपरोक्त दोन मागण्या केल्या. त्याचबरोबर त्यांनी पुढील मागण्याही केल्या आहेत.

अ) आधार योजनेत सहभागी व्हायचे किंवा नाही याचे निवड स्वातंत्र्य नागरिकास देण्याची तरतूद कायद्यात असावी.

ब) नागरिक परिचयाची इतर कमी हस्तक्षेपाची योजना तयार करण्यात यावी. अशा योजनेचा हेतू 'समावेश कर्ता' असावा. नागरिकांना वंचित करण्याचा परिणाम त्यातून होऊ नये.

क) आधार योजनेमुळे ज्यांची खातरजमा, तांत्रिक पध्दतीने (आधार पद्धतीने) होऊ शकत नाही. त्यांचे अस्तित्व आभासी, भुतासारखे होते म्हणून ती नको.

ड) कायद्यातील 'तात्काळ, अपरिहार्य प्रभावाचे' (Eminent Domain) तत्त्व व्यक्तीच्या स्वतःच्या शरीर मालकीला लागू करता येत नाही.

वकील महोदयांच्या मते, आधार योजनेच्या सक्तीमुळे शाळा प्रवेश, (दवाखाना प्रवेश, वाहतूक प्रवेश, करमणूक केंद्र प्रवेश इ.) व तत्सम सोयी-सुविधांपासून काही व्यक्ती वंचित होण्याची शक्यता निर्माण होतात.

आधार योजना गरीब, दुर्बल, शारीरिक कष्ट करणाऱ्या लोकांवर प्रतिकूल परिणाम करू शकेल.

आधार योजनेमुळे व्यक्तीच्या सर्व खाजगी वित्तीय व्यवहारांवर, त्याच्या खरेदी-विक्री स्वातंत्र्यावर अतिक्रमण होते. आधार योजनेमुळे काही व्यक्तीचे कलंकीकरण / डागाळणे होवू शकते.

सामाजिक सुरक्षेचा लाभ मूलतः १००% हक्काच्या

स्वरूपाचा असतो. त्यांना आधारकार्डशी जोडल्यामुळे त्यांच्या बाबतीत वंचितत्त्व निर्माण होण्याची शक्यता निर्माण होते.

आधारकार्डाची योजना अनधिकृत निर्वासितांच्या बाबतीत लागू झाली तर राष्ट्रीय सुरक्षेला घातक पद्धतीने माहितीचा वापर होण्याची शक्यता वाढते.

एकंदरीत पाहता आधार योजनेच्या उद्दिष्टांचा व व्यक्तीगत मालमत्ता, निवड स्वातंत्र्य, हालचाल स्वातंत्र्य व राष्ट्रीय सुरक्षा यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे. अन्यथा, राज्य व्यवस्थेच्या हातात अमर्याद सत्ता, व्यक्ती नगण्य अशी अवस्था निर्माण होईल व राज्य व्यवस्था आधारकार्डाच्या बटणाचा वापर करून नागरिकांचे सामाजिक अस्तित्व नाकारू शकेल. असे भयानक घडू शकेल. म्हणूनच याबाबतीत अधिक जबाबदारीने कायदा करण्याची व लोकांच्या भावना समजून घेण्याची गरज आहे. नागरिकांच्या 'खाजगी' पणाच्या हक्काचे संरक्षण झालेच पाहिजे.

## १०. निष्कर्ष

उपरोक्त सर्व धोरणात्मक निर्णयांचे-चार आर्थिक व एक राजकीय- मूल्यमापन करताना आधारभूत निकष म्हणून :

अ) पारंपारिक पद्धतीने : १) वृद्धिदरवाढ/दारिद्र्यघट. २) रोजगारवाढ. ३) भाववाढ नियंत्रण. ४) व्यापार तोल संतुलन हे निकष महत्त्वाचे ठरतात. त्यात आता. ५) व्यवसाय सोय वाढ. ६) जीवन सोय वाढ.

या नवीन निकषांची भर पडली आहे. या निकषांवर :

अ) नोटाबंदीचे धोरण फसले. कारण त्यामुळे रोजगार घटला. वृद्धीदर घटला. काही प्रमाणात भाववाढ नियंत्रित झाली. पण त्याची किंमत उपभोगाच्या - सामान्याच्या- घटीत शोधावी लागते.

ब) विषमता व तिचा प्रत्यक्ष अनुभव दोन्हीत वाढच झाली. याचाच अर्थ या धोरण निर्णयाची उद्दिष्टे मूलत: आर्थिक नव्हती.

क) वस्तू व सेवा कर मात्र वृध्दीदर वाढ, रोजगार वाढ, विषमता घट, भाववाढ नियंत्रण या निकषावर व महसूल वाढीच्या निकषावर यशस्वी, उपकारक धोरणाचा भाग ठरला आहे. वस्तू व सेवा कर कार्यवाहीत आला. कारण त्याबाबतीत राष्ट्रीय सहमती होती. तत्कालीक ''नाटक'' झाली हा भाग वेगळा.

ड) निवडणूक रोख्यांचा अजूनही पुरेसा अनुभव आला नाही. पण मूलत: हेतू चांगला, नेमका व सर्वसमावेशक व राजकीयदृष्ट्या तटस्थ आहे. त्याचा परिणाम भाववाढ, विषमता, समांतर बाजार, घटण्यामध्ये होण्याची अधिक शक्यता आहे.

ड) वित्तीय सोडवणूक व ठेवी विमा विधेयक २०१७ चे कायद्यात रूपांतर होणे व त्याचा प्रत्यक्ष अनुभव अजून दूर आहे. तर्काचा आधार घेता, त्यातील 'बेल-इन' तरतुदींचा फेरविचार, ठेवीदारांच्या सुरक्षेच्या निकषावर केल्यास वित्तव्यवस्था बळकट स्थिर होण्याचे परिणाम - वृध्दीदर, रोजगार, भाववाढ, व्यापार तोल व विषमता या संदर्भात अनुकूल होतील असेच वाटते.

इ) आधार सक्ती संबंधात सध्या सर्वोच्च न्यायालयात घटनापीठासमोर सुनावणी सुरू आहे. मा. न्यायालयाने 'खाजगीपणा' हा नागरिकांचा हक्क आहे, अशी प्राथमिक भूमिका घेतली आहेच. त्याचीच पुढची पायरी म्हणजे आधार सक्ती व्यक्ती स्वातंत्र्य मर्यादित करते. म्हणून सक्ती नको. या वळणावर अंतिम निर्णय होण्याची शक्यता वाटते.

शेवटी एक प्रश्न उपस्थित करून या धोरण चर्चेचा

उपोद्घात करणे योग्य ठरेल.

राजसत्तेवर असणारा लोकशाहीतील, राजकीय पक्ष धोरण ठरविताना : आर्थिक उद्दिष्टांची, व्यक्तीहित कमालीकरणाच्या निकषावर - पूर्तता हे प्रधान ध्येय मानतात का?

का

राजसत्ता ताब्यात ठेवावी / राहिलीच पाहिजे या उद्दिष्टासाठी जे उपयुक्त तेच करायचे असा विचार करतात?

का

या दोन निकषांमध्ये समन्वय साधणे म्हणजेच राजकारण. धोरण असा अर्थ घ्यायचा का?

**संदर्भ**

१. पाटील जे.एफ., निवडणूक रोखे, एक दृष्टिकोन, दै.पुढारी, दि.०८.०१.२०१४. (बहार)

२. पाटील जे.एफ., वित्तीय सोडवणूक व ठेवी विमा विधेयक-२०१६, वास्तव-प्रश्न-पर्याय, दै.पुढारी, दि.१७.११.१८ (बहार), दि.२४.११.२०१८.

३. पाटील जे.एफ., नोटाबंदी - काही निबंध, समाजवादी प्रबोधिनी, दि.२.४.२०१७.

४. पाटील जे.एफ., जी.एस.टी.दर सिध्दांत व व्यवहार, दै.सकाळ, दि.०४.१२.२०१७.

५. पाटील जे.एफ., आधार सक्ती व्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच, दै.सकाळ, दि.३०.०१.२०१८.

६. राउट्रे समन्वय, इकॉनॉमिक टाइम्स, दि. १८-०१-२०१८.

◆

## मराठी अर्थशास्त्र परिषद

## ४२ वे वार्षिक अधिवेशन, चंद्रपूरः शोधनिबंध लेखकांसाठी निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४२ वे वार्षिक अधिवेशन सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर येथे आयोजित केले असून प्रा. चारुदत्त गोखले, जळगाव (खानदेश) हे अध्यक्षस्थान भूषविणार आहे. सदर अधिवेशनाचे स्थानिक कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले आणि स्थानिक कार्यवाह डॉ. सौ. शरयू पोतनुरवार (९४२२१४६३४५) आहेत. परिषदेच्या चर्चासत्रासाठी निश्चित केलेल्या तिन्ही विषयांवरील शोधनिबंध आजीव सभासदांनी दि. १५ सप्टेंबर, २०१८ पूर्वी परिषदेचे अध्यक्ष यांचे पत्त्यावर वेळेत पाठवावे.

निबंध लेखकांनी आपले निबंध जास्तीत जास्त २००० शब्दांत व ३०० शब्दांत त्याचा गोषवारा सादर करणे अनिवार्य आहे. गोषवारा न पाठविल्यास निबंध प्रकाशित करणे शक्य नाही. निबंध मराठीतच असावेत व ते पूर्वी कोठेही प्रकाशित केलेले नसावेत. शोधनिबंध krutidev-110 (मराठी) या फॉन्टमध्ये (साईज १४) सी.डी.सह दोन प्रतींमध्ये पाठवावेत.

लेखकांनी आपले संपूर्ण नाव व पत्ता, आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी व महाविद्यालयाचे नाव हा सर्व तपशील मराठीत देणे आवश्यक आहे.

निबंध लेखकांनी आपले निबंध पुढील पत्त्यावर पाठवावेत.

**प्रा. चारुदत्त श्रीधर गोखले,** १०, प्राध्यापक कॉलनी, जिल्हा उद्योग केंद्रामागे, जळगाव (खान्देश)
मु.पो.ता.जि. जळगाव (खानदेश) ४२५००१ (०२५७-२२५२३७५) मोबा. : ९४२२६१८४१०
charudattasgokhale@gmail.com

**आर.बी. भांडवलकर,** कार्यवाह-खजिनदार

# शेती विकासाचे दोन उपाय-आधार किंमती व घटक अनुदान

**अनिल पडोशी** †
माजी अध्यक्ष,
मराठी अर्थशास्त्र परिषद.

## प्रस्तावना

शेतीचा सर्वांगीण विकास हा आर्थिक विकासाचा पाया आहे. आपल्या देशामध्ये स्वातंत्र्यानंतर म्हणजे सत्तर वर्षांनंतरसुद्धा शेतीचा विकास समाधानकारक झाला आहे, असे कोणीही म्हणत नाही. शेती विकासामध्ये भारतातील बहुसंख्य अशा लहान शेतकऱ्यांचा विकास झाल्याशिवाय, त्यांची प्राप्ती समाधानकारकपणे वाढल्याशिवाय शेती विकासाला फारसा अर्थ नाही. शेतकऱ्यांची प्राप्ती वाढण्यासाठी (दुप्पट होण्यासाठी) शेती फायदेशीर झाली पाहिजे. शेती फायदेशीर करण्याचे सर्वसाधारणपणे दोन उपाय सरकारला करता येतात.

१. विविध प्रकारच्या शेतमालाच्या विक्रीच्या किमती शेतकऱ्याला फायदा मिळवून देतील अशा निश्चित करणे आणि ती फायदेशीर किंमत शेतकऱ्याला मिळवून देण्याची सरकारने हमी देणे, याला 'उत्पादन आधार किंमत' (आऊटपुट प्राइसिंग) असे म्हणतात.

२. शेतकरी वापरत असलेल्या विविध प्रकारच्या उत्पादक घटकांवर (बियाणे, खते, सिंचन इ.) अनुदान देऊन ती शेतकऱ्यांसाठी स्वस्त करून, उत्पादन खर्च कमी करून शेती फायदेशीर करणे, याला 'इनपुट सबसीडायझींग' म्हणतात. प्रस्तुत अभ्यासामध्ये आपण वरील दोन्ही उपायांच्या सैध्दांतिकदृष्ट्या सविस्तर विचार करून भारताच्या संदर्भात कोणता उपाय अधिक योग्य ठरेल, याचा अभ्यास करणार आहोत. दोन्ही उपायांचे तुलनात्मक गुणदोष लक्षात घेऊ!

## आधार किंमत

शेती व्यवसाय फायदेशीर करण्यासाठी शेत-मालाच्या किमती निश्चित करण्याचा उपाय भारतासह अनेक देशांमध्ये प्रचलित आहे. भारतामध्ये या उपायाने गहू, तांदूळ, कापूस इ. वेगवेगळ्या तेवीस प्रकारच्या शेतमालाच्या किमती सरकारतर्फे केल्या जातात. याचे अनेक फायदे आहेत.

१. हा उपाय वापरण्यास तुलनात्मकदृष्ट्या सोपा असतो. तज्ञांचा सल्ला घेऊन, विविध प्रकारच्या आर्थिक (व राजकीयसुध्दा) घटकांचा विचार करून किंमत निश्चित करणे हे काम असते. सरकारने हात सैल सोडला की, सर्व संबंधितांचे समाधान करणे अवघड नसते. परंतु, येणारा सर्व माल निर्धारित किमतींना विकत घेण्याची हमी सरकारने दिल्याशिवाय या उपायास अर्थ नसतो. तथापि, जर बाजारभाव पडले तरी हमी किंमत

† आजीव सभासद क्र. : २९०, भ्रमणध्वनी : ९९२२५८८८६२, ई-मेल : anilpadoshi@gmail.com

आणि बाजारभाव यातील फरक शेतकऱ्यांना सरकारने अदा केल्यास, प्रत्यक्ष खरेदी सरकारने करण्याची गरज नसते.

२. शेतीसारख्या अस्थिर आणि बेभरवशाच्या व्यवसायाला या उपायामुळे स्थिरता लाभते. शेतकरी विक्री किमतीच्या बाबतीमध्ये बिनधास्त असतो.

३. राजकीयदृष्ट्या हा उपाय रामबाण आहे. सूज्ञास अधिक सांगणे न लगे! परंतु, यामध्ये दोषही आहेत.

१. जे शेतकरी वाढाव्यात (surplus) आहेत, ज्यांच्या-कडे विक्रीसाठी वाढीव उत्पादन आहे, अशा बड्या शेतकऱ्यांनाच याचा फायदा होतो. त्यामुळे समावेशक विकासासाठी हा उपाय निरुपयोगी आहे.

२. ज्या पिकांची सरकारतर्फे आधार किमती ठरतात, तीच पिके शेतकरी घेतात, यामुळे शेतीमध्ये विषमतोल निर्माण होऊ शकतो. हे शेती विकासाला घातक ठरू शकते.

## घटक अनुदान (इनपुट सबसीडायझींग)

या उपायास इनपुट सबसीडायझींग म्हटले जाते. येथे शेतकरी वापरत असलेल्या उत्पादक घटकांवर अनुदान देऊन ते घटक त्यांना स्वस्तात दिले जातात. त्यामुळे उत्पादन खर्च कमी होतो. शेतकऱ्यांची स्पर्धाक्षमता वाढते. शेती फायदेशीर होऊ शकते. या उपायाचे अनेक गुण आहेत :

१. यामुळे सर्वांचा फायदा होऊ शकतो. भेदभाव नाही. त्यामुळे हा उपाय समावेशक विकासाला पोषक असतो.

२. या उपायामुळे आर्थिकदृष्ट्या 'अक्षम' असणारा शेतकरी 'सक्षम' होऊ शकतो.

३. या उपायांतर्गत धरणे, रस्ते, बंधारे, वीज प्रकल्प इ. ची निर्मिती झाल्यास देशामध्ये कायमस्वरूपी भांडवल निर्मिती होते.

४. उत्पादक घटक स्वस्तात मिळाल्यामुळे शेतकरी (सिंचन सोयी असल्यास) दोन-दोन पिके वर्षातून घेऊ शकतो. रोजगार निर्मितीस चालना मिळते.

या संक्षिप्त अशा सैध्दांतिक विवेचनानंतर, आधार किंमत आणि घटक अनुदान या दोन उपायासंबंधी भारतातील परिस्थिती काय आहे याचा विचार करू!

## भारतातील परिस्थिती

शेती विकासासाठी आधार किमती आणि घटक अनुदान या दोन पद्धती वापरण्याबाबत आपल्या देशातील परिस्थिती काय व कशी आहे ते समजावून घेऊ.

## थोडा पूर्वेतिहास

१९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यानंतर साधारण १९६० पर्यंत शेती विकासाबाबत आपल्या देशातील सरकारी धोरणाचा मुख्य भर शेती संबंधीच्या तंत्रज्ञानात्मक (Technological) विकासावर नसून संस्थात्मक (Institutional) विकासावर होता. त्या धोरणांतर्गत असे मानले जात होते की, भारतीय शेतीच्या मागासलेपणाचे मुख्य कारण मागासलेले तंत्रज्ञान किंवा तंत्र हे नसून सर्वसामान्य शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी आवश्यक असलेल्या उत्तेजनाचा अभाव हे मुख्य कारण आहे आणि शेतकऱ्यांना उत्साह किंवा उत्तेजन देण्यासाठी कायदे करणे आवश्यक आहे. आणि ते झाले की, देशाचा शेती विकास झपाट्याने सुरू होईल. त्यानुसार केंद्रसरकार आणि राज्यसरकार यांनी 'कूळ कायदा', 'कसेल त्याची जमीन', 'जमीन सुधारणा', 'कमाल जमीन धारणा कायदा', 'खासगी सावकारीवर नियंत्रण', 'कम्युनिटी डेव्हलपमेंट योजना' इ. विविध योजना

राबविण्यास सुरुवात केली. त्यामुळे शेतकरी बांधवाना आवश्यक ते उत्तेजन मिळेल, त्यांच्या कष्टाचे फळ त्यांनाच मिळेल आणि त्यामुळे शेतीचे उत्पादन विशेषत: अन्नधान्याचे उत्पादन भरघोसपणे वाढेल अशी आशा होती. परंतु, दुर्दैवाने १९६० साल जवळ आले तरी वरील योजनांची अपेक्षित फळे मिळेनात. शेतीच्या आघाडीवर नैराश्य पसरले. देशामध्ये अन्नधान्याची अभूतपूर्व टंचाई निर्माण झाली. अमेरिकेहून 'पी.एल.४८०' अंतर्गत अन्नधान्य मिळवूनसुद्धा अन्नधान्याचा तुटवडा कमी होण्याचे चिन्ह दिसेना. शेतीविकासाच्या धोरणासंबंधी काहीतरी फेर विचार करणे गरजेचे आहे, शेतकरी बांधवांना केवळ उत्तेजन देऊन भागणार नाही, तर त्यांना उत्पादन वाढ घडवून आणण्यासाठी सुधारलेले आधुनिक उत्पादन तंत्र उपलब्ध करून देणे अधिक आवश्यक आहे. याची सरकार दरबारी तीव्रतेने जाणीव झाली. या नवीन धोरणांतर्गत शेतकऱ्यांना सुधारलेले, अधिक उत्पादन देणारे बियाणे पुरविणे (संकरित बियाणे), सिंचनाची सोय करणे, त्या पिकांना आवश्यक ती जंतुनाशके पुरविणे, खते मुबलकपणे पुरविणे, या वरील सर्व घटक विकत घेण्यासाठी शेतकऱ्यांना पुरेसे अनुदान देणे आणि पुन्हा सवलतीच्या दरामध्ये शेतकऱ्यांना कर्जवाटप करणे इ. उपायांचा अंतर्भाव असणारे नवीन धोरण अंमलात आले. सुरुवातीस हा नवीन प्रयोग, ज्या जिल्ह्यामध्ये सिंचनाची सोय उत्तम आहे अशा निवडक जिल्ह्यामध्येच प्रायोगिक तत्त्वावर राबवून पाहण्याचे ठरले. याला 'इंटेन्सिव्ह ॲग्रीकल्चरल डिस्ट्रिक्ट प्रोग्राम' संबोधण्यात आले. हा प्रयोग उत्पादन वाढविण्यामध्ये कल्पनातीत यशस्वी झाल्यामुळे हळूहळू देशभर हा प्रयोग सुरू झाला. उत्पादन भरघोसपणे वाढू लागले. आपल्या देशामध्ये अशा प्रकारे १९६६ चे सुमारास 'हरितक्रांती'चा जन्म झाला. देश अन्नधान्याच्या टंचाईतून मुक्त झाला. अन्नधान्याचा प्रश्न सुटला.

परंतु, आपल्या प्रस्तुत अभ्यासाच्यादृष्टीने वर वर्णन केलेल्या तांत्रिक बाजूपेक्षा हरितक्रांतीच्या धोरणाची आर्थिक बाजू अधिक महत्त्वाची आहे. कारण, या धोरणांतर्गत सरकारने शेती विकासाचे दोन्ही मार्ग - आधार किमती आणि घटक अनुदान- यांचे सुयोग्य मिश्रण करून ते यशस्वीपणे राबविले. सरकारने शेतकऱ्यांना घटक घेण्यासाठी भरीव अनुदान तर दिलेच, शिवाय शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य अशी फायदेशीर किंमत देऊन ते उत्पादन हमी भावाने विकत घेतले. अन्नधान्यांची कोठारे भरून वाहू लागली. सरकार आणि शेतकरी असे दोघेही समाधान पावले. देश अन्नधान्यांत स्वयंपूर्ण झाला. धोरण व उपाय यशस्वी झाले.

परंतु, या हरितक्रांतीमध्ये एक उणीव होती. ही क्रांती 'गहू आणि तांदूळ' या पुरतीच मर्यादित आहे. शिवाय सरकारी खरेदी आजसुद्धा प्रामुख्याने या दोन पिकापुरतीच प्रामुख्याने होत आहे. ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, डाळी, इ. इतर अन्नधान्यांना हरितक्रांतीचा जवळजवळ काहीच उपयोग झालेला नाही. याशिवाय त्यांची सरकारतर्फे होणारी खरेदी नगण्य आहे. परंतु, तो आपला आजचा विषय नाही. आपला अभ्यास पुढे चालू आहे.

### आजची परिस्थिती

योगायोगाने, गेली काही वर्षे आपल्या देशामध्ये, घटक अनुदानापेक्षा आधार किमतीचा प्रश्न प्रकर्षाने गाजतो आहे. २०१८-१९च्या अर्थसंकल्पनानंतर तर शेतीची आणि शेतकऱ्यांची दुरावस्था (डिस्ट्रेस) संपविण्यासाठी आधार किमती हा एकमेव आणि तोसुद्धा रामबाण उपाय आहे असे काहीसे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे आधार किमतीचे अर्थव्यवस्थेवर होऊ शकणारे दुष्परिणाम आणि शेतकऱ्यांची दुरावस्था

दूर करण्यासाठी इतर सरस पर्यायी उपाय या दोहोंचा विचार करण्याची मानसिकतासुद्धा कोणाची दिसत नाही. आपण सविस्तर पाहू.

आपल्या देशामध्ये शेतमालाच्या आधार किमती निश्चित करण्यासाठी कृषि मूल्य आयोगातर्फे (सीएसीपी) सरकारला शिफारस केली जाते. नंतर सरकार आपल्या विचारानुसार आधार किमती निश्चित करते. परंतु, शिफारस करण्याची जबाबदारी आणि अधिकार कृषिमूल्य आयोगाचा आहे. (अर्थात, आपल्या मर्जीनुसार कृषि मूल्य आयोगाला डावलून सरकार आधार किमती निश्चित करू शकत असेल सुद्धा. परंतु, तसे अद्याप तरी घडलेले दिसत नाही. निदान सौजन्य म्हणून आयोगाकडून सरकार शिफारशी मागवत आले आहे.) आपली शिफारस करताना आयोगातर्फे त्या त्या शेतमालाचा उत्पादन खर्च, त्याला असू शकणारी मागणी, देशी आणि परदेशी किमती, देशातील इतर शेतीमाल आणि औद्योगिक वस्तू यांच्या किमती, त्या त्या शेतमालाचा देशामध्ये होऊ शकणारा संभाव्य पुरवठा इ. अनेक बाबींचा साधकबाधक विचार करून नंतर मग शिफारस केली जाते. मालाचा केवळ उत्पादन खर्चाचाच विचार करून (इतर बाबींचा विचार न करता) शिफारस केली जात नाही. (संदर्भ : डॉ. अशोक गुलाटी, इंडियन एक्सप्रेस दि. ६/२/२०१८).

कृषिमूल्य आयोगातर्फे तीन प्रकारच्या उत्पादन खर्चाचा किंमत निर्धारणासाठी विचार केला जातो.

१. शेतकऱ्याने स्वत:च्या खिशातून प्रत्यक्ष केलेला (खते, बी-बियाणे, औषधे यावरील) खर्च, याला ए२ असे म्हटले जाते.

२. वरील ए२ अधिक कुटुंबातील सदस्यांना त्यांनी घरच्या शेतावर केलेल्या कामाची दिलेली अप्रत्यक्ष (इंप्युटेड) मजुरीचा खर्च (ए२+ एफएल)

३. ए२+ एफएल अधिक शेतकऱ्याची स्वत:ची जमीन आणि स्वत:चे भांडवल यावरील अप्रत्यक्ष (इंप्युटेड) खंड आणि व्याज. या उत्पादन खर्चास सी२ अशी संज्ञा आहे. त्यामुळे सी२ हा प्रत्येक बारीकसारीक बाब विचारात घेऊन निश्चित केलेला सर्वसमावेशक उत्पादन खर्च होय. उत्पादन खर्च या पेक्षाही अधिक असणे संभाव्य नाही.

परंतु, २००६ मध्ये स्वामिनाथन आयोगाचा अहवाल सरकारला सादर झाला. (नॅशनल कमिशन ऑन फार्मर्स). या अहवालाने शेतमालाची आधार किंमत निश्चित करताना त्या शेतमालाच्या भारभूत सरासरी उत्पादन खर्चाचाच विचार करावा, अशी जोरदार शिफारस केली आहे. (वेटेड ॲव्हेरेज कॉस्ट ऑफ प्रॉडक्शन) परंतु वेटेज ॲव्हेरेज कॉस्ट ऑफ प्रॉडक्शन म्हणजे नेमके काय, आणि तो खर्च नेमका कसा निश्चित करावयाचा याचे स्पष्टीकरण अहवालामध्ये नाही. त्यामुळे उत्पादन खर्च आणि आधार किंमत ठरविताना प्रचंड गोंधळ होणे शक्य आहे. (संदर्भ : इंडियन एक्सप्रेस दि. २२ जून २०१७). कृषिमूल्य आयोगातर्फे जसे तीन प्रकारच्या उत्पादन खर्चाचे स्पष्टीकरण आणि गणित दिले जाते तसे स्वामिनाथन आयोगामध्ये नाही. तथापि, स्वामिनाथन आयोगाने सुचविलेला सरासरी उत्पादन खर्च आणि कृषिमूल्य आयोगातील सी२ हा खर्च हे दोनही एकच असावेत असा सध्या अनेक अभ्यासकांचा तर्क आहे.

त्यामुळे आधार किंमत निश्चित करताना कोणता उत्पादन खर्च विचारात घ्यायचा, हा आजचा शेतीमाल आधार किंमत निर्धारण करतानाचा यक्षप्रश्न आहे. स्वामिनाथन आयोगाची शिफारसच विचारात घ्यावी (सी२) इतर कोणतीही नाही आणि त्यानुसार आधार किमती ठरवाव्या अशी शेतकऱ्यांची आग्रही मागणी आहे. परंतु, सरकारने याला अद्यापही स्पष्ट मान्यता

दिलेली नाही. शेतकऱ्यांची मागणी सी२ + ५० टक्के अशी आहे.

२०१८-१९ च्या अर्थसंकल्पानुसार, सरकारने उत्पादन खर्च अधिक ५० टक्के अशी आधार किंमत असेल असे आश्वासन दिले आहे. परंतु, कोणता उत्पादन खर्च विचारांत घेणार. ए२ की ए२+ एफएल की सी२ (स्वामिनाथन) हे अद्याप तरी सरकारने स्पष्ट केलेले नाही. परंतु, बहुतेक अभ्यासकांच्या मते, हा उत्पादन खर्च सी२ (स्वामिनाथन) नसून ए२+ एफएल असेल. त्यामुळे उत्पादन खर्च जर १००रु. असेल तर आधार किंमत (उत्पादन खर्च १००+ ५० टक्के) १५०रु. असेल असे समजावयास हरकत नाही. सरकारतर्फे सध्या विविध प्रकारच्या २३ प्रकारच्या शेत वस्तूवरील आधार किंमत निश्चित केली जाते. त्या सर्व २३ वस्तुंच्या आधारभूत किमती या सूत्रानुसार निश्चित केल्या जातील. बाजारभाव आणि आधार किंमत यातील फरक सरकारतर्फे शेतकऱ्यांना देण्यात येईल. त्यामुळे शेतीमाल प्रत्यक्ष खरेदी करण्याची सरकारला गरज भासणार नाही. शेतकऱ्यांना आपले उत्पादन कोठेही आणि कोणालाही विकण्याचे स्वातंत्र्य असेल अशी व्यवस्था आहे.

## याचे संभाव्य परिणाम

ए२+ एफएल या उत्पादन खर्चाचा विचार केल्यास त्यावर ५० टक्के फायदा देण्यासाठी शेतमालाच्या आधार किमती मोठ्या प्रमाणावर वाढवाव्या लागतील असे मान्यवर अर्थशास्त्रज्ञ सांगत आहेत. सरकारी अंदाजाप्रमाणे या योजनेसाठी सुमारे ८०,००० कोटी रुपयांची तरतूद करावी लागेल. हा पैसा कसा जमा करावयाचा हा प्रश्न आहे.

या योजनेंतर्गत विक्रेत्या शेतकऱ्याला आपले नाव सरकारकडे नोंदवावे लागेल. लाखो, करोडो शेतकऱ्यांची नावे नोंदविणे, आवश्यक ते कागदपत्रे तयार करणे, नोंदी करणे यासाठी प्रचंड सरकारी नोकरवर्ग आवश्यक होईल. साहजिकच, भ्रष्टाचारास रान मोकळे.

या योजनेसाठी बाजार यंत्रणा प्रामाणिकपणे आणि कार्यक्षमपणे चालली पाहिजे. परंतु, एकतर सरकार पैसा देणार असल्यामुळे बाजार किमती पाडण्याचे प्रयत्न होतील. किमती पडतील. तसेच सरकार पैसे देणार म्हटल्यावर आपल्याकडे वाढीव उत्पादन नसतानासुद्धा शेतकरी शेतीमाल विकतील, सरकारकडून पैसे घेतील आणि तोच माल खाण्यासाठी पुन्हा स्वस्तात खरेदी करतील. सरकारची फसवणूक.

आजमितीस शेतमालाची निर्यात वाढविणे गरजेचे आवश्यक आहे. परंतु, ५० टक्के फायदा असल्यावर शेतकरी निर्यातीची खटपट करणारच नाहीत. शिवाय किंमत वाढल्याने निर्यातीतील स्पर्धाक्षमता कमी होईल हे वेगळेच!

याशिवाय सरकार जी काही थोडी बहुत खरेदी करेल (राखीव साठ्यासाठी) त्याची विक्री कशी करावयाची हा प्रश्न असेलच. कारण वाढीव किमती! मग पुन्हा अनुदान! यामुळे चढ्या भावाने खरेदी आणि अनुदाने देऊन पडेल त्या भावाने विक्री हे जुने दुष्टचक्र पुन्हा सुरू होईल.

आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारत सातत्याने श्रीमंत देशावर टीका करत आहे की, ते देश आपल्या शेतकऱ्यांना अवास्तव संरक्षण/अनुदाने देतात! आता वाढीव आधार किमतीमुळे ते देश भारतावर तशीच टीका करतील. त्या टीकेला तोंड/उत्तर कसे द्यायचे हा वेगळाच प्रश्न उद्‌भवेल!

विशेष म्हणजे उत्पादन खर्च काहीही असला तरी ५०% फायदा सहजासहजी मिळतो आहे. त्यामुळे प्रयत्न करून, प्रयोग करून कार्यक्षमता वाढविणे, उत्पादन खर्च कमी करणे यादृष्टीने हालचाल होणार नाही.

आळशीपणाला उत्तेजन मिळेल. भारतीय शेती आणि शेतकरी जगामध्ये सर्वांत अकार्यक्षम/आळशी होण्याचा धोका आहे.

एकूणच अर्थशास्त्रज्ञांच्या मते, ही योजना सर्वस्वी अयोग्य आणि शेती विकासाला निरुपयोगी आहे. मग पर्याय काय?

## आधार किमतीस पर्याय

'आधार किंमत देणे' या उपायांमधील सर्व प्रकारचे धोके टाळून सर्वंकष शेती विकासाला गती देऊ शकेल, असा सरस उपाय म्हणजे 'घटक अनुदान'(इनपुट सबसीडाइझींग) होय. या उपायामध्ये शेतमालाला आधारभूत किंमत न देता शेतकरी वापरत असलेल्या उत्पादक घटकांवर (बियाणे, खते इ.) अनुदान देऊन उत्पादन खर्च कमी करण्यात येतो. उत्पादन खर्च कमी झाल्यामुळे शेती फायदेशीर होऊ शकते. सुदैवाने आता या उपायामध्ये अधिक सुधारणा झाली आहे. घटकावर अनुदान न देता ते अनुदान शेतकऱ्यालाच द्यावे. शेतकरी तो पैसा आपल्या निर्णयाप्रमाणे उत्पादनासाठी खर्च करू शकेल. हा एक नवीन अभिनव उपाय तेलंगणा राज्य-सरकारने राबविण्यास सुरुवात केली आहे. या अंतर्गत :

१. राज्यांतील प्रत्येक शेतकऱ्यांस खरीप आणि रब्बी या दोन्ही हंगामासाठी प्रत्येक हंगामामध्ये दर एकरी ४०००रु. इतके अनुदान उत्पादन खर्चासाठी सरकार देईल. म्हणजे दरवर्षी ८०००रु !

२. जो शेतकरी रब्बीची पिके घेत नाही, त्याला ते अनुदान मिळणार नाही.

३. अनुदानाची रक्कम प्रत्येक शेतकऱ्यास धनादेशाने दिली जाईल. आपल्याला हव्या त्या बँकेत शेतकऱ्यास तो धनादेश वटविता येईल.

४. शेतकरी अनुदानाचा वापर कसा करतो यावर सरकारचे नियंत्रण/लक्ष असणार नाही. ऑडीट नाही.

५. पैसा खर्च करण्याचे आणि उत्पादन घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य शेतकऱ्यास असेल. तसेच उत्पादन विकण्याचेही पूर्ण स्वातंत्र्य!

६. उत्पादन विकत घेण्याची सरकारची जबाबदारी असणार नाही.

७. तेलंगणा राज्यामध्ये साधारण ७२ लाख शेतकरी आहेत. प्रत्येकास ८०००रु . या हिशोबाने एकूण रक्कम साधारणपणे १०,००० कोटी रुपये होऊ शकेल. आणि

८. याशिवाय शेतकऱ्यास मोफत वीज सतत चोवीस तास देण्यात येईल, असे या योजनेचे एकूण स्वरूप आहे.

'आधार किंमत देणे' या उपायापेक्षा तेलंगणा राज्याची योजना सर्वार्थाने सरस असून ती व्यावहारिक, स्वस्त, पारदर्शी, नि:पक्षपाती, सर्वसमावेशक असून शेतीविकास आणि शेतकऱ्याचा विकास या दोहोंना चालना देणारी आहे असे मत डॉ. गुलाटी यांनी व्यक्त केले आहे. शेतकऱ्याने काटकसर करून उत्पादन खर्च कमी केला तर (सरकारचा) उरलेला पैसा शेतकऱ्याचाच असेल.

तेव्हा भारत सरकारनेसुद्धा आधार किंमत या उपायाच्या मागे न धावता सर्वार्थाने सरस अशी शेतकऱ्यास अनुदान ही योजना स्वीकारल्यास शेती आणि शेतकरी या दोहोंचाही विकास समीप येईल. परंतु, हे घडेल असे दिसत नाही.

## समारोप

'आधार किंमत' आणि 'घटक अनुदान' या दोन्ही उपायांची आपण सविस्तर चर्चा केली. त्यांचे गुणदोष

विचारात घेतले. 'शेतकऱ्यांना अनुदान' हा उपाय सरस असूनसुद्धा तो सरकार दरबारी विशेष आवडता नाही. कारण आधार किंमत देणे, शेतकऱ्यांना बोनस देणे इ. उपायांना जे राजकीय महत्त्व आहे ते 'अनुदान' या उपायाला नाही. त्यामुळे राजकारणाच्यादृष्टीने आधार किंमत हाच उपाय अधिक वापरला जाईल असे स्पष्ट दिसते. राजकारणाने अर्थकारणावर मात पुन्हा एकदा केली असे म्हणणे भाग आहे.

## संदर्भ सूची


1. Aiyar S.S. : Don't Let it come a Cropper, Eco. Times, Dated : 13.02.2018.
2. Barker Hayami - Price support vs Insut subsidy Developing Conutries, Amercian Journal of Agri Eco, Dated : 01.11.1976.
3. Damodaran Harish : Swaminathan Formula Mirage in Indian Express, Dated : 22.06.2017.
4. Gulati Ashok : How to Help Farmers, in Indian Express, Dated:29.01.2018.
5. Gulati Ashok : M S P Smoke Screen in Indian Express, Dated : 06.02.2018.
6. Indian Express, 15.12.2018 - Agri Income Support Telangana.
7. Sabanvis Madan - Merely Hiking ..... Panacea In Business Line, Dated : 13.02.2018.


◆

## निवेदन : अर्थसंवाद वर्गणी

अर्थसंवाद अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / व्यावसायिक संस्था/ ग्रंथालये यांच्यासाठी त्रैवार्षिक वर्गणी रु. १०००/- तर पंचवार्षिक वर्गणी रु. १५००/- आहे. ही वर्गणी कृपया 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा संपादकांशी संपर्क साधून NEFT (मराठी अर्थशास्त्र परिषद, बँक ऑफ इंडिया, राजारामपुरी, कोल्हापूर. खाते क्र. : 094720110000368, IFSC : BKID0000947) द्वारे पाठवावी. **मनिऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.** सदर वर्गणी कृपया प्रमुख संपादकाच्या पुढील पत्त्यावर कव्हरिंग लेटरसह पाठवावी.


**डॉ. राहुल शं. म्होपरे**

विद्यापीठ क्वार्टर्स नं. डी-३४, सायबर समोर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर. पिन : ४१६ ००४. भ्रमणध्वनी : ०९९२३८७९०२०


**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

## निवेदन : अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल तर त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा; मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# भारतातील बँकींग उद्योग व बॅसल आव्हाने

**संतोष दास्ताने** †
माजी अध्यक्ष व माजी विश्वस्त,
मराठी अर्थशास्त्र परिषद, पुणे.

**गोषवारा :** सन १९९१ च्या दशकात भारतातील अभूतपूर्व आर्थिक सुधारणांच्या पार्श्वभूमीवर भारतातील बँकींग उद्योगाला सुदृढ व सक्षम करण्यासाठी रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर एम. नरसिंहन यांच्या अध्यक्षते-खालील समितीने केलेल्या शिफारशी या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बॅसल प्रमाणकांची अंमलबजावणी करण्याकरिता आवश्यक होत्या. त्याचा भारतातील बँकींग उद्योगानेसुद्धा स्वीकार केला व अंमलबजावणी केली. त्यामुळे सन २००८ साली आलेल्या जागतिक आर्थिक अरिष्टाच्या काळातही हा उद्योग सक्षमपणे कार्यरत राहिला. परंतु, त्यानंतर प्रस्तुत करण्यात आलेल्या बॅसल-३ प्रमाणकांच्या अंमलबजावणीसाठी भारतातील बँकांपुढेच नव्हे तर जगातील सर्वच बँकींग उद्योगांपुढे आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने वाढत जाणारी बुडीत व अनुत्पादक कर्जे आणि त्या प्रमाणात बँकांना राखावी लागणारी भांडवली पर्याप्तता हे प्रमुख आव्हान आहे. या प्रमाणकांच्या कसोटीवर बँकांना त्यांच्या अनुत्पादक कर्जांवर सातत्याने नियंत्रण तर ठेवावेच लागणार आहे आणि पुनर्भांडवलीकरण करावे लागणार आहे. त्याचा परिणाम बँकांनी कमविलेल्या नफ्यावर होणार असून या नफ्यातूनच विविध प्रकारच्या निधींद्वारे पुनर्भांडवलीकरण करताना बँकांच्या लाभांश वाटपावरसुद्धा परिणाम होऊ शकतो. खुल्या बाजारातून भांडवल उभे करणे बँकांना आव्हानच असणार आहे. त्यासाठी बँकांना व्यावसायिक व्यवस्थापनाचा अंगीकार करणे अपरिहार्य आहे.

**मुख्य शब्द :** बॅसल प्रमाणके, व्यापारी बँका, पुनर्भांडवलीकरण, भांडवली पर्याप्तता.

## प्रस्तावना

स्वातंत्र्योत्तर भारताच्या सात दशकातील आर्थिक वृद्धी आणि विकास यामध्ये बँकींग क्षेत्राने उल्लेखनीय कार्य केले आहे. या कालावधीत भारतीय अर्थ-व्यवस्थेच्या वेगवेगळ्या क्षेत्रात अनेक रचनात्मक बदल घडून आले. विशेषत: बँकींग क्षेत्रात गुणात्मक आणि संख्यात्मक अशा दोन्ही स्वरूपाचे बदल घडून आले. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी भारतीय बँकींग क्षेत्र हे नागरी भागातील विशेष वर्गातील ग्राहकांना सेवा देणारे अरुंद क्षेत्र होते. परंतु, त्यानंतरच्या काळात या क्षेत्राचा झपाट्याने विस्तार होत गेला आणि देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत बँकींग सेवेचे जाळे विस्तारत गेले. काळाच्या ओघात मोठ्या प्रमाणातील बँकींग व्यवसायाबरोबरच या क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान व व्यवस्थापन पद्धतीचा वापर वृद्धींगत झाला आहे.

†आजीव सभासद क्र. : ६४, भ्रमणध्वनी : ९८२२००९९५४, ई-मेल : santosh.dastane@gmail.com

त्यामुळेच या क्षेत्राने बँकींग क्षेत्र हे देशाच्या आर्थिक विकासाचे इंजिन असल्याचे सिद्ध केले आहे. स्वातंत्र्योत्तर काळाच्या ७० वर्षांत भारताची लोकसंख्या जवळपास ३ पटीने वाढली, ढोबळ घरेलू उत्पादन जवळपास ३२ पटीने वाढले; तर साक्षरता दर ४ पटीने वाढला आहे. सन १९५१ साली असणारे नागरी-ग्रामीण लोकसंख्या गुणोत्तर १:४.७ वरून २०११ साली १:२.२ इतके झाले आहे, हे भारतातील जलद नागरीकरणाचे द्योतक आहे. या पार्श्वभूमीवर बँकींग क्षेत्राचाही लक्षणीय विस्तार झाला आहे. १९५० साली देशातील प्रत्येक अनुसूचित व्यावसायिक बँक कार्यालय सरासरी ७५ हजार लोकांना सेवा पुरवीत होते; त्यामध्ये सुधारणा होऊन २०१७ साली प्रत्येक बँक कार्यालय १० हजार लोकांना गुणात्मक सेवा पुरविते आहे.

भारतातील अर्थव्यवस्थेच्या जवळजवळ सर्वच क्षेत्रात सुरुवातीस लोकशाही समाजवादी व्यवस्था असल्याचे दिसून येते. सार्वजनिक क्षेत्र अधिकाधिक सकारात्मक भूमिका पार पाडताना दिसते, तर जवळपास सर्वच क्षेत्रात शासनाचा हस्तक्षेप होता असे आढळून येते. परंतु २० व्या शतकातील शेवटच्या दशकापासून जागतिकीकरण तसेच उदारीकरण आणि खासगीकरणाचे बाळकडू देण्यास सुरुवात झाली. अर्थव्यवस्था हळूहळू खुली होण्यास सुरुवात झाली. गुणवत्ता हे एकविसाव्या शतकाचे ब्रीदवाक्य बनले. १९९१ सालानंतर नियंत्रण, परवाना पद्धती, राष्ट्रीयीकरण आणि गुंतवणूक यामधील सरकारी हस्तक्षेप मर्यादित करण्याच्या प्रक्रियेस सुरुवात झाली. देशाच्या अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले. जागतिकीकरणाच्या या प्रवाहात भारतीय अर्थव्यवस्था, जागतिक बाजारपेठ, जागतिक अर्थव्यवस्था या परिवर्तनास सिद्ध झाली.

**सुधारणांचे पर्व** : आर्थिक सुधारणांचा सुरुवातीचा काळ समग्रलक्षी अर्थव्यवस्थेत स्थिरता प्राप्त करून देणाऱ्या उपाययोजनांचे व्यवस्थापन करणारा होता. विदेशी मुद्रास्थितीने सुरक्षित मर्यादेचे सर्व निकष ओलांडले होते व तातडीने पावले उचलून परिस्थिती सामान्य करणे आवश्यक बनले होते. संरक्षण व सामूहिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असणारे १५ उद्योग सोडून औद्योगिक परवाना पद्धती अधिक सोपी व खुली करण्यात आली. अर्थव्यवस्थेतील वाढत्या स्पर्धात्मकतेमुळे व बाजारीकरणामुळे मक्तेदारी नियंत्रण कायद्याचे (MRTP Act) अस्तित्व संपुष्टात आले. थेट विदेशी गुंतवणुकीस चालना देण्यात आली. त्यासाठी नियमने व नियंत्रणे अधिक सुटसुटीत करण्यात आली. तांत्रिक अद्ययावतीकरण आणि आधुनिकीकरण घडवून आणण्यासाठी तंत्रज्ञान आयातीस प्राधान्य देण्यात आले. सर्व प्रकारच्या वस्तूंवरील संख्यात्मक नियंत्रणे हटविण्यात आल्याने विदेशी व्यापार अधिक सुकर झाला. सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापना अधिक स्वायत्त, स्पर्धात्मक आणि कार्यक्षम होण्यासाठी व्यावसायिक व्यवस्थापनास सुरुवात झाली. आर्थिक सुधारणांच्या या प्राथमिक उपचारानंतर दुसऱ्या पिढीच्या सुधारणांना सुरुवात झाली. त्यांना मानवी व सामाजिक बदलांचा स्पर्श होता. अर्थव्यवस्थेतील दीर्घकालीन बदल व आव्हाने त्यात समाविष्ट होती. ज्या काही सुधारणा करण्यात आल्या, त्यापैकी वित्तीय व बँकींग क्षेत्राशी संबंधित सुधारणा अधिक खोलवर आणि व्यापक स्वरूपाच्या होत्या. त्यासाठी रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर एम.नरसिंहन यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने दोन स्वतंत्र समित्यांची नियुक्ती केली. वित्तीय व्यवस्थेसंदर्भातील प्रथम समितीने तिचा अहवाल १९९२ मध्ये तर बँकींग क्षेत्रासंबंधीच्या द्वितीय समितीने आपला अहवाल १९९८ मध्ये सादर केला. प्रथम समितीच्या अनेक शिफारशींचे अर्थव्यवस्थेवरील आणि बँकींग क्षेत्रावरील दूरगामी परिणाम निदर्शनास येतात,

त्या अहवालातील काही महत्त्वपूर्ण बाबी पुढीलप्रमाणे :

अ) वैधानिक रोखता प्रमाण (SLR) व रोख राखीव निधी प्रमाण यामध्ये कपात.

आ) मान्य उत्पन्न (Income Recognition) मालमत्ता वर्गीकरण, भांडवली पर्याप्तता व बुडीत मालमत्ता तरतूद यासंदर्भात दूरदर्शी वा धोरणात्मक प्रमाणके मांडण्यात आली.

इ) बँकांना त्यांच्या शाखांचे जाळे विस्तारण्यासाठी अधिक खुले धोरण मान्य केले गेले.

ई) नव्या पिढीच्या व्यावसायिक बँकांकरिता खासगी क्षेत्राच्या प्रवेशास मान्यता व प्रोत्साहन देण्यात आले.

उ) व्याजदर रचनेचे उदारीकरण आणि वाजवीकरण.

ऊ) सन १९९३ मध्ये विशेष वसुली लवाद कायदा (SRTA) मंजूर करण्यात आला. जलद आणि संपूर्ण कर्ज थकबाकी वसुलीच्या हमीसाठी बँकांच्या संशयित मालमत्तेची काळजी घेण्यासाठी, मालमत्ता पुनर्रचना निधीची उभारणी.

ए) सर्वसाधारणपणे वित्तीय व्यवस्थेचे सक्षमीकरण व विशेषत: बँकांची नफाक्षमता वाढावी याकरिता आणि अधिक निधीच्या उभारणीकरता नवीन वित्तीय साधनांची (उदा. ठेवींचे प्रमाणपत्र) निर्मिती.

ऐ) ग्रामीण लोकसंख्येतील दुर्बल घटकासाठी प्राधान्य क्षेत्राची व्याख्या व व्याप्तीत सुधारणा करण्यात आली.

नरसिंहन् समिती -१ च्या वरील शिफारशी बँकींग क्षेत्र अधिक खुले करणे व बँकींग व्यवस्थेचे सक्षमीकरण करणे यासाठी आवश्यक होत्या. त्यामुळे या समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी अधिक व्यापकतेने करण्यात आली. त्यामुळे बँकींग क्षेत्राची विश्वासपूर्ण वाटचाल सुरू झाली. बँकींग क्षेत्र अधिक स्पर्धात्मक, कार्यशील व लवचिक बनले.

नरसिंहन् समिती -२ ने जेव्हा बँकांच्या कार्यपद्धतीवरील आपला सर्वंकष अहवाल १९९८ मध्ये सादर केला, तेव्हापासून बँकींग क्षेत्रातील बदलांचा दुसरा टप्पा सुरू झाला. दुसऱ्या पिढीच्या सुधारणा असे त्यांना नाव दिले गेले. यावेळी समितीने आंतरराष्ट्रीय मानकांनुसार बँकांच्या गुणात्मक प्रगतीवर विशेष भर दिला. आंतरराष्ट्रीय मानकानुसार उत्तम कार्यप्रदर्शन करण्यासाठी जर आवश्यकता भासली तर बँकींग संरचनेचे वाजवीकरण करण्याचा प्रयत्न करण्याचे सूचित करण्यात आले. समितीने वैधानिक चौकटीवर शिफारस करताना रिझर्व्ह बँक कायदा, बँकींग नियंत्रण कायदा, स्टेट बँक ऑफ इंडिया अधिनियम इ.चा पुनर्विचार, पुनर्वापर व आवश्यक दुरुस्तीसाठी पूर्ण चिकित्सा आणि त्याचा बँकींग व्यवस्थेवरील परिणाम यांचा अहवालात समावेश केला. अनेक टीकाकारांनी द्विरुक्ती आणि पुनरावृत्तीच्या समान प्रश्नांवर या द्वितीय समितीची अनावश्यकता प्रतिपादन केली. प्रथम समितीच्या अहवालावर कार्यवाही पूर्ण झाली नसताना द्वितीय समितीची स्थापना झाली. असे असले तरी प्रथम समितीने बँकांच्या एकात्मिक व सशक्त संरचनेसाठी व्यापारी बँकांच्या एकत्रीकरणास प्रोत्साहन देण्यासंदर्भात मत मांडले होते. परंतु द्वितीय समितीने मात्र या प्रश्नावर पूर्णपणे उलट मत मांडले. अशा काही त्रुटी व विसंगती असल्या तरी या समित्यांनी बँकींग व वित्तीय क्षेत्र तसेच संपूर्ण अर्थव्यवस्था योग्य त्या मार्गावर आणण्याचा यथायोग्य प्रयत्न केला.

**प्रस्तुत अभ्यासाचे उद्देश** : वर वर्णन केलेल्या समग्रलक्षी अर्थव्यवस्थेच्या दृश्यपटलावर या अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

अ) संरचनात्मक बदलांच्या संदर्भात बँकींग क्षेत्रासमोरील आव्हानांची उकल करणे.

इ) बँकींग क्षेत्रासाठी लागू करण्यात आलेल्या बॅसल

मानकांच्या परिणामांचा अभ्यास करणे.

उ) बँकींग क्षेत्राला चैतन्यपूर्ण, सर्वंकष व कार्यक्षम बनविण्यासाठी त्यामध्ये संरचनात्मक बदल घडवून आणणाऱ्या योग्य त्या सूचना मांडणे.

एकविसाव्या शतकाच्या पूर्वाधात बँकींग उद्योगामध्ये सुधारणांचे जे टप्पे गाठले गेले त्यामध्ये बॅसल मानके ही महत्त्वपूर्ण मैलाचा दगड ठरल्याचे सिद्ध होते. त्यामध्ये बँकींग उद्योगात दीर्घकालीन सुधारणा दृष्टिक्षेपात आहेत व त्याचबरोबर पर्यायाने अर्थव्यवस्थेतही सुधारणा होणे अपेक्षित आहे. आर्थिक व बँकींग क्षेत्रातील सुधारणांच्या पार्श्वभूमीवर या शोधनिबंधाच्या संदर्भात खालील संदर्भ साहित्याचा संक्षिप्त आढावा घेणे उचित ठरणारे आहे.

**संदर्भ साहित्याचा आढावा :** सन २०१२ मध्ये किडवाई यांनी समकालीन समर्पकतेचा (contemporary relevance) समावेश असलेल्या अनेक शोधनिबंधांचा एक ग्रंथ संपादित केला. त्याचा विषय बँकींग, वित्त व भांडवली बाजारातील बदलांच्या संदर्भात होता व त्यामध्ये प्रशासन, नवउपक्रम आणि तंत्रज्ञानाचे अद्ययावतीकरण यावर लक्ष केंद्रित केले आहे. त्यामध्ये या क्षेत्रात असणाऱ्या आव्हानांवरही प्रकाश टाकण्यात आला आहे. सन २०१२ मध्ये रंगराजन यांनी या क्षेत्रातील अनुत्पादक मालमत्ता (Non Performing Assets-NPA), वित्तीय समावेशन, नवउपक्रम यासारख्या समस्यांवर भाष्य केले आहे. झेनुलभाई (२०१२) यांनी भारतीय बँकींग क्षेत्रासंदर्भात नागरीकरण, ग्राहकांचे बदलते वर्तन आणि उच्चतर स्पर्धा यातील सहसंबंध मांडण्याचा प्रयत्न केला आहे. सुब्बाराव (२०१२) यांनी आपल्या लेखात बँकींग क्षेत्रावरील संयुक्त प्रशासन यावर महत्त्वपूर्ण प्रश्नांची चर्चा केली आहे. बिंद्रा यांनीसुद्धा (२०१२) बँकांच्या प्रशासकीय संरचनेवर काही महत्त्वपूर्ण बाबी मांडल्या आहेत. आचार्य (२०१२) यांनी बॅसल-३ मधील अटींची भारतीय अर्थव्यवस्था व विशेषत: बँकींग उद्योगातील अंमलबजावणी याचे विश्लेषण केले आहे. समग्रलक्षी आर्थिक संदर्भात अर्थव्यवस्थेतील बदलांबाबत रिझर्व्ह बँकेची प्रकाशने, प्रकाशित नियतकालिके इत्यादींनी बॅसल-३ अटींवर प्रकाश टाकला आहे. या प्रकाशनांमध्ये रिझर्व्ह बँकेचा २०१२ सालचा वार्षिक अहवाल, भारतातील बँकींगचा विकास व कल, आणि वित्त व चलन यावरील अहवालांचा समावेश आहे. सन २०१३ चे आर्थिक सर्वेक्षण व १२ व्या पंचवार्षिक योजनेचा मसुदा (२०१२) यामध्ये भारतातील बँकींग क्षेत्र व विशेषत: बॅसल-३ अटींच्या संबंधित समस्यांवरील चर्चा समाविष्ट आहे. भारत सरकारने वित्तीय दृढीकरणाचा मार्ग सुचविण्यासाठी एक समिती गठित केली होती. त्या समितीच्या अहवालात (२०१२, केळकर समिती) भारतातील बँकांसाठी भांडवली तरतुदी व राजकोषीय अंमलबजावणी यावर प्रकाश टाकला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत बॅसल-३ अटींच्या अंमलबजावणीचा खर्च सुभाशिष राय (२०१३) यांनी अंदाजित केला, त्यांनी विशेष करून समग्रलक्षी आर्थिक शाखेसंदर्भात चर्चा केली आहे.

**बॅसल संकल्पनेची उत्क्रांती :** बॅसल हे स्वित्झर्लंड देशाच्या वायव्य भागात उत्तर सीमेवर ऱ्हाईन नदीच्या तीरावर वसलेले एक छोटे शहर आहे. त्याची लोकसंख्या अंदाजे २ लाख आहे. लोकसंख्येने हे त्या देशातील तिसरे शहर आहे. त्या शहरात अनेक वस्तुसंग्रहालये व कलादालने आहेत. रसायन आणि औषधनिर्माण उद्योगांसाठी हे शहर मुख्यत: प्रसिद्ध आहे. तेथे देशातील सर्वात जुने विद्यापीठ आहे. त्याची स्थापना १४६० साली झाली. सेवा व्यवसायांमध्ये प्रामुख्याने बँकींग आणि वित्तीय सेवांसाठी हे शहर प्रसिद्ध आहे.

जगातील व्यापारी बँकांच्या परिनिरीक्षणाच्या संदर्भात बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंट या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेने जी समिती नेमली होती तिला 'बॅसल समिती' असे संबोधले जाते. दुसऱ्या महायुद्धानंतर व विशेष करून विसाव्या शतकाच्या शेवटी व एकविसाव्या शतकात बँकींग क्षेत्रात व त्यातही व्यापारी बँकींग क्षेत्रात क्रांतिकारी बदल झाले. वाढती स्पर्धा, नवे तंत्रज्ञान, उदारीकरण, आर्थिक सुधारणा, खासगीकरण ही बदलाची ठळक वैशिष्ट्ये होती. बँकांनी आपले व्यवहार पारदर्शी ठेवावेत, त्यांची कार्यपद्धती प्रमाणीकृत असावी, तेजीमंदीच्या आव्हानांना त्यांनी समर्थपणे तोंड द्यावे; अशा उद्दिष्टांसाठी या बॅसल समितीने वेळोवेळी आपल्या शिफारशी मांडल्या.

जागतिक पातळीवर बँकींगमध्ये सतत सुधारणा करण्यासाठी बॅसल समिती ही एक कायमस्वरूपी योजना आहे. भारताने बॅसल सुधारणा योजनेसाठी स्वाक्षरी करून संमती दर्शविल्याने त्या सुधारणांची अंमल-बजावणी करणे भारतावर बंधनकारक आहे. या संकल्पनेत व्यापारी बँकांमधील भांडवली निधींची भूमिका व त्याबाबत नियामक यंत्रणांना संक्षिप्त सूचना करण्यात आल्या आहेत. तसेच उत्तरदायित्व, पारदर्शकता, आणि उत्पादकता हे घटक शासनाच्या विभागाकडून हस्तांतर करण्यात येणाऱ्या प्रशासकीय निधीपेक्षा अधिक वर्चस्ववादी भूमिका पार पाडतात. बँकेचा कर्ज व्यवसाय विस्तृत करण्यासाठी बँक अधिक सुरक्षित स्वभांडवली निधीचा पाया निर्माण करते. त्याचा बँकेच्या कार्यक्षमतेवर आणि नफाक्षमतेवर थेट परिणाम होतो. सशक्त, रुंद आणि खोलवर भांडवली पायाच बँकेची सशक्त जोखीम क्षमता असते. बँकींग नियमन (Banking Regulation Act, 1949) कायद्याच्या कलम २३ अन्वये रिझर्व्ह बँकेस बँक व्यवसाय कोणत्याही अडथळ्यांविना व धक्क्यांविना सुचारूपणे कार्यरत राहण्यासाठी बँकांच्या भांडवली पर्याप्ततेबाबत सूचना करण्यासाठी पुरेसे अधिकार प्रदान केले आहेत.

बँकेच्या स्वभांडवलाची पर्याप्तता तपासणीसाठी अनेक मापदंडांची उपाययोजना केली आहे. बँकेची वित्तीय परिस्थिती तपासण्यासाठी बँकेचे भरणा झालेले भागभांडवल व बँकेचा राखीव निधी अथवा गंगाजळीचे गुणोत्तर, ठेवी व भांडवलाचे गुणोत्तर हे सातत्याने वापरले जाणारे निदर्शक आहेत. ह्या गुणोत्तराचे मूल्य जास्त असल्यास बँक व्यवसायाची जोखीम कमी असते. परंतु जोखीम अथवा धोका पत्करण्याची क्षमता आणि नफाक्षमता यातील संबंध मात्र व्यस्त आहे. बँकेची वित्तीय परिस्थिती तपासण्यासाठी आणखी एक निर्देशक म्हणजे भांडवल व जिंदगी/मालमत्ता गुणोत्तर याचा वापर केला जातो. बँकेची भांडवली पर्याप्तता मोजण्यासाठी प्राथमिक भांडवल व जोखीम प्रमाण यांचासुद्धा उपयोग केला जातो. यामध्ये बँकेच्या जोखीम भारांक मालमत्तेसाठी जुळवून घेतलेले प्राथमिक भांडवल गृहीत धरले जाते. तसेच सुरक्षित व उत्पादक कार्यासाठी कोणतेही मुख्य सूत्र अवलंबिले जात नाही. बँकेची व्यावसायिक नीती आणि व्यवस्थापन यावर याबाबी अवलंबून असतात.

**बॅसल -१ :** सन १९८८ पासून बॅसल समितीने जोखीम व्यवस्थापनासाठी भांडवली पर्याप्ततेची सुधारित मानके सूचित केली आहेत. आंतरराष्ट्रीय तडजोडविषयक बँकेने (Bank for International Settlement) जोखीम मुक्त बँक व्यवहारांसाठी ठरविण्यात आलेले भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण ही सुरुवात होती. बँकींग क्षेत्रातील वाढती स्पर्धा, नवनवीन तंत्रज्ञान, उदारीकरण, सुधारणा कार्यक्रम आणि खासगीकरणाचे धोरण यासाठी ह्या अटी आवश्यकच होत्या. जुलै १९८८ मध्ये बॅसल समितीने अटींचे पालन करण्यासाठी कालबद्ध धोरण मांडले. भांडवल पर्याप्तता प्रमाण मोजण्यासाठी

जोखमीनुसार मालमत्तांचे वर्गीकरण केले. या १९८८ च्या बॅसल-१ अटींनी भांडवलाचे दोन भागात वर्गीकरण केले. श्रेणी-१ भांडवल हे मुख्य भांडवल की जे कायमस्वरूपी भांडवल होते. यामध्ये भरणा झालेले भागभांडवल, वैधानिक राखीव निधी, भाग अधिमूल्य निधी आणि राखीव भांडवली निधी यांचा समावेश होता. श्रेणी-२ भांडवल हे पूरक भांडवल की जे श्रेणी-१ पेक्षा कमी कायमस्वरूपी भांडवल होय. यामध्ये सर्वसाधारण इतर निधी, पूर्ण भरणा झालेले संचयी प्राधान्य भाग निधी, पुनर्मूल्यांकन निधी, सर्वसाधारण तरतुदी आणि तूट राखीव निधी समाविष्ट होत. यातील श्रेणी-१ साठी जोखीम भारांक मालमत्तेच्या कमीत कमी ८% भांडवलाचे प्रमाण ठरविण्यात आले. परंतु श्रेणी-२ च्या भांडवलाचे प्रमाण श्रेणी-१ भांडवलाच्या १०० टक्क्यांपेक्षा जास्त असता कामा नये असे ठरविण्यात आले. या अटींमध्ये बँकांच्या जोखमींनुसार ० ते १०० टक्के यामध्ये वर्गीकरण देण्यात आले. या अटी पूर्ण करण्याबाबतचा अनुभव समाधानकारक नव्हता. सर्व सभासद देशातील सर्व बँकींग संस्थांकडून या बॅसल अटींच्या अंमलबजावणीची चालढकल ही सर्वसाधारण बाब होती. मालमत्तांचे वर्गीकरण अपरिपक्व होते. या अटींमध्ये पतजोखीम व इतर प्रकारची जोखीम यामध्ये कोणताही भेद नव्हता.

**बॅसल -२ :** बॅसल-१ अटींच्या वरील मर्यादांमुळे भांडवल पर्याप्ततेच्या बॅसल-२ अटींची मांडणी करण्यास चालना मिळाली. जून १९९९ मध्ये बॅसल-२ ची सुरुवातीची आवृत्ती सर्वत्र वितरित झाली व ती अधिक वादग्रस्त ठरली. जानेवारी २००१ मध्ये सुधारित आवृत्ती देण्यात आली. त्यानंतर जुलै २००३ मध्ये आणखी एक सुधारित आवृत्ती प्रसारित करण्यात आली आणि ती हळूहळू टप्प्याटप्प्याने २००६ पर्यंत कार्यान्वित झाली. बॅसल-२ च्या या आवृत्तीमागील मूलभूत वैचारिक बैठक सर्वसाधारण पुढीलप्रमाणे होती.

अ) अगोदरच्या काळात जोखीम भारांकाच्या कमीत कमी १०० टक्के भांडवली आवश्यकता होती.आता जोखीम भारांकाचे चार टप्पे करण्यात आले. उदा. २०%, ५०%,१००%, व १५०%. हा नवा दृष्टिकोन अधिक समर्पक व वास्तववादी होता.

ब) प्रत्येक बँकेने स्वत:ची आदर्श वित्तीय व्यवस्था निर्माण करून उत्तम परिनिरीक्षण प्रक्रियेद्वारे भांडवल पर्याप्ततेची आवश्यकता सुनिश्चित करणे. त्यामुळे व्यवस्था अधिक लवचिक बनली.

क) बँकांनी अधिक उघडपणाने बाजार शिस्तीचे पालन करणे. त्यामुळे बँकांची जोखमी पार्श्वभूमी अधिक पारदर्शक व भांडवल पर्याप्तता अधिक वस्तुनिष्ठ होणार होती.

वरील मूलभूत तत्त्वप्रणालीनुसार अनेक सुधारणा मांडण्यात आल्या. उदा. पूर्ण सुरक्षित कर्ज वाटपासाठी ४०% ऐवजी ३५% जोखीम भारांक निश्चित करण्यात आला. तसेच एक पर्यायी प्रमाणशीर कार्यकारी जोखीम दृष्टिकोन विकसित करण्यात आला. बँकांनी स्वत:च त्यांच्या पत-जोखमीचे मूल्यमापन करावे आणि त्यांच्या स्वत:च्या प्रमाणबद्ध व्यूहरचनेचे पालन करावे, या सुधारित व्यवस्थेद्वारा उच्च स्पर्धात्मक फायद्यांबरोबरच अधिकतम चिकाटी अपेक्षित केली गेली. यामध्ये उच्च दर्जाच्या बँकींग सेवेचा हेतू सामावलेला होता.

**अंमलबजावणी :** बॅसल-१ व बॅसल-२ च्या अटींना भारतीय रिझर्व्ह बँकेने सकारात्मक व सक्रिय प्रतिसाद दिला. भारतातील बँकींग उद्योगानेसुद्धा त्याचे उत्साहाने स्वागतच केले. जून २००६ मध्ये रिझर्व्ह बँकेचे तत्कालीन गव्हर्नर वाय. वी. रेड्डी यांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे, 'संथ बदल, सावध सुसंवाद व जागतिक दर्जा यांचा काळजीपूर्वक मेळ घातला गेला.' रिझर्व्ह

बँकेच्या या प्रयत्नांमध्ये भांडवली आवश्यकतेचे कालबद्ध मूल्यमापन, त्यासंदर्भात त्रैमासिक प्रगतीचा आढावा, बॅसल या जागतिक दर्जाच्या मानकांची पूर्तता करण्यासाठी सर्वोच्च व्यवस्थापनास संवेदनशील करणे इ.चा समावेश होता. या दिशेने महत्त्वाचे पाऊल म्हणजे भांडवली पर्याप्ततेची मूल्यांकन प्रक्रिया व्यवहारात आणणे होते. बँकांमध्ये जोखीमधारित परिनिरीक्षण व्यवस्थासुद्धा गठित करण्यात आली. ह्या अटींच्या अंमलबजावणीची खात्री करण्यासाठी एक सुकाणू समिती नेमली गेली. सुधारित दिशानिर्देशानुसार बँकांना सातत्याने भांडवल जोखीम भारांक मालमत्ता गुणोत्तर (CRAR) राखणे आवश्यक बनले. परंतु प्रकरण निहाय जोखीम पार्श्वभूमी गृहीत धरून रिझर्व्ह बँक विशिष्ट बँकेस अधिकतम भांडवली गुणोत्तराची शिफारस करू शकते. अपेक्षेप्रमाणे बँकांना श्रेणी-१ च्या भांडवलाची मात्रा ६% पूर्ण करण्याचे कालबद्ध लक्ष्य देण्यात आले. श्रेणी-२ च्या भांडवलाची मात्रा पूर्ण करण्यासाठी एक संरचनात्मक अनुसूची तयार करण्यात आली. जोखीम मूल्यांकनासाठी क्रिसिल (A Subsidiary Company of Standard & Poor) व इक्रा (ICRA) या पत मानांकन कंपन्यांनी दिलेले पत मूल्यांकन प्रमाणपत्र अधिकृतपणे स्वीकारले गेले. अशाप्रकारे भारतातील बँकींग उद्योगात आंतरराष्ट्रीय मानकांनुसार भांडवल पर्याप्तता, जोखीम व्यवस्थापन, रोखता व्यवस्थापन, पारदर्शकता, स्पर्धात्मकता व सुप्रशासन याबरोबर बॅसल अटींची पूर्तता करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली गेली. बॅसल-२ अनुसार बँकांना ६७० ते ७२५ कोटी रुपये नवीन भागभांडवलाची आवश्यकता निर्माण झाली. ही भारतातील बँकींग उद्योग अधिक सुदृढ व स्थिरस्थावर करण्याची किंमत होती.

**बॅसल -३ :** सन २००८ मध्ये उद्‌भवलेल्या जागतिक वित्तीय पेचप्रसंगाने जगातील अनेक नामवंत अर्थसंस्था व विशेषत: गुंतवणूक बँका उदा. लेहमन ब्रदर्स, मेरील लिंच लयाला गेल्या, तर काही दुसऱ्या संस्थेत विलीन झाल्या, काही अवसायनात गेल्या. सिटी बँकेसारख्या संस्थेला सरकारने गुंतवणूक करून जीवनदान द्यावे लागले. सन २००६ पासून भारतातील बँकींग उद्योगाची स्थिती हळूहळू योग्य दिशेने सुधारण्यास सुरुवात झाली असली तरी अनुत्पादक मालमत्तेचे उच्च प्रमाण व वित्तीय समावेशन यासारख्या समस्या तशाच राहिल्या. सन २००८ साली निर्माण झालेल्या आंतरराष्ट्रीय वित्तीय आरिष्टाने भारतीय बँकांच्या मजबूत संरचनेमध्ये तडे गेले. नियामक संस्थांच्या हातातील परिणामशून्य आयुधे व संरचनेचे अपयश यामुळे बँकांची अनुत्पादक मालमत्ता फुगत गेली व बँकांचे एकूणच व्यावसायिक अपयश उघड झाले. या सर्व घटना क्रमाने बॅसल-३ नामाभिधान असलेल्या ताज्या अटींचा मार्ग अधोरेखित केला गेला. बॅसल-३ अटी या बॅसल-२ चा विस्तार आहे, पर्याय नाही. या नवीन गुणवैशिष्ट्यांचा तपशील पुढीलप्रमाणे :

अ) भांडवलाची मात्रा आणि गुणवत्तेत वाढ करणे.

ब) रोखता मानकांची निश्चिती.

क) व्यवसायातील नफ्यातून करावयाच्या तरतुदींच्या सूत्रात सुधारणा.

ड) व्यावसायिक व आर्थिक स्थितीचे उत्तम व अधिक पारदर्शक प्रकटीकरण.

वरील सर्वसाधारण अटींची पूर्तता करण्यासाठी बॅसल-३ ने कालबद्ध कार्यक्रम प्रसृत केला. बँकांनी २०१३ पर्यंत जोखीम भारांक मालमत्ता भांडवल तरतुदींचा ३.५% व २०१९ पर्यंत ४.५% टप्पा गाठणे अपेक्षित होते. अंतिमत: २०१३ पर्यंत त्यांनी जोखीम भारांक मालमत्ता भांडवली पर्याप्ततेचा ८% व २०१९ पर्यंत १०.५% टप्पा गाठणे अपेक्षित होते. या तरतुदींनी बँकांना कर्ज मागणीतील चक्रीय चढउतार व त्यातून

निर्माण होणारी अपेक्षित तूट यातून आश्वस्त केले जाऊ शकते. त्याने भांडवली गरजा व रोखता गरजा यातील नैसर्गिक संबंध लक्षात येतात. दोन्हींसाठी समान उपचारांची गरज आहे, त्यामुळे संभाव्य अपयश व व्यवस्थेतील तोटे टाळता येतील. हा सुधारित दृष्टिकोन मांडताना बॅसल-३ समितीने दोन नवीन गुणोत्तरे शोधली ती म्हणजे :

**१) रोखता समावेशन गुणोत्तर (LCR) :** बँकेच्या ३० दिवसांपेक्षा जास्त कालावधीतील निव्वळ रोख देयकांच्या इतकी उच्च गुणवत्तेची रोख मालमत्ता (रोख रक्कम + सरकारी रोखे).

**२) निव्वळ स्थिर निधी गुणोत्तर (NSFR) :** बँकेच्या स्थिर निधीच्या उपलब्ध भागाचे स्थिर निधीच्या आवश्यक भागाशी असणारे गुणोत्तर. यात भांडवल, दीर्घकालीन देणी आणि अल्पकालीन स्थिर मुदत ठेवी यांचा समावेश. साधारणतः हे गुणोत्तर १ पेक्षा जास्त असावे म्हणजे ते १००% पेक्षा जास्त असावे.

या तरतुदींचे टीकात्मक मूल्यमापन करता असे निदर्शनास येते की, नवीन अटी बँकींग व्यवसायातील सूक्ष्म दृष्टिकोन विचारात घेतात; परंतु समग्रलक्षी अर्थव्यवस्थेच्या चढउतारांसोबत त्याची नाळ जोडण्यात अपयशी ठरतात. व्यक्तिगत पातळीवर अधिक लक्ष दिल्याने समग्र पातळीवरील जुळवणीकडे दुर्लक्ष होते. परिणामतः व्यवस्थेतील अंगभूत जोखीम व कालांतराने व्यवस्थेतील अपयश हे घडू शकते. या सर्वांमुळे जोखीम व्यवस्थापन व जोखमीचे किमानीकरण हे मूळ उद्देश दूरच रहातात.

बॅसल-३ ने बँकांच्या भांडवली पायाची संकल्पना नव्याने मांडली आहे आणि ती गुणात्मकदृष्ट्या अधिक उत्तम करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, अजून बरेच काही करावयाचे बाकी आहे. एकूणच बॅसल-३ मध्ये जोखीम व्यवस्थापन व रोखता व्यवस्थापन यावर भर देण्यात आला आहे. या बॅसल-३ च्या काही प्रमुख तरतुदी थोडक्यात पुढीलप्रमाणे :

- मार्च २०१५ अखेर भांडवलाचे प्रमाण एकूण व्यवसायाच्या ५.५% वर नेणे.
- मार्च २०१८ अखेर भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण ११.५% पर्यंत नेणे. तसेच संभाव्य आर्थिक धक्क्यातून सावरण्यासाठी श्रेणी -१ च्या वाढीव भांडवलाची उभारणी करणे.
- वेगवेगळ्या गुंतवणुकीला/कर्जांना वेगवेगळा जोखीम भारांक असून तो बॅसल-३ तरतुदीनुसार लागू करण्याच्या (२०१३-१५) काळात ४.५% हून अधिक राखण्याचे प्रयत्न करणे.
- काही अटींची पूर्तता केल्यानंतर बँका त्यांचा नफा त्यावर्षीच्या भांडवल पर्याप्ततेच्या पूर्ततेसाठी वापरू शकतील.

बॅसल-३ च्या या तरतुदी पाहता जगातील सर्वच देशांना त्यांची पूर्तता करणे आव्हानात्मक ठरणारे आहे. एका बाजूला जोखीम भारांक वाढेल तर दुसऱ्या बाजूला समभाग भांडवल वाढल्यामुळे गुंतवणुकीवरील परतावा कमी होईल. बँकांच्या भांडवली संरचनेमध्ये भांडवल व गंगाजळी यांचे प्रमाण ८% पेक्षा कमी झालेले चालणार नसल्याने व्यवसायवृद्धी बरोबरच दरवर्षी किंवा तीन-चार वर्षांचा आढावा घेऊन भागभांडवलात सतत वाढ करावी लागणार आहे. भांडवलात वाढ केल्याने उत्पादन व उत्पन्नात वाढ करून परतावा नियमित राखणे आव्हानात्मक होणार आहे. तर दुसऱ्या बाजूस अनुत्पादक मालमत्तेवर नियंत्रण ठेवून त्याचे प्रमाण कमीतकमी राखणे अत्यावश्यक व आव्हानात्मक आहे. अन्यथा, भांडवली पाया विस्तारूनही नफाक्षमतेत वाढ होणार नाही व भांडवली परतावा कमी होईल. तसेच भागभांडवलात वाढ करणेही तितकेसे सोपे नाही.

त्यासाठी बँकांची व्यावसायिक कार्यक्षमता, नफाक्षमता बँकांना सिद्ध करावीच लागेल. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना विशेषत: राष्ट्रीयीकृत बँकांना भागभांडवलात वाढ करताना भागभांडवलातील किमान सरकारी हिस्सा नियमितपणे राखणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे खुल्या बाजारात भाग विक्री करण्यास मर्यादा पडतात. मोठे समभाग भांडवल घेऊन प्राथमिक व दुय्यम भांडवल बाजारात टिकून राहणे व तेथील चढउतारांना यशस्वीपणे सामोरे जाणे ही गोष्ट सोपी नाही. भांडवल बाजाराची तरलता, बँक व्यवसायातील अंगभूत जोखीम, भागधारकांच्या अपेक्षा व राष्ट्रीयीकृत बँकांचे सरकारला असणारे उत्तरदायित्व ही कसरत करणे एक आव्हानच आहे. बँकांची सध्याची वाढती अनुत्पादक मालमत्ता बँकांच्या व्यावसायिक कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम करते आहे. त्यामुळे बँकांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भांडवली बाजारात बँकांच्या समभागांची किंमत उतरते आहे. अशा वेळी बँकांना भागभांडवलात वृद्धी करणे कठीण झाले आहे.

भारतातील बँकांच्या एकूण भांडवली संरचनेत राष्ट्रीयीकृत बँकांचे श्रेणी-१ च्या भांडवलाचे प्रमाण सरासरी ९.३% आहे तर काही खाजगी बँकांचे हे प्रमाण ११.९% इतके आहे. श्रेणी-१ चे भांडवल वाढल्यावर भांडवलावरील परतावा कमी होईल. भारतातील विदेशी बँकांचा विचार करता फक्त दोन बँका, बँक ऑफ अमेरिका व सिटी बँक यांचा परतावा अनुक्रमे १.९१% व १.६३% आहे. भारतातील राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये आंध्र बँक १.५९% पंजाब नॅशनल बँक १.२०% अलाहाबाद १.११% कॅनरा बँक १.०१% व स्टेट बँक ०.९४% परतावा आहे. असे असले तरीही डिसेंबर २०१७ पर्यंत बँकांच्या अनुत्पादक मालमत्तेचे प्रमाण १० लाख कोटी रुपयांच्या वर होते. रिझर्व्ह बँकेने डिसेंबर २०१७ मध्ये सादर केलेल्या वित्तीय स्थिरता अहवालात नमूद केल्यानुसार मार्च-सप्टेंबर २०१७ याकाळात भारतातील बँकांचे ढोबळ अनुत्पादक मालमत्तेचे प्रमाण ९.६% वरून १०.२% पर्यंत वाढले आहे. जून २०१७ अखेर राष्ट्रीयीकृत बँकांच्या ढोबळ अनुत्पादक कर्जाची रक्कम ७ लाख ३३ हजार १३६ कोटी रुपये होती. वाढत्या थकीत कर्जाचा सामना करणाऱ्या, विशेषत: सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना रिझर्व्ह बँकेने थोडा दिलासा देण्याकरता बॅसल-३ अंमलबजावणीची मर्यादा ३१ मार्च २०१९ पर्यंत वाढवली आहे. तरीही एका अंदाजानुसार मार्च २०१८ पर्यंत बँकांना नव्याने ५ लाख कोटी रुपये इतकी भांडवलाची सज्जता करावी लागली असती. श्री. राय (२०१३) यांनी पूर्वी दिलेल्या अंदाजानुसार सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील बँकांना १.४ लाख कोटी ते १.५ लाख कोटी रुपयांचे अधिक भागभांडवलाची आवश्यकता होती. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक क्षेत्रामधील बँकांमध्ये भांडवली पुनर्भरण करण्याकरिता ऑक्टोबर २०१७ मध्ये अर्थमंत्र्यांनी राष्ट्रीयीकृत बँकांना पुढील दोन वर्षात २.११ लाख कोटी रुपये मदत मिळवून देण्याची घोषणा केली. यापैकी १.३५ लाख कोटी रुपये हे बँक पुनर्भांडवलीकरण रोख्यांची विक्री करून, तर ५८ हजार कोटी रुपये सरकारच्या बँकांतील भागभांडवलाची बाजारात खुली विक्री करून उभारण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. त्यानुसार बँकांच्या या पुनर्भांडवलीकरणाच्या प्रक्रियेस सन २०१८ मध्ये सुरुवात झाली आहे.

**पुनर्भांडवलीकरण** : राष्ट्रीयीकृत बँकांच्या सक्षमीकरणाच्या कार्यक्रमात सार्वजनिक क्षेत्रातील २० बँकांमध्ये सरकारकडून ८८,१३८ कोटी रुपयांचे भांडवल गुंतविले जाणार आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :

**तक्ता क्र. १ : केंद्र सरकारकडून सार्वजनिक क्षेत्रातील बँकांना दिले जाणारे भांडवली पाठबळ.**

| बँकेचे नाव | रक्कम रु. (कोटी) | बँकेचे नाव | रक्कम रु. (कोटी) |
|---|---|---|---|
| आय.डी.बी.आय. | १०,६१० | स्टेट बँक | ८.८०० |
| बँक ऑफ इंडिया | ९,२३२ | युको बँक | ६,५०८ |
| पंजाब नॅशनल बँक | ५,४७३ | बँक ऑफ बडोदा | ५,३७५ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया | ५,१५८ | कॅनरा बँक | ४,८६५ |
| इंडियन ओव्हरसीज | ४,८६४ | युनियन बँक | ४,५२४ |
| ओरियंटल बँक ऑफ कॉमर्स | ३,५७१ | देना बँक | ३,०४५ |
| बँक ऑफ महाराष्ट्र | ३,१७३ | युनायटेड बँक | २,६४३ |
| कॉर्पोरेशन बँक | २,१८७ | सिंडिकेट बँक | २,८३९ |
| अलाहाबाद बँक | १,५०० | आंध्र बँक | १,८९० |
| पंजाब ॲण्ड सिंध | ७५८ | | |

*संदर्भ : रिझर्व्ह बँक परिपत्रक, जानेवारी २०१८.*

लोकसभेने बँकांसाठी विक्रीला काढावयाच्या या पुनर्भांडवलीकरण रोख्यांच्या कार्यक्रमास मंजुरी दिली आहे. तर दुसऱ्या बाजूस सार्वजनिक क्षेत्रातील ६ कमकुवत बँकांना भांडवल पर्याप्तता प्रमाण प्राप्त करण्यासाठी ७,५७७ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावास केंद्रीय अर्थमंत्रालयाने मंजुरी दिली आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :

बँक ऑफ इंडिया २,२५७ कोटी रु., आय.डी.बी.आय. बँक २,७२९ कोटी रु., युको बँक १,३७५ कोटी रु., बँक ऑफ महाराष्ट्र ६५० कोटी रु., देना बँक २४३ कोटी रु. आणि सेंट्रल बँक ऑफ इंडिया २३३ कोटी रु.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे या सहा बँकांवर रिझर्व्ह बँकेने तत्पर सुधारात्मक कृतीसाठी (PCA) निर्बंध आणले आहेत. असे असले तरी, बँकांच्या दीर्घकालीन सक्षमीकरणाबाबत ठामपणाने शाश्वती देणे धाडसाचेच ठरेल. कारण, भांडवली पुनर्भरण झाले व भांडवली पाया मजबूत झाला की, कर्ज वितरण वाढणार आहे. त्यामुळे बँकांच्या भांडवली सक्षमतेबरोबरच कर्ज वसुलीच्या प्रयत्नांवर अधिकाधिक लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी सरफेसी कायद्यात (Securitization & Reconstruction of Financial Assets & Enforcement of Security Interest Act) सन २०१३ मध्ये अनेक तरतुदी व सुधारणाही करण्यात आल्या आहेत. तसेच रिझर्व्ह बँकेला जादा अधिकारही प्रदान केले आहेत. परंतु कायदेशीर तरतुदींची जलद व निर्दोष अंमलबजावणी दीर्घकालावधीत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या सरफेसी कायद्यातील तरतुदींचा उपयोग करून काही नागरी सहकारी बँकांनी त्यांच्या थकबाकी व अनुत्पादक कर्जांची वसुली करण्याचा चांगला प्रयत्न केल्याचे आढळून येते. परंतु, तसा प्रयत्न राष्ट्रीयीकृत बँकांकडून झाल्याचे क्वचितच निदर्शनास येते. त्याचबरोबर नादारी

व दिवाळखोरी कायद्यातील तरतुदींच्या अडचणींमुळेही कर्ज वसुलीमध्ये अडचणी उभ्या ठाकल्या आहेत. त्या कायद्यातील सुधारणाही प्रस्तावित आहेत.

**आव्हाने व उपाययोजना :** बदलत्या परिस्थितीची आव्हाने पेलण्यासाठी बँकांना विनियंत्रणे, विविधीकरण आणि संरचनात्मक संगठन याची गरज आहे. त्यासाठी बॅसल-३ मध्ये अधिक व्यापक, निसंदिग्ध आणि कठोर प्रमाणके समाविष्ट आहेत. तरीही अनुत्पादक मालमत्तेचे दुष्टचक्र भेदण्याचे आव्हान भारतातील बँकींग उद्योगापुढे आहे. अनुत्पादक मालमत्तेमध्ये भांडवली गुंतवणूक अडकून पडल्याने नवीन व्यवसायासाठी भांडवली उपलब्धता कमी प्रमाणात झाल्याने बँकांच्या नफाक्षमतेवर विपरीत परिणाम होतो आहे. तर दुसऱ्या बाजूस जो काही ढोबळ नफा बँकांनी कमविला आहे त्यातून अनुत्पादक मालमत्तेपोटी मोठ्या तरतुदी करणे भाग पडते आहे. परिणामत: बँकांना तोटासुद्धा होत आहे. त्याचा परिणाम निधींची उभारणी आणि भांडवली पर्याप्तता प्रमाण राखण्यावर होत आहे. अशा प्रकारे अनुत्पादक मालमत्तेचे दुष्टचक्र हे बॅसल -३ च्या अंमलबजावणीसाठी आव्हानात्मक आहे. (अनुत्पादक मालमत्तेपोटी केलेल्या तरतुदीमुळे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील डिसेंबर २०१७ अखेर संपलेल्या तिमाहीमध्ये भारतातील सर्वात मोठ्या स्टेट बँकेला तोटा झाला आहे.)

बँकींग व वित्तीय सुधारणांमध्ये बँकांच्या विलीनीकरणाचा-सामिलीकरणाचा एक पर्याय आहे. विलीनीकरणाने अनावश्यक स्पर्धा कमी करता येईल. परंतु, बँकांच्या थकीत कर्जांचा म्हणजेच अनुत्पादक मालमत्तेचा बोजा वाढून नफ्यातील बँकासुद्धा तोट्यामध्ये येऊन वरील दुष्टचक्रात अडकण्याची शक्यता आहे.

एम.नरसिंहन् समितीच्या अहवालातील सूचनेच्या संदर्भानुसार भारतात राष्ट्रीयीकृत बँकांपैकी स्टेट बँक, सार्वजनिक क्षेत्रातील आय.डी.बी.आय. आणि आय.सी.आय.सी.आय. या बँकांच्या सहयोगाने प्रारंभिक भांडवल रु. १० कोटींसह ११ फेब्रुवारी २००२ रोजी 'आरसील' नावाची पहिली मालमत्ता पुनर्बांधणी (Asset Reconstruction Company) कंपनी स्थापन झाली. या बँकांच्या हजारो कोटी रुपयांच्या थकीत कर्जांची विक्री दरवर्षी या कंपनीस करून त्यापोटी या कंपनीचे रोखे (Bonds) संबंधित बँकेस मिळत. त्यामुळे प्रत्यक्ष कर्जविक्रीचा पैसा न मिळताही या बँकांच्या ताळेबंदामध्ये गुंतवणूक दाखवून अनुत्पादक मालमत्तेचे प्रमाण कमी करण्यात आले व 'नफा' कमविण्यात आला. परंतु, या आरसील कंपनीनेसुद्धा थकीत व अनुत्पादक कर्जांपैकी किती रक्कमेची प्रत्यक्षात वसुली केली हाही एक प्रश्नच आहे. थकीत व अनुत्पादक कर्जांची प्रत्यक्ष वसुली आणि त्यासाठी आवश्यक ती कठोर उपाययोजना यांचे आव्हान तसेच राहिल्याने दीर्घकाळात अनुत्पादक मालमत्तेचे प्रमाण सतत वाढत गेल्याचे दिसून येते.

सन २०१८ मध्ये सार्वजनिक व राष्ट्रीयीकृत बँकांनी अनुत्पादक कर्जांचे प्रमाण कमी करण्यासाठी अशा कर्जांची विक्री करण्याच्या नोटीसासुद्धा प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली आहे. त्यातून बॅसल -३ च्या आव्हानांचा मुकाबला करण्याची धडपड दिसून येते. परंतु, हा कायमस्वरूपी पर्याय नक्कीच नाही. त्यासाठी बँकांनीच त्यांच्या कर्ज वसुलीची सक्षम व कार्यक्षम यंत्रणा उभारणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी स्वतंत्र कर्ज वसुली कक्ष, कर्ज वसुली पथक, कर्ज वसुली अधिकारी यांची नेमणूक करणे आणि त्यांना अधिकार प्रदान करणे, कायदेशीर अधिकार व संरक्षण उपलब्ध करून देणे. अनुत्पादक कर्जांच्या वसुलीसाठी अशा कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर सेवेमध्ये पदोन्नती किंवा आर्थिक बक्षिसाच्या तरतुदी करणे इ.सारख्या विविध उपाययोजनांची निर्मिती करून

अंमलबजावणी करणे हितावह होईल. बँकींग क्षेत्रातील व्यावसायिक व्यवस्थापन सुधारणांसाठी सन १९९९-२००० साली भारतातील बँकांसाठी मालमत्ता व देणी व्यवस्थापनाचा (Asset Liability Management) स्वीकार करणारा ठराव रिझर्व्ह बँकेने केला. या व्यवस्थापन प्रारूपाची सुरुवात सन १९७० साली अमेरिका व कॅनडा या देशांमध्ये झाली. व्यवस्थापनाच्या या प्रारूपामुळे जोखमीचे मोजमाप करणे व त्यावर देखरेख ठेवणे आणि त्यासाठी योग्य व्यवस्थापकीय व्यूहरचना करणे शक्य होते.

बँकींग व्यवसायातील अनावश्यक स्पर्धा कमी करण्यासाठी आर्थिकदृष्ट्या सक्षम बँकांमध्ये अशक्त किंवा कमकुवत बँकांचे विलीनीकरण-सामिलीकरण करणे काळानुरूप आवश्यक आहे. परंतु, असे विलीनीकरण करताना बँकांच्या अनुत्पादक मालमत्तेचे योग्य प्रकारे नियोजन करणे अत्यावश्यक ठरते. कारण, त्यामुळे सक्षम बँकांचे अनुत्पादक मालमत्तेचे प्रमाण वाढण्याचा धोका आहे व अशा सक्षम बँकांसुद्धा अनुत्पादक मालमत्तेच्या दुष्टचक्रात सापडण्याची शक्यता आहे. त्यामुळे विलीनीकरण-समिलीकरणाला तितकासा प्रतिसाद अजूनतरी दृष्टिपथात दिसून येत नाही. फेब्रुवारी २०१७ मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळाने भारतीय स्टेट बँकेत तिच्या पाच सहयोगी बँकांसह, भारतीय महिला बँकेच्या विलीनीकरणाच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. स्टेट बँक ऑफ बिकानेर ॲण्ड जयपूर, स्टेट बँक ऑफ हैदराबाद, स्टेट बँक ऑफ म्हैसूर, स्टेट बँक ऑफ पतियाळा आणि स्टेट बँक ऑफ त्रावणकोर या पाच सहयोगी बँका आणि भारतीय महिला बँक अशा सहा बँकांसह १ एप्रिल २०१७ पासून हे विलीनीकरण अमलातही आले. यापूर्वी प्रथम २००८ मध्ये स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र आणि त्यानंतर दोन वर्षांनी स्टेट बँक ऑफ इंदूर या बँका भारतीय स्टेट बँकेत विलीन झाल्या आहेत. त्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही बँकांच्या विलीनीकरणांच्या संबंधात प्रस्ताव सरकारपुढे विचाराधीन नाही.

सार्वजनिक व राष्ट्रीयीकृत बँकांच्या सक्षमी-करणासाठी सरकारने पुनर्भांडवलीकरणाच्या उपाययोजना आखल्या असून त्याची अंमलबजावणीसुद्धा सुरू केली आहे. परंतु, भविष्यात या बँकांच्या सक्षमीकरणासाठी ह्या उपाययोजनेवरही मर्यादा पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे काळानुरूप बँकांचे विलीनीकरण-सामिलीकरण आवश्यक ठरणार आहे. बँकांच्या या संभाव्य विलीनीकरण-सामिलीकरणाचे चित्र पुढीलप्रमाणे :

**तक्ता क्र. २ : बँकांचे संभाव्य विलीनीकरण-सामिलीकरण**

| अ.क्र. | मुख्य बँक | प्रस्तावित समाविष्ट बँका |
|---|---|---|
| १. | पंजाब नॅशनल बँक | ओरियंटल बँक ऑफ कॉमर्स, अलाहाबाद बँक, कार्पोरेशन बँक, आणि इंडियन बँक |
| २. | कॅनरा बँक | सिंडिकेट बँक, इंडियन ओव्हरसिस बँक, युको बँक |
| ३. | युनियन बँक ऑफ इंडिया | आय.डी.बी.आय. बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, देना बँक |
| ४. | बँक ऑफ इंडिया | आन्ध्र बँक, विजया बँक, बँक ऑफ महाराष्ट्र |
| ५. | बँक ऑफ बडोदा | युनायटेड बँक, पंजाब ॲण्ड सिंध बँक |

बँकींग सुधारणांमध्ये व उपाययोजनांमध्ये आणखी एक घटक विचारार्थ असल्याचे दिसून येते तो म्हणजे खाजगीकरण. भारतीय अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप, मिश्र अर्थव्यवस्थेतील समाजवादी व्यवस्थेकडून भांडवलशाही व्यवस्थेकडे होणारे मार्गक्रमण खाजगीकरणास प्रोत्साहित करणारे आहे. परंतु, संघटित कामगार वर्ग सातत्याने खाजगीकरणाच्या विरोधात असल्याचे दिसते. खाजगीकरणाच्या निर्णयासाठी राजकीय इच्छाशक्तीसुद्धा महत्त्वाची आहे. बँकींग क्षेत्रातील खाजगीकरणाच्या प्रक्रियेत फक्त संघटित कामगार एकच अडसर नाही तर बँकांचा ग्राहक हासुद्धा महत्त्वपूर्ण घटक अडसर ठरणार नाही ना? याचा विचार राजकीय इच्छाशक्तीवर परिणाम करणारा आहे हे ध्यानात घेतले पाहिजे. एकीकडे वित्तीय समावेशन करावयाचे प्रयत्न आणि दुसरीकडे बँकींग क्षेत्राचे खाजगीकरण हे काही अंशी परस्परविरोधी तत्त्व आढळते. खाजगी क्षेत्रातील बँका अग्रिम क्षेत्रासाठी व समाजातील दुर्बल घटकांना वित्तपुरवठा करण्यात फारशा उत्सुक नसल्याचे आतापर्यंत दिसून आले आहे. आजही भारतामध्ये अनाधिकृत खाजगी सावकारीचा व्यवसाय तेजीत सुरू आहे हे कोणीही नाकारणार नाही. त्यामुळे बँकींग क्षेत्रातील खाजगीकरण प्रक्रियेमध्ये आव्हाने व अनेक समस्या आहेत.

**सर्वसाधारण सूचना व शिफारशी :** बँकांच्या सक्षमीकरणासाठी बँकांच्या व्यावसायिक व्यवस्थापनामध्ये अधिक सुधारणा करणे आवश्यक आहे. कर्ज वसुलीसाठी कर्ज वसुली न्यायाधिकरणाकडून शीघ्र कृती अपेक्षित आहे व वसुली अधिकाऱ्यांना अधिकार व संरक्षण याने आश्वासित करण्याची आवश्यकता आहे. कर्ज वितरणात पारदर्शकता आणणे व बँकांच्या व्यावसायिक कार्यात स्वायत्तता आणणे दीर्घकाळात हिताचे ठरणार आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये वित्तीय शिस्त निर्माण करणे व संपूर्ण कर्ज वसुलीची जबाबदारी निश्चित करून समयबद्ध नियंत्रण व कार्यवाही करणे महत्त्वाचे आहे. बँकांमध्ये निकोप स्पर्धेचा अभाव असल्याचे दिसून येते त्यामुळे सरकारी बँक म्हणजे ठेवींची सुरक्षितता असा सर्वसामान्यांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी बँकांच्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे वेळोवेळी प्रशिक्षण आवश्यक वाटते. तसेच बँकांचे ताळेबंद स्थानिक पातळीवरही प्रसिद्ध होणे हितावह ठरेल. त्यातूनच पारदर्शकता, तुलनात्मकता आणि स्पर्धा यांना चालना मिळू शकेल.

## समारोप

बँकांच्या सक्षमीकरणासाठी बॅसल मानके हे एक उपयुक्त साधन आहे. जर या प्रमाणकांचे अत्यंत काटेकोरपणाने पालन केल्यास येणाऱ्या काळात अर्थव्यवस्थेचे स्थैर्य व शाश्वत विकास याबरोबरच गुणात्मक कामगिरी प्रगट होईल. जागतिक बँकींग क्षेत्रासाठी आंतरराष्ट्रीय प्रमाणके व व्यवसायाचा कालबद्ध कार्यक्रम ही पूर्वअट आहे. त्यामुळे बॅसल अटींच्या मालिकेत काही मर्यादा घातल्या गेल्या. बँकींग क्षेत्राचे अंतिम हित ही या कार्यक्रमाची दीर्घकालीन प्रेरणा व उद्दिष्ट आहे. अंतिमत: अर्थव्यवस्थेच्या न्याय्य व शाश्वत विकासासाठी चांगली सेवा हे एक साधन आहे. बॅसल अटींच्या यशस्वी अंमलबजावणीची पराकाष्ठा हे देशाच्या बँकींग व आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचे समान उद्दिष्ट आहे.

## संदर्भ


1. Acharya Viral V (2012): Basel-III Capital Requirements: Implications for India, article in Kidwai.
2. Economic Survey, 2012-13, (2013), Ministry of Finance, Government of India, New Delhi, February.
3. Gopinath, Shyamala (2006): Approach to

Basel II, RBI Bulletin, June.

4. Kidwai Naina Lal (Ed) (2012): Contemporary Banking in India, Busniessworld Books, New Delhi.
5. Rangarajan C. (2012): The Indian Banking System – Challenges Ahead, article printed in Kidwai.
6. Report on Currency & Finance (2012), RBI Mumbai.
7. Report on the Committee on Roadmap for Fiscal Consolidation (2012) (Kelkar Committee), Ministry of Finance, New Delhi.
8. Roy Subhashish (2013): "Cost of Implementing Basel III" article in Economic and Political Weekly, Vol.48, No. 35, 31st August.
9. Subbaro D. (2012) : Corporate~ Governance of Banks in India, article printed in Kidwai.
10. Trend and Progress of Banking in India (2012), RBI Mumbai.
11. Twelth Five Year Plan (2012-2017), Ministry of Finance, Government of India, New Delhi.
12. Zainulbhai Adil (2012): Defining the Decade – A New Outlook for Indian Banking, article printed in Kidwai.

(या शोधनिबंधासाठी संदर्भ संकलित करणे व संदर्भ तपासणे याकामी डॉ. अविनाश कुलकर्णी यांची बहुमोल मदत झाली. त्यांचे मी आभार मानतो)

◆

---

शेती हा आमच्या सगळ्यांच्या बुद्धीचा प्रयत्न आहे. कारण अखेरीस ती खरी संपत्ती, चांगली नैतिकता आणि आनंदी बनवते.

**- थॉमस जेफर्सन**

---

## मराठी अर्थशास्त्र परिषद

## सभासद व महाविद्यालय/संस्थांना आवाहन

मराठी अर्थशास्त्र परिषद आणि यजमान महाविद्यालय यांचे संयुक्त विद्यमाने परिषदेच्या विविध उपक्रमांचे आयोजन वर्षभरात केले जाते. ज्यांना अशा उपक्रमांचे आयोजन आपले महाविद्यालयात करावयाचे असेल त्यांनी कार्यवाह यांचेकडे प्रस्ताव किंवा मागणी अर्ज पाठवावेत. ही परिषद आपल्या अर्थशास्त्र परिवाराची असल्यामुळे आपले सहकार्य अपेक्षित आहे. (सविस्तर माहितीसाठी कार्यवाह यांचेशी संपर्क (९४२३१३४६८६) करावा.)

**विविध उपक्रमाचे नाव**

- स्व.जमनालाल बजाज उपक्रम
- डॉ. सुधा मोकाशी पुरस्कृत व्याख्यान/चर्चासत्र
- टिळक महाराष्ट्र विद्यापीठ व्याख्यानमाला
- पत्रपंडित पां.वा.गाडगीळ स्मृती व्याख्यान
- भारतीयार्जित नोबेल पुरस्कार स्मृती परिसंवाद
- धुळे व्याख्यानमाला

**डॉ. आर.बी.भांडवलकर**

कार्यवाह-खजिनदार

# दुसऱ्या हरितक्रांतीच्या उंबरठ्यावर भारतीय शेतकऱ्यांचा आक्रोश

**एम. एन. शिंदे**†
माजी अध्यक्ष व विश्वस्त,
मराठी अर्थशास्त्र परिषद.

भारत हा शेती प्रधान देश आहे. शेती हा भारतीयांचा परंपरागत व्यवसायच नाही, तर ती भारतीय लोकांची जीवन पद्धती आहे. २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर भारत जागतिक महासत्ता बनण्याची स्वप्ने पाहत असतानाच भारतातील शेतकरी व शेती व्यवसाय मात्र आर्थिक अरिष्टातून जात आहे. २०व्या शतकाच्या सुरुवातीला रॉयल कमिशनने भारतीय शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थिती व कर्जबाजारीपणाबद्दल जे विधान केले होते, ते आजदेखील जसेच्या तसे शेतकऱ्यांना लागू पडते. स्वातंत्र्योत्तर काळात त्यापेक्षा देखील कितीतरी पटीने अधिक शेतकऱ्यांची परिस्थिती वाईट बनून जगाचा पोशिंदा आत्महत्या करीत आहे. या परिस्थितीला अस्मानी संकटाबरोबरच सुलतानी कारभारदेखील जबाबदार आहे. शेतकऱ्यांच्या या आक्रोशाकडे लक्ष देण्यास ना सरकारला ना राजकारण्यांना वेळ आहे, नुसती खोटी आश्वासने देऊन मताच्या राजकारणात शेतकऱ्यांचा भूलभुल्लैया केला जात आहे.

भारतातील १२५ कोटीपेक्षा जास्त लोकांच्या पोशिंदा व अन्नदाता कर्जाच्या विळख्यात सापडून दारिद्र्याच्या दुष्ट चक्रामुळे जगण्याची इच्छा हरवल्याने २१व्या शतकाच्या पूर्वसंध्येला त्याने अत्यंत सोपा व सरळ असा आत्महत्येचा मार्ग स्वीकारला आहे. शेतकरीच उरला नाही, तर भविष्यात शेती कोण पिकवणार?

शेती बिनकिफायतशीर बनल्यामुळे सन १९९१ ते २००१ या काळात ८० लक्ष शेतकऱ्यांनी शेती करणे सोडून दिले. तर NSSO-2005 च्या सर्वेनुसार पर्यायी रोजगार उपलब्ध करून दिल्यास ४०.१ टक्के शेतकऱ्यांनी शेती व्यवसाय सोडून देण्यास तयार असल्याचे सांगितले.

भारतीय हरितक्रांतीचे जनक व थोर कृषितज्ज्ञ डॉ. स्वामिनाथन यांनी आजच्या काळातील शेती क्षेत्रातील दुरावस्थेचे मार्मिक वर्णन केले आहे. ते म्हणतात, ''भारतातील आजची आर्थिक वाढ ही देशातील मोठ्या लोकसंख्येला बाजूला ठेवणारी आनंददायी नसलेली व दीर्घकाळात शाश्वत नसणारी आहे. या स्थितीत देशातील ७०० दशलक्षापेक्षा जास्त ग्रामीण लोकसंख्येचे भवितव्य काय असेल? जेथे ३० टक्के भारतीय मजा करीत आहेत व ७० टक्के लोक आक्रोश करीत आहेत, अशा परिस्थितीत आम्ही डोळे झाकून शांत बसू शकत नाही. डॉ. स्वामिनाथन यांच्या म्हणण्यात फार मोठे तथ्य आहे. कारण, आजदेखील

†आजीव सभासद क्र. : ६६८, भ्रमणध्वनी : ९८९०११४८९६, ई-मेल : mnshinde.isl@gmail.com

भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ६५ टक्के लोकसंख्या (प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष) ५० टक्के कामगार रोजगार व उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या २.५ पटीने वाढली, अन्नधान्याचे उत्पादन ५ पटीने, दुधाचे उत्पादन ६ पटीने, मच्छ उत्पादन ९ पटीने वाढले तर अंड्याचे उत्पादन २५ पटीने वाढले. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनातील शेतीचा वाटा ५७ टक्क्यांवरून १४ टक्के इतका कमी झाला. परंतु, शेती उत्पादन वाढीचा फायदा मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना मिळाला नाही तर त्यामुळे उत्पन्न विषमता वाढण्यास मदत झाली.

स्वातंत्र्योत्तर काळातील भारताचा आर्थिक विकास दर शेती विकास दरावर अवलंबून राहिल्याचे दिसून येते. देशाचा सर्वसाधारण आर्थिक विकास दर व शेतीक्षेत्राचा विकास दर दोहोंत धन सहसंबंध (+०.७४) आहेत. त्यामुळे जेव्हा जेव्हा शेतीचा विकासदर जास्त राहिला तेव्हा भारताचा आर्थिक विकास दरदेखील जास्त राहिला. यावरून भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीक्षेत्राचे महत्त्व स्पष्ट होते.

जुलै १९९१ मध्ये भारतात जागतिकीकरणाला सुरुवात झाली. जागतिकीकरण काळात शेती विकासाची प्रक्रिया मंदावली व शेतकरी आत्महत्यांना याच काळात सुरुवात झाली. जागतिक स्पर्धा, शेतकी अनुदाने, पेटंटची बियाणे, बहुराष्ट्रीय कंपन्यांचा शेतीक्षेत्रातील प्रवेश, भांडवलदारी शेतीपध्दती, करार शेतीपध्दती, राज्य व केंद्र सरकारची शेतीविषयक सदोष धोरणे या जोडीला नैसर्गिक आपत्ती व धोके सदोष शेतमाल बाजारव्यवस्था, अपुरा कर्जपुरवठा, खाजगी सावकारी वगैरे आव्हाने शेतीक्षेत्रात निर्माण झाली. परिणामी, शेतीक्षेत्रे बिनकिफायतशीर बनले व शेतीची दुर्दशा झाली व शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरू झाल्या. त्या आजतागायत थांबलेल्या नाहीत.

भारत सरकारच्या गृहमंत्रालयाने जाहीर केल्यानुसार सन १९९६ ते २००५ याकाळात, देशात १,६६,२०४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. सन २००६ या एका वर्षात देशात १७,००० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या म्हणजे २००६ या वर्षात दर दिवशी ४७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, तर दर तासाला २ शेतकरी आत्महत्या करीत होते. अशी भयावह स्थिती शेतीक्षेत्रात निर्माण झाली. सन २००६ हे वर्ष शेतकऱ्यांच्यादृष्टीने अत्यंत वाईट वर्ष ठरले. भारतातील शेतकरी आत्महत्यांचे वैशिष्ट्ये म्हणजे देशातील महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, पंजाब, हरियाणा, कर्नाटक, मध्यप्रदेश, केरळ, तामिळनाडू या मोठ्या व विकसित राज्यातच शेतकरी आत्महत्या जास्त झाल्या. देशातील एकूण आत्महत्यांच्या ६४ टक्के आत्महत्या मोठ्या राज्यात झाल्या. महाराष्ट्रात २००१ ते २००८ याकाळात ५,१४२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, तर २०१५ व २०१६ या वर्षात अनुक्रमे २,३१७ व २,०४२ शेतकऱ्यांनी महाराष्ट्रात आत्महत्या केल्या. महाराष्ट्र हे देशातील सर्वात आर्थिकदृष्ट्या प्रगत राज्य समजले जाते. महाराष्ट्राच्या अर्थमंत्र्यांनी मोठ्या अभिमानाने सांगितले की, महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न २०१७-१८ या वर्षात १,८०,५९६ रु. सर्वात जास्त आहे. १९९७ ते २००६ या काळात देशातील एकूण शेतकरी आत्महत्यांपैकी २६.१ टक्के शेतकरी आत्महत्या पुरोगामी व प्रगत महाराष्ट्रात झाल्या. सन १९९५पासून आजपर्यंत भारतात ४ लाख शेतकऱ्यांनी तर महाराष्ट्रात ७६ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. याबाबत डॉ. स्वामिनाथन म्हणतात,''भारतीय कृषी व्यवस्थेत काही तरी भयंकर चूक होत आहे, जर कृषी क्षेत्रात चूक होत असेल तर इतर कोणत्याही क्षेत्राचे भले होणार नाही.''

भारतीय शेतीच्या दुरावस्थेस अनेक घटक

कारणीभूत आहेत. भारतात आजदेखील ६० टक्के क्षेत्र कोरडवाहू आहे, तर महाराष्ट्रात ८२ टक्के क्षेत्र कोरडवाहू आहे. भारतात मान्सून लहरी आहेत. कधी अतिवृष्टी तर कधी अवर्षण पडते. काही राज्यांत ओला दुष्काळ तर काही राज्यांत कोरडा दुष्काळ असतो. त्याचा परिणाम शेती उत्पादनावर होऊन ते कमी राहते. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी राहून त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची होते.

जेथे सिंचित क्षेत्र आहे, तेथे सदोष व्यवस्थापन, भ्रष्टाचार यामुळे कार्यक्षम व पर्याप्त सिंचना अभावी सिंचन खर्च वाढतो, पुरेसे क्षेत्र ओलिताखाली येत नाही त्यामुळे शेतीची उत्पादकता कमी राहते. बहुसंख्य शेतकरी गरीब असल्यामुळे भांडवला अभावी तुषार सिंचन, ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करीत नाहीत. ठिबकसिंचनावर सरकारकडून शेतकऱ्यांना मिळणारे अनुदान कागदोपत्रीच राहते. परिणामी, शेती उत्पादन वाढत नाही. भारतात जेथे शेतजमिनीला सिंचनासाठी पाणी उपलब्ध आहे, तेथे पाणी व खतांचा अतिरिक्त वापर होऊन पाण्याच्या अयोग्य व्यवस्थापनामुळे देशात ३३९ दशलक्ष हे.जमिनीची प्रत खालावली आहे. पाण्याच्या अतिवापरामुळे ४३ टक्के जमिनीची उत्पादकता कमी झाली, ५ टक्के जमीन अनुत्पादक बनली आहे. सन १९९५ मधील ब्रॅन्डन के. हॉमन यांच्या अभ्यासानुसार, भारतात जमिनीची प्रत खालावल्यामुळे दरवर्षी १.९ अब्ज व एन.टी. चाऊ यांच्या अभ्यासानुसार, पाण्याच्या अतिरिक्त वापरामुळे भारतात शेती उत्पादनात २० टक्के घट झाली आहे.

अलीकडे जागतिक हवामान बदलाचा परिणाम भारतीय शेतीक्षेत्रातदेखील घडून येत आहे. त्याचा प्रतिकूल परिणाम शेती उत्पादनावर होत आहे. १९व्या शतकापासून पृथ्वीचे तापमान वाढत आहे. गेल्या १०० वर्षांत पृथ्वीच्या पृष्ठभागावरील तापमान ०.१८ सें.ग्रेडने वाढले आहे, २१व्या शतकात ते १.१ ते ६.४ सें.ग्रेडने वाढेल असा अंदाज आहे. या तापमानवाढीमुळे जमिनीची शुष्कता वाढते, पर्जन्यमानात वाढ किंवा घट होते, त्यामुळे चक्रीवादळे, पूर, दुष्काळ, पिकांवर रोगराई व कीड पडते. परिणामी, पिकांचे उत्पादन घटण्यासारखे परिणाम घडून येतात. भारतात हवामान बदल व तापमान वाढीमुळे गहू, तांदूळ व इतर अन्नवर्गीय पिकांच्या उत्पादनात घट होत आहे. तापमान वाढीची ही क्रिया अशीच चालू राहिली, तर २020 मध्ये भारताच्या सकल देशांतर्गत उत्पादनात २० टक्के घट होईल असा अंदाज वर्तविण्यात आला.

हवामान बदलामुळे शेती क्षेत्रात जोखीम व अस्थिरता वाढत आहे, नैसर्गिक धोके निर्माण होऊन शेती उत्पादनात घट होत आहे. परिणामी, शेतकरी आर्थिकदृष्टया कमकुवत राहतात.

भारतात शेती क्षेत्राला केल्या जाणाऱ्या वीज-पुरवठ्यात सरकारची मक्तेदारी आहे. महाराष्ट्रात ग्रामीण भागात दररोज १० ते १८ तास विजेचे भारनियमन केले जाते. एक आठवडा दिवसा तर दुसऱ्या आठवड्यात रात्री शेतीला वीज पुरविली जाते. ती फक्त ८ तास पुरविली जाते. ती वारंवार खंडित होते. या अपुऱ्या वीज पुरवठ्याचा शेती उत्पादनावर प्रतिकूल परिणाम घडून येतो.

जागतिकीकरणामुळे भारताच्या कृषी क्षेत्रावर अनेक बाबतीत प्रतिकूल परिणाम घडून आला आहे. भारतीय शेतमाल निर्यातीला आंतरराष्ट्रीय बाजारात तीव्र स्वरूपाची स्पर्धा निर्माण झाली आहे. विकसित देश आपल्या शेतमालास प्रचंड अनुदाने देत आहेत. या अनुदानाचे प्रमाण किमान ४४ टक्के व कमाल ७०० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. याउलट, भारतात फक्त वस्तू विरहित अनुदानाचे प्रमाण ४ टक्के आहे तर काही बाबतीत ती उणे आहेत. भारत सरकारने आजच्या

काळात खते, सिंचन, अवजारे वगैरे बाबींवरील अनुदाने कमी केली आहेत. विकसित देशांनी भारतासारखा विकसनशील देशांचा शेतमाल आपल्या बाजारात येऊ नये म्हणून आयात कर मोठ्या प्रमाणात लादले आहेत. ते कमी करण्यास तयार नाहीत. तसेच WTO च्या बैठकीमध्ये अमेरिका व इतर ३० शेतमाल निर्यातदार देश आपला दबावगट निर्माण करून विकसनशील देशांनी शेतमालाच्या आयातीवरील कर, अनुदाने कमी करावी म्हणून दबाव आणतात. तसेच हे देश भारताने शेतकऱ्यांना किमान आधारभूत किमती देऊनयेत, अन्नसुरक्षा कार्यक्रम राबवू नये, शेती अनुदाने देण्यास विरोध करतात. हे २०१५ च्या नैरोबी व २०१७-१८ च्या ब्युनॉस आयर्स परिषदेत दिसून आले. परिणामी, भारताची निर्यात कमी राहून, देशात शेतमालाच्या किमती कमी राहतात व शेतकऱ्यांचे उत्पन्न घटते. २५ जुलै, २००७ चा अमेरिकेतील कापसावरील अनुदानाबाबत न्यूयॉर्क टाइम्स म्हणतो, अमेरिकेत कापसाला मिळणाऱ्या प्रचंड अनुदानामुळे जागतिक बाजारपेठेत कापसाची मोठी आवक वाढली असून गरीब देशांतील शेतकऱ्यांना त्यांच्याशी स्पर्धा करणे अवघड झाले आहे. विकसित देशांतील आयात कराचे प्रमाण किमान ८२ टक्के व कमाल ३८८ टक्के आहे. याउलट, भारताने कापसावरील आयात कर ३५ टक्क्यांवरून ५ टक्के असा कमी केला. परिणामी, भारतात परदेशी कापसाची आयात वाढून कापसाच्या किमती कमी झाल्या. याउलट, भारतात केंद्र सरकारने कांदा, साखर वगैरे शेतमालावर निर्यात शुल्क लादले. त्यांच्या आयातीवरील बंधने उठविली. परिणामी तूर, सोयाबीन, साखर, कांदा वगैरे शेतमालाच्या किमती पडल्या व शेतकऱ्यांचे नुकसान झाले.

महाराष्ट्रात शेतकऱ्यांनी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या कापसाच्या बीटी बियाणांची लागवड केली. खते, औषधे, मशागतीवर मोठ्या प्रमाणात खर्च केला. या कंपन्यांनी या बियाणांच्या उत्पादनाचे आकडे फुगवून सांगितले होते. प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या हाती कंपन्यांनी सांगितलेल्या उत्पादनाच्या निम्मे उत्पादनदेखील हाती पडले नाही, परिणामी शेतकरी कर्जबाजारी झाले. देशात सर्वात जास्त आत्महत्या कापूस उत्पादकांच्या झाल्या आहेत.

अमेरिका व इतर विकसित देशांच्या शेतीमाल धोरणाबाबत नोबेल पारितोषिक विजेते 'जोसेफ स्टिगलिटझ्' म्हणतात, ''विकसनशील देशांनी अमेरिका जोपर्यंत त्यांच्या शेतकऱ्यांची अनुदाने बंद करीत नाही, तोपर्यंत अमेरिकन कृषिमालास मुळीच प्रवेश देऊनये.''

जागतिकीकरणामुळे पेटंट कायद्याची अंमलबजावणी केली जात असल्यामुळे भारतीय शेतकऱ्यांचे बियाणे उत्पादक बहुराष्ट्रीय कंपन्यावरील अवलंबित्व वाढले आहे. ही जी.एम. बियाणे होत. अनेक वेळा या बियाणांची उगवण न झाल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. सन २०१७-१८ मध्ये या कंपन्यांच्या कापसाच्या बीटी बियाणांपासून निर्मित कापसावर बोंड अळी पडली व या कंपन्यांचा बीटी बियाणे कीड प्रतिबंधक व बोंड अळी प्रतिरोधक आहेत. हा दावा फोल ठरला. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. शेतकऱ्यांना नुकसान भरपाईबाबत या कंपन्यांनी हात वर केले आहेत. असाच अनुभव जागतिकीकरणाद्वारे सुरू झालेल्या करार शेतीबाबत आला आहे. करारशेतीतील शेतमाल खरेदीचा करार बहुराष्ट्रीय कंपन्यांची न पाळल्यामुळे पंजाब व हरियाणातील बटाटे व टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले.

अलीकडच्या काळात शेतकी आदाने व प्रदानांच्या किमतीत फार मोठी तफावत पडल्यामुळे भारतातील शेतकऱ्यांचे खर्च लाभ गुणोत्तर उणे होऊन शेतकऱ्यांच्या विरोधी गेले. सन २०१० ते २०१६ या काळात शेतीसाठी आवश्यक शेतमजुरीच्या दरात किमान ८७

टक्के तर कमाल १०० टक्के वाढ झाली. सन २०१५ मध्ये केंद्र सरकारने ग्रामीण भागातील अकुशल कामगारांच्या किमान मजुरीचा दर १३७ रु. वरून १६० रु. प्रति दिवस वाढविण्यात आला. ही वाढ २५ टक्के इतकी आहे. शेतीत रोजंदारीवर मजूर मिळणे कठीण झाले आहे. रोजंदारीऐवजी शेती कामात गुत्तेदारी पद्धत सुरू झाली आहे. या पद्धतीत शेतमजूर अव्वाच्या सव्वा मजुरी मागून शेतकऱ्यांची पिळवणूक करतात. देशात एका बाजूला प्रचंड बेरोजगारी, तर दुसऱ्या बाजूला शेतीक्षेत्रात मजुरांची टंचाई असा विरोधाभास (Paradox) भारतीय अर्थव्यवस्थेत दिसून येतो. आमच्या एका पीएच.डी.च्या अभ्यासानुसार, सन १९९१-९२ ते २०१२-१३ या काळात खते, बियाणे, शेतमजुरी, कीटकनाशके, कृषी अवजारे वगैरे आदानांच्या किमती सरासरी १४२२.८३ टक्क्यांने वाढल्या तर शेतमालाच्या (प्रदाने) किमती २७६.९१ टक्क्यांने वाढल्या. तसेच केंद्र सरकारने सन २००९-१० ते २०१७-१८ या काळात जाहीर केलेल्या किमान आधारभूत किमती सरासरी ११२.८ टक्क्यांने वाढल्या. परिणामी, भारतीय शेतीचे खर्च-लाभ विश्लेषण शेतकऱ्यांच्या विरोधी गेले. शेती व्यवसाय आतबट्ट्याचा बनला.

टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस मुंबई या संस्थेने केलेल्या भात, बाजरी, कापूस, सूर्यफूल, गहू व ऊस या पिकांच्या अभ्यासानुसार, त्यांच्या किमान आधारभूत किमती व उत्पादन खर्चामध्ये ३८.८३ टक्क्यांची तफावत आढळून आली. म्हणजे या पिकांच्या आधारभूत किमतीवर उत्पादन खर्चाचे आधिक्य ३८.८३ टक्के राहून शेती व्यवसाय तोट्याचा बनला.

भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना त्यांचा कर्जबाजारीपणा कारणीभूत आहे. NSSO च्या २००३ च्या पाहणीनुसार, देशात एकूण ८९.३५ दशलक्ष शेतकरी कुटुंबे आहेत, त्यापैकी ४३.४२ दशलक्ष कुटुंबे म्हणजे ४८.६ टक्के कुटुंबे कर्जबाजारी आहेत. त्यांच्यावर ८१,७०९ को. रु. एकूण कर्ज आहे म्हणजे प्रति कुटुंब १,८८२ रु. कर्ज असल्याचे दिसून येते. लहान व सीमांत शेतकऱ्यांपैकी ६६ टक्के शेतकरी कर्जबाजारी होते. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा मोठ्या व विकसित राज्यांत मोठ्या प्रमाणात दिसून येतो. आंध्रप्रदेश ८२ टक्के तामिळनाडू ७४.५० टक्के, पंजाब ६५ टक्के, केरळ ६४.४० टक्के, कर्नाटक ६१ टक्के व महाराष्ट्र ५४.८ टक्के या मोठ्या राज्यांत शेतकरी कर्जाचे सरासरी प्रमाण ६७ टक्के होते.

सन २००७ च्या अर्थमंत्रालयाच्या तज्ञ गटाच्या पाहणीनुसार, आजदेखील ३९ टक्के शेती कर्जपुरवठा खाजगी सावकार, व्यापारी, मित्र, नातेवाईक यासारख्या बिगर संस्थात्मक स्त्रोताद्वारे होतो. त्यांचे व्याजाचे दर मोठे असतात, ते शेतकऱ्यांची पिळवणूक करतात.

भारतीय शेतीक्षेत्राच्या हलाखीस केंद्र व राज्यसरकारची आर्थिक धोरणेदेखील कारणीभूत ठरली. आमच्या एका पीएच.डी.च्या अभ्यासात असे आढळून आले की, सन १९९१ ते २०११ या काळातील केंद्र सरकारच्या अंदाजपत्रकात शेतीक्षेत्रावर फक्त ४.४ टक्के खर्च करण्यात आला. शेती हा जरी राज्यांच्या यादीतील विषय असला तरी गेल्या २० वर्षांच्या काळात केंद्र व राज्यसरकारकडून शेतीकडे फारसे लक्ष देण्यात आले नाही. महाराष्ट्र राज्य हे देशातील सर्वात प्रगत समजले जाते. महाराष्ट्र सरकारच्या २००१ ते २०१० या १० वर्षांच्या अंदाजपत्रकात शेती क्षेत्रावरील सरासरी खर्चाचे प्रमाण फक्त ३.०१ टक्के होते. परिणामी, शेतीक्षेत्राचा विकास मंद राहिला.

भारताच्या शेतकी खर्च व किंमत आयोग CACP ची किमान आधारभूत किंमत निश्चितीची प्रक्रियाच सदोष आहे. देशातील विविध पिकांच्या किमान

आधारभूत किमती ठरविताना हा आयोग देशातील २८ राज्ये व २ केंद्रशासित प्रदेशातील पिकांचा सरासरी उत्पादन खर्च गृहीत धरून किमान आधारभूत किमती ठरवितो. त्यावेळी सर्व राज्यातील मजुरीच्या दराची सरासरी काढली जाते, ही सरासरी महाराष्ट्रासारख्या राज्यातील वेतनदरापेक्षा कमी असते, पिकांची उत्पादकता, हवामान वगैरे बाबी सारख्या असतात, असे गृहीत धरून किमान आधारभूत किमती ठरविली जाते. तसेच शेतकऱ्यांच्या खेळत्या भांडवलावरील खर्च, जमिनीचे भाडे विचारात घेतले जात नाही म्हणजे किमत आयोग सी२ खर्चदेखील विचारात घेत नाही.

शेतमालाच्या उत्पादन खर्चाचे वर्गीकरण ए१, ए२, बी१ , बी२, सी१, सी२, सी३ असे केले जाते. भारताच्या शेती किमत आयोगाच्या अहवालानुसार, २००८ ते २०११ या तीन वर्षांत शेती उत्पादनखर्चात मोठी वाढ झाली आहे. भारतीय पातळीवर तो ७४ टक्क्यांने वाढला तर ओरिसामध्ये १०१ टक्के, महाराष्ट्र व तामिळनाडूत ९३ टक्के, आंध्र व कर्नाटकात ८५ टक्क्यांने वाढला. किमान आधारभूत किमती ठरविताना ही किमत आयोग सी२ उत्पादन-खर्चदेखील विचारात घेत नाही, तर ए१ उत्पादन खर्चातील खेळत्या भांडवलावरील व्याजालादेखील विरोध करतो. त्यामुळे या आयोगाने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किमती उत्पादन खर्चापेक्षा कितीतरी कमी राहतात. त्यामुळे शेतकऱ्यांना तोटा होत आहे. म्हणून सी ३ उत्पादनखर्च विचारात घेऊन किमान आधारभूत किमती ठरवाव्यात.

केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकारने सन २०१८-१९ या वर्षाच्या अंदाजपत्रकात शेतकऱ्यांना उत्पादनखर्चाच्या १५० टक्के किमान आधारभूत किमती देऊअसे जाहीर केले आहे. ज्यावेळी देश पातळीवरील शेतीक्षेत्राचा विकास दर २ टक्के व महाराष्ट्राचा शेती विकास दर उणे-८.४ टक्के झाला. या अंदाज-पत्रकातील उत्पादनखर्चावर ५० टक्के नफा देणाऱ्या शेतमालाच्या किमान आधारभूत किमती देण्याची घोषणा ही शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसणारी व कधीही पूर्ण न होणारी आहे, तसेच २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची घोषणादेखील अशीच फसवी आहे. कारण, केंद्रीय अर्थमंत्र्यांना कि. आ. किमतीसाठी जमिनीचा खंड व भांडवलावरील व्याजाचा समावेश असलेला सी२ उत्पादन खर्च अभिप्रेत नाही, तर ए२+एफ एल खर्च अभिप्रेत आहे. सी३ उत्पादन खर्च लांबच राहो. त्यामुळे शेतकऱ्यांचा खरा व वास्तव उत्पादन खर्च विचारात घेतला जात नाही. परिणामी, कि.आ.किमत कमी राहते व ती बिनकिफायतशीर ठरते.

सरकारने नुसत्या किमान आधारभूत किमती जाहीर करू नयेत, तर त्यांची अंमलबजावणी केली पाहिजे व त्यासाठी कायदे केले पाहिजेत. सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षात तूर, हरभरा, सोयाबीन, उडीद, मूग, ऊस वगैरे पिकांच्या बाजारातील किमती हमी किमतीपेक्षा कमी राहून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले.

तसेच २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे सरकारचे आश्वासनदेखील फसवे आहे. येत्या ४ वर्षात शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करावयाचे असल्यास देशाच्या आर्थिक वाढीचा दर १४ टक्क्यांपेक्षा जास्त असला पाहिजे, पंतप्रधानाचे प्रमुख सल्लागार अरविंद सुब्रमण्यम यांच्या मते, तो किमान १२.५ टक्के तरी असला पाहिजे. सध्याचा आर्थिक वृध्दीदर ६.५ टक्के आहे. म्हणजे येत्या ४ वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा वृध्दीदर दुपटीपेक्षा जास्त वाढविणे कठीण आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा आर्थिक वृध्दीदर शेतीक्षेत्राच्या वृध्दीदरावर अवलंबून आहे. परंतु, शेतीचा अखिल भारतीय पातळीवरील २०१७-१८ वर्षातला वृध्दीदर २ टक्के महाराष्ट्रातील हा दर -८.४ टक्के आहे. या परिस्थितीत सन २०२२ पर्यत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची

घोषणा म्हणजे शेतकऱ्यांची शुध्द फसवणूक होय.

सन २०४० मध्ये भारताची लोकसंख्या १५० कोटी होईल, असा अंदाज वर्तविला जातो या लोकसंख्येला पुरेसे अन्नधान्य उपलब्ध करून द्यायचे असेल तर त्यासाठी देशात ४५० दशलक्ष टन अन्नधान्याची आवश्यकता आहे. सध्या देशातील एकूण अन्नधान्याचे उत्पादन २५० ते २७० दशलक्ष टनाच्या आसपास राहते. शेती उत्पादनात वाढ झाली नाही तर १९६० च्या दशकातील भारतातील अन्न समस्या पुन्हा निर्माण होईल. म्हणून राज्यकर्ते व धोरणकर्त्यांनी शेतीच्या विकासाला प्राधान्यक्रम दिला पाहिजे, तरच भारत जगात आर्थिक महासत्ता होईल. त्यासाठी पुढील उपाय योजावेत.

१) शेती क्षेत्रासाठी स्वतंत्र अर्थसंकल्प जाहीर करावा.

२) डॉ. स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी.

३) किमान आधारभूत किमती ठरविण्यासाठी भारतीय शेती खर्च व किमत आयोगाने सी३ उत्पादन खर्च गृहीत धरावा.

४) किमान आधारभूत किमतीच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारने संसदेत व राज्यसरकारनी विधिमंडळात कायदे करून त्याची कडक अंमलबजावणी करावी.

५) शेतमजुरांसाठी कामाची कायदेशीर आचारसंहिता तयार करून तिची अंमलबजावणी करावी.

६) शेतमाल निर्यातीवर बंधने घालू नयेत, त्यांच्या किमान निर्यात किमती ठरवू नयेत, निर्यात प्रोत्साहन योजना राबवाव्यात.

७) कोरडवाहू शेती संशोधनाला चालना द्यावी.

८) शेतकऱ्यांना खते, बियाणे, अवजारे इत्यादींसाठी अनुदाने द्यावीत.

९) शहरी व पांढरपेशा वर्गाला स्वस्तात शेतमाल उपलब्ध व्हावा, म्हणून सरकारी धोरणाद्वारे मुद्दाम शेतमालाच्या प्रशासित किमती कमी ठेवू नयेत.

## संदर्भ


१. Economic survey of India 2005-06 to 2017-18.

२. Economic survey of Maharashtra 2001-02 to 2017-18.

३. Farmers lament a souviner of UGC National seminar K.B.P. College , Islampur 2010-11.

४. https://goo.gl//v2t9uy. - Date : 9-03-2018.

५. Indian express 15th Dec, 2017.

६. Kalhon A.S and Tyagi D.S. (1983), Agricultural price policy in India allied publishers pvt. Ltd Bombay.

७. Mamoria C.B. (2007) Agricultural Problem in India, Shivlal Agrawal and co. Agra 3.

८. NSSO-Report 2003, 2005, 2007.

९. Patil B. P. A Comparative analysis of prices of agricultural and non agricultural commodities during globalization Era – A Ph.D. Thesis, (unpublished), Shivaji University Kolhapur, Aug, 2013.

१०. Report of the National commission on farmers 2006.

११. Satre Anil D. Agriculture sector in the union Budgets during the Economic Reforms – A Ph. D. Thesis, (unpublished), Shivaji University Kolhapur, May, 2011.

१२. शिंदे एम.एन. व सत्रे अनिल 'भारतीय अर्थव्यवस्था' अजित पब्लिकेशन्स, इस्लामपूर (सांगली) २०१७.

१३. वाटसरू, फेब्रुवारी २०१८, प्रकाशक अभय कांता, नारायण पेठ, पुणे ३०.


◆

# सर्वेऽपि सुखिनः सन्तु की सधनः सन्तु?

**विनायक श्रीधर देशपांडे** †

माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद व माजी संपादक, अर्थसंवाद.
प्राध्यापक, व्यवसाय व्यवस्थापन विभाग, अधिष्ठाता वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्या शाखा,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

जनसामान्यांच्या विकल्पात विस्तार घडवून आणणे आणि त्यांना निवड करायला वाव देणे, हे मानव विकासात अभिप्रेत आहे. यामुळे त्यांना दीर्घायुष्य, निरोगी आणि सर्जनशील जीवन जगण्यास समर्थ करणे शक्य होते. राष्ट्रीय उत्पन्नातील बदलांपेक्षा मानव विकास ही संकल्पना अधिक व्यापक आहे. दारिद्र्याशी लढा देणे हा तर महत्त्वाचा भाग मानव विकासाचा आहेच. परंतु, त्या व्यतिरिक्त प्रतिष्ठेने माणसाला कसे जगता येईल हा देखील पैलू मानव विकासात लक्षात घेण्यात येतो. मानवाला अधिकाधिक मोकळीक मिळावी, त्याला स्वातंत्र्याचा उपभोग घेता यावा, हे ध्येय मानव विकासाचे आहे. प्रत्येक राष्ट्रात उत्पादन आणि उत्पन्न किती प्रमाणात वाढते आहे, यापेक्षा मानवाचा सहभाग या प्रक्रियेत किती आहे हे अधिक महत्त्वाचे असल्याचे मानव विकास अहवालाचे संस्थापक महबूब उल हक यांनी विशद केले. आर्थिक विकासाचे मापन सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या साहाय्याने करण्यात येत असल्याने मानवी जीवनाची फारकत होऊन दुजाभाव निर्माण झाला. वस्तू, मालाचे उत्पादन यावर भर दिल्याने लोक त्यांचे जीवन, त्यांना आवश्यक असलेली मोकळीक या बाबी दुर्लक्षित झाल्या. विकासाच्या संपूर्ण प्रक्रियेत बाजाराच्याऐवजी माणूस हा केंद्रस्थानी असावा, या एका मुख्य उद्देशाने १९९० साली मानव विकास अहवाल प्रकाशित करण्याची सुरुवात झाली. 'युनायटेट नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम' या संस्थेने या संदर्भात पुढाकार घेऊन स्वतंत्ररित्या अहवाल प्रकाशित करण्याची प्रक्रिया सुरू केली.

लोकांच्या जीवनाची गुणग्राहकता मानव विकास अहवालात प्रतिबिंबित व्हावयास लागली. याचा भर निव्वळ मोजमाप करण्यावर नाही; तर अहवालांमध्ये भरीव वर्णन विकासाच्या प्रक्रियेबाबत आढळते. पुरेसे अन्नधान्य खरेदी करण्याचे स्वातंत्र्य, शिक्षणाच्या संधी यांचा अभाव असे दारिद्र्याचे वर्णन करताना येते. परंतु, जीवनशैली ठरविताना स्वातंत्र्य प्राप्त न झाल्यास जीवनाची गुणवत्ता घसरू शकते. उत्पन्नाचा स्तर महत्त्वाचा नसून त्या उत्पन्नाचा उपयोग कशा रीतीने होतो आहे यावर मानव विकासाचा भर अधिक आहे. तेच प्राप्त उत्पन्न औषधोपचारासाठी वापरता येऊ शकेल किंवा अंमली पदार्थांसाठीदेखील या उत्पन्नाचा उपयोग होऊ शकेल. सैन्यासाठी लागणाऱ्या उपकरणांसाठी उत्पन्नाचा वापर होईल किंवा रस्ते बांधणीसाठी होऊ शकेल. मानव विकास निर्देशाकाचे मापन करताना लोकांचे आयुर्मान, शिक्षण आणि उत्पन्न यांच्या साहाय्याने संयुक्त निर्देशक काढण्यात येतो. यात

† आजीव सभासद क्र. : ४६९, भ्रमणध्वनी : ९८२२७३७७२५, ई-मेल : vinayak.desh1961@gmail.com

अपक्वता असली तरी सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत हा निर्देशक अधिक वरच्या दर्जाचा आहे हे देखील मान्य करावे लागेल. राजकीय स्पर्धात्मकता या निर्देशकाच्या माध्यमाने निर्माण होत असल्याने प्रत्येक राष्ट्राचा प्रयत्न मानव विकासात सुधार करण्याकडे असतो. कार्यक्षमतेत वाढ करण्याचे दृष्टीने बाजाराप्रमाणेच राजकीय स्पर्धा हितावह ठरू शकते. राजकीय स्वातंत्र्य, सामाजिक न्याय असे अनेक महत्त्वाचे पैलू या अहवालाच्या माध्यमाने उघड होतात. आर्थिक विकासाला बाधा पोहोचवणारा महत्त्वाचा घटक म्हणजे असमानता! तणावाचे वातावरण असमानतेमुळे निर्माण होते. समाजाची घडी असमानतेमुळे विस्कळीत होते. हिंसेचे मूळ असमानतेमध्ये दडलेले आहे.

वाढत्या आर्थिक वृद्धी दराचे प्रतिबिंब जीवनाच्या गुणग्राहकतेत उमटलेच याची शाश्वती देता येत नाही. कल्याणकारी योजनांची जाणीवपूर्वक आखणी केल्यास राष्ट्रीय उत्पादनाच्या वाढीवर अवलंबून राहण्याची आवश्यकता नाही असे काही छोट्या राष्ट्रांनी सिद्ध करून दाखवले. त्यातील काही निवडक राष्ट्रांची माहिती येथे उद्धृत केली आहे. ही राष्ट्रे आकाराने तसेच लोकसंख्येने लहान असली तरी त्यांनी मानव विकासाबाबतचा निर्धारित केलेला मार्ग दुर्लक्षित करून चालणार नाही. विकसनशील राष्ट्रांची धोरणे निश्चित करताना या राष्ट्रांचे अनुभव उपयुक्त ठरू शकतील.

**तक्त क्र. १ : विश्वातील निवडक राष्ट्रांचे प्रमुख मानव विकास निर्देशांक (२०१७)**

| अ. क्र. | राष्ट्राचे नाव | मानव विकास निर्देशांक | स्थान | लोकसंख्या | अपेक्षित आयुर्मर्यादा (वर्ष) | शाळेतील अपेक्षित वर्ष | दरडोई उत्पन्न (२०११ क्रयशक्ती तुल्यता) यु.एस.$ | रोजगाराचे लोकसंख्येशी प्रमाण (१५ वर्षे आणि त्याहून अधिक टक्केवारी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नॉर्वे | ०.९४९ | १ | ५२ लाख | ८१.७ | १७.७ | ६७,६१४ | ६२.२ |
| २. | ऑस्ट्रेलिया | ०.९३९ | २ | २ कोटी ४० लाख | ८२.५ | २०.४ | ४२,८२२ | ६०.७ |
| ३. | स्वित्झर्लंड | ०.९३९ | २ | ८२ लाख | ८३.१ | १६.० | ५६,३६४ | ६५.४ |
| ४. | जर्मनी | ०.९२६ | ३ | ८ कोटी ७ लाख | ८१.१ | १७.१ | ४५,००० | ५७.६ |
| ५. | डेन्मार्क | ०.९२५ | ५ | ५७ लाख | ८०.४ | १९.२ | ४४,५१९ | ५८.१ |
| ६. | अमेरिका | ०.९२० | १० | ३२ कोटी १८ लाख | ७९.२ | १६.५ | ५३,२४५ | ५८.८ |
| ७. | इस्त्रायल | ०.८९९ | १९ | ८१ लाख | ८२.६ | १६.० | ३१,२१५ | ६०.८ |
| | भारत | ०.६२४ | १३१ | १३१ कोटी ११ लाख | ६८.३ | ११.७ | ५,६६३ | ५१.९ |

*स्त्रोत: युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम-ह्यूमन डेव्हलपमेंट रिपोर्ट.*

## नॉर्वे

नॉर्वे या देशात श्रीमंत लोक नाहीत, परंतु राष्ट्र मात्र श्रीमंत आहे. कल्याणकारी राज्याची संकल्पना नॉर्वेमध्ये खऱ्या अर्थाने रूजली आहे. नॉर्वेच्या प्रत्येक व्यक्तीकडे बँकेमध्ये १ कोटी रुपये आहेत. नॉर्वेमध्ये समानता मोठ्या प्रमाणावर आहे. असमानतेचे मापन गिनी गुणकाच्या आधारे करण्यात येते. नॉर्वेचा गिनी निर्देशांक ०.२५ येतो. भारताच्या बाबतीत हा निर्देशांक ०.३५ आहे. नॉर्वेमधील कल्याणकारी राज्याचे प्रतिमान सामाजिक लोकशाहीवर आधारित असून सार्वत्रिक सामाजिक विमा/सार्वत्रिक सेवा अशा प्रमुख तरतुदींचा अवलंब केल्याने बाजार यंत्रणेमुळे निर्माण होणारी विषमता कमी होण्यास मदत झाली. नॉर्वे हे राष्ट्र १९०० पर्यंत गरीब राष्ट्र म्हणून ओळखले जात असे. नॉर्वेमध्येदेखील वसाहतवाद होता. ४०० वर्ष डेन्मार्कच्या वसाहती नॉर्वेमध्ये होत्या. खूप मोठे जमीनधारक/शेतकरी या देशात नव्हते. सरंजामशाहीचा अनुभव नॉर्वेनी कधीच घेतला नाही. नॉर्वेमध्ये औद्योगिकरण बरेच उशिरा झाले, परंतु जर्मनीप्रमाणे राष्ट्रीयस्तरावरील कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी १८८४ च्या सुमारास झाली. कामकरी वर्गामध्येदेखील एकी होती. श्रमिक वर्गामध्ये विभाजन होण्यास फारच कमी अवधी कल्याणकारी राज्य स्थापन होण्यापूर्वी प्राप्त झाला. श्रमिक वर्ग आणि शेतकरी अशा पद्धतीने विभाजन झाले नव्हते. सर्वच कामकरी वर्गातील लोक एकत्रित होते.

नॉर्वेमध्ये सर्वच मुले बालमंदिर आणि शासकीय शाळेत जातात. पुढील शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी राज्याची असते. सर्वांना समान संधी मिळण्याची तरतूद यात असून खाजगी शिकवणी वर्ग नाहीत. कोणी आजारी पडल्यास उत्पन्नाची होणारी नुकसान भरपाई एक वर्षापर्यंत शासनामार्फत मिळते. राष्ट्रीय आरोग्य सेवेचाच हा एक भाग आहे.

केंद्रापासून दूर असणाऱ्या प्रदेशांना केंद्रामार्फत साहाय्य प्राप्त होत असल्याने शहर आणि ग्रामीण भागात समानता प्रस्थापित होते. सेवाप्रधान प्रतिमानात सर्वच स्तरातील लोकांचा समावेश होता. नॉर्वे हे कल्याणकारी राष्ट्र असल्याने अधिक स्पर्धात्मक झाले आहे. नॉर्वेमधील तेल उत्पादन आर्थिक वृद्धीचे इंजिन आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. उत्पन्नातील असमानता वाजवी असल्याने जनतेचा शासनावर असलेला विश्वास दृढ होण्यास मदत झाली. स्त्री-पुरुष समानतेबाबत नॉर्वे हे राष्ट्र फारच जागरूक आहे. स्विडन, फिनलँड, नॉर्वे, आईसलँड या राष्ट्रांनी कल्याणकारी राज्य प्रस्थापित करण्याचेदृष्टिने असमानता कमीत कमी राखण्यासाठी अनेक धोरणात्मक बदल केले. उपरोक्त निर्देशित राष्ट्रांच्या समुहाला नॉर्विक राष्ट्र असे संबोधण्यात येते. सामाजिक लोकशाहीचे नॉर्विक प्रतिमानच या राष्ट्रांनी जगापुढे ठेवले. मूल्यांवर आधारित नॉर्विक प्रतिमान असून प्रत्येक नागरिकाला हक्कांसोबतच संधी कशी प्राप्त होईल यावर या प्रतिमानाचा भर आहे. प्रत्येकाला समान संधी आणि स्वातंत्र्य हे या प्रतिमानाचे प्रमुख स्तंभ आहेत. कौटुंबिक बंधने ही प्रेमावर आधारित असावीत, आर्थिक कारणांमुळे नाही असे मानणारी ही राष्ट्रे आहेत. आर्थिक धोरण हे पूर्ण रोजगारावर भर देणारे असावे. सार्वत्रिक तसेच उदार कल्याणकारी व्यवस्था आणि संघटित श्रमिक बाजार या तीन घटकांना अनुसरून नॉर्विक प्रतिमान विकसित करण्यात आले आहे. बेरोजगारीशी सामना करणे म्हणजे जास्तीत जास्त स्वातंत्र्य जनतेला प्राप्त करून देणे, स्वातंत्र्यासाठी रोजगार निर्मिती ही पूर्व अट आहे. सुदृढ राष्ट्र निर्माण करण्याचे रोजगार हे एक साधन आहे. कल्याणकारी राज्याची प्रस्थापना सुदृढ राष्ट्राच्या माध्यमानेच करता येते. सत्तेची विभागणी मालक आणि कामगार यामुळे शक्य होते. बेरोजगार

वाढणे म्हणजे कामगारांना दुर्बल ठेवणे होय असे हे प्रतिमान मानते. स्त्रियांना बेरोजगारीपासून बंधमुक्त दुर्बल ठेवणे होय असे हे प्रतिमान मानते. स्त्रियांना बेरोजगारीपासून बंधमुक्त करणे हा देखील उद्देश या प्रतिमानाचा आहे.

कल्याणकारी योजनांचा गैरवापर होऊ नये, म्हणून कल्याणकारी योजनांचा अवलंब करताना काम करण्यापासून कामकरी परावृत्त होऊ नये, याची देखील खबरदारी घेण्यात येते. रोजगार प्राप्ती करताना किंवा नवा रोजगार शोधताना कल्याणकारी योजनेचा वापर एखाद्या स्प्रिंगबोर्डसारखा करण्यात येतो. संघटित श्रमिक बाजारदेखील कल्याणकारी राष्ट्रासाठी निर्णायक घटक आहे. सामाजिक संरक्षण श्रमिकांना प्रदान करणे हा एक महत्त्वाचा भाग राष्ट्रीय सामुदायिक सहमताच्या माध्यमाने अवलंबिण्यात येतो. सामाजिक भागीदार सहमताने वेतन दर निश्चित करतात, त्यामुळे क्षेत्र निहाय वेतनदर बदलत असतात. कामाच्या जागी सातत्याने बदल करण्यामध्ये नॉर्वे हे राष्ट्र आघाडीवर आहे. सततचे बदल घडत असल्याने अर्थव्यवस्था अधिक स्पर्धात्मक झाली आहे. निम्न स्तरावरील शिक्षण म्हणजे वाढणारा बेरोजगार हा संबंध नॉर्वेसारख्या राष्ट्राला चांगल्या पद्धतीने अवगत असल्याने शिक्षणावर या राष्ट्राने सातत्याने भर दिला आहे.

थोडक्यात, असे म्हणता येईल की, नॉर्वे या राष्ट्राने आर्थिक धोरणांमध्ये उच्चस्तरीय रोजगार/पूर्ण रोजगार याला प्राधान्य दिले. याच माध्यमाने संसाधनांची निर्मिती होणे शक्य होते असे या राष्ट्राचे ठाम मत आहे. सार्वत्रिकीकरण या तत्त्वावर आधारित उदार कल्याणकारी व्यवस्था उभारण्यावर भर या राष्ट्राने दिला. सामाजिक सुरक्षितता प्रदान करण्याची जबाबदारी राष्ट्राने घेतली. श्रमिक बाजार अधिकाधिक संघटित कसा होऊ शकेल, यादृष्टीने कसोशीने प्रयत्न या राष्ट्राने केले. या धोरणांचा परिणाम दरडोई उत्पन्न वाढीवर झाला, मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती झाली. उत्पन्नातील असमानता अर्थव्यवस्थेला सुसह्य होऊ शकेल इतकीच राहिली.

## ऑस्ट्रेलिया

जागतिक पातळीवर मानव विकास निर्देशांकात ऑस्ट्रेलिया हे राष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. तर्कसंगत वर्तन आणि अभिव्यक्त पसंती अर्थशास्त्राचा गाभा आहे. मर्यादित साधनसामग्री असताना प्राधान्यक्रम कसा ठरवावा, हा प्रश्न सर्वच राष्ट्रांना वेळोवेळी भेडसावत असतो. ऑस्ट्रेलियाने सामाजिक धोरणाचा भाग म्हणून प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य देऊन गुणवत्ता वाढविण्याचे दृष्टीने कसोशीने प्रयत्न केले. शिक्षण आणि आरोग्याचे सार्वत्रिकीकरण करताना एकात्मिक बालविकास यावर ऑस्ट्रेलिया शासनाने विशेष लक्ष केंद्रीत केले. एकात्मिक सहयोग कार्यक्रमांची अंमलबजावणी फार जाणीवपूर्वक पद्धतीने या राष्ट्रात करण्यात आली. अशा कार्यक्रमांचा प्रभाव कुटुंब आणि समाजाच्या संदर्भात मुलांच्या विकासावर कसा होतो, याचे वेळोवेळी परीक्षण करण्यात येते. मुलांना आणि कुटुंबाना विविध प्रकारच्या सेवा पुरविताना या सेवा संयोग घडवू शकणाऱ्या आणि इतर सर्व घटकांवर प्रभाव टाकणाऱ्या आहेत अथवा नाही याबाबतचे चिंतन करण्यात येत असे. सेवा पुरविताना राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची निष्पत्ती यावर अधिक भर ऑस्ट्रेलियाने दिला.

आर्थिक सहकार आणि विकास (OECD) या संघटनेचा ऑस्ट्रेलिया सभासद असून या संघटनेच्या माध्यमाने आर्थिक आणि सामाजिक जीवनमान सुधारण्याचे दृष्टिने जागतिक पातळीवर प्रयत्न करण्यात येतात. लोक चांगल्या पद्धतीने जीवन जगत आहेत किंवा नाही याचे गमक भौतिक संपत्ती महत्त्वपूर्ण नसून

जीवनाची गुणवत्ता अधिक महत्त्वपूर्ण आहे. याबाबतीत सामाजिक शास्त्रज्ञांमध्ये एकमत असल्याचे आढळून येते. मानव विकासाला प्रभावित करणारे आयुर्मर्यादा, शिक्षण आणि उत्पन्न यात विकसनशील राष्ट्रांमध्ये वाढ न होण्याची प्रमुख कारणे म्हणजे उत्पन्नाची खालावत चाललेली स्थिती आणि आर्थिक फाटाफूट तसेच दुष्काळ आणि निकृष्ट शासकीय धोरणे हेदेखील घटक मानव विकास निर्देशांकात घट होण्यास कारणीभूत ठरतात.

## स्वित्झर्लंड

स्वित्झर्लंड हे राष्ट्रदेखील मानव विकास निर्देशांकाच्या संदर्भात आघाडीवर आहे. एकूण १८८ राष्ट्रांमध्ये या राष्ट्राचादेखील दुसरा क्रमांक येतो. दुसऱ्या क्रमांकावर ऑस्ट्रेलिया आणि स्वित्झर्लंड ही दोन राष्ट्रे येतात. वाढती आयुर्मर्यादा, शाळेतील अपेक्षित वर्षात झालेली वाढ आणि दरडोई उत्पन्नात झालेला सुधार हे घटक उत्कृष्ट मानव विकासास कारणीभूत ठरले. स्वित्झर्लंडच्या सर्व नागरिकांनी वैधानिक आरोग्य विमा खाजगी विमा कंपन्यांकडून घेणे, फेडरल इन्शुरन्स ॲक्टनुसार अनिवार्य केले आहे. आरोग्याशी संबंधित सर्व प्रकारच्या सेवा यात अंतर्भूत होतात. आरोग्य सेवेचे सार्वत्रिकीकरण यामुळे स्वित्झर्लंड या राष्ट्रात सहज शक्य झाले. लोकसंख्येच्या २९ टक्के लोकांना इन्शुरन्समध्ये सबसिडीदेखील देण्यात येते. युरोपमधील प्रगत राष्ट्रांमध्ये स्वित्झर्लंडची गणना होते. नेस्ट्ले ही प्रसिद्ध कंपनी स्वित्झर्लंडचीच आहे. खुल्या अर्थ-व्यवस्थेचा लाभ या राष्ट्राला झाला. बेरोजगारीचा दर निम्न स्तरावर असल्याने स्वित्झर्लंडचे उत्पन्न वाढले तसेच मुद्रास्थिती दरदेखील कमीत कमी ठेवण्यात हे राष्ट्र यशस्वी झाले. ऊर्जा निर्मितीसाठी स्वित्झर्लंडमध्ये हायड्रोपॉवरचा वापर करण्यात येतो. युरोपिअन मुक्त व्यापार परिषदेचादेखील लाभ स्वित्झर्लंडला झाला. स्वित्झर्लंड या राष्ट्राने इतर देशात केलेली विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकदेखील मोठ्या प्रमाणावर आहे. झुरीक येथील विद्यापीठ आणि तेथील संशोधन अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले. स्वित्झर्लंड येथील १९ शास्त्रज्ञांना नोबेल पारितोषिक प्रदान करून गौरविण्यात आले आहे. संशोधनावर या राष्ट्राचा भर असून त्यांच्या संस्कृतीचा तो एक भागच झाला आहे. घड्याळे तयार करण्यात स्वित्झर्लंड आघाडीवर राहिले. औषधी उद्योगातदेखील येथे संशोधनाचे कार्य मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. सत्तेचे विकेंद्रीकरण स्वित्झर्लंडमध्ये खूप परिणामकारकरित्या करण्यात आले आहे. नगरपालिका - जिल्हा - संघराज्य अशा पद्धतीची रचना अवलंबिण्यात येऊन स्थानिक पातळीवर बरेच अधिकार प्रदान करण्यात आले आहे. कर किती द्यावे? याबाबतचा निर्णय स्वित्झर्लंडमध्ये लोकांवर सोडण्यात आला आहे. वेतनदर खूप जास्त असला तरी कामाचे तास वर्षाला जवळपास २००० आहेत.

## जर्मनी

जर्मनीचे आर्थिक धोरण सामाजिक बाजार अर्थव्यवस्थेवर आधारित आहे. निर्यातीच्या बाबतीत जर्मन आघाडीवर असून विविध प्रकारच्या धातुंचे उत्पादन जर्मनीत मोठ्या प्रमाणावर होते. आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यापारी मेळाव्याचे आयोजन जर्मनी येथे दरवर्षी करण्यात येते. फ्रॅंकफर्ट, बर्लिन, म्युनिक अशा विविध शहरांमध्ये मेळावे आयोजित करण्यात येतात. स्टॉक मार्केटमध्ये नामांकन केलेल्या सर्वश्रेष्ठ ५०० कंपन्या ज्यांची मिळकत सर्वात अधिक आहे, अशा फॉर्च्युन ५०० कंपन्यांपैकी ३६ कंपन्यांची प्रमुख कार्यालये जर्मनीत आहेत. औद्योगिकरणाच्या बाबतीत एक प्रगत राष्ट्र म्हणून जर्मनी झपाट्याने आगेकूच करीत आहे. बेंझ, बीएमडब्ल्यू अशा कंपन्या जर्मनीत कार्यरत आहेत. बेरोजगार युवकांची संख्या

औद्योगिकरणामुळे निम्न स्तरावर आहे. जर्मनीमध्ये होणारे आर्थिक व्यवहार रोख रकमेने जास्तीत जास्त होतात. संसाधनाच्या पुनर्वापराच्या संदर्भात जर्मनी सर्वात वरच्या क्रमांकावर आहे. कामाच्या वेळेबाबत जर्मनीत खूप लवचिकता ठेवण्यात आली आहे. कामगार संघटना परिणामकारकरित्या कार्यरत आहेत. जर्मनीतील शिक्षण व्यवस्था आगळ्या स्वरूपाची असून मोफत शिक्षण जर्मन सरकार प्रदान करीत आहे. जर्मनीतून १०५ शास्त्रज्ञांना आतापावेतो नोबेल पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले आहे.

## डेन्मार्क

डेन्मार्क हे राष्ट्र मानव विकास निर्देशांकाच्या संदर्भात पहिल्या पाच राष्ट्रांत आहे. डेन्मार्कमध्येदेखील जर्मनीप्रमाणेच सायकली मोठ्या प्रमाणावर आढळतात. लोकांचे आरोग्य काही अंशी यामुळेदेखील उत्तम राहण्यास मदत झाली असावी. डेन्मार्कमधील कल्याणकारी योजना बदलत असतात, त्यात वेळोवेळी आवश्यकतेनुसार सुधार करण्यात येतो. प्रत्येक वर्षी कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी योग्यरीत्या व्हावी म्हणून आयोगाचे गठन करण्यात येते. कल्याणसुधार आयोग, श्रमबाजार आयोग, यांच्यामार्फत मार्गदर्शनपर सूचना शासनाला प्राप्त होत असतात. कल्याणकारी योजनांचे डेन्मार्कमध्येदेखील सार्वत्रिकी-करण झाले आहे. श्रमिक बाजारात स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणात आहे. सामाजिक कल्याणाचे वैशिष्ट्य असे आहे की, ते त्या संबंधित राष्ट्रालाच अमलात आणावे लागते. त्या त्या राष्ट्रांच्या जडणघडणीवर कल्याणकारी राज्याची स्थापना होते. कल्याण दुसऱ्या राष्ट्रातून आयात करता येत नाही. पर्यावरण आणि विकासातील सातत्य यावर डेन्मार्क या राष्ट्राने भर दिला आहे. रिन्युएबल एनर्जीवर डेन्मार्कने लक्ष केंद्रीत करून पवन चक्क्यांच्या उभारणीला प्राधान्य दिले आहे. डॅनिश नागरिकांना शिक्षण आणि आरोग्याची निगा मोफत प्राप्त होते. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत जनतेची काळजी घेण्यास शासन तत्पर आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वृत्तिवेतन (Stipend) देखील नियमितपणे प्राप्त होते. उत्पन्नप्राप्तीची काळजी आणि त्या संबंधातील तणाव लोकांना नाही. कराचे दर खूप जास्त असतानादेखील डेन्मार्क म्हणजे 'नंदनवन' असे मानण्यात येते. डेन्मार्कमध्ये ८० टक्के लोकांचा एकमेकांवर विश्वास आहे. सुखी जीवनाचा मंत्र म्हणजे एकमेकांवरील विश्वास! याआधारे डेन्मार्कमध्ये सुखसमाधान प्राप्त होण्यास मदत झाली. फेकून देण्यात आलेले अन्न/कचरा उचलणे हीदेखील महत्त्वाकांक्षा डॅनिश तरुणाची असू शकते आणि ती पूर्ण करण्याकरिता पालकांकडून प्रोत्साहन देण्यात येते. जीवनाची गुणवत्ता वाढवायची असल्यास आपल्याला स्वत:ला काय करणे आवडते, आपले स्वप्न आणि विश्वास संपादन या बाबी लक्षात घेतल्यास समाधानाचे बीजारोपण होते हे डेन्मार्क या राष्ट्राने दाखविले. मानव विकास निर्देशांकाच्या बाबतीत डेन्मार्क पाचव्या क्रमांकावर येत असले तरी OECD या संस्थेने डेन्मार्क हे राष्ट्र सुखसमाधानाच्या बाबतीत क्रमांक एक वर असल्याचे नमूद केले आहे. आर्थिक सहकार आणि विकासाशी संबंधित विषय ओ.ई.सी.डी. संस्थेच्या माध्यमाने हाताळण्यात येतात.

## इस्त्रायल

इस्त्रायल संपूर्ण जगातील एक तरुण राष्ट्र म्हणून मानण्यात येते. इस्त्रायलचे आयुष्य केवळ ६९ वर्षांचे आहे. राष्ट्रभाषा हिबरू आहे. हिबरू आणि अरबी अशा दोन भाषांचा वापर सार्वजनिक जीवनात करण्यात येतो. इस्त्रायलची लोकसंख्या जवळपास ९० लाख

आहे. आपल्याकडील एकट्या दिल्ली शहरापेक्षादेखील ही लोकसंख्या कमी आहे. परंतु, इस्त्रायलने प्रत्येक क्षेत्रात आपली छाप पाडली आहे. प्रत्येक नागरिकाला मिलीटरी प्रशिक्षण मिळालेच पाहिजे असा नियम आहे. स्त्रियांनादेखील मिलीटरी प्रशिक्षण घ्यावेच लागते. हिऱ्याचे व्यापार केंद्र आणि पैलू पाडण्याचे काम इस्त्रायलमध्ये होते. हिऱ्याचा सगळ्यात मोठा घाऊक व्यापार येथे चालतो. सौरऊर्जेचा उपयोग इस्त्रायलमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर होतो. इस्त्रायलमध्ये प्रत्येक व्यक्तीला शासनामार्फत पुस्तकाचे वाटप करण्यात येते. पुस्तकांची दुकाने या राष्ट्रात तुलनात्मकदृष्ट्या बघितल्यास कमी आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात सर्वात जास्त विद्यापीठे इस्त्रायलमध्येच आहेत. इस्त्रायलमधील समाज संवेदनक्षम असल्याने कल्याणाबाबत कृती आणि ज्ञान त्याचा उत्तम संगम या राष्ट्रात साधण्यात आला. भरकटलेल्या तरुणांना दिशा देण्याचे कामे जाणीवपूर्वक इस्त्रायलमध्ये चालतात. तरुणांचे प्रश्न कुटुंबापुरते मर्यादित राहात नसून राष्ट्रीय पातळीवर हाताळण्यात येतात. तरुणांना जास्तीत जास्त वाव मिळावा, हा उद्देश ठेवून त्यांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी आवश्यक मदत पुरविण्याची व्यवस्था उभारण्यात आली आहे.

औषधी निर्माण उद्योगात इस्त्रायल आघाडीवर असून जागतिक पातळीवरील औषध उद्योगाची विक्री इस्त्रायलमधून ११ टक्क्याने होते. रिफाईंड पेट्रोलियम पदार्थांची निर्यात इस्त्रायलमधून ७.६ टक्क्याने होते. हिऱ्याचा व्यापार इस्त्रायलमध्ये मोठ्या प्रमाणावर होत असून जागतिक व्यापारात इस्त्रायलचा हिस्सा ७.५ टक्के आहे. इंटिग्रेटेड सर्किटच्या (आयसी) उत्पादन व व्यापारात इस्त्रायल जगात आघाडी घेत आहे. एअरक्राफ्ट सुटे भागदेखील इस्त्रायल जगातील इतर राष्ट्रांना निर्यात करते, याचा हिस्सा एकूण जागतिक व्यापारात २.१ टक्के आहे. या क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात उत्पन्नप्राप्ती होत असल्याने या क्षेत्रातदेखील हे राष्ट्र प्रगती पथावर आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात इस्त्रायलला स्टार्टअप राष्ट्र म्हणून संबोधण्यात येते.

संरक्षणासंबंधीच्या तंत्रज्ञानावर नवनवे संशोधन करण्यास इस्त्रायल संशोधकांना प्रोत्साहित करीत असल्याने याचा फायदा गैर लष्करी क्षेत्रातील संशोधन वाढण्यावर झाला. आरोग्यनिगा, टेलिकम्युनिकेशन आणि इतर मुलकी क्षेत्रातील संशोधनाला चालना मिळाली. साहसी गुंतवणुकीच्या (Venture-Capital) बाबतीतदेखील इस्त्रायल आघाडीवर राहिले. दरडोई साहसी गुंतवणूक इस्त्रायलमध्ये सर्वात जास्त आहे. सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या ४ टक्के रक्कम संशोधन आणि विकास कार्यावर खर्च करण्यात येते. जागतिक पातळीवर विचार केल्यास इस्त्रायलचा संशोधन आणि विकासावर होणारा खर्च सर्वात जास्त आहे. कृषी तंत्रज्ञानाच्या विकासातदेखील झेप घेतली असल्याने तंत्रज्ञानाचे केंद्रस्थान म्हणून इस्त्रायलची ओळख संपूर्ण जगाला होईल. सायबर सेक्युरिटीच्या संदर्भातदेखील इस्त्रायलने बाजी मारली आहे. जवळपास ४००० हून अधिक सायबर स्टार्टअप्स येथे आहेत. वैश्विक पातळीवरील १५०० सायबर सेक्युरिटी कंपन्यांपैकी ४०० कंपन्या म्हणजे जवळपास २५ टक्के एकट्या इस्त्रायलमध्ये आहेत. मानवशक्ती आणि मेंदूशक्ती यांचा मेळ इस्त्रायलमध्ये झाल्याचे दिसते. नवीन उपक्रम, बदल घडवून आणणे यावर इस्त्रायलने भर दिला. लष्कराचे प्रशिक्षण प्रत्येक नागरिकाला अनिवार्य असल्याने तंत्रज्ञान विकासाला यामुळे चालना मिळाली. जीवितकार्य (Mission) पूर्णत्वाला नेण्याची कला कदाचित लष्करी प्रशिक्षणामुळे विकसित झाली असावी, इस्त्रायलमध्ये संशोधक अपयशामुळे खचत नाहीत. या अनुभवातून आपल्याला काही शिकता आले अशी त्यांची भावना असते. नव्या उद्योजकांसाठी इस्त्रायलने

स्टार्टअप व्हीसा देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे बाहेरच्या राष्ट्रातील विशेष नैपुण्य/कौशल्य प्राप्त केलेल्या व्यक्ती इस्त्रायलला जाऊन त्यांच्या तंत्रज्ञानात भर घालू शकतील. इस्त्रायलचा मानव विकास निर्देशांक वेगाने वधारत असून सध्या तो १८८ देशांमध्ये १९ आहे.

## युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका

आंतरराष्ट्रीय व्यवहारांमध्ये अमेरिकेच्या चलनाचाच वापर सर्वात जास्त होतो. कृषी क्षेत्रापासून प्राप्त होणारे उत्पन्न सकल देशीय उत्पादनाच्या १ टक्क्याहून कमी असूनदेखील मका आणि सोयाबीनच्या उत्पादनात युनायटेट स्टेट्स पहिल्या क्रमांकावर आहे. प्रत्येक करदात्याचा पैसा कल्याणकारी योजनेत जात असल्याने भावी आयुष्यात या करदात्यांना त्याचाच लाभ मिळतो. वृद्ध आणि दिव्यांगांसाठी दर महिन्याला शासनामार्फत पगार देण्यात येतो. सामाजिक सुरक्षितता अंतर्गत वृद्ध तसेच मोठ्या आपत्तीतून बचावलेले आणि दिव्यांगांसाठी विमा शासनामार्फत काढण्यात येतो. स्वातंत्र्य, वैयक्तिक अभिरुची, स्वालंबन याबाबी अमेरिकेत अत्यंत महत्त्वपूर्ण आहेतच, परंतु या व्यतिरिक्त प्रत्येक अमेरिकन नागरिक स्वत:च भविष्य निर्धारित करू शकतो. कौटुंबिक पार्श्वभूमी व सामाजिक दर्जा याबाबींवर व्यक्तीची वाटचाल तसेच भावी आयुष्य अवलंबून राहत नाही.

अमेरिकेत उपक्रमशीलतेला अग्रक्रमाने चालना दिली जाते, तरीही काहीजण कमालीचे यशस्वी; तर काही अपयशी ठरतात. त्यामुळे सामाजिक संयोग घडवून आणण्याचे एक नवेच आव्हान या राष्ट्रापुढे उभे ठाकले आहे. शासनाची या संदर्भात महत्त्वाची भूमिका असते. परंतु, सामाजिक कृत्य शासनामार्फत होताना शासनाचे वर्चस्व वाढते. शासनाची भूमिका परिणामकारक राहिलच याची शाश्वती देता येत नाही. निधी उपलब्धता करण्यात येऊन सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करण्याकडे शासनाचा कल असतो. लोकांना दयाळूपणा नको असतो. त्यांना संधी हवी असते. सामाजिक उद्यमशीलता हा मार्ग सामाजिक गुंतवणुकीसाठी आता बऱ्याच राष्ट्रांमध्ये निवडण्यात येतो आहे. यात करांमध्ये सवलती देऊन सामाजिक क्षेत्राच्या गुंतवणुकीसाठी खाजगी उद्योजकांना प्रोत्साहित करण्यात येते.

आरोग्याच्या बाबतीत अमेरिकेत खाजगीकरण मोठ्या प्रमाणावर झाले असून बहुतांश इस्पितळे खाजगी संस्थांद्वारेच चालतात. ७० टक्के इस्पितळे ना नफा तत्त्वावरच चालतात. औषधविक्रेते, उपकरणे, खाजगी संस्थांच पुरवितात. आरोग्याची निगा राखण्यास लागणारा खर्च अमेरिकेत फारच जास्त असल्याने विमा असल्याशिवाय औषधोपचार किंवा इलाज करणे शक्यच होत नाही. अमेरिकेतील जवळपास ६० टक्के लोकांना नियोक्ता (Employer) च्या वतीने विमा प्राप्त होतो. आरोग्याच्या संबंधित मेडिकेअर, मेडिकेड असे कार्यक्रम राबविण्यात येतात. मेडिकेडच्या साहाय्याने गरीब लोकांना राज्यशासनातर्फे आरोग्यासंबंधीच्या सोयी उपलब्ध होतात. राज्यनिहाय मेडिकेड संबंधित खर्च बदलत असतो. काही राज्ये जास्त खर्च करतात तर काही खर्च करण्याची क्षमता नसल्याने कमी खर्च करतात. अमेरिकेतील शासनाचा आरोग्यावर होणारा खर्च सकल उत्पादनाच्या १८ टक्के आहे. जागतिक पातळीवर हा खर्च बराच जास्त असल्याचे आढळून येते. ऑस्ट्रेलियामध्ये हा खर्च केवळ ९ टक्के आहे.

सध्याच्या स्थितीत मात्र अमेरिकेतील उत्पन्नाची वाढती विषमता चिंतेची बाब आहे. थॉमस पिकेटी यांच्या Capital in the twenty first century या ग्रंथात ही वाढती विषमता अधोरेखित केली आहे. १९७७ ते २००७ या दरम्यान राष्ट्रीय उत्पन्नाच्या ६० टक्के उत्पन्न १ टक्का अमेरिकन्सकडे केंद्रीत झाले असा प्रमुख

निष्कर्ष या ग्रंथाचा आहे. वारसाहक्काने मिळालेल्या संपत्तीत वाढ होत असल्याने काही मूठभर लोकांच्या हातात उत्पन्नाचे केंद्रीकरण झाले. याचा विपरित परिणाम लोकशाहीच्या कार्यपद्धतीवर होतो. भांडवलापासून होणारी उत्पन्नप्राप्ती ४ ते ५ टक्के परंतु, अर्थव्यवस्थेचा वृद्धीदर २ ते ३ टक्के अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. राजघराणे अर्थव्यवस्थेवर नियंत्रण आणून स्वत:च्याच संपत्तीत वाढ करीत असतात. राजघराण्यांमध्ये संपत्तीचे हस्तांतरण दुसऱ्या पिढीकडे होत राहते आणि अर्थव्यवस्थेची राजकीय बाजूदेखील संपत्तीधारकांकडे वळायला लागते. अमेरिकेमध्ये वाढती उत्पन्न विषमता सध्या चिंतेची बाब आहे. निम्नस्तरावरील लोकांकडे खर्च करण्यास उपलब्ध असलेल्या उत्पन्नातदेखील घट होत चालली आहे. अमेरिकेत उत्पन्नाचे वितरण योग्यरीतीने होण्याचे दृष्टीने उच्च उत्पन्न गटातील लोकांवर मोठ्या प्रमाणावर कर लादण्यात येऊन त्याचा उपयोग आरोग्य, शिक्षण यासारख्या सामाजिक आधारभूत संरचनेच्या बांधणीवर करण्यात येतो. प्राथमिक शिक्षणावर अमेरिकेमध्ये अधिक भर देण्यात येतो. घराच्या किमती या त्या भागात असलेल्या शाळांवर अवलंबून असतात. चांगली नावाजलेली शासकीय शाळा घराच्या आसपास असल्यास लोक त्यासाठी जास्तीचे पैसे देऊ करून घरे विकत घेतात.

## समारोप

आर्थिक विकासाच्या संकल्पनेत संधी आणि कार्यकुशलता या दोन्ही पैलूंचा समावेश होतो. आर्थिक वृद्धीच्या माध्यमाने लोकांना संधी उपलब्ध होऊ शकतात. परंतु कार्यकुशलता विकसित करण्यासाठी शासनामार्फत सकारात्मक पावले उचलावी लागतात. सामान्य लोकांच्या जीवनाची गुणग्राहकता आर्थिक वृद्धीने सुधारेलच याची शाश्वती देता येत नाही.

आर्थिक वृद्धी सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक तसेच पर्याप्त अट नाही, परंतु आर्थिक वृद्धीसाठी सामाजिक विकास पर्याप्त अट जरी नसली तरी आवश्यक अट नक्कीच आहे. स्वतंत्र भारताच्या विकासातील प्रवासाचा राहिलेला टप्पा म्हणजे सामान्य जनतेला सुस्थितीत आणणे. गरीब, वंचित आणि विकासाच्या प्रक्रियेतून वगळल्या गेलेल्यांच्या परिस्थितीत जोपर्यंत सुधार होणार नाही तोपर्यंत विकासाचा प्रवास पूर्णत्वाला जाऊ शकणार नाही. वंचितांना उपकाराची नाही तर संधी मिळवून देण्याची आवश्यकता आहे. ही बाब ध्यानात ठेवूनच सध्याच्या शासनाने विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून सामाजिक विकास घडविण्याच्या प्रक्रियेला सुरुवात केली आहे. कल्याणकारी योजना राबवण्यात सरकारला यश मिळेलच याची शाश्वती देता येत नाही. त्यामुळे खाजगी उद्योगांनादेखील काही प्रमाणात सामाजिक परिवर्तनाचा भार उचलावा लागेल.

मानवाच्या निवडी, पर्याय यांचे संवर्धन करणे त्यात वाढ करणे या सरळ, साध्या संकल्पनेच्या आधारे मानव विकास ही संज्ञा १९९० साली अस्तित्वात आली. मानवाच्या विकल्पांमध्ये वाढ करावयाची असल्यास कार्यकुशलता आणि सुसंधी हे दोन घटक महत्त्वपूर्ण ठरतात. कार्यकुशलतेत वाढ झाल्यास संधी उपलब्ध होणे आवश्यक ठरते. १९८० तील दशकाच्या मूलभूत गरजांच्या दृष्टिकोनापेक्षा मानव विकास दृष्टिकोन हा अधिक व्यापक आहे. मानवाच्या किमान गरजा भागविण्यासाठी किमान वस्तू समुच्चय किती असावा यावर मूलभूत गरज दृष्टिकोन आधारित होता. मानवाचे जीवन समृद्ध, संपन्न करण्यासाठी निवड, पर्याय, विकल्प याबाबतचा उल्लेखदेखील किमान गरजांच्या संदर्भात नव्हता.

मानव संसाधन विकास या संकल्पनेपेक्षादेखील मानव विकास ही संकल्पना अधिक व्यापक आहे. उत्पादनाच्या प्रक्रियेत मानव एक भांडवल म्हणून मानव संसाधन विकासाच्या संकल्पनेत मानण्यात येते. मानव हा मानवी विकासात लाभधारक असतो तो निव्वळ माध्यम नसतो. मानव विकास ही संकल्पना वरवर बघता साधी वाटत असली तरी त्याचे परिणाम फारच व्यापक आहेत. मानव विकासासाठी उत्पन्न ही आवश्यक अट आहे. परंतु, ती पर्याप्त अट नाही. मानव विकासाचे उत्पन्न हे माध्यम आहे. थोडक्यात, मानव विकास हा लोकांनी लोकांसाठी केलेला लोकांचा विकास आहे असे म्हणता येईल. अर्थव्यवस्था ही लोकांसाठी हवी, लोक अर्थव्यवस्थेसाठी नको. त्यामुळे लोकांच्या राहणीमानात वाढ करण्यासाठी आर्थिक वृद्धी आवश्यक आहे. परंतु, आर्थिक वृद्धी आणि मानव विकास यात स्वयंचलित दुवा साधल्या जात नाही. मानव विकासाच्या बाबतीत आघाडीवर असणाऱ्या उपरोक्त निर्देशित राष्ट्रांच्या बाबतीत ही बाब प्रकर्षाने जाणवते. विकासाचा मतितार्थ वाढीव उत्पन्न की जनकल्याण? एवढे मात्र खरे की, विकासाच्या वाटचालीत माणूस हाच केंद्रस्थानी असावा.

## संदर्भ सूची


१. Chakraborty Achin (2000) Human Rights and Human Development (Book Review) Economic and Political Weekly Vol.35 Issue No. 39. 23rd Sept.

२. देशपांडे विनायक श्रीधर, (२०१७) जागतिक अर्थकारण-एक दृष्टिक्षेप दीपोत्सव विशेषांक तरुण भारतचा अर्थकारणाला वाहिलेला विशेषांक.

३. देशपांडे विनायक श्रीधर, (२०१७) मानव विकास अहवालाची २५ वर्षे: संकल्पना, मुद्दे आणि आव्हाने, कौटील्य ज्ञानप्रबोधिनी, अमरावती आयोजित दोन दिवसीय आय.सी.एस.एस.आर. पुरस्कृत राष्ट्रीय चर्चासत्र बीज भाषण १८/८/२०१७.

४. Human Development Index and Key Componenets: Selected Developing Countries Economic and Political Weekly. Vol. 36, Issue No. 39. 23th Sept. 2001.

५. Jahan Selim, (2017) 2016 Human Development Report-Human Development for everyone. Keynote Speech at JICA Research Institute, UNDP Tokyo. (Internet)

६. Melhotra Santosh, (2005) Human Capital or Human Development Economic and Political Weekly Vol.40, Issue No.4. 22nd Jan. 2005.

७. People First: Human Development Report Campaign, Oct. 7 2010.

८. Sengupta Arjun, (2001) Right to Development as a Human Right Special Article. Economic and political Weekly Vol. 36 Issue No. 27. 7th July 2001.


◆

वापरलेली नाहीत अशी यंत्रे भांडवल नाहीत.

चळवळ हा नफ्याचा घटक आहे.

**- कार्ल मार्क्स**

# अर्थशास्त्रातील संशोधनपर लेखन : काही पथ्ये

**आ. गो. पुजारी** †
माजी अध्यक्ष व कार्यवाह आणि विद्यमान विश्वस्त,
मराठी अर्थशास्त्र परिषद.

अलीकडे मनात सतत घोळत असलेल्या एका विचारावर काही लोकांशी चर्चा करीत होतो. तर तो विचार अर्थसंवादासाठी लिहावे असे प्रमुख संपादक यांनी मनोदय व्यक्त केल्याने, सुखाऊन त्या विचाराला शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न येथे केला आहे. संशोधनपर नियतकालिकांतील काही लेखन, परिषदांमध्ये सादर होणारे काही शोधनिबंध आणि एम्.फि्ल. व पीएच.डी.चे काही प्रबंध यांचे अवलोकन केले असता प्रस्तुत लेखन करावेसे वाटले. वर निर्देशित गोष्टींतील चुका शोधणे हा या लेखाचा बिलकूल उद्देश नाही, तर या सर्वांच्या संदर्भात जे संभाव्य प्रश्न व प्रथा वा रूढी तयार झाल्या आहेत व होत आहेत त्यांच्याविषयी चर्चा करावी एवढाच मापक उद्देश आहे. जाता जाता नवोदित लेखकांना यातील काही पैलू उपयोगी पडले तर प्रस्तुत लेखाचा उद्देश सफल झाला असे समजेन.

प्रस्तुत लेखाच्या पहिल्या भागात संशोधनपर लेखासंबंधी व दुसऱ्या भागात एम्.फिल. व पीएच.डी. प्रबंधासंबंधी काही विचार मांडले आहेत.

## भाग एक

### दोन चलांतील सरळ संबंध

एक छुपी चर्चा अशी आहे की, अलीकडे वर निर्देशित माध्यमातून अपेक्षित स्वरूपातील कसदार लेखन पुढे येताना दिसत नाही. ही परिकल्पना (गृहितक, गृहितकृत्य, Hypothesis) तपासली असता त्याला पुष्टी मिळते असे वाटते. कारण, ज्ञानक्षेत्रातील (Knowledge) दोन चलांत (प्रवाहात) तत्त्वतः जो सरळ संबंध (Direct relation) प्रस्थापित व्हायला पाहिजे तसा तो संबंध गुणात्मकदृष्ट्या फारसा प्रस्थापित होताना दिसत नाही. ती दोन चलं म्हणजे संशोधनपर लेखनासाठी आवश्यक असणाऱ्या संदर्भसाहित्यांचे (संदर्भग्रंथ, नियतकालिके, इंटरनेट, संकेतस्थळे, अनेक स्तरातील परिषदा, चर्चासत्रे, उजळणीवर्ग यांचे आयोजन, इत्यादी)[१] होत असलेले उपलब्धतेचे प्रमाण आणि दुसऱ्या बाजूला संख्येने विपुल परंतु संशोधनाच्या गुणात्मकतेच्या अंगाने अशक्त स्वरूपातील लेखनांची निर्मिती, ही ती दोन चले. संशोधनपर लिखाणासाठी एका बाजूने उपयुक्त व विपुल माहिती उपलब्ध होत असताना दुसऱ्या बाजूने त्यास प्रतिसाद म्हणून पूर्वीच्या तुलनेने उत्तम दर्जाचे लेखन पुढे येणे अपेक्षित आहे. यालाच दोन चलांतील सरळ संबंध प्रस्थापित होणे असे येथे म्हटले आहे. तर साधनांच्या उपलब्धतेच्या तुलनेत लेखनात अपेक्षित परिणाम दिसतो का हे पुढील काही घटना व उदाहरणांच्या साहाय्याने पाहू या.

†आजीव सभासद क्र. : २६०, भ्रमणध्वनी : ९५९५१९५५५६, ई-मेल : dragpujari@yahoo.com

येथे संदर्भ म्हणून मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अर्थसंवाद या नियतकालिकाचा संदर्भ घेतला आहे. या नियतकालिकाची सुरुवात १९७७ मध्ये झाली. त्याच्या पहिल्या अंकापासून ते आजच्या अंकापर्यंतच्या बहुतांश लेखांच्या गुणात्मकतेवर बारकाईने नजर टाकल्यास, संशोधन गुणात्मकतेचा आलेख (Graph) ज्ञानक्षेत्रातील नियमानुसार उत्तरोत्तर वरती सरकत असल्याचे निदर्शनास यायला पाहिजे. कारण, वीस-तीस वर्षांपूर्वी, अर्थसंवादमध्ये लेखन करणाऱ्या लेखकांच्या पुढ्यात वर उल्लेखिलेल्या सुविधा (संदर्भ) संख्येनी अगदीच कमी होत्या. त्या मर्यादेत राहून, त्या काळातील लेखकांनी अर्थसंवादसाठी आपल्या परीने लेखन केले. तर त्या तुलनेने आजच्या लेखक पिढीला वर उल्लेखिलेले अनेक साहाय्यसंदर्भ विपुल प्रमाणात उपलब्ध असून, अगदी सहज हाती लागत आहेत. तर त्या पार्श्वभूमीवर सरासरीने विचार करता आजच्या लिखाणांची गुणवत्ता ही पूर्वीच्या लिखाणापेक्षा सरस असायला हवी होती, तरच ज्ञानक्षेत्रातील या सरळ संबंधाच्या तत्त्वाला पुष्टी मिळाली असती. तेव्हा वर उल्लेखिलेल्या या छुप्या चर्चेला पुष्टी मिळते आहे की काय, हे तपशिलात जाऊन तपासण्याची जबाबदारी अर्थसंवादच्या नियमित (म्हणजे सर्वसाधारणपणे एकूण सभासदांपैकी १५ ते २० टक्के) वाचकांच्यावरच सोपवितो आणि जर का खरोखर या नियमाला येथे तडा जाणारा असेल तर ज्ञानक्षेत्रात मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या उद्देशाच्या दुर्दशेला प्रारंभ झाला आहे असेच म्हणावे लागेल.

## अर्थसंवादचा जन्म का व कशासाठी?

वरीलप्रमाणे विधान करण्यापूर्वी अर्थसंवादच्या जन्माची कथा समजून घेणे आवश्यक वाटते. तिच्या जन्माची कथा अगदीच निराळी आहे. १९७६ मध्ये गोवर्धन पारीख व नी. वि. सोवनी आपल्या काही साथीदारांच्या सोबत मराठी माध्यमातील अर्थशास्त्रीय लेखनांसंबंधी चर्चा करण्यासाठी एकत्र जमले होते. त्या काळापर्यंतच्या एकूणच मराठी माध्यमातील अर्थशास्त्रीय लेखनांचा आढावा घेता जमलेल्या सर्वांना असे जाणवले की, मराठी माध्यमातून अर्थशास्त्राचे लेखन करण्यासाठी एक खास नियतकालिक काढावे आणि त्याच्या माध्यमातून संशोधनपर लेखन करणाऱ्या लेखकांना एक पीठ (Platform) तयार करावे, ''हा विचार पटल्याने नियोजित नियतकालिकाचा (अर्थसंवादचा) गाडा ओढण्यासाठी **मराठी अर्थशास्त्र परिषद** नावाने संस्था स्थापन करण्याचा निर्णयही त्यापाठोपाठ झाला. या रीतीने **नियतकालिकासाठी संस्था** असा याचा घटनाक्रम आहे.''[२] हा मुद्दा येथे एवढ्यासाठीच नमूद केला आहे की, अर्थसंवादला कोणत्या प्रकारच्या लेखनाची भूक आहे, याची भावी लेखकपिढीला कल्पना यावी. याच पार्श्वभूमीवर अर्थशास्त्रीय लेखन कोणासाठी आणि कशासाठी याची चर्चा यापुढे करणार आहे.

## लेखन कोणासाठी व कशासाठी?

नी. वि. सोवनी यांच्या दोन पुस्तिका; पहिली माझे गुरू धनंजयराव गाडगीळ आणि दुसरी मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचे त्यांचे अध्यक्षीय भाषण, कोणत्याही तरुण लेखकाला आकर्षित करणारे आहेत. यात संशोधन आणि संशोधनपर लेखन करतेवेळचे त्यांचे अनेक अनुभव मांडण्यासोबतच या प्रकियेतून जात असताना कोणकोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी याचीही चर्चा केली आहे.

लेखन करतेवेळी तो का करतो, कशासाठी करतो, कोणासाठी करतो (म्हणजे कोणत्या प्रकारच्या लेखन माध्यमासाठी) आणि त्याचे स्वरूप काय असावे हे पहिल्यांदा लेखकाला निश्चित करावे लागते. कारण, लेखनाचे विविध उद्देश असल्यामुळे त्यानुसार त्या

लेखनाचे स्वरूप व धाटणी निश्चित होते. आपले अनुभव लोकापर्यंत जावेत म्हणून लेखकाकडून लेखणी चालवली जाते. समाजात एखादा नवीन विचार वावरू लागला (जी.एस.टी., नोटा बदली), की त्यासंबंधी काही मते मांडण्याच्या उद्देशाने तो लेखन करतो. कोण्या एका संपादकानी एखाद्या विषयावर लेखनाची मागणी केल्यास त्यासाठी लेखन करतो. लेखन वृत्तपत्रासाठी, स्मरणिकेसाठी, ललित नियत-कालिकासाठी, संशोधनपर नियतकालिकासाठी, प्रबंध लेखनासाठी आदी माध्यमांच्यासाठी लेखन करतो. तर या ठिकाणी महत्त्वाचे हे, की या सर्व माध्यमांच्यासाठी एकाच स्वरूपाचे व धाटणीचे लेखन उपयोगी पडत नाही. कारण, या सर्वांचा वाचकवर्ग एक सारखा नसून तो विषयाच्या आकलनाच्या निकषावर वेगवेगळ्या स्तरांत विभागलेला असतो. तेव्हा त्याच्या आकलनाच्या स्तरावरून त्या लेखाचे स्वरूप व धाटणी निश्चित होते. उदाहरणार्थ, वृत्तपत्रासाठीचे लेखन हे हलके फुलके असते. त्यात लेखकाचे म्हणणे/विचार महत्त्वाचे असून अनेक अंगाने तो विचार वाचकापर्यंत पोहचवण्याच्या भाषेत त्याची मांडणी केली जाते. शब्दातील काटेकोरपणाला तसे फार महत्त्व नसते. कारण जाणकार वाचकापासून ते सर्वसामान्य वाचकापर्यंत तो विचार पोहचावा, हा उद्देश त्यामागे असतो. साधारणतः कमीजास्त प्रमाणात हीच पद्धत ललित नियत-कालिकांच्यासाठी, स्मरणिकेसाठी वापरली जाते.

## संशोधनपर लेखनाची वैशिष्ट्ये

संशोधनपर नियतकालिके (येथे प्रामुख्याने अर्थसंवाद डोळ्यासमोर ठेवला आहे) आणि शोधनिबंध यासाठीच्या लेखनाच्या स्वरूपासंबंधी थोडी चर्चा करणार आहे. अर्थशास्त्र हे एक शास्त्र आहे (सामाजिक शास्त्रात त्याची गणना केली जाते). तेव्हा त्याच्या विषयीच्या लेखनाची भाषा ही शास्त्रीय स्वरूपाची असावी, वृत्तपत्रीय लेखनाच्या स्वरूपाची नसावी. विषयाच्या निरूपणासाठी योग्य तोच शब्द (संकल्पना -Concept) वापरणे, भाषा सुघटित (Compact) असणे. निरूपणातील विचारधारेत सुसंगती (Consistency) असणे, वस्तुनिष्ठ व तटस्थतेने (Reality, Neutral) लिखाण करणे आदी  संशोधनपर लेखनाची लक्षणे आहेत. तेव्हा अशा स्वरूपाच्या लेखनाच्या प्रसंगी ही लक्षणे टिकविण्यात कोणत्याही परिस्थितीत हेळसांड होणार नाही याची काळजी घ्यावी. काही उदाहरणाच्या साहाय्याने ही लक्षणे अधिक स्पष्ट करू इच्छितो. लेखनाच्या एका परिच्छेदात संबंधित लेखकाने शेतकऱ्यांचे उत्पन्न असा शब्द प्रयोग केला आहे. चार वाक्यानंतर तोच विचार शेतकऱ्यांची **मिळकत** या शब्दांनी वर्णिला जातो. पुनः पुढील परिच्छेदात शेतकऱ्यांचे एकूण उत्पन्न असा शब्द प्रयोग केला जातो. परंतु, शास्त्रीय भाषेत उत्पन्न, मिळकत, एकूण उत्पन्न ही एकमेकांस पर्यायी संकल्पना (शब्द) होऊ शकत नाहीत. कारण, या प्रत्येक शब्दाला त्याचाच एक स्वतंत्र अर्थ असून त्याच अर्थाने तो अर्थशास्त्रीय परिभाषेत वावरत असतो. तेव्हा एकमेकांस पर्यायासारखे वाटणाऱ्या विविध शब्दांतील सूक्ष्म सीमारेषा ओळखून शास्त्रीय भाषेत त्यांचा योग्य अर्थासाठी योग्य ठिकाणी वापर करावा.

लिखाणाची भाषा ही सुघटित असावी. एकच विचार दोन-तीन वाक्यात सांगण्याचा प्रयत्न टाळावा. उदाहरणदाखल येथे माझी एक चूक नमूद करतो, संत चोखामेळा यांच्यावरील पुस्तकात माझ्या हातून लिहिलेली दोन वाक्ये पुढील प्रमाणे. चोखोबांचे आईवडील हे वारकरी होते, नित्यनेमाने ते पंढरीची वारी करत असत. येथे दुसरे वाक्य अनावश्यक आहे. कारण, जो नित्यनेमाने पंढरीची वारी करतो तो वारकरी. तेव्हा पहिल्या वाक्यात दुसऱ्या वाक्याचा अर्थ स्पष्ट

झाला असताना दुसरे वाक्य याठिकाणी निरर्थक ठरते. सुघटित भाषेची सवय अवगत करण्यासाठी शब्द-संग्रहाच्या संवर्धनासोबतच शब्दसामर्थ्याची ओळखही व्हायला हवी.

संशोधनपर लिखाणाच्या निरूपणातील विचारधारेत सुसंगती असावी. कारण, अशा प्रकारचे लेखन हे तर्कसंगत विचारांचा प्रवाह असतो. जो मूलभूत विचार मध्यभागी ठेवून लेखनाचा प्रवास चालू होतो त्याने मध्यंतरी कोठेच आपल्या विचारापासून फारकत घेऊ नये. उदाहरणार्थ, आपल्या लेखनात प्रारंभी सरकारी शाळांपेक्षा खाजगी शाळेत मुलांना चांगले व दर्जेदार शिक्षण मिळते असे विचार मांडलेला आहे. आणि पुढील काही पानावर एकूण शिक्षण पद्धती (त्या एकूणमध्ये खाजगीदेखील आहे) ही कार्यक्षम मानवी भांडवल निर्माण करण्यात कशी कुचकामी ठरली आहे, याचे विवेचन करावयाचे. तर येथील हे दुसरे विधान लेखकाच्या पहिल्या विधानाशी सुसंगत नाही. दुसरे एक उदाहरण, शेतीचे आकारमान छोटे असल्याने सखोल (Intensive) शेती करता येते असे विधान केलेले असते. तर पुढील काही परिच्छेदात शेतजमिनींचे सतत विभाजन होत गेल्याने शेतीच्या उत्पादकतेत घट होत गेली आहे. तेव्हा एकाच विषयाच्या संदर्भात एकाचवेळी परस्पर विरोधी विधान होणार नाही याची दक्षता घ्यावी. यात अत्यंत काळजीने पुराव्यासहित विधाने पक्की करून घेऊनच मांडावेत. लेखकाला कोणते विधान करावयाचे आहे (विचार मांडावयाचा आहे), ते कोणत्या पार्श्वभूमीवर करावयाचे आहे, याच्या शास्त्रशुद्ध मांडणीवर आपले विधान स्वार व्हायला पाहिजे.

संशोधनपर लेखनाला पृष्ठसंख्येची मर्यादा नसावी. लेखकाचे समाधान हे महत्त्वाचे असावे. तेव्हा अर्थसंवादमधील अलीकडील लेखनांकडे या निकषातून पाहिले असता त्यात बरीच सुधारणा करण्यास वाव आहे असे वाटते. असे विधान करण्याचे मुख्य कारण म्हणजे अर्थसंवादसारखे एक नियतकालिक कोणत्या उद्देशाने जन्माला आले हे नी. वि. सोवनी यांच्या शब्दांतूनच पाहू. परिषद आणि अर्थसंवाद यांच्या जन्माचे मूळ कारण (उद्देश) सांगताना सोवनी नमूद करतात : ''मराठी अर्थशास्त्राची व तदनुषंगिक प्रश्नांची शास्त्रशुद्ध चर्चा-विवेचन करण्याच्या उद्दिष्टास वाहिलेली एकही संस्था अगर नियतकालिक नाही. ती वाण परिषदेने भरून काढावयाची आहे. हेच तिचे कार्यक्षेत्र तिने आखून घेतलेले आहे. ....ज्या शास्त्रशुध्द चर्चा-विवेचनाची जोपासना करावयाची आहे, ती सर्वसाधारणपणे सामान्य शिक्षितांच्या आवाक्यात ठेवण्याचा जरी सतत प्रयत्न राहिला तरी ती सर्वदा व सर्वकाळ त्याच पातळीवर राहील अशी खात्री देता येणार नाही.''[३]

## लेखक : कार्यकर्ता की संशोधक ?

एखाद्या विशिष्ट विचारधारेतून ('वाद', 'पंथ', 'Ism') झालेल्या लेखनाला संशोधनपर लेखन म्हणावयाचे का हा वरकरणी चर्चेचा विषय होऊ शकतो; परंतु ती चर्चा निरर्थक आहे. कारण, वस्तुनिष्ठता आणि तटस्थता (Neutral, Indifferent, Unbaised) हे सर्व संशोधनाचे अंगीभूत गुण असताना एखाद्या विशिष्ट विचारसरणीतून जन्मलेल्या लेखात हे गुण दिसणे संभवनीय नाही. कारण, त्याचा विचाराचा पायाच पंथ असल्यामुळे त्या पंथाला छेद देणारे निष्कर्ष जर त्या लेखातून निघणार असतील, तर तो लेखक कदापि ते विचार मान्य करणार नाही. कारण, त्या लेखकाची भूमिका याठिकाणी लेखकाची नसून पंथवाद्याची (कार्यकर्त्याची) असते. तेव्हा शेतकरी संघटना, कामगार संघटना, भटक्या विमुक्त, ऊसतोडी कामगार, शेतकऱ्यांची आत्महत्या यासारख्या विषयासंबंधी संशोधनपर लेखन करतेवेळी लेखकाला कार्यकर्त्याच्या (Activist) भूमिकेत

न राहाता संशोधकाची (Researcher) भूमिका निभवावी लागते. तेव्हा संशोधक व कार्यकर्ता या दोन्ही भूमिकेतील सूक्ष्म सीमारेषा लेखकाला ओळखता आली पाहिजे. या सीमारेषेच्या संदर्भात विवेचन करणारी नी. वि. सोवनी यांच्या एका पुस्तिकेने महाराष्ट्रातील विचारविश्व ढवळून निघाले. त्यांची 'माझे गुरू धनंजयराव गाडगीळ' ही पुस्तिका प्रकाशित झाल्यानंतर पुण्यात वर्तमानपत्रातून आणि काही विचारवंतांच्याकडून सोवनी यांच्यावर बरीच टीकेची झोड उठली. परंतु, त्या टीकेसमोर नमतं न घेता सोवनी हे आपल्या मताशी ठाम राहिले, एवढेच नव्हे तर त्या वादावर जाहीर चर्चा करण्याची तयारीही दर्शविली. कारण, तो विचार त्यांनी अत्यंत काळजीपूर्वक हाताळून मनाची खात्री पटल्यानंतरच जाहीरपणे मांडला होता. पुढे वातावरण निवळले आणि सोवनी यांच्या विचारांच्या बाजूने सम्मती वाढू लागली.

## लेखनाला सिद्धांताचा आधार हवा

संशोधनपर लेखनाचा विषय हा अर्थशास्त्रातील कोणत्या सिद्धांतातून फुलतो याची जाणीव लेखकाला व्हायला पाहिजे म्हणजे त्या लेखनाला शास्त्रीय अंग प्राप्त होते. अर्थात, त्या संबंधित सिद्धांताला बळकटी मिळणारेच लेखन करावे असे नाही. हा मुद्दा येथे नमूद करण्याचा हेतू हा की, १९९७ च्या दरम्यान नी. वि. सोवनी यांच्याशी चर्चा करीत असताना एक भाबडा प्रश्न त्यांच्या समोर मांडला. तो असा होता: ''शिवाजी विद्यापीठात अर्थशास्त्रातील स्नातकाची पदवी घेणारा विद्यार्थी पहिल्या वर्षी अर्थशास्त्राची मूलतत्त्वे (Price theory) हा विषय शिकतो. दुसऱ्या वर्षी, आर्थिक विकास, सार्वजनिक आयव्यय, आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत आणि तिसऱ्या वर्षी, भारतीय अर्थव्यवस्था, भारतातील शेती, उद्योग, बँका, कामगार आदी विषय अभ्यासतो. परंतु, पहिल्या दोन वर्षांच्या तुलनेत तिसऱ्या वर्षी त्या विद्यार्थ्यांची विषयाची आकलनशक्ती प्रगल्भ झाली असताना त्या वर्षी इतके सोपे विषय अभ्यास-क्रमात समाविष्ट करणे संयुक्तिक वाटते का?'' हे ऐकून सोवनी माझ्या खांद्यावर हात टाकीत जोरजोरांनी हसत म्हणाले, ''तुम्ही, म्हणजे तुमच्यासारखे बहुतांश प्राध्यापक येथेच चुकता. तिसऱ्या वर्षी विषय सोपे ठेवले असे नाही तर तुम्ही शिकविणाऱ्या आणि त्याविषयाचे पाठ्यपुस्तक लिहिणाऱ्या मंडळींनी तो विषय अध्यापनाच्या दृष्टीने मर्यादित करून टाकला आहे.'' ते जे उदाहरण देऊन त्या स्वरूपाचे अभ्यासक्रम ठरविण्यामागील त्यांनी जी भूमिका मांडली ती अशी होती: ''समजा, शेतीमालाच्या किमतींच्या समस्या हा विषय मुलांना शिकवित असताना, शेतीमालाचा पुरवठा व त्याची मागणी या त्याच्या दोन्ही गोष्टी अर्थ-शास्त्रातील कोणत्या बाजारव्यवस्थेत (Perfect, Imperfect, Monopoly, Monopolistic, Duopoly etc.) येतात हे अगोदर विशद करावे. मग त्या बाजाराची लक्षणे त्या शेतमालाच्या मागणी पुरवठ्यात कशी दिसतात हे मुलांना सांगावे. आता दुसरे, भारतीय कामगारांचा प्रश्न घ्या. तर कामगारांची मागणी व पुरवठा, हे अर्थशास्त्राच्या कोणत्यातरी सिद्धांतात बसणारे आहे, तर तो विषय त्या सिद्धांताच्या आधारे शिकवावयाचे आहे. याचा मतितार्थ असा की, मुलं पहिल्या व दुसऱ्या वर्षात जे सिद्धांत शिकली, त्याचे भारतीय अर्थव्यवस्थेच्या उदाहरणाच्या साहाय्याने त्यांना एकप्रकारे प्रात्यक्षिकच दाखवावयाचे आहे. पण हे वाटते तितके सोपे नाही. म्हणून आपण सरळ सोपा मार्ग निवडला आणि तो म्हणजे शेतीमालाच्या किमतीची समस्या म्हटले, की तिची एक मोठी यादी करून मुलांच्या समोर ठेवले, की अध्यापनाचे काम संपले असे होत नाही.''

संशोधनपर लेखन हे निश्चितच कोणत्या ना कोणत्या अर्थशास्त्रीय सिद्धांताच्या भोवती कसे रेंगाळत

असते, या संदर्भातील एक उदाहरण देतो. सांगोल्यातील शेतकरी सहकारी सूतगिरणी ही गेल्या ३५ वर्षांपासून यशाच्या अनेक कसोट्यांच्या आधारे भारतात सतत उच्चांक गाठत आली आहे. त्या गिरणीची ही यशोगाथा एका पुस्तिकेतून मांडली. उद्योगाच्या केंद्रीकरणाविषयी Weight losing and weight caring हे नियम आहेत. तर एकट्या सांगोला शहरात आजच्या घडीला चार सूतगिरण्या एकवटल्या असून आणखी एक गिरणी उत्पादन सुरू करण्याच्या मार्गावर आहे. दुसऱ्या बाजूला स्थानिक पातळीवर अत्यंत नगण्य प्रमाणात कापसाचे उत्पादन (कच्च्या मालाचा पुरवठा) होते. तरी येथे सूतगिरण्यांचे केंद्रीकरण होते. हे पूर्वी नमूद केलेल्या दुसऱ्या प्रकारच्या नियमामुळे. कारण, सांगोला हा दुष्काळी तालुका. येथील लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी उद्योग (Industry) आणि तेही श्रमप्रधान उद्योग उभारणे आवश्यक होते. परंतु, कोणत्याच प्रकारचा कच्चामाल तेथे उपलब्ध नसताना उद्योग उभा करणे सोपे नव्हते. तेव्हा विदर्भ व मराठवाडा या भागातून कापूस आणून (वेट कॅरिंग) गेल्या ३५ वर्षांपासून एकापाठोपाठ एक सूतगिरण्या सुरू करत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे रोजगार निर्माण केले गेले. यातील एका गिरणीच्या यशोगाथेवर लिहिलेल्या पुस्तिकेत हा मुद्दा प्रस्तुत लेखकाने प्रकर्षाने मांडला आहे.

## टीका पचवता आली पाहिजे

संशोधनपर लेखनात वाचन व चिंतन हे तर महत्त्वाचे आहेतच. शिवाय जाणकार वरिष्ठ लोकांशी त्याविषयी चर्चादेखील करावी. जमल्यास आपले लेखन त्यांच्या नजरेस आणावे आणि योग्य सूचनांचा आदर करावा.[४] हा एकप्रकारे रेफ्रिडपणाच आहे. परंतु, यासाठी लेखकाकडे मनाचा मोठेपणा असावा लागतो. परंतु, आपल्या लेखनाविषयीची सत्य बाजू (टीका) दुसऱ्याकडून ऐकून घेण्यासाठीची लेखकाच्या मनाच्या मोठेपणाविषयी आलेले अनुभव प्रस्तुत लेखकालाच नव्हे तर अनेकांची देखील समाधानकारक नाहीत म्हणण्यापेक्षा खेदजनक होते म्हणणेच उचित ठरेल. एखाद्याच्या पुस्तकावर वा लेखावर टीकात्मकदृष्ट्या भाष्य केल्यास संबंधित लेखक ते भाष्य वैयक्तिक टीका समजून त्यास निराळे स्वरूप देण्याचे प्रयत्न होताना अनुभवले आहे. याच्या पुष्ट्यार्थ नी. वि. सोवनी यांचा एक अनुभव याला जोडतो. ''पुस्तकावर अभिप्राय देणे अगर त्यातील विवेचनावर टीका करणे यासंबंधी काही चमत्कारिक अपेक्षा व रिवाज आपल्याकडे निर्माण झालेले दिसतात. मराठी ललित वाङ्मयावरील टीकात्मक लिखाणात, असे रिवाज व अपेक्षा गेल्या काही वर्षांत पुष्कळच कमी झाल्या आहेत. परंतु, शास्त्रीय चर्चेला वाहिलेल्या वाङ्.मयासंबंधी अद्याप तसे झालेले नाही. अशा लिखाणातील विवेचनावर शास्त्रीयदृष्टीने टीका केली, त्यातील दोष दाखविले तर अभिप्राय देणाऱ्याने अगर टीका करणाऱ्याने ती ग्रंथकाराच्या अगर लेखकाबद्दल वैयक्तिक द्वेषामुळे अगर हेव्यादाव्यामुळे केली असणार असे मानण्याकडे प्राय: कल दिसतो. त्याचप्रमाणे ग्रंथकाराने विषय किती चांगला बिनचूक विवेचिला आहे वगैरे निकषांपेक्षा तो कोण आहे, त्याची सद्य: परिस्थिती काय आहे, तो राष्ट्रीय महत्त्वाच्या कामात गुंतला आहे की काय, वगैरे सर्वस्वी अवांतर गोष्टींवरच त्याच्या ग्रंथावरचा अभिप्राय अवलंबून असावा अशी अपेक्षा बाळगली जाते.''[५]

परंतु आपल्या लेखनावर झालेली टीका ही जर वस्तुस्थितीला धरून असेल तर ते प्रांजळपणे कबूल करण्यात लेखकाचा मोठेपणा असतो. यासंबंधी सोवनी यांनी अनेक मोठ्या विद्वानांचे दाखले दिले आहेत ते या ठिकाणी नोंदविणे अतीव आवश्यक वाटते. १९४३ मध्ये काकासाहेब गाडगीळ यांनी लिहिलेल्या 'ग्यानबाचे अर्थशास्त्र' या पुस्तकावर सोवनी यांनी टीकात्मक

परीक्षण लिहिले. त्यावेळी गाडगीळ हे तुरूंगात होते. तर तुरूंगात असलेल्या गाडगीळ यांच्या पुस्तकावर सोवनी यांनी अशी टीका करायला नको होती अशी अनेकांची प्रतिक्रिया होती. परंतु, काकासाहेब तुरूंगातून सुटून आल्यानंतर सोवनी यांच्या भेटीत अत्यंत दिलखुलासपणे पुढीलप्रमाणे त्या टीकेला उत्तर दिले, ''तुम्ही लोक पुस्तके लिहित नाही म्हणून आम्ही लिहितो व चुकतो. तुम्ही लिहाल तर आम्हांला त्या वाटेला कशाला जावे लागेल.''[६] या विनम्र प्रवृत्तीविषयी भाष्य करताना सोवनी म्हणतात, ''आपल्या लिखाणावर होणाऱ्या टीकेसंबंधी काकासाहेबांच्यासारखी खिलाडूवृत्तीच लेखकांनी स्वीकारली पाहिजे. कोणत्याही शास्त्रीय चर्चेत शास्त्रीय सत्याचा शोध हा महत्त्वाचा असतो. चर्चा अगर विवेचन करणारा लेखक हा तिचा विषय नसून ती चर्चा अगर विवेचन शास्त्रशुद्धतेच्या कसाला उतरते की नाही हाच तिचा खरा विषय होय. कोणत्याही लिखाणावर त्याच्या लेखकासंबंधी काही मत बनणे अपरिहार्य आहे पण ते शास्त्रीय चर्चेवर कुरघोडी करणार नाही, याबद्दल टीकाकारांनी काळजी घेतली पाहिजे. टीका किंवा चर्चा वैयक्तिक स्तरावर उतरता कामा नये. तिला हेव्यादाव्याचे स्वरूप तर मुळीच येऊ नये. शास्त्रीय पातळीवर मात्र ती कितीही कठोर, तर्ककर्कश असली तरी त्याबद्दल तक्रार करता येणार नाही. **काहीही लिहिले तरी खपून जाते** अशी आजची स्थिती नाहीशी होऊन अभिरुचीसंपन्न व शास्त्रशुद्ध टीका करणाऱ्या टीकाकारांच्या सतत जागृतीमुळे काहीही लिहिले तरी ते जास्तीत जास्त चांगले व शास्त्रशुद्ध कसे होईल, याची आच लेखकांना लागली पाहिजे. वाईट लिहिले, निष्काळजीपणाने लिहिले तर आपल्याबद्दल टीकाकारांचे व त्यामुळे वाचकांचे मत वाईट होईल, असा टीकाकारांचा धाक लेखकांना वाटला पाहिजे.''

''आपल्या लेखनावरील टीका ती व्यक्तिगत टीका आहे असे समजून लेखकानी टीकाकारासंबंधी राग धरणे हे शास्त्राच्या विद्यार्थ्यांना शोभत नाही. अर्थशास्त्रीय चर्चेची परदेशी परंपरा अशी नाही. याच्या अगदी उलटी आहे. आपल्या चुका प्रांजळपणे कबूल करण्याची, त्या सुधारण्याची आहे. ....मिलने आपला वेतननिधी सिद्धांत त्याच्या विरूध्द त्याच्या टीकाकारांनी सादर केलेला पुरावा ग्राह्य मानून जाहीर रीतीने परत घेतला. त्यात त्याला कोणताही वैयक्तिक अपमान वाटला नाही. त्याचप्रमाणे विकस्टीड याने सीमांत उत्पादकतेनुसार उत्पादनाचे उत्पादन घटकात कसे न्याय्य विभाजन होते यासंबंधीचा आपला गणिती सिद्धांत पॅरेटोच्या टीकेमुळे जाहीरपणे परत घेतला. त्यात त्याला काही कमीपणाचे वाटले नाही.''[७] आपल्याकडील उदाहरण म्हणून डॉ. केतकर यांच्या स्वतंत्र हिंदी अर्थशास्त्राच्या कल्पनेला ध. रा. गाडगीळ यांनी विरोध केल्यानंतर १८ वर्षांनी केतकर यांनी तो मान्य केला. ''अर्थशास्त्रीय चर्चेची ही परंपरा व हा वारसा आपण मराठीत जोपासला पाहिजे व आपल्या लिखाणावर होणाऱ्या टीकेसंबंधी आपली वृत्ती उदार व खिलाडू ठेवली पाहिजे.''[८]

आपल्या स्वत:च्या एका लेखाविषयी सोवनी यांनी देखील अशी भूमिका घेतली आहे. एप्रिल-जून १९८० च्या अर्थसंवादच्या अंकातील त्यांचा **लवचिकतेची कल्पना व अर्थशास्त्रातील तिचे उपयोग** या लेखातील काही दोष रवीन्द्र दोशी यांनी दाखविले होते. तसेच ग. प्र. पिंपरकर यांनी देखील पत्रातून काही दोष सोवनी यांना कळविले होते. त्यावरून सोवनी यांनी तो लेख यापुढे वाचण्यास शिफारस करू नये अशी विनंती करणारे पत्र अर्थसंवादच्या संपादकाना पाठविले होते.[९]

## भाग दोन

## एम्.फिल. व पीएच.डी. प्रबंध लेखनासंबंधी

आता एम्.फिल आणि पीएच.डी.साठी लिहिल्या

जाणाऱ्या शोधप्रबंधाच्या लिखाणासंबंधी थोडी चर्चा करणार आहे.

### संशोधनासाठी विषयाची निवड

सर्वप्रथम संशोधनासाठी (अभ्यासासाठी) विषय निवडताना विशेषत्वाने काही काळजी घेणे आवश्यक आहे. विषय घाईघाईने निवडू नये. (संबंधित पदवीमुळे पुढील काही गोष्टी साध्य करण्यासाठीच्या मोहात असे घडणे बऱ्याचवेळा संभवनीय आहे.) संशोधकांनी यापूर्वी संबंधित विषयावर काही लेखन केले असेल, त्यातून काही पैलूंवर अधिक प्रकाश टाकण्याच्या निकडीतून विषय निवडले गेले तर त्याला अधिक न्याय देता येईल. काही संशोधनपर लेख व ग्रंथ वाचताना, काही अभ्यासू व्यक्तींशी चर्चा करताना, सभोवतालच्या आर्थिक घडामोडींचे निरीक्षण करताना, त्यातील एखादा विषय मनात घर करून जातो. अशाप्रकारच्या वेचणीतून दोन-तीन संभाव्य विषय नजरेसमोर आले, की संशोधकाची दुसरी जबाबदारी ही राहील, की तो विषय अर्थशास्त्रीय सारस्वतात (Literature of Economics) नव्याने भर घालणारा असावा याची खात्री करून घेणे. तेव्हा आपल्यासमोरील संभाव्य विषयावर या पूर्वी अभ्यास झाला आहे का, झाला असेल तर तो कोणत्या अंगाने झाला आहे, याची खातरजमा करून घ्यावी. त्या विषयाच्या अभ्यासातून अर्थशास्त्रीय साहित्यात नव्याने काही भर घालता येण्यासारखे नसेल व ते पूर्वीच्या एखाद्या संशोधन अभ्यासाशी समांतर अभ्यास (Parallel Study) ठरणार असेल तर तो विषय एम्.फिल.वा पीएच.डी.च्या अभ्यासासाठी निवडणे टाळावे. उदाहरणार्थ, दारिद्र्य रेषेखालील लोकांचे सामाजिक व आर्थिक अभ्यास, अमक्या जिल्ह्यातील सहकारी दूध उत्पादक संघ, सहकारी बँक, साखर कारखाना, कुक्कुटपालन संघ, पाणी पुरवठा संस्था इत्यादींचे आर्थिक व सामाजिक पाहणी वा तत्सम स्वरूपातील विषय, पूर्वी एकदा एका संशोधकाने हाताळले असेल तर नावीन्याच्या दृष्टीने दुसऱ्याला या विषयात फारसे वाव राहील असे वाटत नाही. कारण, यातील एक उदाहरण म्हणून, एका साखर कारखान्याच्या एकूण कार्यपद्धतीच्या मानाने दुसऱ्या एखाद्या साखर कारखान्याच्या कार्यपद्धतीत फारसा फरक आढळत नाही. एखादे-दुसरे लक्षण वेगळे असू शकेल, परंतु कार्यपद्धतीतील एकजिनसीपणात (Homogeneity) फारसा फरक जाणवत नसल्याने या प्रकारचे समांतर काम करणे शक्यतो टाळावे.

### माहिती मिळण्याची शक्यता

संशोधनासाठी विषय निवडताना त्याच्या विविधांगी विश्लेषणासाठी उपयुक्त माहितीच्या उपलब्धतेविषयी अधिक जागृत राहावे. प्रस्तुत विषय हा प्राथमिक माहितीप्रधान (Primary data) आहे की दुय्यम माहितीप्रधान (Secondary data) आहे हे एकदा ठरल्यानंतर ती माहिती विश्वासनीय, ताज्या स्वरूपातील (Latest) व पुरेशा प्रमाणात मिळू शकेल याची पक्की खात्री करून घेणे आवश्यक आहे. कारण, संशोधनाच्या विश्लेषणाचा संपूर्ण डोलाराच त्यावर उभा असतो. जर अभ्यासाच्या प्रारंभीच ही काळजी घेतली नाही तर अचूक माहिती अभावी विषयाच्या विश्लेषणात काही तडजोडीचा शिरकाव होऊन विषयाला न्याय देण्यात संशोधक कमी पडू शकतो.

### लेखनाचे पुनरावलोकन

संबंधित विषयावर पूर्वी संशोधन (लेखन) झाले असेल तर त्या संबंधित लेखनांचे पुनरावलोकन (Review of Literature) करणे संशोधन प्रक्रियेतील अतिशय महत्त्वाचा भाग ठरतो तो एवढ्यासाठी की, पूर्वीच्या लेखनात (लेखकाने/संशोधकाने) त्या विषयाचे कोणते पैलू तपासले आहेत, त्यासाठी कोणते तंत्र

वापरले आहेत, कोणत्या निष्कर्षापर्यंत तो पोचला आहे आदी गोष्टी स्पष्ट होतील आणि त्यातून त्या विषयात नव्याने काही भर घालता येण्यासारखी संधी (Space) आहे का हे तपासून, त्या संधीचे स्वरूप व दिशा निश्चित करता येईल. जर संधी नसेल आणि त्याला समांतर काम करण्याची मानसिकता असेल तर त्या प्रबंधातून नव्याने कोणते भर घालणार याविषयी शंका आहे. संशोधन प्रबंधात **रिव्ह्यू ऑफ लिटरेचर** नामक प्रकरणात याचीच चर्चा करावयाची असते. म्हणून संबंधित विषयावर पूर्वी संशोधन केलेल्यांची नावे, प्रबंधांची नावे, सादर केलेल्या विद्यापीठांची व कोणत्या पदवीसाठी सादर केले याची ती केवळ यादी ठरणार नाही, याची काळजी घ्यावी. या पार्श्वभूमीवर, निवडलेल्या विषयाच्या माध्यमातून नव्याने काय भर घालणार आहे, हे स्पष्ट केले असता संशोधनाची दिशा निश्चित होते.

## प्रकरणांचे सारण व संशोधनाचे उद्देश

संशोधन प्रबंध, सामान्यपणे ५ ते ८ प्रकरणात (अध्यायात) विभागले जाते. या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने काही नियमावली घालून दिलेली आहे. संशोधनाचे उद्देश (Objectives), परिकल्पना (गृहितकृत्य, Hypothesis), संशोधन अभिकल्प (Research Design), लेखनांचे पुनरावलोकन (Research in the past or review of literature) इत्यादी विषयीचे लेखन प्रबंधाच्या प्रारंभी असावे. प्रबंधातील प्रकरणांची रचना व संख्या ही अभ्यासाच्या उद्देशानुसार ठरवली पाहिजे. परंतु बऱ्याच ठिकाणी असे होताना दिसत नाही. संशोधनाच्या उद्देशाशी काहीही देणेघेणे नसलेल्या विषयाने अथवा माहितीने प्रबंधातील काही प्रकरणे सजविताना दिसतात. उदाहरणार्थ, **सोलापूर जिल्ह्यातील डाळिंब पिकाचे अर्थशास्त्र** असा विषय आहे. या अभ्यासाचे मुख्य उद्देश, त्या पिकाचे उत्पादन परिव्यय, विपणन परिव्यय शोधून, त्यापासून मिळणारे एकूण जमा (Total reciept) शोधणे हा असला पाहिजे; किंबहुना तोच या अभ्यासाचा गाभा आहे. परंतु नेमके होते असे की, सोलापूर जिल्ह्याचा पूर्वेतिहास, त्याच्या नावाची उत्पत्ती, तेथील धार्मिक व राजकीय परंपरा, तेथील लोकसंख्या, त्याची लिंगवार, जातवार विभागणी, त्यांच्या शिक्षणाचा दर्जा, पुनः त्याची विभागणी ह्या व अशा प्रकारच्या बाबी विस्ताराने मांडल्या जातात. परंतु, या सर्व गोष्टी या ठिकाणी अप्रस्तुत (Irrelevant) आहेत. कारण, अभ्यासाचा मुख्य विषय संबंधित पिकाचे अर्थशास्त्र शोधणे हा आहे. तेव्हा या ठिकाणी त्या पिकाचे उत्पादन परिव्यय व त्याच्या विक्रीतून मिळणारी जमा रक्कम यावर अभ्यासाचे लक्ष केंद्रीत व्हावे. दुसरे, संशोधनासाठी निवडलेल्या विषयाची अनावश्यकपणे अनेक व्याख्यांची (Definitions) खैरात (काही ठिकाणी तर १०-१५) केली जाते. सोबतच त्याविषयीची अनेक तज्ञांची मते देखील मांडली जातात. उदाहरणार्थ, फूलशेती हे बागवर्गीय (Horticultural) शेती पध्दती असल्यामुळे, बाग कशाला म्हणावयाचे या संदर्भातील अनेक तज्ञांची मते वा व्याख्या प्रबंधात मांडली जातात. परंतु अभ्यासाच्या उद्देशासी निगडित एखादी-दुसरी व्याख्या पुरेशी आहे. संशोधक ज्या माहितीच्याआधारे संबंधित विषयाचे विश्लेषण करणार आहे त्यास पुष्टी मिळेल व वाचकांना ते विश्लेषण सहज समजावे हा हेतू साध्य होण्याच्या दृष्टीने व्याख्यांची निवड करावी.

## विषयाच्या कक्षेची जाणीव

आणखी एक पैलू प्रबंध लेखनात डोकावताना दिसतो तो म्हणजे, मूळ अभ्यासाच्या विषयाशी काहीही देणे-घेणे नसलेले व अभ्यासकाच्या विषयाच्या अधिकार कक्षेत नसलेली काही विधाने प्रबंधात मांडण्याचे संशोधक करीत असलेले धाडस. उदाहरणार्थ,

डाळिंब पिकाचे अर्थशास्त्र शोधण्यासाठी हाती घेतलेल्या संशोधकांनी, डाळिंब हे कर्करोगावर एक गुणकारी फळ आहे, त्यात आरोग्यासाठी गुणकारी अमक्या अमक्या प्रकारचे जीवनसत्व आहेत, वगैरे. परंतु हा आरोग्य-शास्त्रज्ञांच्या अखत्यारीतील विषय (Area of Discipline) आहे. त्या विषयातील तज्ञांनीच अशाप्रकारे अधिकारवाणीने डाळिंबाच्या औषधी गुणांचे वर्णन करावे. दुसरे उदाहरण असे की, अमुक पिकाला अमुक अमुक खत दिल्याने अमुक अमुक पटीने त्याचे उत्पादन वाढते; परंतु त्या अमुक खतामुळे नेमके कोणते अन्न घटक पिकाला मिळतात, की ज्याद्वारे त्याचे उत्पादन अमुक पटीने वाढते, असे सांगण्याचा आगाऊपणा अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्याने करू नये. कारण, तो वनस्पती शास्त्रज्ञांचा कक्षेतील विषय आहे. तर याच विषयाची मांडणी अर्थशास्त्राचा विद्यार्थी असे करेल, की किती किमतीचे (रकमेचे) खत दिल्याने किती प्रमाणात अमुक पीकाच्या उत्पादनात (पर्यायाने उत्पन्नात) बदल होईल, याची मोजदाद करून त्याचे व्यय-उत्पन्नाचे ताळेबंद मांडू शकेल. तेव्हा आपल्या विषयाच्या कार्यक्षेत्रामुळे येणाऱ्या शास्त्रीय विश्लेषणाची मर्यादा ओळखता आली पाहिजे.

## मोघम स्वरूपाचे विधान करणे टाळावे

संशोधन प्रक्रियेत कार्यकारणभाव या संकल्पनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. संशोधनपर लेखनातील प्रत्येक वाक्य वा परिच्छेद कार्यकारणभाव समर्थनयुक्त व निश्चित स्वरूपाचा असावा. मोघम स्वरूपाचे (Unspecified, Vague) विधान करण्याचे टाळावे. उदाहरणार्थ, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना अनुदान (अल्पदर व्याजाने कर्ज, विना परतावा कर्ज, इत्यादी) दिल्याने, त्यांचे उत्पन्न वाढून संबंधित लोक सुखासमाधानाने नांदतील. साखर कारखाने व दूध संघाच्या सभासदांच्या अनुक्रमे ऊसाला व दुधाला किंमत वाढवून दिल्याने त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन ते सुखासमाधानाने जगू शकतील. परंतु, अशाप्रकारचे मोघम विधान करण्याऐवजी त्यांना दिल्या जाणाऱ्या साहाय्यांचे स्वरूप व त्याच्या वापराची प्रक्रिया (कार्यपद्धती) स्पष्ट करून, त्यातून संबंधितांचे उत्पन्न वाढीची नेमकी प्रक्रिया अर्थात कार्यकारणभाव कसे संभवते हे स्पष्ट करावे. मी नम्रपणे कबूल करतो की, यातील काही प्रमाद माझ्याही हातून घडले आहेत.

प्रबंधाच्या संबंधीचे आधार सामग्री संकलन (माहितीचे) स्रोत हे प्राथमिक वा दुय्यम स्वरूपाचे असतात. काहीवेळा या दोन्हींचाही आधार घेतला जातो. परंतु माझ्या पाहणीतील बहुतांश प्रबंधांत केवळ एकच प्रकरण या आधार सामग्रीच्या विश्लेषणासाठी राखून ठेवलेले आढळले. उर्वरित (जे ४-५ असतील) प्रकरणात विषयाशी अप्रस्तुत माहितीच (मसाला) अधिक प्रमाणात आढळते. वास्तवात, सामान्यपणे पहिले प्रकरण प्रास्ताविकाचे (Introduction) असते. त्यात संशोधनासाठी निवडलेल्या विषयाशी पूरक अशी माहिती असावी. संशोधक संबंधित प्रबंधातून काय मांडणार आहे आणि कोणत्या पार्श्वभूमीवर मांडणार आहे याची वाचकांना कल्पना येण्याच्या दृष्टीने या प्रकरणाचे लेखन करावे.

## संशोधन अभिकल्प

दुसरे प्रकरण संशोधन अभिकल्प (आराखडा Research Design) चा असावा. त्यात पूर्वी नोंदल्याप्रमाणे संबंधित विषयावर पूर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा घेणे (Review of Literature or Research in the past), कोणत्या उद्देश पूर्ततेसाठी प्रस्तुत प्रकल्प हाती घेतले आहे ते सर्व उद्देश नोंदवावे व तेच उद्देश का निवडले याचीही चर्चा करावी.

संशोधनाला चालना देणारा घटक म्हणजे गृहितकृत्य (Hypothesis). तो शक्यतो एकच असावा

आणि तो संक्षिप्त स्वरूपात मांडावा. कारण, एकाच संशोधन प्रकल्पातून चार-पाच गृहितके तपासणे शक्य होईल असे वाटत नाही. परिच्छेद भरून, मोघम स्वरूपात गृहितकृत्य मांडावयाचे टाळून एखाद्या दुसऱ्या वाक्यातून स्पष्टपणे गृहितक मांडावे. उदाहरणार्थ, कापूस हंगामात सूत गिरण्यांना कापूस खरेदी करण्यासाठी सवलतीच्या दरात शासनाचे कर्ज उपलब्ध करून दिल्यास सूत उत्पादन परिव्यय कमी होईल. साखरेवरील निर्यात कर कमी केल्यास ऊसाला अधिक किंमत देणे साखर कारखान्यांना शक्य होईल. अमुक एका जिल्ह्यात रेशीम उद्योग वाढीसाठी सर्वांगाने अनुकूल वातावरण असल्याने भविष्यात तो उद्योग वाढीस पुरेसा वाव आहे. पाण्याचे आधिक्य (Surplus) असलेल्या अमुक खोऱ्यातून तुटीच्या (Deficit) अमुक खोऱ्यात पाणी आणल्यास येथील जमिनीची उत्पादकता वाढेल. संशोधन प्रक्रियेत गृहितकृत्य ही अशी एक गोष्ट आहे की, संपूर्ण शोधप्रबंधातील लेखन तिच्या भोवतीच रिंगण घालत राहते आणि ते राहावे. गृहितकृत्य तपासण्याची संशोधनाची कक्षा ओलांडून भलत्याच स्वरूपाच्या व प्रकाराच्या लेखनांनी प्रबंधाची पाने भरण्याच्या नादात संशोधक भलत्याच दिशेनी भरकटत जाऊ नये. येथे आणखी एक काळजीची गोष्ट म्हणजे प्रबंधाच्या पूर्वीच्या पानांवर संशोधनाचे जे उद्देश निश्चित केले आहेत ती गृहितकृत्याची तपासणी करण्यासाठी सुसंगत असावेत. परंतु बऱ्याच ठिकाणी या दोहोंचा ताळमेळ बसत असल्याचे दिसत नाही. उदाहरणार्थ, साखरेवरील निर्यातदर कमी केल्यास शेतकऱ्यांच्या ऊसाला अधिक किंमत देणे साखर कारखान्यांना शक्य होते हे गृहितक तपासावयाचे आहे. या संदर्भातील माहिती संकलित करण्यासाठी ऊस उत्पादक नमुना (Sample) शेतकरी निवडतो. तर त्यात त्या शेतकऱ्यांची जातवार माहिती, त्यांचा शैक्षणिक दर्जा, कुटुंबाचे आकारमान आदी माहिती संशोधन विषयाशी अप्रस्तुत असून गृहितक तपासण्यासाठी उपयुक्त असलेली माहितीच अभ्यासासाठी संकलित केली जाईल याची संशोधकांनी नितांत काळजी घेणे आवश्यक आहे.

## आधार सामग्री संकलन

संशोधन अभिकल्पातील आणखी एक घटक म्हणजे आधार सामग्री संकलन (Data collection). संबंधित संशोधन, प्राथमिक माहितीच्या, दुय्यम माहितीच्या वा अंशत: संयुक्त माहितीच्या आधारावर अवलंबून असते. तर या सदरात संबंधित विषयाची निगडित माहिती संकलित करण्याची शास्त्रोक्त पद्धती स्पष्ट करावयाची असते. एका उदाहरणाच्या साहाय्याने याचे विवेचन करू या. 'रत्नागिरी जिल्ह्यातील आंबा पिकाचे अर्थशास्त्र' असा संशोधनाचा विषय आहे. तर जिल्ह्यात पंधरा तालुके, हजारो खेडी आहेत. त्यातील हजारो शेतकरी हे पीक घेतात. तेव्हा त्या सर्वांची (Universe) पाहणीसाठी निवड करणे व्यावहारिक नाही म्हणून नमुना पद्धतीचा (Sample methods) आधार घेतो. यासाठी पहिल्यांदा रत्नागिरी जिल्ह्याची निवड का केली हे स्पष्ट करावे. त्यानंतर, त्यातील पंधरा तालुक्यांपैकी किती तालुके निवडली, तीच का निवडली, याचा खुलासा करावा. त्यानंतर त्या निवडलेल्या तालुक्यातील किती खेडी निवडले, तेच का निवडले, या निवडीसाठी कोणत्या निकषाचा आधार घेतला हे स्पष्ट करावे. मग त्या प्रत्येक खेड्यातून किती शेतकरी निवडले, त्यासाठी कोणत्या निकषाचा आधार घेतला हे स्पष्ट करावे. ही सर्व निवड शास्त्रोक्त पद्धतीची असावी. ही निवड जितकी शास्त्रशुद्ध राहिल, तितक्या प्रमाणात हाती लागणारे निष्कर्ष अचूक येतील. प्राथमिक सामग्रीवर आधारित असलेल्या संशोधनात ही एक अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. एकदा नमुना निवडीचा निकष निश्चित केल्यानंतर तोच निकष सर्वत्र

वापरावा. कदाचित वरकरणी आपल्याला अपेक्षित नसलेल्या नमुन्यांची (उदाहरणार्थ गैरसोयीची खेडी वा शेतकरी) पाहणीसाठी वर्णी लागेल देखील. त्यावेळी नमुना निवडीमध्ये तडजोड करण्याची शक्यता असते. तर येथे भावनेला आवर घालून नमुना निवडीत होणाऱ्या तडजोडीला रोखून धरावे.

## संकल्पना स्पष्ट करणे

संशोधन प्रबंधात आणखी एका गोष्टीकडे प्रकर्षाने लक्ष द्यावे लागेल आणि ती म्हणजे संकल्पना स्पष्ट करणे (Conceptual foundation or Connotation of terms). यासाठी शोधप्रबंधात एक स्वतंत्र प्रकरण करावयास काहीच हरकत नसावी, नव्हे ती करावीच. कारण, तोही संशोधन प्रक्रियेतील एक अविभाज्य भाग आहे याची कल्पना असावी. परंतु बऱ्याच प्रबंधांमध्ये हा भाग पाहावयास मिळत नाही. म्हणून त्याची काहीशा विस्ताराने येथे चर्चा केली आहे. संशोधनासाठी निवडलेल्या विषयाचे विश्लेषण (लेखन) करतेवेळी अनेक खास शब्दांचा उपयोग केला जातो. तेव्हा त्या शब्दांचा लेखकाला नेमका कोणता अर्थ अभिप्रेत आहे किंवा कोणत्या अर्थाने त्या शब्दांचा प्रबंध लेखनात उपयोग केला आहे, याचा खुलासा करणे म्हणजे संकल्पना स्पष्ट करणे होय. उदाहरणार्थ, आंबा पिकाचे अर्थशास्त्र या विषयामध्ये उत्पादन परिव्यय (Production cost) असा शब्दप्रयोग केला जातो. मग या शब्दाच्या अनुषंगाने इतर अनेक शब्दांचे अर्थ निश्चित करावे लागतात. या उत्पादन परिव्ययात रोपावरील परिव्यय, मजुरीवरील परिव्यय, खतावरील परिव्यय, वाहतुकीवरील परिव्यय, वीज व पाण्यावरील परिव्यय, आवेष्टनांवरील परिव्यय (Packeging cost) विपणन परिव्यय, आस्थापन परिव्यय अशा सर्व संकल्पनांचा अर्थ स्पष्ट केल्यानंतरच मुळातील त्या उत्पादन परिव्यय या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट होतो. संशोधन प्रकल्पाच्या लेखनात वापरल्या जाणाऱ्या संकल्पनांचा अर्थ स्पष्ट केल्यानंतरच वाचकांना त्या संशोधनाची मूळ कल्पना समजून घेण्यास सोपे जाईल. वरील एका परिव्ययाचा आधार घेऊन त्याचे अर्थ स्पष्ट करणे किती आवश्यक आहे हे पाहू या. आता विपणन परिव्यय (Marketing cost) ही संकल्पना घेऊ या. यात प्रामुख्याने फळांची प्रतवारी करणे, त्यांना विविध प्रकारच्या आवेष्टनांमध्ये बांधणे, त्याची बाजारापर्यंत वाहतूक करणे, तेथील दलाली, अडत, हमाली, तोलाई, इतर आनुषंगिक परिव्यय हे सर्व एकत्र केले असता, आंब्याचे विपणन परिव्यय काढता येईल. आता येथे खुलासा करावा लागेल की, झाडावर फळ तयार झाल्यानंतर त्याची तोडणी करून प्रतवारी करण्यासाठी एका ठिकाणी फळं गोळा करण्यापर्यंतचा परिव्यय हा उत्पादन परिव्ययात समाविष्ट केला आहे की, विपणन परिव्ययात केला आहे याचा खुलासा या संकल्पनेतून स्पष्ट करावे लागेल. कारण, तो परिव्यय उत्पादन परिव्ययातही समाविष्ट करता येतो किंवा विक्री परिव्ययातही समाविष्ट करता येतो. तर तो परिव्यय कोणत्या परिव्ययात समाविष्ट केला आहे हे स्पष्ट झाल्यानंतरचे लेखन समजून घेणे वाचकांस सोपे जाते.

## अभ्यासाचा कालावधी

संशोधनासाठी निवडलेल्या विषयाची परिकल्पना तपासण्यासाठी त्या विषयाच्या संदर्भात किती कालावधीतील माहिती संकलित करावी लागेल हे निश्चित करणे आवश्यक आहे. मोघम स्वरूपाने तो कालावधी निवडणे टाळून कालावधीच्या निवडीला शास्त्रीय आधार द्यावा. परंतु हे काम वाटते तितके सोपे नाही. निवडलेल्या विषयाला पूर्ण न्याय मिळेल, संशोधनाचे उद्देश साकार होतील व परिकल्पना पूर्णत्वाने तपासली जातील, या सर्व गोष्टी नजरेसमोर ठेवून ते साध्य होण्याच्या दृष्टीने अभ्यासाचा कालावधी निश्चित करावा लागतो.

## पाहणीचा कालावधी

प्रत्यक्ष पाहणीचा कालावधी व त्याचे स्वरूप स्पष्ट करावे. कारण पाहणीच्या कालावधीत त्या विषयाच्या संदर्भात शासन, सामाजिक वा इतर पातळीवर काही विशेष निर्णय घेतले असतील, बदल घडले असतील तर त्या सर्वांमुळे संकलित माहिती प्रभावित होते. उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांतील साखर उत्पादन परिव्यय व लाभप्रदता या अभ्यासासाठी माहिती संकलित करीत असलेल्या काळात शासनाने एका भरीव सवलतीची योजना जाहीर केली तर त्या धोरणामुळे साखर उत्पादन परिव्यय व लाभप्रदता प्रभावित होते. तेव्हा पाहणीच्या कालावधीतील त्या धोरणाच्या परिणामांची नोंद संशोधकांनी घेतली आहे की नाही हे वाचकांना कळण्यासाठी तो कालावधी नोंदणे आवश्यक आहे. दुसरे असे की, त्या काळातील संकलित माहितीवर पुढील बऱ्याच गोष्टी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अवलंबून असतात. उदाहरणार्थ, डाळिंब पिकाच्या अर्थशास्त्रावरील दहा वर्षांपूर्वीच्या अभ्यासात त्या काळातील डाळिंब उत्पादनाच्या विविध निविष्टि-वरील परिव्यय नोंदवून, त्याचे उत्पादन परिव्यय काढलेले असते. तर आज त्या पिकाचे उत्पादन परिव्ययाचे अंदाज घ्यावयाचे झाल्यास पाहणीच्या कालावधीतील (Base period$) त्या निविष्टिंच्या किमती व आजच्या किमती लक्षात घेतल्या तर आजचे त्याचे उत्पादन परिव्यय निश्चित करून, त्यावर काही भाष्य करणे सोपे होईल. जर का माहिती संकलनाचा कालावधीच नोंदविला नसेल आणि प्रस्तुत प्रबंधातील त्या माहितीचे विश्लेषण, भविष्यात काही कामासाठी आधार मानावयाचे असेल तर पुढील सर्वच गोष्टी खोळंबून राहतात.

## प्रकल्पाचे नियोजन

निवडलेल्या विषयावरील विश्लेषणाची विभागणी किती प्रकरणात केली आहे आणि त्या प्रत्येक प्रकरणात कोणते विषय हाताळले आहेत, याचे संक्षिप्त वर्णन या मथळ्याखाली करावयाचे आहे. जेणेकरून वाचकांना पुढील प्रकरणे समजून घेण्यासाठी पार्श्वभूमी तयार होईल.

या सर्व गोष्टींचा विचार करता संशोधन अभिकल्प (Research design) हे प्रकरण संशोधन प्रबंध लेखनात अतिशय महत्त्वाचे आहे, म्हणून ते अत्यंत काळजीने हाताळावे.

## माहितीचे विश्लेषण

संशोधनाच्या उद्दिष्ट्यपूर्ततेसाठी संकलित माहितीचे (संपूर्ण?) विश्लेषण शक्यतो एखाद्या-दुसऱ्या प्रकरणात गुंडाळण्याची प्रथा रूढ होत असल्याचे अनुभवास येते. ही प्रथा संशोधन प्रवृत्तीच्यादृष्टीने अतिशय चिंतनीय आहे. संकलित माहितीचे अनेक अंगाने विश्लेषण करून परिकल्पना तपासण्याचे काम संशोधनाचा मुख्य गाभा असताना, त्यास एखाद्या-दुसऱ्या प्रकरणात गुंडाळून वर उल्लेखिल्याप्रमाणे अप्रस्तुत विषयासाठी अनेक प्रकरणे खर्ची टाकणे ही संशोधन प्रक्रियेत न बसणारी बाब आहे. दर्जेदार संशोधन करण्याकडे वाटचाल करण्यासाठी प्रस्तुत रूढ पध्दती पासून जितक्या लवकर फारकत घेता येईल, तितक्या लवकर ते घेणे संशोधन विश्वासाठी हितावह आहे. तेव्हा हाती घेतलेल्या संशोधन प्रबंधातील प्रकरणांची क्रमवारी पुढीलप्रमाणे राहतील. पहिले प्रकरण प्रास्ताविकाचे. दुसरे संशोधन अभिकल्पाचे, तिसरे संकल्पना स्पष्ट करण्याचे आणि पुढील तीन-चार प्रकरणे, संकलित माहितीच्या विश्लेषणांचे. तेव्हा या पद्धतीने प्रकरणांची रचना केली तर संशोधनपर लेखनात फापटपसारा मांडण्याच्या मानसिकतेवर ताबा मिळविता येईल.

## माहितीच्या विश्लेषणाचे स्वरूप

संकलित माहितीच्या विश्लेषणाची पद्धती व

स्वरूप संशोधन अभिकल्पात स्पष्ट करावयास हवी. त्यानुसार पुढील प्रकरणात त्याचे अनुकरण करावे. परिकल्पना तपासण्यासाठी व संशोधनासाठी निश्चित केलेले उद्देश पूर्ततेसाठीच्या दिशेने माहितीच्या विश्लेषणाची मांडणी करावी. त्यासाठी अनेक पद्धती उपलब्ध आहेत. सरासरी पद्धती, टक्केवारी पद्धती, कमाल किमान मूल्याची पद्धती, सांख्यिकी पद्धती आदींच्या साहाय्याने माहितीचे विश्लेषण केले जाते. अलीकडे अर्थमितीचा (Econometrics) चा वावर माहितीच्या विश्लेषणात वाढला आहे. एवढी सर्व साधने हाताशी असताना देखील विश्लेषणाचा दर्जा व स्वरूप अनेक ठिकाणी समाधानकारकरित्या पाहावयास मिळाला नाही. म्हणून याविषयी थोडा विस्ताराने व काही काल्पनिक उदाहरणाच्या साहाय्याने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु, या उदाहरणात कोणाच्यातरी प्रबंधाचा अप्रत्यक्ष संदर्भ आला तर तो निव्वळ योगायोग समजावा. पहिले उदाहरण, एखाद्या सहकारी बँकेचा विषय प्रबंधासाठी निवडला असेल, तर गत दहा-पंधरा वर्षांतील त्या बँकेची सभासद संख्या, त्याचे भाग भांडवल, शाखा विस्तार, कर्जाचा विस्तार यांची आकडेवारी मांडून त्या काळात या सर्वांची वाढ कशी होत गेली हे स्पष्ट केले जाते. पुढे जाऊन त्या वाढीची टक्केवारीही सांगितली जाते. परंतु प्रश्न असा, की यात संशोधकाचे नव्याने योगदान ते कोणते. ही आकडेवारी उभ्या-आडव्या ओळीत मांडून गत १०-१५ वर्षांतील सर्वांगाने बँकेची झालेली प्रगतीची गाथा, बँकेचा एक जाणकार कर्मचारीदेखील मांडू शकतो. तर संशोधकांनी या संदर्भात आपली संशोधन बुद्धी असे पणाला लावली पाहिजे, की बँकेच्या अशा कोणत्या गुणधर्मामुळे, कोणत्या व्यूहरचनेमुळे (Strategy), कोणत्या नावीन्यपूर्ण नियोजनामुळे वा धोरणामुळे सभासद संख्या व भांडवल वाढले. कर्ज आणि शाखाविस्ताराच्या बाबतीतील विश्लेषणा दरम्यान अशी कोणती परिस्थिती निर्माण झाली होती, बँकेनी अशी कोणती विश्वासहार्यता दाखविली, की त्यामुळे तिच्या शाखा विस्तारल्या गेल्या आणि कर्जाचे वाटप वाढले. पुढे जाऊन या सर्वांची वाढीची जी टक्केवारी सांगितली जाते, ती त्या एका विशिष्ट काळात का वाढली, याचे अचूक कार्यकारणभावासहित विश्लेषण, संशोधकाला करावे लागेल.[१०]

एका शैक्षणिक संस्थेच्या शैक्षणिक संकुलावर **अमुक शैक्षणिक संस्थेचे शिक्षणाचे अर्थशास्त्र** असा तत्सम शीर्षकाचा एक प्रबंध वाचण्यात आला. गत काही ठरावीक वर्षात त्या शैक्षणिक संस्थेने विविध स्रोतातून किती रक्कम (उत्पन्न) मिळविली व त्याकाळात विविध घटकांवर किती खर्च केला, याचा तो ठोकळ ताळेबंद मांडलेला होता. परंतु, शिक्षणाचे अर्थशास्त्र हा संशोधनाचा विषय असेल तर त्या ताळेबंदालाच शिक्षणाचे अर्थशास्त्र म्हणून पुढे आणू नये. तेव्हा संशोधनासाठी निवडलेल्या विषयाला अर्थशास्त्रीय कसोट्यांच्या आधारे अनेक पैलू पाडून संशोधनाच्या उद्देशांच्या आनुषंगाने परिकल्पना तपासण्यासाठी विषय खुलवत ठेवण्याची जबाबदारी संशोधकांनी पार पाडणे आवश्यक आहे.

### उपाय (शिफारशी) सुचवू नये

संशोधन प्रक्रियेतील एक अत्यंत विसंगत बाबदेखील काही शोधप्रबंधातून पाहावयास मिळते, ती म्हणजे शोधप्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणात साधारणतः संशोधनासाठी निवडलेल्या विषयातील निष्कर्षात आढळून आलेले काही प्रश्न वा समस्येवर संशोधक काही उपाय सुचविताना दिसतात. परंतु, संशोधन प्रक्रियेतील ही एक अतिशय निष्ठेने टाळण्यासारखी गोष्ट आहे. कारण, तटस्थता हा संशोधनासाठीचा आवश्यक गुण असल्याने, संशोधकाला संशोधन प्रकियेत ते गुण पूर्णत्वाने अंगीकारणे

अत्यावश्यक आहे. तर त्याच तटस्थतेने शोधप्रबंधाच्या माध्यमातून उपाय सुचविण्याचा मोहदेखील टाळावा. जर संशोधक, निवडलेल्या विषयात, संशोधनातून समोर आलेल्या उणिवांच्यावर उपाय सुचविणार असेल तर त्याची संशोधनवृत्ती तटस्थ नाही हेच सिद्ध होते. कारण, संशोधनाअंती त्या विषयाच्या संदर्भात ज्या उणीवा निदर्शनास येतील त्या तशास स्वरूपात स्वीकारण्यास संशोधक मानसिकदृष्ट्या कमी पडतो आणि ते सहन न झाल्याने नकळत तो उपाय सुचविण्याच्या मोहात अडकून पडतो. संशोधनाअंती जे निष्कर्ष बाहेर येतील ते स्वीकारण्याची संशोधकाची मानसिकता व हिम्मत असावी लागते. आपल्या भावना जागृत करून, आपला मानसिक तोल ढळू न देणे हे संशोधनाचे पावित्र्य जपावयाचे आहे. या मोहातून बाहेर पडण्यासाठी, संशोधकाला पहिल्यांदा **संशोधनप्रबंध (Research thesis) व अहवाल (Report)** यातील सीमारेषा अचूकपणे ओळखता आली पाहिजे. संशोधनाची मांडणी, संशोधनाच्या निकषाच्यांवरच व्हावी, त्याला अहवालाचे स्वरूप येऊ नये.

## वस्तुनिष्ठता आणि तटस्थता

वस्तुनिष्ठता आणि तटस्थता (Neutral, Indifferent, Unbaised) हे संशोधनाचे दोन अंगीभूत गुण आहेत. वस्तुनिष्ठता म्हणजे वस्तू जशी आहे तशी ती पाहणे, जशी दिसते तशी नव्हे. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास संबंधित निरीक्षण दुसऱ्या कोणीही, केव्हाही आणि कोठेही करो पहिल्यासारख्याच त्याच्या नोंदी आल्या पाहिजेत. सामाजिक शास्त्राच्या संशोधनात या वस्तुनिष्ठ कसोटीला अगदी काळजीने हाताळावे लागते. कारण, यात व्यक्ती हा केंद्रबिंदू असून त्याचा स्वभाव, विषयाकडे पाहण्याचा त्याचा मानसिक कल, स्वार्थ, प्रेम, आदर, त्याचा अहंकार, व्देष आदी विकारांमुळे (Baisedness, Emotions) नोंदविलेल्या निरीक्षणातून विवेचनाअंती जो निष्कर्षाप्रत पोहचतो, तो व्यक्तिनिष्ठ होण्याचा संभव अधिक असतो. येथे काही उदाहरणे नोंदऊ इच्छितो. शेतमजुरांचे प्रश्न, कामगारांचे प्रश्न, हमालसंघटना, परित्यक्ता व वेश्यांचे पुनर्वसन आदी स्वरूपाच्या विषयांच्यावर संशोधन करण्यात वस्तुनिष्ठतेविषयी अतीव जागृत राहावे लागते. यातील पुढील टप्प्यातील आणखी एक उदाहरण देतो. जर लेखक/संशोधक वरील प्रकारच्या एखाद्या संस्थेशी संबंधित असेल वा वृध्दाश्रम, ग्रामीण विकास, सूतगिरणी, साखर कारखाना, सहकारी बँका सारख्या संस्थेचा पदाधिकारी, सभासद वा त्या संस्थेत सेवक इत्यादी स्वरूपात नाते जुळवून असेल तर संबंधित संस्थेच्या विषयावर संशोधन करीत असताना, त्या संस्थेचे आपले कोणतेच नाते नसून तटस्थतेने राहणे ही संशोधकाची खरी कसोटी असते.

## संदर्भ व संदर्भसूची

संशोधनपर लेख असो वा प्रबंधलेखन, त्यासाठी वापरणारे संदर्भ साहित्य हे संशोधन स्वरूपाचेच असावे. पाठ्य/क्रमिक पुस्तके (मराठी व इंग्रजी), वर्तमानपत्रे, संशोधनाची पार्श्वभूमी नसलेली नियतकालिके, काही वेळा असे निदर्शनास येते की, काही संस्थांनी प्रकाशित केलेल्या स्मरणिका, गौरवग्रंथ आदी संदर्भ साहित्य म्हणून होत असलेला वापर हे कटाक्षतेने टाळावे. अधिकृत माहिती उपलब्ध करून देणारे स्रोतच संदर्भ म्हणून वापरण्याची काळजी घ्यावी. यात देखील दोन प्रकारचे संदर्भ आढळतात. एक आपला प्रबंध वा लेख यातील लेखकाच्या एखाद्या विधानाला पुष्टी (अनुकूल वा प्रतिकूल) देणारे विधान दुसऱ्या एखाद्या स्रोतातून घेत असताना, ते विधान आहे त्या स्वरूपात उचलून आपल्या लिखाणात अवतरण चिन्हात ठेवावे आणि त्याला क्रमांक देऊन टीपा व संदर्भ (Notes and References) मध्ये त्याचा तपशील द्यावा. परंतु

अलीकडे काही शोधप्रबंध, अर्थसंवादमधील काही लेख वाचताना हा प्रकार अगदीच दुर्मिळतेने पाहावयास मिळते. दुसरे, लेख व प्रबंधातील विषयाशी निगडित असलेल्या ज्या साहित्याचे अवलोकन करून, संशोधक, संशोधन-विचाराला व त्यातून फुलणाऱ्या लिखाणाला बळकटी मिळवितो ती सर्व एकप्रकारे संदर्भ साहित्यच असले तरी त्यास संदर्भसूची वा यादी (Bibliography) म्हणून संबोधिले जाते. अर्थसंवादमध्ये बऱ्याच ठिकाणी या **संदर्भसूची**लाच **संदर्भ** म्हणून जे संबोधिले जाते ते टाळावे. वरील ओळीत Notes and References असे दोन शब्द वापरले आहेत. यातील Note (स्पष्टीकरणार्थ असलेली टीप. टीपचे बहुवचन (Notes) टीपा) चा वापरदेखील संशोधनपर लेखनात करण्याची पद्धत आहे. टीपा याचा अर्थ लेखकाला लेखनातील एखाद्या विधानाचे वा विचाराचे अधिक स्पष्टीकरण द्यावयाचे असेल तर संदर्भाच्या स्वरूपात मांडण्याचा हा एक प्रकार आहे. या सूचीमुळे हाती घेतलेल्या संशोधनपर लिखाणाला बळकटी मिळण्यासोबतच वाचकांना, लेखकाचे विधान/विचार अधिक अचूकपणे समजून घेण्यास साहाय्य होते. प्रस्तुत लेखातील दहाव्या क्रमांकाचे संदर्भ हे टीपाच्या स्वरूपातील आहे. विशेषत्वाने २०-२५ वर्षांपूर्वीच्या अर्थसंवादमधील अनेक लेखात हा प्रकार पाहावयास मिळतो.

## संशोधनपर लेखनाची काही संकेत

## १. संदर्भ नोंदविण्याचे संकेत

१.१. एखाद्या लेखकाच्या ग्रंथातून घेतलेले संदर्भ पुढीलप्रमाणे नोंदवावा. आडनाव, नाव अथवा नावाची अद्याक्षरे, ग्रंथाचे नाव (दुहेरी अवतरण चिन्हात अथवा अलीकडे ठळक - Bold - अक्षरात नोंदण्याची प्रथा सुरू झाली आहे.), प्रकाशन संस्थेचे नाव, प्रकाशन वर्ष, आवृत्ती क्रमांक (असेल तर), ज्या पृष्ठावरून संदर्भ घेतला तो पृष्ठ क्रमांक असा त्याचा क्रम असेल. उदाहरणार्थ, भाटवडेकर, मो. वि., **शिक्षणाचे अर्थशास्त्र**, मराठी अर्थशास्त्र परिषद, १९८७, पृ. १०५.

१.२. संपादित केलेल्या ग्रंथातून घेतलेले संदर्भ पुढीलप्रमाणे नोंदवावा. लेखकाचे नाव, लेखाचे नाव, कंसात संपादित, संपादकाचे नाव, संपादित ग्रंथाचे नाव, प्रकाशन सस्थेचे नाव, वर्ष, पृष्ठ क्रमांक.

१.३. नियतकालिकातून घेतलेले संदर्भ पुढीलप्रमाणे नोंदवावा. आडनाव, नाव अथवा नावाची अद्याक्षरे, लेखाचे नाव, नियतकालिकाचे नाव, प्रकाशन संस्थेचे नाव, महिना, वर्ष, खंड क्रमांक, अंक क्रमांक, पृष्ठ क्रमांक.

१.४. एकाच संदर्भ ग्रंथातून एकापाठोपाठ सलग दोन-तीन वेळा संदर्भ घेतले असतील तर प्रत्येक वेळा त्याचे सर्व तपशील लिहिण्याची आवश्यकता (प्रथा) नाही. त्यासाठी तत्रैव (Ibid) या संकल्पनेचा वापर करावा. त्याचा क्रम असा राहील. संदर्भ क्रमांक, तत्रैव, पृष्ठ क्रमांक (गरजेसार).

१.५. आणखी एक शक्यता अशी असते की, एका संदर्भ ग्रंथातून एकदा एक संदर्भ घेऊन त्याचा पूर्ण तपशील लिहून झाला आहे. त्यानंतर दुसरे एक-दोन संदर्भ ग्रंथांची नोंद घेतल्यानंतर पुन:पूर्वीच्या त्या संदर्भग्रंथाची नोंद घेण्याची वेळ आली तर पुन: तो पूर्ण तपशील लिहिण्याची आवश्यकता नाही. त्यासाठी **कित्ता (Op. Cit)** ही संकल्पना वापरावी. याची नोंद पुढीलप्रमाणे राहील. लेखकाचे नाव, कित्ता, पृष्ठ क्रमांक, असा त्याचा क्रम राहील.

२. लेख व प्रबंधातील प्रधान शीर्षक वा उपशीर्षक यांच्या समोर अनेक प्रकारची चिन्हे वापरण्याची प्रथा पाहावयास मिळते. उदाहरणार्थ, पूर्णविराम (.), विसर्ग (:), योगचिन्ह (-), विसर्ग व त्यापुढे आडवी रेष (:-), काही ठिकाणी उद्गारवाचक चिन्ह (!), इत्यादी. परंतु भाषाशास्त्रात या प्रत्येक चिन्हांना त्यांचेच स्वतंत्र

अर्थ असून, लेखनात त्याच अर्थाने, त्यांचा वापर करावा. भलत्याच ठिकाणी भलत्याच अर्थाने होणारा त्यांचा दुरूपयोग टाळावा.

३. लेखनात तक्ते (कोष्टक) (Table), आकृत्या (Figure), आलेख (Graph), रेखाकृती (Diagram), नकाशे (Map) असतात. या प्रत्येक संकल्पनेला त्याचाच एक स्वतंत्र अर्थ असून त्या त्या विचाराच्या सादरीकरणासाठी नेमक्या संबंधित संकल्पनेचाच वापर करण्याची काळजी घ्यावी. लेखनात या संकल्पनांचा वापर करतेवेळी, पहिल्यांदा, त्या संकल्पनेचे (तक्ता, आकृती, आलेख इत्यादी) नाव, नंतर त्याचा क्रमांक (उदाहरणार्थ, तक्ता एक अथवा तक्ता १ असे लिहावे. तक्ता:१,तक्ता-१, तक्ता:-१ अशा विविध चिन्हांचा वापर टाळावा), त्यानंतर संबंधित शीर्षक लिहावे. तक्ता क्रमांक आणि शीर्षक एकाच ओळीत लिहिले तरी ते स्पष्ट दिसावे याची काळजी घ्यावी.

४. तक्त्यातील आकडे (सारण) हे कशाचे आहेत आणि कोणत्या मापनात आहेत हे स्पष्ट करावे. उदाहरणार्थ, रुपये कोटी, लक्ष, हजार इत्यादीमध्ये, जमीन हेक्टर, चौरस मीटर इत्यादीमध्ये, लोकसंख्या हजार, शंभर इत्यादीमध्ये.

५. तक्त्यातील आकडे संपादन करण्यासाठी प्राथमिक वा दुय्यम स्रोताचा वापर करतो. तर त्याचा उल्लेख तक्त्याच्या तळाशी करताना काही ठिकाणी त्यास **आधार** किंवा **टीप** म्हणून संबोधितात. परंतु मुळात तो इंग्रजीतील Source या शब्दाचा मराठी अनुवाद असून त्यासाठी **स्रोत** या शब्दाचाच वापर करावा.

६. लेखनात काही शब्द, पूर्ण स्वरूपात कोठे आणि सांकेतिक स्वरूपात कोठे वापरावे हेही समजून घेणे व त्याचे पालन करणे आवश्यक वाटते. उदाहरणार्थ, लेखनाच्या परिच्छेदात, उदाहरणाला उदा., रुपयाला रु., इत्यादीला इ., प्रतिशतला % इत्यादी सांकेतिक स्वरूपात न लिहिता पूर्ण शब्दानेच लिहावे. परंतु, आलेख, लेखाकृतीमध्ये या स्वरूपाचे संकेत वापरावा.

७. संशोधनपर लेखनात व्यक्तीच्या नावापुढील पदव्यांचा उल्लेख टाळावा. उदाहरणार्थ, डॉ., प्रा., माननीय, आदरणीय, थोर विचारवंत, थोर अर्थशास्त्रज्ञ, गुरुवर्य इत्यादी.

८. लेखन करतेवेळी, कोण्या तज्ञांचे मार्गदर्शन घेतले असेल तर त्यांच्या नावाचा उल्लेख लेखाच्या शेवटी जरूर करावा.

## टीपा व संदर्भ :


१. याला जोडूनच विद्यापीठ अनुदान आयोगासारख्या संस्थेकडून होत असलेले आर्थिक साहाय्य.

२. दोशी रवीन्द्र;, **मराठी अर्थशास्त्र परिषद : पालखी ते जगन्नाथाचा रथ**, अर्थसंवाद, ऑक्टोबर- डिसेंबर, २००१, खंड २५, अंक ३, पृ. २३२.

३. सोवनी, नी. वि., **मराठीतील अर्थशास्त्रीय वाड्.मय : इतिहास, परंपरा, समस्या, भावी वाटचाल**, अर्थसंवाद, ऑक्टोबर-डिसेंबर १९७७, खंड १, अंक ३. पृ. ९.

४. या संदर्भातील आनंद नाडकर्णी यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा प्रसंग, **अर्थविचार** या संपादित ग्रंथाच्या **दुसऱ्या खंडाच्या निमित्ताने** नामक प्रास्ताविकात सांगितला आहे.

५. कित्ता, पृ. ७.

६. तत्रैव, पृ. ८.

७. तत्रैव,

८. तत्रैव,

९. सोवनी, नी. वि., **संपादक 'अर्थसंवाद' यास**, अर्थसंवाद, जुलै-सप्टेंबर १९८०, खंड ४, अंक २, पृ.१२३.

१०. प्रस्तुत लेखकानी २०१५ मध्ये महाराष्ट्रातील यशस्वी सूतगिरणी : शेतकरी सहकारी सूतगिरणी, सांगोला ही पुस्तिका प्रकाशित केली आहे. त्यात ही गिरणी गेल्या ३५ वर्षांत, अधिक नफ्याचा दर, प्रति एकक कमी उत्पादन परिव्यय, सूत उत्पादनाचे प्रमाण, प्रतिचाती सूत उत्पादकता, कामगारांची कार्यक्षमता (उत्पादकता), आदी कसोट्यावर ही सूतगिरणी भारतात क्रमांक एकवरील गिरणी कशी ठरली आहे, याची यशोगाथा त्या पुस्तिकेत मांडत असताना, वरील सर्व गोष्टीतील कार्यकारणभाव शोधून, अर्थशास्त्राच्या अनेक कसोट्यांवरून त्या तपासल्या आहेत.

***ऋणनिर्देश :*** *शि. ना. माने यांनी लेखनात उपयुक्त सूचना केल्या. त्यांचे आभार.*

◆

## ‘अर्थसंवाद’च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (2335) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२. **शोधनिबंधाची प्रत अथवा सीडी पोष्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाइल व त्याचीच PDF केलेली फाइल) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल ॲड्रेसवर पाठवावी.** पेपरबरोबर संपादकांना शोधनिबंध पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. शोधनिबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. शोधनिबंधात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पुढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, (२०१०). (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

# महाराष्ट्राच्या शेतीचे अर्थशास्त्र

**रामचंद्र रसाळ** †
माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद,
उपप्राचार्य व पद्व्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख, पद्मश्री विखे पाटील कला,
विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, प्रवरानगर, ता. राहाता, जि.अहमदनगर.

## प्रास्ताविक

भारतात अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यात महाराष्ट्राच्या शेतीचा प्रश्न गंभीर बनत चाललेला आहे. राज्यात आज जवळजवळ ८४ टक्के क्षेत्र जिरायती आहे. काळाच्या ओघात कृषी क्षेत्रात बदल झाले. कृषीमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर केल्यानंतर सुरुवातीला काही वर्षात उत्पादन वाढले. परंतु नंतर ते घटत गेले. जमिनीचा वापर अन्य कारणांसाठी होऊ लागला. विभाजन तुकडीकरणामुळे कृषी उत्पादन घटले, शेती परावलंबी होऊ लागली आणि त्यातून शेती आतबट्ट्याची ठरून शेतकरी कर्जबाजारी झाला व तो आत्महत्या करू लागला. १९९०-९१ पासून आपण नवीन आर्थिक धोरण स्वीकारले व सहकारी चळवळीपुढे अनेक आव्हाने उभी राहिली. कृषी उत्पादन वाढीचा दर घटला. शेतकऱ्यांचे उत्पन्न घटले त्याला अधिक कर्जाची गरज निर्माण झाली. परंतु शेतकऱ्यांची पत नसल्याने त्याला पुरेसे कर्ज वेळेवर मिळत नाही. याचा परिणाम पुन्हा शेतकऱ्याच्या उत्पादनावर झाला. त्यामुळे प्रस्तुत शोधनिबंधात महाराष्ट्रातील कृषीच्या संदर्भात काही महत्त्वाच्या प्रश्नांचा ऊहापोह करून त्यावर उपाययोजना सुचविलेल्या आहेत.

**कृषी वित्तपुरवठा :** कृषीसाठी वित्तपुरवठा करणारी यंत्रणा किती सक्षम असायला हवी हे सहज समजण्यासारखे आहे. शेती क्षेत्राला तुम्ही उद्योग म्हणा किंवा म्हणू नका, पण शेतीसाठी भांडवल लागते तसेच देशातील शेतीचा एकंदर विस्तार लक्षात घेता प्रचंड प्रमाणात वित्तपुरवठा लागतो. ही वस्तुस्थिती कोणालाही नाकारता येणार नाही. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी वित्तपुरवठा खाजगी सावकारांमार्फत होत होता. त्यातून होणारी प्रचंड पिळवणूक लक्षात घेता, स्वांतत्र्योत्तर काळात सरकारला त्यावर उपाय शोधणे क्रमप्राप्त होते. किंबहुना, शेतीक्षेत्रासंबंधात सावकारी पाशातून शेतकऱ्याला मुक्त करणे. हाच शेती संबंधीच्या सरकारच्या कामाचा केंद्रबिंदू होता. त्यानुसार अंमलबजावणी झाली तरीही शेतकरी सावकारी पाशातून अद्याप पूर्णपणे मुक्त झालेला नाही. तो व्हायचा असेल तर वित्तपुरवठ्याच्या आतापर्यंतच्या योजना अधिक प्रभावी करणे आणि नव्या उपायांचा शोध घेणे हे दोन्ही क्रमप्राप्त आहे.

महाराष्ट्रात कृषी वित्तपुरवठा करणाऱ्या राज्य व जिल्हा पातळीवरील प्रमुख संस्थांची स्थिती कशी आहे हे पाहणे आवश्यक आहे. कृषी सहकारी बँका राज्यात शेतकऱ्यांसाठी फार महत्त्वाची भूमिका बजावतात. त्याची सद्यस्थिती पुढील तक्त्यावरून लक्षात येईल.

† आजीव सभासद क्र. : ६७३, भ्रमणध्वनी : ९८५००४४०८९, ई-मेल : ramrasal18@gmail.com

## तक्ता क्र. १ : कृषी सहकारी बँकांची माहिती

(रु.कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | | २०१५च्या तुलनेत २०१६ |
|---|---|---|---|---|
| | २०१४ | २०१५ | २०१६* | मधील शेकडा बदल |
| **महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित** | | | | |
| सभासद (संख्या) | २,१२२ | २,११५ | २,००० | (-)५.४ |
| खेळते भांडवल | २३,६५७ | २०,९४७ | २३,३०० | ११.२ |
| ठेवी | १३,४७५ | ९,९९३ | १२,२६८ | २२.८ |
| स्थूल कर्ज | १६,०६० | ११,७४३ | १५,०८६ | २८.५ |
| येणे कर्ज | १०,७३१ | १२,००७ | १४,४२४ | २०.१ |
| थकीत कर्ज | १,४३६ | १,२५९ | १,२३५ | (-)१.९ |
| **जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक** | | | | |
| सभासद (लाखात) | १.७३ | १.८२ | १.९६ | ७.७ |
| खेळते भांडवल | ७७,७८२ | ८४,५२८ | ९१,४१५ | ८.१ |
| ठेवी | ५७,३७८ | ६१,५२९ | ६६,३८२ | ७.९ |
| स्थूल कर्ज | ४०,४६३ | ४४,२३१ | ४३,२६६ | (-)२.२ |
| येणे कर्ज | ४०,३५७ | ४८,१४७ | ४७,४५४ | (-)१.४ |
| थकीत कर्ज | ९,९०७ | १०,६७४ | ११,९९९ | १२.४ |
| **महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँक मर्या. @** | | | | |
| सभासद (संख्या) | ८२७ | ८२७ | ८२७ | ० |
| खेळते भांडवल | २,०९१ | २,११० | २,११० | ० |
| ठेवी | - | - | - | - |
| स्थूल कर्ज | - | - | - | - |
| येणे कर्ज | १,०४३ | १,०६५ | १,०७९ | १.३ |
| थकीत कर्ज | १,०४२ | १,०६५ | ९८४ | (-)७.६ |
| **जिल्हास्तरीय सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँका @** | | | | |
| सभासद (लाखात) | ११.२३ | ६.८१ | ६.८१ | ० |
| खेळते भांडवल | १,०२३ | १,५१२ | १,०२३ | (-)३२.३ |
| ठेवी | ०.३ | ०.३ | ०.३ | ० |
| स्थूल कर्ज | - | - | - | - |
| येणे कर्ज | २९० | २८६ | २९०.४ | १.५ |
| थकीत कर्ज | २८५ | २८४ | २८५.२ | ०.४ |

*# अवसायनाची प्रक्रिया सुरू असल्याने माहिती उपलब्ध नाही.*

*@ अवसायनात गेल्याने कर्ज देणे बंद केले आहे. *अस्थायी*

*आधार - सहकारी आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन. (२०१७)*

यावरून असे दिसते की, कृषि क्षेत्राला वित्तपुरवठा करणारी यंत्रणा अत्यंत सुसंघटित आहे. या संपूर्ण यंत्रणेवर एक धावती नजर टाकली तरी हे सहज लक्षात येते की, कर्जयंत्रणेची ही साखळी सुदृढ राहिली तर 'कृषी वित्त' हा विषय प्रश्न म्हणून फारसा उरणार नाही. पण तशी वस्तुस्थिती मात्र नाही. 'कृषी वित्तपुरवठा' हा प्रश्न आहे. किंबहुना, राज्यापुढील सर्वात मोठा आर्थिक प्रश्नांपैकी एक आहे. ही वस्तुस्थिती उघड आहे. अद्यापही खाजगी सावकारांवर कृषी वित्तपुरवठा अवलंबून आहे. हे पुढील तक्त्यांवरून दिसून येते.

**तक्ता क्र. २ : खाजगी सावकारांची माहिती**

(संख्या)

| तपशील | ३१ मार्च रोजी | | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०१५ | २०१६* | |
| परवाना धारक | १२,०२२ | १२,२०८ | १.५ |
| नवीन परवाने | १,५८९ | १,९४७ | २२.५ |
| नूतनीकरण केलेले परवाने | ७,८५२ | ७,७२५ | (-)१.१६ |
| रद्द केलेले परवाने | ४७७ | ७१९ | ५०.७ |
| कर्जदार सभासद (व्यापारी/बिगर व्यापारी/ शेतकरी) | ७,०४,४५२ | १०,५६,२७३ | ४९.९ |
| वाटप केलेले कर्ज (रु.कोटी) | ८९६.३४ | १,२५४.९७ | ४०.० |

*आधार - सहकारी आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन. (२०१७) *अस्थायी*

या तक्त्यावरून खाजगी सावकार शाहीचे पकड अजून ढिली झाली नाही असे दिसते. याचाच अर्थ, ही 'सहकार साखळी' पुरेशी सुदृढ नाही असा होतो. ती सुदृढ नसण्याची काही कारणे लक्षात घेतली पाहिजेत. कोणतीही देशव्यापी यंत्रणा सुदृढ नसण्याची काही कारणे असतात. या यंत्रणांमधील दोष, त्रुटी, उणीवा त्याला कारणीभूत असतात. हा घटक या 'साखळी'मध्ये असणेही अटळ आहे. पण त्यापेक्षा मोठा घटक म्हणजे नियमित कर्जवसुलीचा अभाव. वस्तुतः या कर्जवसुलीतूनच या साखळीला ऊर्जा मिळत असते. सरकारी साहाय्याचाही त्यात वाटा असतोच. पण असमाधानकारक कर्जवसुली हे कारण तरीही कायम राहते.

कर्जवसुली अपुरी राहणे किंवा कर्ज थकबाकीदारांचे प्रमाण वाढणे हेच या यंत्रणेचे मुख्य दुखणे आहे. मात्र त्यावर मात करणे सोपे नाही. कोणाच्याही डोक्यावर खापर फोडून हा प्रश्न सुटणारा नाही. कोणत्याही मोठ्या कर्जपुरवठा यंत्रणेमध्ये काही हेतुत कर्जबुडवे (Willful defaulters) असतात. तसे ते या साखळीतही काही प्रमाणात असतील पण थकबाकीदारांमध्ये प्रचंड मोठी संख्या प्रामाणिकपण अगतिक शेतकऱ्यांची आहे. त्याचा अधिक गांभीर्याने विचार झाला पाहिजे. कर्जबाजारी शेतकरी, त्यामुळे विकलांग झालेली शेती आणि विस्कळीत झालेली अर्थव्यवस्था यांच्या कारणांच्या मुळाशी जाणे आवश्यक आहे. शेतकरी कर्जबाजारी का होतो? थकबाकीदार का होतो? शेतकरी कर्ज परतफेड करू शकत नाही. कारण त्याला नफा होत नाही. शेती तोट्यात जाते. शेती वारंवार तोट्यात जाण्याची कारणे सर्वमान्य असली तरी ती गंभीर

स्वरूपाची आहे. त्यावरील उपाय मात्र अद्याप फारसे सापडलेले नाहीत.

**कर्जाचे पुनर्गठण :** कृषी वित्तपुरवठ्यामध्ये एक भ्रामक प्रकार बँकींग क्षेत्रातील मंडळींनी सुरू केला आहे. शेतकरी थकबाकीदार बनला की, त्याचे मुद्दल व व्याजासह नवीन कर्जात रूपांतर करायचे. प्रत्यक्षात शेतकऱ्याच्या हातात एक रुपयाही पडत नसला तरी कागदोपत्री तो थकबाकीदार न राहता नवा कर्जदार दिसतो. कर्जाचे पुनर्गठन बँकींग व्यवस्थेच्या सोयीचे असेलही, पण शेतकऱ्यांच्या दृष्टीने मात्र ते निरर्थक ठरते. थकबाकीचे एकंदर प्रमाण पाहता, हा पुनर्गठनाचा उतारा पूर्ण टाळता येणारा नसला तरी त्याचा वापर संयमपूर्वक आणि गरजेपुरताच केला पाहिजे. अन्यथा, त्यामुळे शेतकऱ्यावरील कर्जबोजा नकळत वाढत राहील आणि त्याच्या संकटातच भर पडेल.

याचे गांभीर्य जोपर्यंत ओळखले जात नाही तोपर्यंत शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्याच्या जुजबी प्रयत्नांना काही अर्थ नाही. कारण, आत्महत्येसारख्या टोकाच्या पर्यायापर्यंत माणूस पोहोचतो तो अनेक प्रकारची संकटे एकाचवेळी आल्यावरच. अशा परिस्थितीत त्याला योग्य धीर देण्यास कोणी नसेल तरच तो प्राण सोडण्याचा मार्ग स्वीकारतो. एकतर शेतीसाठी पुरेसे भांडवल पुरवणे ही सरकारची जबाबदारी आहे. शिवाय, इतर स्वरूपाचे अर्थसहाय्य करण्यातही सरकारने उदासीन राहून चालणार नाही. उदा. आपत्ती निवारण कार्यासाठी काही निधी खर्च करते. त्यासाठी आपत्ती निवारण कायदाही अस्तित्वात आहे. परंतु, या आपत्ती निवारण कायद्यात शेतकऱ्यांवर येणाऱ्या आपत्तींचा समावेश नाही. या कायद्यामध्येही शेतकरी आत्महत्येचा आपत्तींचा समावेश केला तर सरकार आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन करू शकेल. पण यासाठी वित्तपुरवठ्याच्या धोरणात मानवी संवेदनशीलता आणणे आवश्यक आहे.

ही संवेदनशीलता शेतकऱ्यांच्या सर्वच प्रश्नांच्या संदर्भात अपेक्षित आहे. शेतकऱ्यांपुढे समस्या असतातच, पण या समस्या सोडविण्यात सरकार आपली साथ करणार नाही, याचे दु:खही मोठे असते. एका सर्वेक्षणानुसार आत्महत्या करणाऱ्यांपैकी ३५ टक्के शेतकऱ्यांच्या कुटुंबियांचे म्हणणे आहे की, आत्महत्येचे मुख्य कारण सरकारकडून मदतीचे कोणतेही पाऊल न उचलले जाणे हेच आहे.

**वस्तुनिष्ठ दृष्टिकोनाची आवश्यकता :** शेतीतून अधिकाधिक उत्पन्न मिळविण्याच्या अपेक्षेने शेतकरी नगदी पिके घेत असेल तर त्याला वित्तपुरवठा करताना अधिक वस्तुनिष्ठ दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे. कारण, जेव्हा मध्यम शेतकरीसुद्धा अधिकाधिक उपभोगासाठी नाही तर बाजारासाठी शेती करू लागतात, तेव्हा नगदी पिकांना उत्पादनात मुख्य स्थान देऊ लागतात. अशा वेळी शेतकऱ्यांना अधिक भांडवलाची गरज असते. पीक येण्याचा कालावधीसुद्धा जास्त असतो. शिवाय, अशी बहुतांश पिके जास्त पाण्याची मागणी करतात. याचाच अर्थ बाजारासाठी उत्पादन घेऊ लागते तेव्हा पाणी आणि भांडवलाची गरज अधिक तीव्र होते. ती पुरेशा प्रमाणात न भागविल्यास उभे पीक नष्ट होऊ शकते. बऱ्याचदा अशा पिकांसाठी घेतलेले कर्ज शेतकरी केवळ ते पीक विकून फेडू शकत नाहीत. अशा धोक्यांचा विचारही कृषी वित्तपुरवठा धोरणात सखोल व शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन झाला पाहिजे.

अशा अनेक लहानसहान गोष्टी आहेत. ज्यांचा बारकाईने विचार करून कृषी वित्त धोरणाची आखणी व अंमलबजावणी सरकारने केली पाहिजे. शेतकरी व एकंदरीत दुर्बल घटकांविषयीची, आपल्या कर्तव्याची जाणीव सरकारला असल्याचे दिसले पाहिजे. प्रत्यक्षात शेतकरी किंवा इतर दुर्बल घटकांना जेव्हा सवलती

दिल्या जातात, तेव्हा त्याला अनुदान म्हटले जाते. उलट, उद्योगांना जेव्हा सवलती दिल्या जातात, तेव्हा त्याला प्रोत्साहन म्हटले जाते. शेतकऱ्याविषयीचा हा दृष्टिकोन सुधारल्याशिवाय शेतकरी अनुकूल वित्तधोरण आखले जाऊ शकत नाही. शेतकरी गरीब असेल, कर्जबाजारी असेल पण तो आळशी गरीब नाही तर शोषित गरीब आहे याचे भान ठेवले पाहिजे. दृष्टिकोनातील हा बदलच शेतकऱ्यांना न्याय आणि सन्मान देऊ शकेल.

**अनियोजित उत्पादन प्रक्रिया :** अनियोजित उत्पादन प्रक्रियेमुळे एखाद्या पिकांचे अतिरिक्त उत्पादन होते. हे अनियोजित उत्पादन होण्याचे कारण अनिश्चित नैसर्गिक परिस्थितीमध्ये दडले आहे. आपण विशिष्ट हंगामात कोणते पीक घ्यावे, याचा निर्णय शेतकरी अचूकपणे घेऊ शकत नाही. या अनिश्चितेमुळेच सर्वसामान्यपणे शेतकरी इतरांचे अनुभव व इतरांचे निर्णय पाहून स्वत:चे निर्णय घेतो आणि एकाच पिकांची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते. परिणामी, त्या पिकांचे उत्पादन अतिरिक्त होते. तुरीचा अनुभव अगदी ताजा आहे. कांदा, टोमॅटो आणि इतर काही पिकांबाबतही हा अनुभव वारंवार येताना दिसतो.

या संदर्भात एक उपाय सहज सुचण्यासारखा आहे आणि त्यात तथ्यही आहे. तो म्हणजे, लागवडीच्या प्रारंभीच, कोणते पीक घ्यावे, यासंबंधी शेतकऱ्याला तज्ज्ञांचे मार्गदर्शन व्हावे, हे केवळ पुस्तकी मार्गदर्शन असणार नाही, तर संबंधित काळातील विशिष्ट परिस्थिती, पर्जन्यमान, विशिष्ट भौगोलिक परिस्थिती याबरोबरच प्रत्यक्ष शेतकऱ्याची वेगळी आर्थिक क्षमता, मनुष्यबळासंबंधीची त्याची वेगळी स्थिती, त्याच्या मर्यादा, त्याची मानसिकता या सगळ्यांचा विचार करून प्रत्येक शेतकऱ्याला व्यक्तिगत मार्गदर्शन करणारी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्यात यावी.

शेतकऱ्यांचे निर्णय अधिक अचूक होण्यासाठी याचा निश्चितच उपयोग होईल. पिकांवरील उत्पादन खर्च कमी होण्यासाठी, तसेच इतर मार्गांनी होणाऱ्या नुकसानीस पायबंद घालण्यासाठी याचा उपयोग होईल. या संदर्भातील स्वामिनाथन आयोगाने केलेल्या शिफारशी महत्त्वाच्या आहेत.

१. कृषी पतपुरवठा प्रणालीचा विस्तार करावा.
२. पीक कर्जावरील व्याजदर कमी करावा.
३. संकटकालीन नैसर्गिक व अन्य परिस्थितीमध्ये कृषी कर्जासह अन्य सर्व कर्जांची वसुली स्थगित ठेवावी. परिस्थिती पूर्वपदावर येईपर्यंत त्याच्यावरील व्याजही माफ करावे.
४. पीक विमा योजनेचा विस्तार करून सर्व पिकांना कमीत कमी हप्त्यावर विमा संरक्षण द्यावे, त्यासाठी 'ग्रामीण विमा विकास निधी'ची स्थापना करावी.
५. पीक नुकसानीचे मूल्यमापन करताना 'ब्लॉक'च्या ऐवजी 'गाव' हा घटक वापरून विमा संरक्षण द्यावे.
६. सामाजिक सुरक्षा यंत्रणेचे जाळे निर्माण करून, त्या अंतर्गत शेतकऱ्यांसाठी स्वास्थ विमा आणि वृद्धावस्थेतील आधार यासाठी तरतूद करावी.
७. स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार देऊन त्यांच्याकडून शेतीपूरक पर्यावरण आणि जीवसंस्थांचे जतन आणि संवर्धन करावे.
८. शेती खरेदी करताना कोण, कशासाठी आणि किती जमीन खरेदी करतोय याचे नियमन करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारावी.
९. परवडणाऱ्या दरात बी-बियाणे व इतर यंत्रसामुग्री उपलब्ध करून द्यावी.
१०. कमी जोखमीचे आणि कमी किमतीचे तंत्रज्ञान पुरविण्यात यावे. जेणेकरून पीक हातचे गेले तरी होणारा तोटा मर्यादीत राहील.

स्वामिनाथन आयोगाच्या सर्वच शिफारशी अर्थातच महत्त्वाच्या आहेत. येथे उल्लेख केलेल्या दहा शिफारशी-पैंकी शेवटची शिफारस मला अत्यंत महत्त्वाची वाटते. 'कमी जोखमीचे' तंत्रज्ञान पुरविण्यात यावे, असे आयोगाने म्हटले आहे. हा जोखमीचा घटकच शेतीच्या नफा- नुकसानीच्या बाबतीत निर्णायक ठरणारा आहे. शेतकरी एखाद्या वर्षी थकबाकीदार का होतो? वारंवार थकबाकीदार होऊन कर्जबाजारी का बनतो? हे कर्ज आवाक्याबाहेर गेले की आत्महत्येपर्यंतच्या टोकास का पोहोचतो? याचे सगळ्यात महत्त्वाचे कारण म्हणजे शेतीतील 'जोखीम' त्याला एकट्यालाच पत्करावी लागते.

ही जी जोखीम आहे. त्याबाबत शासन व वित्तीय संस्थानी फारशी जबाबदारी घेतलेली नाही. काही प्रमाणात नाममात्र नुकसान भरपाई देण्याखेरीज या संदर्भात फारशी मदत केली जात नाही. शेती व्यवसायात सहभागी होण्याचा दावा शासन, वित्तीय संस्था व इतर संस्था करीत असल्या तरी त्यांचा सहभाग इतर अनेक बाबतीत असतो. मात्र, जोखमीमध्ये कोणीही सहभागी नसते. ही जोखीम एकट्याच्या बळावर भोगावी लागत असल्यामुळे शेतकरी तणावग्रस्त मन:स्थितीत असतो. यातून त्याला बाहेर काढण्यासाठी मानसोपचार एका मर्यादितच उपयुक्त ठरतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्या त्यामुळे रोखता येत नाहीत हे स्पष्ट दिसते आहे.

धोका व अनिश्चितता ही प्रत्येक व्यवसायातच असते. हे खरे असले तरी शेतीमध्ये त्याची तीव्रता कमालीची अधिक आहे. शिवाय, त्यावर उपाययोजना करण्यात किंवा व्यवसायातील असा धोका घेण्यात शेतकरी सध्यातरी सक्षम नाही. हे धोके टाळणे त्याच्या आवाक्याबाहेरचे आहे. त्यासाठी शेतकऱ्याला हमीभाव देऊन विमा संरक्षण देण्याची गरज आहे.

**हमीभाव :** शेतीला वित्तपुरवठा करताना सरकारने सकारात्मक, संवेदनशील व न्याय दृष्टिकोन ठेवला पाहिजेच पण तेवढ्याने सरकारची जबाबदारी संपत नाही. योग्य पद्धतीने कर्ज घेऊन, प्रामाणिकपणे परिश्रम करून शेतकरी पीक घेतो. इतर घटकांची पुरेशी साथ मिळाल्यास त्याच्या हातात बऱ्यापैकी उत्पादनही येते. पण येथेच जोखमीची म्हणजेच पुन्हा शेतकऱ्याच्या नशिबाची कसोटी लागते. अशा परिस्थितीत शेती व्यवहार्य ठरायची असेल तर शेती उत्पादनाला योग्य म्हणजेच किफायतशीर भाव देण्याची हमी सरकारने घेतली पाहिजे.

या संदर्भात स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशींचा नेहमी उल्लेख केला जातो. शेती उत्पादनाच्या न्याय्य बाजारभाव देण्याच्या संदर्भातही स्वामिनाथन आयोगाच्या पुढील शिफारशी लक्षात घेतल्या पाहिजेत.

१. शेतमालाचा हमीभाव हा उत्पादन खर्च + ५० टक्के एवढा असावा.

२. बाजाराच्या चढ उतारापासून शेतकऱ्यांचे संरक्षण व्हावे यासाठी 'मूल्य स्थिरता निधी'ची स्थापना करावी.

३. आंतरराष्ट्रीय बाजारातील किमतीच्या दुष्परिणामां-पासून शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी इतर देशांतून येणाऱ्या शेतमालावर आयात कर आकारावा.

४. दुष्काळ व इतर आपत्तींपासून बचावासाठी 'कृषी आपत्ती निधी' स्थापन करावा.

५. आंतरराष्ट्रीय बाजारातील किमतीच्या चढउतारामुळे होणाऱ्या आयातीचा परिणाम देशातील शेतीवर कमीतकमी राहील यासाठी यंत्रणा निर्माण करावी.

६. स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार देऊन त्यांच्याकडून शेतीपूरक पर्यावरण आणि जीवसंस्थांचे जतन व संवर्धन करण्यासाठी प्रयत्न करावेत.

७. शेतमालाची आधारभूत किंमत लागू करण्याची पद्धत सुधारून गहू आणि इतर खाद्यान्न वगळता

इतर पिकांना आधारभूत किंमत मिळण्याची व्यवस्था करावी.

स्वामिनाथन आयोगाच्या या शिफारशी शेतकऱ्यांचे दीर्घकालीन हित लक्षात घेऊन केलेल्या आहेत. या शिफारशी स्वीकारण्यासाठी व त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारकडून अधिक गांभीर्याने प्रयत्न होण्याची गरज आहे.

हमीभाव हाच शेती उत्पादनाच्या बाजाराचा केंद्रबिंदू राहिला तर शेतकऱ्यांना नक्कीच आर्थिक न्याय मिळू शकेल. बाजार व्यवस्थेमध्ये उत्पादक, मध्यस्थ व ग्राहक या तीन पक्षांचे हितसंबंध गुंतलेले असतात. हे लक्षात घेऊन उत्पादकांच्या हितसंबंधावर कोणताही अनिष्ठ परिणाम होऊ न देता अखेरच्या ग्राहकाला कमीतकमी खर्चात माल पोहोच करणे, हे बाजार व्यवस्थेचे उद्दिष्ट असते. मात्र उत्पादक, मध्यस्थ आणि ग्राहक यांच्या हितसंबंधातील या संघर्षात आज उत्पादकाचा प्रथम बळी दिला जातो. बाजारपेठेचे हे स्वरूप नेमके लक्षात घेतले की, हमीभावाची अपरिहार्यता लक्षात येते. बाजारपेठेतील शेतमालाचा उत्पादक ते ग्राहक हा प्रवास सर्वसाधारणपणे तीन टप्प्यांत पूर्ण होतो. १. शेतमालाचे केंद्रीकरण २. शेतमालाचे दर्जानुसार वर्गीकरण ३. शेतमालाचे वितरण.

विविध भागातून शेतकरी आपापला माल बाजारात विक्रीसाठी आणतो. अशा अनेक शेतकऱ्यांचा माल बाजारपेठेत येतो. अशाप्रकारे उत्पादनाच्या क्षेत्राकडून शेतमालाचे बाजारपेठेत केंद्रीकरण होते. शेतमाल घाऊक बाजारात आल्यानंतर दुसऱ्या टप्प्याला सुरुवात होते. हा शेतमाल दर्जानुसार वेगवेगळा केला जातो. या मालाला निरनिराळ्या पेठांमधून मागणी येत असते. मागणीनुसार माल वितरित केला जातो. तेथून किरकोळ विक्रेत्यांमार्फत हा माल ग्राहकांपर्यंत पोहोचतो.

**सरकारची जबाबदारी :** हमीभावाने शेतमाल खरेदी करणे, हा सरकारने शेतीवर केलेला खर्च नाही, तर कृषिबाजारात सरकारने केलेली गुंतवणूक आहे हे नीटपणे लक्षात घेतले पाहिजे. एकतर शेती व्यवसायातील धोक्यातील वाटा उचलणे सरकारचे कर्तव्यच आहे. दुसरे म्हणजे हमीभावाने खरेदी केलेल्या शेतमालाची साठवण करणे, त्याचे संरक्षण करणे. हे सगळे सरकारी यंत्रणेला सहज शक्य आहे. या व्यापारात सरकारला कमी-अधिक नफाही कमावता येऊ शकतो. पण त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाचे म्हणजे देशातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या या व्यवसायावर अवलंबून आहे, तो व्यवसाय तोट्यात जाऊ नये, त्याला रास्त नफा मिळावा, यासाठी प्रयत्न करणे हे सरकारचे काम आहे.

आणखी एका संदर्भात शासनाने 'हमीभावा'कडे स्वत:चे कर्तव्य म्हणून पाहिले पाहिजे. हमीभावामुळे शेतकऱ्याला पुरेसे उत्पन्न मिळू शकेल. त्यामधून त्याची आर्थिक स्थिती थोडी तरी सुधारेल. मुख्य म्हणजे त्याची क्रयशक्ती वाढेल. त्याचा उपयोग एकंदर अर्थ-व्यवस्थेलाच आणखी चालना मिळण्यासाठी होईल. शेतमालाला हमीभाव मिळाला तर एकट्या-दुकट्या शेतकऱ्याची क्रयशक्ती वाढेल असे नाही, तर शेतीवर अवलंबून असणाऱ्या सुमारे ५५ टक्के लोकसंख्येची क्रयशक्ती वाढेल. त्याचे अर्थव्यवस्थेवर किती चांगले परिणाम होतील, हे वेगळे स्पष्ट करून सांगण्याची गरज नाही.

**जागतिकीकरण, उदारीकरण व शेती :** शेती उत्पादनाला, उत्पन्नाला जे शासकीय संरक्षण होते, तो जागतिकीकरण व उदारीकरणाच्या प्रक्रियेने काढून घेतले आहे. शेतमालाची मुक्त आयात आणि शेतीवरील अनुदानात कपात यांचा आग्रह डंकेल प्रस्तावानुसार धरण्यात आला. त्यामधून शेतकऱ्याची आर्थिक स्थिती आणखी भीषण बनली. येथे एक महत्त्वपूर्ण वस्तुस्थिती

लक्षात घेतली पाहिजे की, शेतीच्या विकासाचे सातत्य हे सार्वजनिक गुंतवणुकीवर निर्णायकपणे अवलंबून असते. सार्वजनिक क्षेत्राची शेतीतील गुंतवणूक घटत जाते, तसतशी शेती अधिकाधिक तोट्यात जाते.

भारतामध्ये जागतिकीकरण व उदारीकरणाची प्रक्रिया १९९१ पासून सुरुवात झाली. त्यामधून एकाबाजूने कृषी खर्चात वाढ झाली तर दुसऱ्या बाजूने शेतमालाच्या किमती घसरू लागल्या. कृषि क्षेत्रातील गुंतवणूक व वित्तीय संस्थांकडून होणारा कर्जपुरवठा घटल्यामुळे कृषि क्षेत्राच्या अडचणीत भर पडली. अमेरिका स्वत:च्या देशातील शेतकऱ्यांना प्रचंड अनुदान देते, इतर देशांनी अनुदान दिल्यास त्याला मात्र जागतिक व्यापार संघटना आक्षेप घेते. भांडवली, औद्योगिक यंत्रणा शेतकऱ्यांची कशी लूट करीत आहेत हे पाहण्यासारखे आहे. सध्या बी-बियाणांबाबत असलेली शेतकऱ्यांची पारंपारिक आत्मनिर्भरता संपवण्यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्या प्रयत्न करतात. कित्येकदा या कंपन्यांनी पुरविलेले महागडे बियाणे निरुपयोगी ठरते. पण शेतकरी त्याविरूद्ध आवाज उठवू शकत नाही. खते व औषधे यांच्यावरचा खर्चही बेसुमार वाढत चालला आहे, त्यावेळी शेतमालाच्या किमतीही जागतिक बाजारपेठेच्या प्रभावामुळे घसरत चालल्या आहेत. अशा दुहेरी कात्रीत शेतकरी सापडला आहे.

जागतिकीकरण आणि उदारीकरणाचा आणखी एक परिणाम म्हणजे या काळात राष्ट्रीयकृत बँकांनी कृषी पतपुरवठा १० टक्क्यांवर आणला आहे. पूर्वी या बँकांना कृषि क्षेत्रासाठी १८ टक्के कर्ज पुरवठा करणे बंधनकारक होते. शिवाय, ट्रॅक्टरसारख्या महत्त्वाच्या कृषी उपयोगी साधनासाठी दिल्या जाणाऱ्या कर्जावरील व्याजदर १७ टक्के आहे. प्रादेशिक बँका आणि सहकारी बँकांची साखळी कमकुवत झाल्यामुळे ते ही कृषीसाठी पुरेसा कर्जपुरवठा करू शकत नाहीत. कृषि क्षेत्रास वित्तपुरवठा करण्याबाबत अधिक जागरूक व उदार धोरण सरकारने स्वीकारले पाहिजे.

**अरिष्टग्रस्त शेती :** महाराष्ट्रात शेतीच्या दृष्टीने विदर्भ, खानदेश व मराठवाड्यातील गोदातीर सुपीक आहे. तर ३३ टक्के महाराष्ट्र अवर्षणप्रवण आहे. पीक संरक्षणासाठी धरणे बांधून सिंचन सुविधा मुख्यत: पश्चिम महाराष्ट्रात विकसित करण्यात आल्या. परंतु, सिंचनाच्या पाण्याचा वापर प्रामुख्याने ऊस शेतीसाठी केला जात आहे. ऊसाखालचे क्षेत्रफळ १९६० साली १.५ लाख हेक्टर होते. ते १९८५-८६ मध्ये ३.५ लाख हेक्टरपर्यंत वाढले. त्यानंतर मुख्य अर्थव्यवस्थेचे वारे वाहू लागले. त्यात झपाट्याने वाढ होऊन २०१४-१५ साली ते ९.६ लाख हेक्टरपर्यंत पोहचले. अर्थात, एकूण पिकाखालील क्षेत्रफळात ऊसाचा वाटा ५ टक्के पेक्षाही कमी आहे. मात्र, सिंचनाचे ६० टक्के पाणी ऊसासाठी वापरले जाते. ऊस, केळी व अलीकडे क्षेत्र वाढत असलेल्या फळबागा व भाजीपाला, मिरची, हळद आदी नगदी पिकांसाठी सुमारे ७० टक्के पाणी वापरले जाते. सिंचनाची उपलब्धता असलेल्या मुलखात दुधाचा जोडधंदा वाढला, परंतु सिंचित विभाग सोडला तर महाराष्ट्रातील जवळजवळ ८४ टक्के कोरडवाहू शेती पावसाच्या लहरीवर अवलंबून आहे. या शेतीत उत्पादन वाढ ही फारशी साधता आली नाही. परिणामी, मध्यम शेतकऱ्यांना जेमतेम जगण्यापुरताच जमिनीचा आधार लाभतो. लहान शेतकऱ्याला तर खरीपाच्या हंगामानंतर मजुरीचा आधार शोधावा लागतो. दुष्काळी वर्षात तर हा वर्ग मोठ्या संख्येने शहराकडेही ढकलला जातो. हे स्थलांतर राखण्यासाठी आणि ऊस जोडणी व शेतीच्या कामासाठी मजूर खेडोपाडीच राखण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १९७२ या भीषण दुष्काळानंतर शेतमजूर संघटना व डाव्या पक्षाच्या चळवळीच्या रेट्याखाली रोजगार हमी योजना सुरू केली. मजूर

संघटित असतील तरच हे काम सुरू करून घेणे शक्य होते.

**विजेचा प्रश्न :** १९६० साली महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ अस्तित्वात आले आणि कोयना जलविद्युत प्रकल्प, चंद्रपूर, खापरखेडा आदी औष्णिक प्रकल्प विद्युतवहन व वितरण व्यवस्थेचा विस्तार करण्यात आला. पुढे १९७८ साली राजकीय हस्तक्षेपामुळे शेतीच्या पंपासाठी विजेचा वापर मीटर ऐवजी अश्वशक्तीवर करण्यास शासनाने मुभा दिली. त्यामुळे वीज वापरण्याचा हिशोब ठेवता येईना व विजेची उधळपट्टी वाढू लागली. वीज चोरी वाढली. १९९१ साली २४ टक्के वीज शेतीसाठी वापरली जात होती. त्यामुळे शेतीला वीज पुरविण्यामध्ये वीज मंडळाला तूट येऊ लागली. तरीही प्रतिअनुदान व्यवस्थेमुळे वीजमंडळ फायद्यात चालत होते. वीज पुरवठा पुरेसा होता. पुढे १९९९ मध्ये एन्रॉनची वीजनिर्मिती सुरू झाली. अपेक्षित दर २ रुपये युनिट असताना तो ७.८० युनिटला पडला, शिवाय कराराप्रमाणे वीज मिळेना तेव्हा मे २००१ मध्ये वीज मंडळाने करार रद्द केला. परंतु, १९९९ ते २००१ या काळातील एन्रॉनची अव्वाच्यासव्वा विजेची बिले आणि न्यायालयीन खटले यांच्या ओझ्याखाली १९९८ ते १९९९ पर्यंत फायद्यात चालणारे वीजमंडळ तोट्यात लोटले गेले. डिसेंबर २००१ मध्ये एन्रॉन कंपनीचे दिवाळे निघाले. पुढे विजेचा प्रश्न गंभीर बनत गेला. त्याचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला. ग्रामीण भागात आजही अतिशय कमी काळ आणि कमी दाबाने अनियंत्रित वीज पुरवठा होतो. त्याचा परिणाम ज्या शेतकऱ्यांकडे पाणी आहे त्यांच्याही पिकांना पाणी देता येत नाही. शेवटी शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर विपरित परिणाम होतो. शेतकऱ्यांचे उत्पन्न घटून त्याच्यावर दारिद्र्यात जीवन जगण्याची वेळ आली.

**शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती व आत्महत्या :** शेतीमधील महत्त्वाचा घटक शेतकरी आहे. त्याला आपण अन्नदाता मानतो. परंतु गेल्या काही वर्षांत भारतात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणा व इतर कारणांनी आत्महत्या केल्या आहेत. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतरच्या काळात राष्ट्रीयकृत बँकांचा शाखाविस्तार, त्यांचा कर्जपुरवठा, सहकारी बँकांचा कर्जपुरवठा इ. या परिस्थितीत सुधारणा झाली असली तरी सावकाराकडील शेतकऱ्यांचे कर्जप्रमाण अजूनही कमी झालेले नाही. शेती व्यवसायातील सर्वात मोठी समस्या म्हणजे खर्चावर आधारित किंमत न मिळणे ही आहे. प्रक्रियामालाच्या किमती वेगाने वाढत आहेत; मात्र शेतमालाला मिळणारी किंमत त्याचा उत्पादन खर्च देखील भरून काढू शकत नाही.

कृषिमालाला दिल्या जाणाऱ्या हमीभावाच्या धोरणाचा आढावा घेतल्यास असे दिसते की, शेतकऱ्यांना त्याचा फायदा फारसा झाला नाही. मात्र, त्यांच्या तोट्यात सातत्याने वाढच होत राहिली. ऊस हे पीक वगळता इतर कोणत्याही पिकाच्या हमी भावाने उत्पादन खर्च भरून निघालेला नाही. शेतमाल किमतीबाबत दुसरा घटक लक्षात घेणे आवश्यक आहे, तो म्हणजे शेती उत्पादन घटकांच्या किमती. खुल्या आर्थिक धोरणानंतर १९९०-९१ ते १९९५-९६ या काळात घाऊक किंमत निर्देशांकानुसार गव्हाची किंमत ५८% नी वाढली, तर त्याचकाळात खतांच्या किमती ११३%, सिंचन ६०%, कीटकनाशके ९०% तर डिझेलच्या किमतीत ७५% वाढ झाल्याचे दिसून येते. आजही यापेक्षा वेगळी परिस्थिती नाही.

सर्वसाधारणपणे गेल्या २५ वर्षांत प्रामुख्याने आर्थिक सुधारणोत्तर काळात धोरणात झालेले बदल, आदान-प्रदान बाजारातील किमतीच्या बदलातील बदलते संबंध, शेतमालाच्या घटत्या किमती व उत्पादन

घटकांच्या वाढत्या किमती यामुळे शेती क्षेत्रातून मिळणाऱ्या मोबदल्याचे प्रमाण घटले व शेती क्षेत्राचा ऱ्हास होऊन शेतकऱ्यांची स्थिती अधिकच बिकट झाली. असे असले तरी कोरडवाहू शेतीच्या समस्या सोडविण्यासाठी कोरडवाहू शेती तंत्र वापरणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. त्याचप्रमाणे रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून फळबाग विकासाचा कार्यक्रम राबविणारे पथदर्शी राज्य आहे. त्याचप्रमाणे बी-बियाणांच्या क्षेत्रात शेतकऱ्यांची कंपनी असणारी स्टेट सीड कार्पोरेशन ही देखील देशातील पथदर्शक आहे. शेती क्षेत्रात सहकाराचे भक्कम जाळे असणारेही (साखर, कापूस, दूध) महाराष्ट्र हे मार्गदर्शक राज्य आहे. फलोत्पादन क्षेत्रातही उद्योजकता आली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आणि चार कृषी विद्यापीठे व शेतकऱ्यांच्या परिणामकारक संशोधन पायावर आधारित महाराष्ट्राच्या कृषि क्षेत्राची भविष्याची दिशा ठरविणे आवश्यक आहे. ही दिशा ठरवितांना 'शाश्वत विकासासाठी शाश्वत शेती' या ब्रीद वाक्यावर आधारित कृषी धोरण असले पाहिजे.

महसूल मदत व पुनर्वसन विभागाच्या अधिकृत नोंदीनुसार २००१ ते २०१५ या कालावधीत राज्यात २० हजार ८७३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यापैकी १० हजार ३९० म्हणजेच तब्बल ४९.७ टक्के शेतकऱ्यांच्या आत्महत्या मदतीसाठी अपात्र ठरविण्यात आल्या आहेत. मुख्यत: जमीन नावावर नसल्याने ही मदत नाकारण्यात आली आहे. दुष्काळ व अतिवृष्टीसारख्या आपत्तीमध्येही जमीन नावावर नसणाऱ्यांना मदत नाकारली जाते. कर्जमाफीच्या चर्चेत तर त्यांचा संदर्भही येत नाही. आपत्तीचा कर्जबाजारी-पणाचा व शेती तोटयात असण्याचा, जमीन नसणाऱ्यांच्या उपजीविकेवर काहीच परिणाम होत नाही असा अत्यंत गैरसमज यामागे असतो.

**कृषी उत्पादकता वाढीचा मार्ग :** महाराष्ट्रातील कृषी समस्येचे स्वरूप वैशिष्ट्यपूर्ण आहे, त्यामुळे उत्पादकता वाढविण्यासाठी बहुस्तरीय उपाय करणे आवश्यक आहे. दख्खनच्या पठारावरील राज्यांमध्ये पाऊस कमी तर पडतोच परंतु, अतिशय बेभरवशाचा पडतो. त्यामुळे राज्यात पावसाच्या पाण्यावर केल्या जाणाऱ्या शेतीची उत्पादनाची पातळी ही खालच्या स्तरावर स्थिरावलेली दिसते. राज्यात अशा कमी उत्पादकता असणाऱ्या शेतीच्या क्षेत्रफळाचा विस्तार हा सुमारे ८२ टक्के आहे. त्यामुळे देशातील १७ मोठ्या राज्यांमध्ये धान्य उत्पादनाच्या संदर्भात महाराष्ट्राचे स्थान हे सर्वात कमी उत्पादकता असणारे ठरले. नीती आयोगाने अलीकडे प्रस्थापित केलेल्या संशोधनपर निबंधानुसार महाराष्ट्रात प्रतिहेक्टर धान्याचे उत्पादन केवळ १९९८ किलो एवढे कमी असल्याची माहिती नोंदविण्यात आली आहे. हे उत्पादनही २०१३ ते २०१४ सालातील म्हणजेच दुष्काळाचा मागमूस नसणाऱ्या वर्षातील आहे. थोडक्यात, राज्यातील शेती क्षेत्राची आणि शेतकऱ्यांची परिस्थिती गंभीर बनली आहे. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाले आहे. त्यातील अनेकजण आत्महत्या करीत आहेत. राज्यातील सुमारे ५० टक्के लोक हे त्यांच्या निर्वाहासाठी कृषिक्षेत्रावर अवलंबून आहे. हे वास्तव लक्षात घेतले की या प्रश्नांची विस्तारलेली व्याप्ती लक्षात येते.

कृषी उत्पादनात सिंचित क्षेत्र व उत्पादकता यांचा जवळचा संबंध आहे. उदा. पंजाबमध्ये ९८.७० टक्के व हरियाणामध्ये ८८.९० टक्के क्षेत्र सिंचित आहे. त्यामुळे या राज्यांचे दरहेक्टरी धान्यांचे उत्पादन अनुक्रमे ४४०९ किलो आणि ३८५४ किलो असल्याचे दिसते. देशाच्या पातळीवर ही उत्पादकता विक्रमी ठरते. कारण, देशाच्या पातळीवर धान्यांचे उत्पादन २१०१ किलो एवढे कमी आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर धान्य उत्पादनाच्या संदर्भातील आकडेवारी पाहिली तर

भारतातील शेतीची उत्पादकता कमी दिसते. या वास्तवाची नोंद नीती आयोगाने घेतली आहे. शेतीच्या उत्पादनाच्या बाबतीत उत्पादकता कमी असली तरी उत्पादन खर्चात फार फरक पडत नाही. याचा अर्थ उत्पादकता कमी असली तरी उत्पादनासाठी येणारा खर्च कमी येत नाही. कारण, शेतीची मशागत खर्च कमी होत नाही. यामुळेच राज्यातील शेतकऱ्याची शेती आतबट्ट्याची ठरते. शेतकरी संघटनांनी यापूर्वी जेव्हा आंदालने केली त्यातील बरीच आंदोलनेही नगदी पिकांसाठी दिलेली आहे. परंतु, महाराष्ट्रातील कोरडवाहू शेतकऱ्यांच्या दु:खाला वाचा फोडल्याचे काम त्यांनी फार कमी वेळा केले आहे.

राज्यात सीमांत शेतकऱ्यांची संख्या ४९ टक्के इतकी मोठी आहे. या शेतकऱ्यांचे शेतीचे आकारमान १ हेक्टरपेक्षा कमी असणारे आहेत. तसेच अल्पभूधारक म्हणजेच शेतीचे आकारमान १ हे. ते २ हे. असणारे शेतकरी ३० टक्के आहेत. या जवळजवळ ७९ टक्के शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत हलाखीची आहे. या शेतकरी कुटुंबातील बहुतेकांचे उत्पादन कुटुंबाच्या गरजा भागतील एवढे देखील नाही. स्वातंत्र्यानंतर या सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होईल असे खास प्रयत्न झाल्याचे दिसत नाही.

या राज्यात पावसाचे योग्य पद्धतीने नियोजन केले जात नाही. पीक पद्धतीत योग्य तऱ्हेने बदल केला आणि पाटबंधारे खात्याने सिंचन व्यवस्थेचे व्यवस्थापन करण्यास सुरुवात केली तर विदर्भ हा विभाग वगळता राहिलेल्या महाराष्ट्रात आठमाही सिंचनासाठी पुरेसे पाणी उपलब्ध होईल. या उपलब्ध पाण्याचा संरक्षक सिंचनासाठी वापर करण्यास सुरुवात केली. तसेच भुसार पिकांचे उत्पादन आहे त्यापेक्षा दुप्पट होईल. तसे होईल तेव्हा महाराष्ट्रातील धान्य उत्पादनाची पातळी गुजरात राज्याप्रमाणे वाढेल.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कृषी जोड व्यवसाय उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. जसे गुजरातमध्ये शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसाय हा पर्यायी उत्पन्नाचे साधन उपलब्ध आहे. राज्यात दुधाचे वार्षिक उत्पादन सुमारे एक कोटी टन एवढे आहे. तर महाराष्ट्राच्या निम्मे आकारमान आणि निम्मीच लोकसंख्या असणाऱ्या गुजरात राज्यातील दुधाचे उत्पादन १ कोटी २०लाख एवढे आहे. त्यामुळे महाराष्ट्राला दुधाचे उत्पादन सुमारे अडीचपट करण्यासाठी वाव आहे. राज्याच्या पुणे विभागात दुधाचे उत्पादन ४१८४.३२ हजार मेट्रिक टन होताना दिसते. तर मराठवाडा आणि विदर्भ या प्रदेशात एकत्रितपणे ते केवळ २७६५ हजार मेट्रिक टन होताना दिसते. दुधाच्या उत्पादनाला चालना द्यायची असेल, तर शेतकऱ्यांनी उत्पादन केलेल्या दुधावर प्रक्रिया करून त्याचे वितरण करणारा अमूल डेअरीसारखा सक्षम 'दूध उत्पादक संघ' विकसित करावा लागेल. सहकारी साखर कारखान्या-प्रमाणे दूध धंद्याच्या विकासासाठी गुंतवणूक करण्यास सरकारने पुढाकार घेणे आवश्यक आहे. त्यामुळे कृषी उत्पादनास जोड व्यवसाय विकसित झाल्यास शेतकऱ्यांना किमान त्यांचे कुटुंब तरी चालविता येईल. विदर्भ, मराठवाडा या दुष्काळी भागात शेतकऱ्यांना एक जगण्याची संजीवनी मिळेल व होणाऱ्या आत्महत्यांचे प्रमाण काही प्रमाणात कमी होईल.

**दुष्काळ निर्मूलनासाठी धोरणात्मक पावले :** दुष्काळाचे मूळ - पाणी टंचाई दूर करण्यासाठी महाराष्ट्रामध्ये पाण्याच्या विविध वापरांबाबत शास्त्रशुद्ध नियोजन करून आज चालू असलेली पाण्याची उधळमाधळ, गैरवापर व विषम वाटप दूर करणे आणि पाण्याचे प्रदूषण नियंत्रित करणे गरजेचे आहे. नागरी केंद्रामध्ये पाण्याच्या अकार्यक्षम व्यवस्थापनामुळे पाण्याची मोठ्या प्रमाणात गळती व अपव्यय होतो तो

रोखणे व मोठ्या छपरांवरून वाहून जाणारे पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था करणे अगत्याचे आहे. मलनिस्सारण व्यवस्था असलेल्या नागरी केंद्रातील सांडपाणी नदीत न सोडता सुयोग्य प्रक्रिया करून सिंचनासाठी वापरले गेले पाहिजे. त्यादृष्टीने नागरी केंद्रानजीक हरित पट्टे आरक्षित करून सांडपाण्याचा पर्याप्त वापर केला पाहिजे. साखर व अन्य कारखान्यातील प्रदुषित पाणी, सांडपाणी नदी-नाल्यात किंवा मोकाट सोडता कामा नये. प्रदुषित पाण्यावर प्रक्रिया करून त्याचा यथायोग्य पद्धतीने पुनर्वापर केला पाहिजे. त्यायोगे ५० ते ७० टक्के पाणी वाचेल. उर्वरीत जे पाणी बाहेर सोडले जाईल ते प्रदुषित असणार नाही, यासाठी कडक नियंत्रण व्यवस्थेची गरज आहे. त्यायोगे आज पुणे, नाशिक, औरंगाबाद, रायगड, रत्नागिरी, नागपूर, अकोला, अमरावती, जळगाव आदी जिह्यातील जनतेला प्रदुषित पाण्यामुळे जो त्रास होत आहे तो दूर व्हावा. यापुढील काळात नवे कारखाने काढताना पाण्याची उपलब्धता नसेल तर कारखाने काढण्यास मनाई करावी. भूजलाच्या वापराचे नियोजन हे भूशास्त्रीय अभ्यासावर आधारलेले असले पाहिजे. त्यासाठी अशा अभ्यासास त्वरित आरंभ केला पाहिजे. दरम्यान, ज्या ज्या भागात विहिरीतील पाणी खाली जात आहेत, तेथे नव्या विहिरी अथवा कूपनलिका खणण्यावर काटेकोर नियंत्रण घातले पाहिजे.

महाराष्ट्रातील शेती प्रश्नांचा विविध अंगांनी आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. कृषी अर्थव्यवस्था खरेतर सर्व विकासाचा पाया आहे. हा पाया अधिक मजबूत करण्यासाठी व शेतीचा शाश्वत विकास होण्यासाठी आजपर्यंत विविध तज्ज्ञांनी आपल्या अभ्यासातून अनेक उपाययोजना सुचविल्या आहेत. या योजना प्रत्यक्षात आल्या असत्या तर कदाचित आज महाराष्ट्राच्या नव्हे; तर देशाच्या कृषि क्षेत्राचे भवितव्य बदलले असते. याठिकाणी मला ही काही उपाययोजना व कृती कार्यक्रम सुचवावेसे वाटतात. त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

## उपाययोजना व कृती कार्यक्रम

१. महाराष्ट्रातील सर्व जलसंपत्ती ही सामाजिक संपत्ती आहे. हे स्वीकारून जलसंपत्तीचे साठे करण्याची समुच्चित योजना आखली पाहिजे. भूपृष्ठावरील पाणी व भूजल यांचा एकत्रित विचार झाला पाहिजे. भूपृष्ठावरील पाण्यापैकी सुमारे ३२ टक्के पाणी साठविण्याच्या दृष्टीने सिंचन प्रकल्प अजून हाती घ्यावयाचे आहे. हे पाणी लहान, मध्यम, धरणे आणि बंधारे बांधून कसे साठविता येतील, त्याची एकत्रित योजना आखली पाहिजे. ही योजना तयार करताना विस्थापितांची संख्या किमान राहील, जंगलतोड किमान होईल आणि साठविलेले पाणी विस्तृत पद्धतीने जास्तीत जास्त जमीन सिंचनाखाली येईल, अशारीतीने वाटले जाईल याबाबत दक्ष असले पाहिजे.

२. पाण्याचा वापर करताना अग्रक्रम पुढीलप्रमाणे असले पाहिजे. अ) पिण्याचे संरक्षित पाणी आ) घरगुती वापर इ) गुरांसाठी ई) पीक संरक्षणासाठी उ) सिंचित पिकांसाठी पाणी ऊ) उद्योगधंदे, वीजनिर्मिती व इतर वापर.

३. सिंचनाखाली येणाऱ्या सर्व क्षेत्रासाठी जमिनीचा पोत, खोली, पर्जन्यमान व पाण्याची उपलब्धता विचारात घेऊन पर्याप्त पीक आराखडा आखला पाहिजे. पीक आराखडा बनविताना प्रत्येक नागरिकास सकस आहार मिळण्याच्यादृष्टीने डाळी, तेलबिया, फळे, भाजी, दूध, मासे आदींच्या गरजा भागविण्याएवढे उत्पादन होण्याची तरतूद केली पाहिजे.

४. जमिनीचा उतार व प्रत लक्षात घेऊन जमिनीचा यथायोग्य उपयोग करण्यासाठी खोरेनिहाय योजना

आखल्या पाहिजेत. डोंगरउतार, पडजमीन, उथळ जमिनी, कुरणे व झाडे लावण्यासाठी वापरली पाहिजे. ह्या जमिनीचा विकास योजनाबद्धरीतीने करण्याची जबाबदारी सरकारने घेतली पाहिजे. ही जमीन जर गरीब कुटुंबे कसत असतील तर त्यांना किमान उत्पादनाची हमी देऊन ह्या जमिनीच्या विकासाच्या कामात रोजगार दिला पाहिजे व जमिनीपासून उत्पन्न मिळू लागल्यावर ते त्यावर श्रम करणाऱ्या कुटुंबांना मिळाले पाहिजे.

५. सर्व ग्रामीण कष्टकऱ्यांना त्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी किमान जमीन मिळाली पाहिजे व जमिनीचा वापर कमाल उत्पादन काढण्याच्या दृष्टीने झाला पाहिजे. यासाठी सर्व जमिनीच्या वापराबाबत शास्त्रीय संयोजन झाले पाहिजे.

६. नियोजित आराखड्याप्रमाणे जमिनीचा वापर केला तरच शेतकऱ्यास सिंचन सुविधा दिली पाहिजे. सिंचनाचे पाणी मोजून दिले पाहिजे व त्याचे गटपातळीवरील व्यवस्थापन शेतकऱ्यांच्या पाणी पंचायती स्थापून त्यामार्फत करावे. अस्तित्वात असलेल्या सर्व धरण प्रकल्पातील पाणी जास्तीत जास्त जमिनीस पोहचावे; यादृष्टीने कालव्यांची पुनर्रचना केली पाहिजे व ते पाणी संपूर्ण नियोजित लाभ क्षेत्रात पोहचले पाहिजे. यासाठी नियोजन पीक आराखड्याचे चोख पालन केले पाहिजे.

७. धरणे बांधल्यामुळे आजपर्यंत जी कुटुंबे विस्थापित झाली, त्या सर्वांचे सिंचन लाभ क्षेत्रात विकसनशील पुनर्वसन केले पाहिजे.

८. ऊसाला सुधारित पद्धतीने पाणी देऊन किमान निम्मे पाणी वाचवता येईल. निचऱ्याची सुयोग्य व्यवस्था करून जमीन पाणथळ होणे, मीठ फुटणे रोखले पाहिजे. ऊसाच्या क्षेत्राची पुनर्रचना केल्याशिवाय जमीन व पाणी यांच्या शास्त्रीय नियोजनात ऊसासाठी किती क्षेत्र ठेवणे योग्य आहे, याचा अभ्यास झाल्याशिवाय नवीन साखर कारखान्यास परवानगी देऊ नये.

९. पिण्याच्या पाण्याची लांब पल्याची व्यवस्था होईपर्यंत गावोगावच्या घरगुती वापराच्या पाण्याच्या निकडीचा विचार करून त्याचप्रमाणे सिंचनासाठी पाणी वापरण्यावर नियंत्रण आणले पाहिजे.

१०. चराऊ कुरणे नियंत्रित पद्धतीने वापरून सुधारली पाहिजेत. जमिनीची धूप रोखण्यासाठी, इंधन टंचाई दूर करण्यासाठी, पशुखाद्य पुरवठा वाढविण्यासाठी, डोंगरउतार पडजमीन यामध्ये झाडेझुडपे यांची जोपासना केली पाहिजे. त्यासाठी चरण्याचा हंगाम संपल्यावर गुरे मोकळी न सोडता त्यांना गोठ्यात वैरण, चारा घालावा. वैरण,चारा यांचा तुटवडा पडत असेल तर बागायतदारांकडून चारा-लेव्ही वसूल करून सरकारने त्याचा जरूरीप्रमाणे पुरवठा केला पाहिजे.

११. पश्चिम घाट विकास योजना, अवर्षण विभाग विकास योजना, सामाजिक वनीकरण, रोजगार हमी योजना आदी योजना बंद करून ते पैसे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, पाणलोट क्षेत्र विकास आदीवर सुचविलेल्या योजनांसाठी वापरले पाहिजे.

१२. शेतमालाला निश्चित व रास्त भाव मिळण्यासाठी उत्पादक-ग्राहक संघटन उभारणे आवश्यक आहे. शास्त्रीय माहिती संकलन व तंत्र वैज्ञानिक ज्ञानाचा पाया याआधारे नियोजन आणि सामूहिक संघटनाचा आधार याद्वारे विविध अडचणींवर मात करणे शक्य आहे, अशा अनुभवातून शेतकऱ्यांमध्ये विश्वास निर्माण झाल्यावर शेतकऱ्यांचे राज्यकर्त्यां नेत्यांवरचे परावलंबन दूर होण्यास मदत होईल. संघटित प्रयत्न व त्यातून दृढ झालेला आत्मविश्वास, या आधारे दैववादाच्या जागी प्रयत्नवाद-वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे

शक्य होईल. या सामूहिक प्रयत्नातून समन्यायी, शाश्वत विकास साधून शेतकरी व अन्य श्रमिक ताठ मानेने चांगले जीवन जगू शकतील यात शंका नाही.

१३. भारत हा एक कृषिप्रधान देश आहे. बहुसंख्य लोकसंख्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कृषिक्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे पूर्वी जसे रेल्वेचे बजेट स्वतंत्रपणे मांडले जात असे, तसे फक्त कृषी बजेट मांडले जावे. कृषीसाठी विशेष तरतूद झाली तर यातून शेतीशी निगडित प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल.

**भविष्याची दिशा :** गेल्या काही दशकातील महाराष्ट्राच्या शेतीची वाटचाल पाहिल्यानंतर त्या वाटचालीच्या अनुभवांवर भविष्यातील दिशा ठरविताना, आवश्यक सूत्र म्हणजे शाश्वत विकासासाठी शाश्वत शेती यासाठी महाराष्ट्रातील शेती शाश्वत रहावी, तेथील शेतकरी संपन्न व्हावा आणि देशातील पुढच्या पिढीच्या शेतीचा महाराष्ट्र मार्गदर्शक व्हावा, म्हणून सर्व शेतीक्षेत्र आणि त्यावर अवलंबून असणारे सर्व शेतकरी यांच्यासाठी एकात्मिक विकास आराखडा आखणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील एकूण शेतजमिनीचा वापर व शेतकऱ्यांच्या शेती आकारमानाचा विचार करता मोठ्या प्रमाणात शेतकरी हे सीमांत आणि लहान शेतकरी आहेत. उर्वरित शेतकरी हे मध्यम आणि मोठे शेतकरी आहेत. या सर्वांच्या सुरक्षिततेचा आराखडा हा महाराष्ट्राच्या शेती विकासाचा आराखडा होय. २१व्या शतकातील शेतकरी हा इतर उद्योग आणि सेवा क्षेत्रापासून अलिप्त राहून आपली प्रगती करू शकणार नाही. कारण, उद्योग आणि नवतंत्रज्ञान यांच्या एकात्मिक वापरामधून त्याला शाश्वत विकासाचा मार्ग शोधावा लागणार आहे, त्यासाठी शासन आणि उद्योग क्षेत्र, तसेच सेवाक्षेत्राच्या पातळीवर समन्वय व सहकार्यासह आराखडा व मार्गदर्शक प्रकल्पांची आवश्यकता आहे.

शेतीपुढील महत्त्वाची आव्हान म्हणजे वाढणाऱ्या लोकसंख्येची गरज भागविण्यासाठी अधिक उत्पादन व त्यासाठी अधिक रासायनिक खतांचा आणि औषधांचा वापर. त्यातून जमिनीच्या सुपीकतेचे नुकसान व अशाश्वत शेतीची निर्मिती होत आहे.

यासाठी जैविक व जैव तंत्रज्ञानाचा वापर करून शेती हे लहान शेतकऱ्यांसाठीचे धोरण असणे आवश्यक आहे. पुढच्या पिढीच्या गरजा भागविण्यात कोणत्याही प्रकारची तडजोड न स्वीकरता आजच्या गरजा भागविणारा विकास म्हणजे शाश्वत विकास होय. यासाठी महाराष्ट्रात सेंद्रीय शेतीचा वापर होणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात सेंद्रीय शेतीचे क्षेत्र ०.४२ लाख हेक्टर इतकेच आहे. महाराष्ट्रात जवळपास २ लाख शेतकरी हे सेंद्रीय शेती करतात अशी नोंद आहे. देशातील हे प्रमाण अतिअल्प आहे. यापुढे राज्यात सेंद्रीय शेतीचे प्रमाण वाढविण्यासाठी समुहाची सेंद्रीय शेती गटाची निर्मिती करून लोकांना सेंद्रीय शेतीचे महत्त्व पटवून सांगण्याची आवश्यकता आहे. मध्यम आणि मोठ्या शेतकऱ्यांच्या उत्पादकतेत वाढ करून देशी व परदेशी बाजारपेठांमध्ये त्यांची उत्पादने भविष्यात स्थिरावण्यासाठी त्यांच्या उत्पादनांसाठी वेगळ्या प्रकारच्या प्रयत्नांची गरज आहे. महाराष्ट्रात द्राक्षे, केळी, मोसंबी, टोमॅटो, आंबा इ. पिकांबाबत उत्पादकता वाढवून त्यांचे प्रमाणिकरण आणि मूल्यसंवर्धन होण्यासाठी ब्रँडिंग, माहितीचा प्रसार, कृषिपूरक उद्योग, कृषी उत्पादन खर्च कमी करण्यासाठी प्रशिक्षण दिले पाहिजे. यापुढे सरकारने शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले आणि शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीचा वापर करून खर्चात काटकसर करून शेती केली तरच शेती परवडेल यात शंका नाही.

## समारोप

खरेतर कृषी हा विषय व त्यामधील समस्या अगदी मोजक्या शब्दात व वेळेत मांडणे हे अवघड काम आहे. अनेक अर्थतज्ज्ञांनी भारतातील कृषि क्षेत्राचा तपशीलवार अभ्यास केला आहे. अनेक कृषी आयोग

नेमले गेले. आपआपल्या परीने त्यांनी शिफारशी पण केल्या. अनेक शिफारशी स्वीकारलेल्या आहेत. भारतासारख्या प्रचंड संख्या व विस्तार असलेल्या देशात कृषी सुधारणा हा नेहमीच चर्चेचा विषय आहे. हरितक्रांती, धवलक्रांतीच्या माध्यमातून भारत अन्न-धान्यांच्या व दुधाच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला तरी जगाच्या तुलनेत आपली उत्पादकता हा नेहमीच चिंतेचा व चिंतनाचा विषय आहे. वाढत्या संख्येचा शेतीवर पडणारा बोजा शेतीला एका मर्यादे पलीकडे विकासाच्या मार्गावर नेऊ शकत नाही. नदीजोडसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प व विज्ञान व तंत्रज्ञानाचा अधिक सक्षम वापर कृषिक्षेत्रात सुधारणा घडवून आणू शकले. अर्थात, यासाठी गरज आहे. प्रबळ राजकीय इच्छाशक्तीची. स्व. लालबहादूरशास्त्रींनी 'जय जवान जय किसान' हा नारा दिला. त्याची पुनरावृत्ती करण्याची वेळ आली आहे. शेती सुधारणासाठी तात्पुरत्या मलमपट्टीची नव्हे तर शाश्वत उपायांची गरज आहे. अनिश्चित स्वरूपाच्या शेतीचे निश्चित उत्पन्न देणाऱ्या शेतीत रूपांतर करण्यासाठी व जोखीम कमी करण्यासाठी अधिक व्यवसायिकतेची गरज आहे. उत्पादकापासून ग्राहकांपर्यंत रास्त किमतीत शेती उत्पादने पोहचविण्यासाठी सक्षम यंत्रणा उभाराव्या लागतील. दरडोई उत्पन्नात वाढ करावयाची असेल तर शेतीमधील गुंतवणूक वाढविली पाहिजे. इस्त्रायलसारखी अधिक शास्त्रशुद्ध शेती अंगीकारली पाहिजे. योग्य पीक नियोजन, आवश्यक अर्थपुरवठा, योग्य तंत्रज्ञान व योग्य जलसिंचन याच्या जोरावर महाराष्ट्राच्या शेतीला प्रगतीच्या मार्गावर आणू शकेल.

## संदर्भ


१. जहागिरदार दि.व्य. (संपादित), (२०१२), महाराष्ट्र, ५० वर्षांतील आर्थिक विकासाचा धांडोळा.

२. खांदेवाले श्रीनिवास व पाटील ज.पा. (२०१०) (संपादित) महाराष्ट्रातील कोरडवाहू शेती : समस्या व उपाय.

३. कुरुलकर र.पु., (जाने- मार्च २००७), मराठवाड्यातील शेती व शेतकऱ्यांच्या आत्महत्या, समाज प्रबोधन पत्रिका.

४. लांजेवार सं. नरेंद्र, (२००७), शेतकऱ्यांच्या आत्महत्या : चिंतन आणि उपाय, सुमेद प्रकाशन, डोंबिवली.

५. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, (२०१६-१७), अर्थ व सांख्यिकीय संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

६. पाटील ज.फा., (१९९३) विभुते भालभा (संपादित), बदलता महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सव सिंहावलोकन परिषद, सांगली.

७. शिंदे जगन्नाथ (२००७), कृषी अर्थसहाय्य योजना, गोदावरी पब्लिकेशन, नाशिक.

८. Agrawal A.N., (2014) Indian Economy, Problem of Development of Planing, Wishwa Prakashan & Division of New Age International (P) Limited Publisher, New Delhi.

९. Agriculture Census 2010-11, Agriculture Census Division Department of Agriculture & Co-operation Ministry of Agriculture, Government of India, 2014.

१०. Alagh Yoginder K.(1999), "Agricultural Policy in the Ninth Plan" Hans E. Karl and B. J. Nanjundappa Memorial Endowment Lecture, April, Banglore.

११. Causes of Formers suicides in Maharashtra : An Enquiry, Final Report submitted to the Mumbai High Court, Tata Institute of social sciences, Tuljapur, March, 15, 2005.

१२. Dantwal M. L. (Eds) (1991), Indian Agricultural Development Since Independence, Oxford & IBH Publishing Co., Delhi.

१३. Govil R. K. and Tripathi B. B., Agricultural Economy of India, Fifth Edition, Kitab Mahal, Allahabad, 2016.

१४. Jafa V.S. (2001) Labour and Employment Scenario in the 21st Century, New Century Publications, Delhi.

१५. Kumar Virendra & Sing Balvir, (2013), Levels and Pattern of Indebtness Among Landless Agricultural Labour in Rural Punjab, Journal of Agricultural Development and Policy, Vol. 23, Issue-II.

१६. Maharashtra- State Agricultural portal software requirement specifications.

१७. Srijit Mishra, (2006) Suicide of Farmers in Maharashtra, Indira Gandhi Institute of Development Research, Mumbai.

**Website**

1) http://mahamtb.com/Encyc/2017/9/1/Appeal-to-enrich-agriculture-in-Maharashtra-till-2002-Hansraj-Ahir.html
2) http://saptahikyugantar.blogspot.in/2017/06/blog-post.html
3) http://shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/10603/95726/13/13_chapter%206.pdf
4) http://www.lokmat.com/storypage.php?catid=13&newsid=1359822
5) http://www.lokmat.com/storypage.php?catid=297&newsid=13381488
6) http://www.loksatta.com/vruthanta-news/why-do-the-farmers-are-committing-suicide-448379/
7) http://www.maharashtra1news.in/firstsuicideoffarmers/
8) http://www.saptahiksakal.com/SaptahikSakal/20111105/4952280819423765568.htm

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## मतदानासाठी ओळखपत्र आवश्यक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वार्षिक अधिवेशनात संपन्न होणाऱ्या साधारण सभेत कार्यकारी मंडळातील रिक्त होणाऱ्या विविध पदाकरिता (अध्यक्ष, कार्याध्यक्ष, कार्यवाह-खजिनदार, विश्वस्त, कार्यकारी मंडळ सदस्य) मतदान घेतले जाते. याकरिता परिषदेच्या आजीव सदस्यांनी छायाचित्र असलेले ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. यामध्ये आधार कार्ड, मतदान कार्ड (शासनाचे), पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी दिलेले छायाचित्र असणारे ओळखपत्र यापैकी कोणतेही एक असणे आवश्यक आहे. ४२ व्या वार्षिक अधिवेशनापासून साधारण सभा समारोपीय कार्यक्रमानंतर अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी दुपारी २.०० वाजता घेण्याचा निर्णय कार्यकारी मंडळाने सर्वांच्या सोयीकरिता घेतला आहे, याची नोंद घ्यावी.

सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर येथे संपन्न होणाऱ्या ४२ व्या वार्षिक अधिवेशनाकरिता आपणा सर्वांना आग्रहाचे निमंत्रण.

**आर.बी. भांडवलकर**
कार्यवाह-खजिनदार

# सार्वजनिक क्षेत्रातील बँकांपुढील आर्थिक संकट : खाजगीकरणाची चर्चा !

**चारुदत्त गोखले** †
विद्यमान अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

## प्रास्ताविक

नीरव मोदी व मेहुल चोकसी या मामाभाच्याच्या जोडीने पंजाब नॅशनल बँकेत केलेल्या घोटाळ्यानंतर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे खाजगीकरण करावे; अशी मागणी होताना दिसून येत आहे. सरकारी बँकात होणाऱ्या आर्थिक घोटाळ्यांची व्याप्ती व या बँकांमध्ये निष्क्रिय मालमत्तेचे (एन.पी.ए.) वाढत जाणारे प्रमाण व सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा वाढत जाणारा तोटा (एकूण ७९ हजार कोटी रुपये म्हणजेच ताशी ९ कोटी रुपये) यामुळे जनतेचा विश्वास दोलायमान होत आहे. बँकींग क्षेत्रातील तज्ज्ञ व उद्योजकांच्या संघटना सरकारने सार्वजनिक बँकांचे खाजगीकरण करावे असे सुचवित आहेत. या बँकांमध्ये शिस्त आणण्यासाठी खाजगी क्षेत्राचा सहभाग वाढवावा असे काही तज्ज्ञांचे मत आहे. खाजगी क्षेत्राच्या सहभागामुळे सार्वजनिक क्षेत्रातील बँका सावध होतील, त्यांच्यातील धोक्याचे प्रमाण कमी होईल, त्या सक्षम होतील अशी आशा व्यक्त केली जात आहे.

बँकांचे राष्ट्रीयीकरण करताना जी सामाजिक उद्दिष्टे ठेवली होती, कल्याणकारी राज्यांची संकल्पना अस्तित्वात आणण्यासाठी जे प्रयत्न सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमार्फत होत होते, याचे बँकांचे खाजगीकरण केल्यास काय होईल, हा प्रश्न आहे.

खाजगी क्षेत्रातील बँका व सार्वजनिक क्षेत्रातील बँका यांच्या निष्क्रिय मालमत्तेची तुलना केल्यास तसेच सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी प्राधान्य क्षेत्राला केलेला वित्तपुरवठा या बाबींचा विचार केल्यास त्याचे खाजगीकरण करावे की नाही हे पाहणे संयुक्तिक ठरेल.

## अभ्यासाची उद्दिष्टे

- सार्वजनिक क्षेत्रातील व खाजगी क्षेत्रातील बँकाच्या निष्क्रिय मालमत्तेची तुलना करणे.
- प्राधान्य क्षेत्र व बिगर प्राधान्य क्षेत्राला सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी केलेल्या वित्तपुरवठ्याचे अध्ययन करणे.
- सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या खाजगीकरणाची पार्श्वभूमी अभ्यासणे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत अध्ययन दुय्यम आकडेवारीवर आधारलेले आहे. आकडेवारी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावरून तसेच इतर प्रकाशित अहवालातून घेतली आहे.

† आजीव सभासद क्र. : १८७, भ्रमणध्वनी : ९४२२६१८४१०, ई-मेल : charudattasgokhale@gmail.com

## निष्क्रिय मालमत्तेची तुलना

तक्ता क्र.१ मध्ये सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्रातील बँकांच्या निष्क्रिय मालमत्तेची २००५ ते २०१६ या कालावधीची तुलना केली आहे. तुलना करण्यासाठी निष्क्रिय मालमत्तेची त्रिवर्षीय बदलती सरासरी विचारात घेतली आहे.

**तक्ता क्र.१**

**अनुसूचित व्यापारी बँकांची स्थूल, निष्क्रिय मालमत्ता गुणोत्तराची रचना**

| वर्ष | राष्ट्रीयकृत बँका | त्रिवर्षीय बदलती सरासरी | खाजगी बँका | त्रिवर्षीय बदलती सरासरी | विदेशी बँका | त्रिवर्षीय बदलती सरासरी | अनुसूचित बँका | त्रिवर्षीय बदलती सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २००५ | ५.३६ | - | ३.८३ | - | ३.०५ | - | ४.९२ | - |
| २००६ | ३.८१ | ३.९५ | २.४१ | २.८१ | २.१२ | २.३६ | ३.३५ | ३.६० |
| २००७ | २.६९ | २.८५ | २.१९ | २.३६ | १.९२ | १.९९ | २.५२ | २.७१ |
| २००८ | २.०६ | २.१७ | २.४७ | २.५३ | १.९२ | २.७४ | २.२६ | २.३६ |
| २००९ | १.७५ | १.९५ | २.९२ | २.७९ | ४.३७ | ३.५५ | २.३१ | २.३६ |
| २०१० | २.०३ | १.९२ | २.९९ | २.८० | ४.३६ | ३.७८ | २.५१ | २.३९ |
| २०११ | १.९७ | २.२२ | २.४८ | २.५२ | २.६१ | ३.२४ | २.३५ | २.६० |
| २०१२ | २.६७ | २.६३ | २.०९ | २.११ | २.७६ | २.८० | २.९५ | २.८४ |
| २०१३ | ३.२४ | ३.३३ | १.७७ | १.८८ | ३.०४ | ३.२२ | ३.२३ | ३.३४ |
| २०१४ | ४.०९ | ४.२० | १.७८ | १.८८ | ३.८६ | ३.३७ | ३.८३ | ३.७८ |
| २०१५ | ५.२६ | ६.६८ | २.१० | २.२४ | ३.२० | ३.७५ | ४.२७ | ५.२० |
| २०१६ | १०.६९ | - | २.८३ | - | ४.२० | - | ७.४९ | - |

*स्रोत- RBI – Database on Indian Economy*

वरील तक्त्यावरून पुढील प्रमुख बाबी निदर्शनास येतात-

- २००६ ते २०१० या कालावधीत राष्ट्रीय बँकांच्या निष्क्रिय मालमत्ता गुणोत्तराची त्रिवर्षीय बदलती सरासरी घटली आहे. २०११ नंतर यात वाढ झाल्याचे दिसून येते.
- विदेशी बँकांच्या निष्क्रिय मालमत्तेच्या गुणोत्तराची प्रवृत्ती अस्थिर (बदलती) आहे. विदेशी बँकांचे निष्क्रिय मालमत्ता गुणोत्तर खाजगी बँकांच्या निष्क्रिय मालमत्ता गुणोत्तरापेक्षा जास्त आहे.
- २००७ ते २०११ या कालावधीत सर्व अनुसूचित बँकांमध्ये निष्क्रिय मालमत्ता गुणोत्तर कमी आहे. २०११ नंतर त्यात वाढ झालेली आहे.
- सर्वसाधारणपणे अनुसूचित बँकांच्या स्थूल निष्क्रिय मालमत्तेमध्ये वाढीची प्रवृत्ती दिसून येते.

## प्राधान्य क्षेत्राला केलेला वित्तपुरवठा

तक्ता क्र.२ मध्ये अनुसूचित बँकांनी प्राधान्य क्षेत्र व बिगर प्राधान्य क्षेत्राला केलेल्या वित्तपुरवठ्याची स्थिती दर्शविली आहे. प्राधान्य क्षेत्रामध्ये शेती व शेती संलग्न उपक्रम, सूक्ष्म व लहान व्यावसायिक, किरकोळ घरबांधणी, शिक्षण तसेच दुर्बल घटकांना केलेल्या कर्जपुरवठ्याचा समावेश होतो.

**तक्ता क्र.२**

**प्राधान्य क्षेत्र व बिगर प्राधान्य क्षेत्रासाठीचा कर्जपुरवठा ३१ मार्च रोजी**

**(आकडे अब्ज रु.)**

| क्षेत्र | प्राधान्य क्षेत्र | | बिगर प्राधान्य क्षेत्र | | सार्वजनिक क्षेत्र | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | रक्कम | रक्कम | टक्केवारी | रक्कम | टक्केवारी | रक्कम | टक्केवारी |
| २००५ | २१५.३६ | ४५.२२ | २५४.९४ | ५३.५३ | ५.९२ | १.२४ | ४७६.२२ |
| २००६ | २२२.३६ | ५३.७५ | १८२.७९ | ४४.१८ | ८.५५ | २.०७ | ४१३.७० |
| २००७ | २२५.१९ | ५७.९६ | १५६.०३ | ४०.१६ | ६०.३२ | १.८८ | ३८८.५४ |
| २००८ | २४२.०१ | ५३.७५ | २०५.२८ | ४५.५९ | २.९७ | ०.६६ | ४५०.२६ |
| २००९ | २४८.७४ | ६१.४८ | १५०.०७ | ३७.१० | ५.७४ | १.४२ | ४०४.५६ |
| २०१० | ३०४.९६ | ५०.८९ | २९१.१४ | ४८.५८ | ३.१४ | ०.५२ | ५९९.२४ |
| २०११ | ४०१.८६ | ५३.८२ | ३४२.३५ | ४५.८५ | २.४३ | ०.३२ | ७४६.६४ |
| २०१२ | ५५७.८० | ४७.५७ | ५८८.२६ | ५०.१७ | २६.५६ | २.२७ | ११७२.६२ |
| २०१३ | ६७२.७६ | ४०.९१ | ९६०.३१ | ५८.३९ | ११.५५ | ०.७० | १६४४.६१ |
| २०१४ | ७९८.९९ | ३५.१६ | १४७२.३५ | ६४.७९ | १.३० | ०.०६ | २२७२.६४ |
| २०१५ | ९६६.११ | ३४.६९ | १८१५.९८ | ६५.२१ | २.५९ | ०.०९ | २७८४.६८ |
| २०१६ | १२५८.०९ | २३.३० | ४१४१.४८ | ७६.७० | ३४.८२ | ०.६४ | ५३९९.५७ |

*स्रोत-RBI – Database on Indian Economy*

वरील तक्त्यावरून खालील बाबी निदर्शनास येतात-

- २००८ पर्यंत बहुतेक अनुसूचित बँकांनी प्राधान्य क्षेत्राला कर्जपुरवठा केला होता. प्राधान्य क्षेत्राचे वर्चस्व होते. २००५ ते २००८ या कालावधीत प्राधान्य क्षेत्राला केलेल्या कर्ज पुरवठ्यात वाढीची प्रवृत्ती दिसून येते. याच कालावधीत बिगर प्राधान्य क्षेत्राला केलेल्या कर्जपुरवठ्यात घटीची प्रवृत्ती दिसून येते. या कालावधीत अनुसूचित बँकांनी केलेल्या कर्ज पुरवठ्यात किरकोळ कर्जपुरवठा व शेती क्षेत्राला केलेला कर्जपुरवठा मोठ्या प्रमाणात आहे.
- २००८ च्या जागतिक आर्थिक समस्येनंतर कर्जपुरवठ्याच्या प्रवृत्तीमध्ये विरूद्ध दिशेने बदल झाल्याचे निदर्शनास येते. या तक्त्यावरून असेही लक्षात येते की, २००८ नंतर प्राधान्य क्षेत्राच्या

कर्जपुरवठ्याच्या प्रवृत्तीमध्ये वाढ झाली आहे. या मागील एक महत्त्वाचे कारण म्हणजे जागतिक वित्तीय अरिष्टामुळे अर्थव्यवस्थेला विकासाच्या मार्गावर आणण्यासाठी खाजगी व बिगर प्राधान्य क्षेत्राला मोठ्या प्रमाणावर कर्जपुरवठा केला आहे. २०१६ या वर्षी प्राधान्य क्षेत्राला सर्वात जास्त प्रमाणात कर्जपुरवठा केला आहे.

वरील दोन्ही तक्ते व भारतीय रिझर्व्ह बँकेचे विविध अहवाल विचारात घेता खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील बँकांबाबत काही ठळक तुलना पाहणे योग्य ठरेल.

- भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार, डिसेंबर २०१७ च्या शेवटी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे निष्क्रिय मालमत्तांचे मूल्य ७.७७ लाख कोटी रुपये आहे. खाजगी क्षेत्रातील बँकांमधील निष्क्रिय मालमत्तेचे मूल्य १.०३ लाख कोटी रुपये आहे. खाजगी बँकांचे हे निष्क्रिय मालमत्तेचे प्रमाण कमी नाही. खाजगी बँका जास्तीत जास्त तारण घेऊन श्रीमंतांना झुकते माप देतात; तरी त्यांचे एन.पी.ए.चे प्रमाण जास्त आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे एन.पी.ए.चे प्रमाण जास्त असण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे बँकींग प्रणालीतील एकूण मालमत्तेच्या ८७ टक्के मालमत्ता या बँकांच्या ताब्यात आहे.
- सर्वात जास्त एन.पी.ए. स्टेट बँक ऑफ इंडियाचा १.८८ लाख कोटी रुपये आहे. त्यानंतर पंजाब नॅशनल बँकेचा ५७.६३० कोटी रुपये, बँक ऑफ इंडिया ४९.३०७ कोटी रुपये, बँक ऑफ बडोदा ४६.३०७ कोटी रुपये, कॅनरा बँक ३९.१६४ कोटी रुपये, युनियन बँक ऑफ इंडिया ३८.२८८ कोटी रुपये असा एन.पी.ए.बाबत क्रम लागतो.
- सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची खाजगी क्षेत्रातील बँकांशी तुलना केल्यास आय.सी.आय.सी.आय. बँकेच्या एन.पी.ए.चे मूल्य ४४,२३६ कोटी रुपये, ॲक्सिस बँकेच्या एन.पी.ए.चे मूल्य २२,१३६ कोटी रुपये, एच.डी.एफ.सी.बँकेच्या एन.पी.ए.चे मूल्य ७,६४४ कोटी रुपये, जम्मू काश्मीर बँकेच्या एन.पी.ए.चे मूल्य ५,९८३ कोटी रुपये आहे.
- भारतीय रिझर्व्ह बँकेच्या द्वैवार्षिक वित्तीय स्थिरता अहवालानुसार भांडवल-धोके भारान्वीत मालमत्ता गुणोत्तर (Capital to Risk Weighted asset Ratio) सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या बाबतीत मार्च ते सप्टेंबर २०१७ दरम्यान १३.६ टक्क्यांवरून १३.९ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. याच कालावधीत खाजगी क्षेत्रातील बँकांचे हे गुणोत्तर घटले आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधील मोठ्या प्रमाणावरील एन.पी.ए. हे कार्पोरेट क्षेत्रातील मोठ्या कर्ज बुडव्यामुळे निर्माण झाले आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधील ७७ टक्के एन.पी.ए. कार्पोरेट क्षेत्रातील कर्ज बुडव्यामुळे आहे.
- भारतीय रिझर्व्ह बँकेने गेल्या वर्षीच्या वित्तीय स्थिरता अहवालात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे स्थूल निष्क्रिय मालमत्तेचे प्रमाण गेल्या पाच वर्षांमध्ये दोन अंकी होते, असे निर्देशित केले आहे. इंडियन ओव्हरसीज बँक व आय.डी.बी.आय. बँकेत हे प्रमाण २० टक्क्यांपेक्षा जास्त होते. इतर बँकांमध्ये हे प्रमाण १५ टक्क्यांपेक्षा जास्त होते.
- याच कालावधीत खाजगी बँकांच्या मालमत्ता देयतेत सुधारणा झाली आहे, असे असले तरी ॲक्सिस बँक व आय.सी.आय. या सारख्या मोठ्या खाजगी क्षेत्रातील बँकांमध्ये २०१५ नंतर एन.पी.ए. मध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.
- २०१२ ते २०१५ या कालावधीत सार्वजनिक

क्षेत्रातील बँकांमध्ये एन.पी.ए.चे मूल्य कमी झाले आहे. त्यानंतर त्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. निव्वळ निष्क्रिय मालमत्तेचे निव्वळ मालमत्तेशी असलेले प्रमाण २०१२ मध्ये १८ टक्के होते, ते जून २०१७ च्या शेवटी ७६ टक्के झाले.

- सात सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये निव्वळ निष्क्रिय मालमत्तेचे एकूण मालमत्तेशी प्रमाण सर्वात जास्त खराब म्हणजे १०० टक्केपेक्षा जास्त होते. फक्त दोन सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये हे प्रमाण ४० टक्केपेक्षा कमी होते. इंडियन बँक ३३ टक्के आणि स्टेट बँक ऑफ इंडिया ३७ टक्के एवढे होते.
- निव्वळ निष्क्रिय मालमत्ता प्रमाणाबद्दल खाजगी बँका चांगल्या स्थितीत आहेत. ॲक्सिस बँक आणि आय.सी.आय.सी.आय. या दोन मोठ्या प्रमाणात एन.पी.ए. असणाऱ्या बँकेत निव्वळ निष्क्रिय मालमत्तेचे एकूण मालमत्तेशी असणारे प्रमाण अनुक्रमे १५ टक्के आणि २५ टक्के इतके होते.
- या सर्व बाबीं बरोबर भारतीय रिझर्व्ह बँकेने जो एक सावधानतेचा इशारा केला आहे, तो लक्षात घेतला पाहिजे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकाच्या एन.पी.ए. मध्ये सप्टेंबर २०१७ च्या अखेर १७ टक्क्यांने वाढ झाली तर; याच कालावधीत खाजगी क्षेत्रातील बँकांच्या एन.पी.ए. मध्ये ४०.८ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या खाजगीकरणाचा विचार करावा लागेल.

## निष्कर्ष

खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची तुलना केली असता दोन्ही संख्येने जवळपास सारख्याच आहेत. पण बँकींग व्यवसायात सार्वजनिक बँकांचा वाटा ६८ टक्के आहे, तर खाजगी बँकांचा वाटा सुमारे १८ टक्के आहे. सार्वजनिक बँका, सामाजिक बँकींग, सेवा, कल्याणकारी राज्याची संकल्पना रूजविणे ही मोठी कामे करतात. खाजगी बँकांचे काम व प्राधान्य क्षेत्राकडील दुर्लक्ष पाहता त्यांचे एन.पी.ए.चे प्रमाण कमी नाही. एन.पी.ए. वाढीत खाजगी बँका फार मागे नाहीत हे दिसून येते. खाजगी बँकांमध्ये गैरव्यवहार नाहीतच, असे म्हणता येत नाही. या सर्व बाबी विचारात घेता सार्वजनिक बँकांचे खाजगीकरण हा उपाय असू शकत नाही.

## उपाययोजना

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी आर.बी.आय. व वित्त मंत्रालय काही उपाय करत आहे. त्यात नादारी व दिवाळखोरी संहिता, राष्ट्रीय कंपनी कायदा लवाद यांची तरतूद आहेच. याचबरोबर सरकारने स्वत:चीच मालमत्ता पुनर्बांधणी कंपनी स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँका कल्याणकारी राज्याची कामे करतात; ही बाब विचारात घेऊन या बँका व्यवसायिक पद्धतीने चालवणे गरजेचे आहे. सरकारच्या नियंत्रणाखाली असणाऱ्या या बँकांचे प्रशासन व्यावसायिक पद्धतीने करणे आवश्यक आहे. या बँकांच्या कामात कोणताही हस्तक्षेप असता कामा नये. रिझर्व्ह बँकेच्या कामात हस्तक्षेप होत असेल तर, तो खपवून घेता कामा नये. जे मोठे कार्पोरेट क्षेत्रातील कर्जदार आहेत; त्यांनी दिलेल्या अटीचे उल्लंघन केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये सरकारची भूमिका ही फक्त दिशा दर्शकाची, धोरण ठरविण्याची असली पाहिजे. तसेच या बँकांचे चेअरमन, कार्यकारी संचालक यांना कुठलीही नियमावली नाही. हे सर्व वरिष्ठ मंडळी लोकसभा-राज्यसभा यांना उत्तरदायी असले पाहिजेत. मोठ्या उद्योगांना केलेला कर्जपुरवठा व त्यांच्याकडील थकबाकी यांना हे वरिष्ठ संचालक मंडळ जबाबदार धरले पाहिजे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे नियमन

बँकींग क्षेत्रातील तज्ज्ञांकडेच असावे. सार्वजनिक क्षेत्रातील बँका अधिक सक्षम व्हाव्यात व त्यांचा संचालक मंडळावर होणारा खर्च कमी व्हावा, यासाठी काही प्रमुख सार्वजनिक बँकांचे विलीनीकरण करावे.

**संदर्भ**


१) प्रा. एस. एस. कोलते, ''भारतीय बँकींग प्रणाली'', प्रशांत पब्लीकेशन्स, जळगाव, १४ जानेवारी, २०१४

२) अरूण वि. कुकडे, ''नको खाजगीकरण, नीट नियंत्रण हवे!'' दिव्य मराठी, जळगाव, दि. १३ मार्च २०१८.

३) डॉ. भालचंद्र मुणगेकर, ''खाजगीकरण हा उपाय नव्हे!'' महाराष्ट्र टाइम्स, जळगाव, दि. ६ मार्च २०१८.

४) तुळजापूरकर देवीदास, ''बँक खाजगीकरण घातकच!'' लोकसत्ता, जळगाव,२२ मार्च २०१८

5) Dutta Prabhas K., "Beyond PNB Fraud, NPA is Biggest Worry of Public Sector Banks. Is Privatization a Solution?' India Today, 20 Feb. 2018.

6) Kandela Rames, "Analysis of Priority Sector and Non- Priority Sector NPAs of Indian Public Sector Banks, Journal of Business and Management, 30th June, 2017

7) Reddy K. Sreelatha, M. V. Sivaram Naidu, "A Comparative Study of NPA of Scheduled Commercial Banks', Journal of Business and Mgt., 30th June 2017

8) www.rbi.org.in


◆

## मराठी अर्थशास्त्र परिषद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्यावतीने आजीव सभासदांकरिता विविध पारितोषिके वर्षभरातील उपक्रमास अधिवेशन काळात देण्यात येतात. या पारितोषिकाकरिता प्रत्येकाने प्रयत्न करावा, अशी परिषदेची अपेक्षा आहे.

■ **डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक** (१ जानेवारी २०१७ ते ३१ डिसेंबर २०१७ या कालावधीतील मराठी अर्थशास्त्रीय ग्रंथलेखक).

■ **मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक** (१ जानेवारी २०१७ ते ३१ डिसेंबर २०१७ या कालावधीत मराठीतून प्रकाशित अर्थशास्त्रीय ग्रंथ (महिला) सभासदांकरिता ).

■ **डॉ.सौ. अरूणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार** (१ जानेवारी २०१७ ते ३१ डिसेंबर २०१७ या कालावधीत फक्त वर्तमानपत्रातून प्रकाशित झालेल्या अर्थशास्त्रीय लेखास प्रथम व द्वितीय पुरस्कार ).

■ **डॉ. शंकर मोडक पुरस्कार** (रस्ते, रेल्वे, हवाई वाहतूक, जलवाहतूक (अंतर्गत व समुद्री), धरणे, कालवे पाईपलाईन, विद्युत उत्पादन व वितरण, शहरनियोजन, पाणीपुरवठा, रस्ते दिवेप्रणाली, पोस्ट ऑफिसचे अर्थशास्त्र, संरचनात्मक अर्थशास्त्र विषयावर १ जानेवारी २०१७ ते ३१ डिसेंबर २०१७ या कालावधीत प्रकाशित लेख व ग्रंथ )

(सविस्तर माहितीकरिता कार्यवाह यांचेशी संपर्क ९४२३१३४६८६ करावा.

आपले उपरोक्त उपक्रमासंबंधी लेख व ग्रंथ चार प्रतीमध्ये अर्जासह कार्यवाह यांचेकडे ३१ ऑगस्ट २०१८ पूर्वी पाठवावेत.)

**डॉ. आर. बी. भांडवलकर**
कार्यवाह-खजिनदार

# प्रेषित अर्थशास्त्री : कार्ल मार्क्स

**शिवाजीराव मुरलीधर भोसले** †
माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद,
विभाग प्रमुख, अर्थाास्त्र विभाग, छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

## प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख, महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे माजी सदस्य, शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषद व मराठी अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ ज. फा. पाटील, कोल्हापूर यांनी ५ मे, २०१८ रोजी जगत्विख्यात क्रांतिकारी अर्थशास्त्रज्ञ 'कार्ल मार्क्स' यांच्या द्विशतकी जन्मदिनाचे औचित्य साधून त्याला समर्पित असे 'प्रेषित अर्थशास्त्र : कार्ल मार्क्स' हा ग्रंथ त्यांच्या संपादकीयत्वाखाली नुकताच प्रकाशित केला. त्यांनी आपल्या शैक्षणिक गोतावळ्यासह 'कार्ल मार्क्स' यांचा व्यक्तिवेध, त्यांचे कार्य, विचार, तत्त्वज्ञान यांचा चिकित्सक परामर्श घेतलेला आहे. या निमित्ताने 'मार्क्स व मार्क्सवादावर' भाष्य करणारा एक दर्जेदार संदर्भग्रंथ आणि तोही मराठी भाषेत अभ्यासकांसाठी उपलब्ध करून दिला आहे. आज १५० ते २०० वर्षे होऊनही जगभरातील अनेक देशांच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनामध्ये ज्या अनेक विचार प्रवाहांचा प्रभाव दिसून येतो; त्यापैकी कार्ल मार्क्स यांनी मांडलेला मार्क्सवाद हा असा एकमेव 'वैचारिक प्रवाह' आहे, की जो सकारात्मक किंवा नकारात्मक अशा कोणत्यातरी एका दृष्टीने प्रभावित करतोच. त्यामुळे २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर या ग्रंथाच्या निमित्ताने मार्क्स आणि मार्क्सवाद याचा घेतलेला मागोवा अर्थशास्त्राच्या साहित्य सारस्वतांना एक वैचारिक मेजवानी ठरेल यात शंका नाही.

## ग्रंथाचे शीर्षक

या ग्रंथास लेखक व संपादक ज. फा. पाटील सरांनी दिलेले शीर्षक 'प्रेषित अर्थशास्त्री : कार्ल मार्क्स' अत्यंत मार्मिक व अर्थपूर्ण आहे. कारण, अर्थशास्त्रात ॲडम स्मिथपासून अगदी केन्सपर्यंतच्या विद्वतजनांची मांदियाळी जर बारकाईने अभ्यासली, तर असे दिसून येते की, लौकिकाच्या पलीकडे जाऊन एखादया उदात्त ध्येयवादातून प्रेरित होऊन आपले संपूर्ण जगणे त्याला वाहून देणारे फार थोडेच आहेत. त्या थोड्यांमध्ये कार्ल मार्क्स हा शोषितांच्या जगण्यात आत्मसन्मानाची सोनेरी पहाट घेऊन असा ध्रुवताराच म्हणावा लागेल. कार्ल मार्क्स यांनी त्यांच्या जीवनात व जगण्यात जो संघर्ष, जे दु:ख, ज्या यातना भोगल्या त्या त्यांनी वैयक्तिक जगण्यासाठी किंवा सुख-समाधानासाठी भोगलेल्या नव्हत्या, तर जगातील विषमतामूलक व्यवस्थेमुळे भरडल्या जाणाऱ्या शोषितांच्या प्रश्नांसाठी

†आजीव सभासद क्र. : ५१२, भ्रमणध्वनी : ९४२११९७४५, ई-मेल : bshivajim@gmail.com

असे नीतिधैर्य फक्त प्रेषितालाच शोभून दिसते. कुणा सामान्य माणसाच्या बाबतीत ती एक दंतकथाच ठरेल. म्हणूनच ज. फा. पाटील सरांनी या ग्रंथास दिलेले शीर्षक 'प्रेषित अर्थशास्त्री : कार्ल मार्क्स' हे सर्वार्थांनी युक्त आहे.

## पुस्तकाचे स्वरूप

प्रेषित अर्थशास्त्री : कार्ल मार्क्स या ग्रंथाची १३ भागांमध्ये व २६८ पृष्ठांमध्ये मांडणी केलेली आहे. यासाठी संपादक ज. फा. पाटील सरांनी घटकनिहाय निवड करून २७ सहलेखकांद्वारे त्या त्या घटकांचा सांगोपांग परामर्श घेतलेला आहे. प्रेषित ठरलेला अर्थशास्त्री म्हणून मार्क्सचे व्यक्तित्व पुस्तकाच्या पहिल्या भागात स्वत: ज. फा. पाटील सरांनी मांडले आहे. त्यामध्ये त्यांनी सुरुवातीलाच या ग्रंथलेखन प्रपंचामागील हेतू विदीत केलेला आहे. मार्क्स यांचा जीवन परिचय, त्यांच्यावरील वैचारिक प्रभाव, त्यांचे तत्त्वज्ञान आणि विचारविश्व, त्यांची सैद्धांतिक, ऐतिहासिक मांडणी व त्यांचे अर्थशास्त्र याचे समर्पक विश्लेषण संयुक्तिक शब्दमर्यादेमध्ये केलेले आहे.

दुसऱ्या भागात पी. बी. कुलकर्णी यांनी कार्ल मार्क्सवरील वैचारिक प्रभाव स्पष्ट करताना कालाच्या परिप्रेक्षात त्यांच्या विचारांच्या उपयुक्ततेच्या प्रश्नांचा परामर्श घेतलेला आहे. हेगेलचे तत्त्वज्ञान, इतिहासवादी संप्रदाय, ॲडम स्मिथ आणि रिकॉडो या पूर्वसूरींच्या आणि वैचारिक पंथांच्या प्रभावाचा मार्क्सच्या विचारांवर जो काही परिणाम झाला व त्याचे प्रतिबिंब 'दास कॅपिटलच्या निर्मितीत कसे उमटत गेले, याचा क्रमबद्ध आढावा या भागात घेतलेला आहे. उल्हास माळकर यांनी मार्क्स यांच्या वैचारिक जडणघडणीचा आलेख मांडताना सनातनवाद्यांच्या, प्रारंभीच्या स्वप्नाळू समाजवाद्यांच्या, हेगेलच्या तत्त्वज्ञानाचा, त्यांचा विचारांच्या जडणघडणीतील योगदानांचा मागोवा घेतलेला आहे.

एखादी व्यक्ती उत्तुंग यश-शिखरावर आहे त्यापेक्षा ती त्या ठिकाणी कुठून पोहचली, तो प्रवासच त्याचे कर्तृत्व सांगून जाते. त्या अनुषंगाने तिसऱ्या भागात कार्ल मार्क्स जीवन वृत्तांत संतोषकुमार यादव, तेजस्विनी मुडेकर, अर्जुनराव महाडिक, माधुरी देशमुख यांनी आपल्या लेखांद्वारे कार्ल मार्क्सचा जीवन परिचय व त्यांचे कार्य याचे सविस्तर विवेचन केले आहे.

मार्क्सच्या विचारांवर, तत्त्वज्ञानावर सर्वाधिक प्रभाव हा हेगेलचा असलेला दिसून येतो. त्यामुळेच या ग्रंथातील चौथ्या भागात त्याचा अन्वयार्थ लावण्याचा एम. एस. देशमुख, जे. एस. पाटील, जालिंदर यादव या लेखकांनी आपल्या लेखातून केलेला आहे. मार्क्स यांनी हेगेल यांचे तत्त्वज्ञान भाबडेपणाने न स्वीकारता त्याला वास्तवतेच्या पातळीवर व्यवहार असे नवे कोंदण दिले त्याचा या लेखातून प्रत्यय येऊन जातो.

सैद्धांतिक विश्लेषणात ऐतिहासिक दृष्टिकोणातून इतिहासवादी दृष्टीने झालेला अभ्यास हा वर्तमानाला नवे आयाम देत असतो. त्यादृष्टीने या पद्धतीचा सर्वात प्रभावी वापर करण्याऱ्या अर्थशास्त्र तज्ज्ञांमध्ये मार्क्सचा क्रमांक वरचा लागतो. त्यांच्या याच पैलूचा सविस्तर आढावा पाचव्या भागात संजय ठिगळे व एल. एन. घाटगे या लेखकांनी घेतलेला आहे.

मार्क्स यांचे वेगळेपण हे आहे की, त्यांनी आपल्या अभ्यासाचा अवकाश हा बहुव्याप्त केला. त्यातील उत्तम उदाहरण म्हणजे त्यांनी कुटुंब, खासगी मत्ता व राज्य यांचा उगम, आधार, परस्परसंबंध याचे शास्त्रीय विश्लेषण त्यांच्या या अभ्यास विश्वाचा परामर्श सहाव्या भागात सिंधुदेवी कोरे व श्रीमती एन. बी. विभूते यांनी घेतलेला आहे.

पुस्तकाचा सातवा भाग मार्क्स यांची सर्वोत्कृष्ठ

निर्मिती असलेल्या 'दि कॅपिटल' या ग्रंथाला समर्पित आहे. राजकुमार वाइंगडे, अर्जुन पाटील व मी स्वत: (डॉ. एस. एम. भोसले) या लेखकांनी 'दास कॅपिटलचा' गुणगौरवच केलेला नसून, त्यांचे आर्थिक विचारांच्या विकासातील योगदानदेखील स्पष्ट केलेले आहे. हे तिन्ही लेख वाचल्यानंतर वाचकांच्या सहज लक्षात येते की, 'दास कॅपिटल' या ग्रंथाला मार्क्सवादाचे बायबल का म्हणतात.

मार्क्स यांनी युरोपात वर्गसंघर्षाची मीमांसा केली आहे. त्याचाच धागा पकडून भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर्गसंघर्षाची मीमांसा मांडली. या दोन्ही महान क्रांतिकारी महापुरुषांच्या परस्पर समन्वयाचा आढावा ग्रंथाच्या आठव्या भागात सुभाष दगडे यांनी घेतलेला असून या लेखातून भारतीय प्रश्नांची मार्क्स-वादाद्वारे सोडवणूक करताना त्यांचे भारतीय मातीशी असलेले समकालीन दिलेले संदर्भ वाचकांच्या ज्ञानात भर टाकणारे आहेत.

जगातल्या बलाढ्य भांडवलशाहीला कार्ल मार्क्स यांनी आपल्या ज्या अमोघ अस्त्रांनी खिंडार पाडले ते अस्त्र म्हणजे कार्ल मार्क्स यांचा 'मूल्यसिद्धांत'. भांडवलशाही शोषणातून अतिरिक्त मूल्य कसे निर्माण होते. तिच्यामध्ये अंगभूत दोष निर्माण होऊन ती कशी नष्ट होते; याबाबत मार्क्स यांनी मांडलेला मूल्यसिद्धांत व अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत या सैद्धांतिक उत्पत्ती ग्रंथाच्या अनुक्रमे नवव्या व दहाव्या भागात संतोष कदम, एस. एस. दणे, बळवंत कोरे, राहुल म्होपरे, अनिलकुमार वावरे या लेखकांनी सविस्तर मांडलेली आहे.

भांडवलदार श्रमिकांची पिळवणूक आणि शोषण कशा पद्धतीने करतात, याचे शास्त्रीय विवेचन जगापुढे सर्व प्रथम मार्क्स यांनी मांडले. हे विश्लेषण शोषणाच्या सिद्धांताद्वारे मांडले आणि त्यातून श्रमिकांच्या पिळवणुकीचे भयावह वास्तव जगापुढे आणले. त्याचा ऊहापोह अकराव्या भागात विजय ककडे आणि सुनिता माळी यांच्या लेखातून प्रतिपादित झालेले आहे.

कार्ल मार्क्स हे हाडाचा पत्रकार होते. आपल्या निर्भीड पत्रकारितेमुळे त्यांना दंड, तुरूंगवास, हकालपट्टी, जप्ती इत्यादीला सामोरे जावे लागले. त्यांच्या या साहसी वृत्तीतून त्यांना साहित्यामध्ये शास्त्रीय संशोधनातून जी भर घातली आहे ती फार महत्त्वाची आहे. म्हणूनच या ग्रंथाच्या बाराव्या भागात मार्क्समध्ये असलेला हाडाचा पत्रकार आणि त्याची साहित्यिक बाजू राहूल यादव व पद्मा पाटील यांनी अतिशय सुरेख पद्धतीने मांडली आहे.

कार्ल मार्क्स यांच्यावर आजपर्यंत असंख्य लेखकांनी पुस्तके, ग्रंथ लिहिलेले आहेत. अनेकांनी काव्ये केलीत. ग्रंथांच्या शेवटी तेराव्या भागात याचाही परामर्श घेतलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने मराठीतील उपलब्ध संदर्भावर भर दिलेला आहे. पुस्तक त्याचे प्रकाशन, लेखक आणि वर्ष इ. संपूर्ण माहिती अभ्यासकांसाठी संकलित करण्याचे मौलिक काम राजू झाडबुके यांनी केलेले आहे.

## पुस्तकांचे वाङ्मयीन महत्त्व

प्रेषित अर्थशास्त्री कार्ल मार्क्स हा ग्रंथ कार्ल मार्क्स या जगद्विख्यात क्रांतिकारी महान अर्थशास्त्रज्ञाने समर्पित असल्याने त्याचे महत्त्व निर्विवाद आहेच. तरीदेखील संपादकांनी या ग्रंथाची रूपरेषा व रचना ही संशोधनाच्या चौकटीत ठेवत, त्याला वस्तुनिष्ठ निकषांमध्ये बसविण्याचा प्रयत्न स्तुत्य वाटतो. सर्व सह-लेखकांनीही याला साजेशी अशी मांडणी केल्याने अर्थशास्त्रातीलच नव्हे तर 'कार्ल मार्क्स' अभ्यासणाऱ्या प्रत्येक अभ्यासकाला हा ग्रंथ 'यथार्थ' मार्गदर्शन करेल. कालातीत राहिलेल्या आणि अवघे विश्व व्यापून राहिलेल्या मार्क्सना त्यांच्या विचाराला असे शब्दात पकडणे महाकठीण काम आहे. मात्र, ज. फा. पाटील सरांनी त्याची उत्कृष्ठ वर्गवारी, प्रतवारी व मांडणी

करत आपल्या शैक्षणिक परिघातील दुवे जुळवत हे शिवधनुष्य लिलया पेलले आहे.

## प्रकाशकाविषयी

या ग्रंथाचे प्रकाशन 'समाजवादी प्रबोधिनी', इचलकरंजी यांनी प्रकाशित केले आहे. हा अप्रतिम योग आहे. कारण, कार्ल मार्क्स यांनी युरोपात ज्या समतेकरिता आपली 'काया-वाचा आणि लेखणी' झिजविली; त्याच भावनेने व प्रेरणेने समाजवादी प्रबोधिनी गेली अनेक वर्षे महाराष्ट्रात सामाजिक समतेने व समाजधारणेचे कार्य करीत आहे. यामुळेच अशा संस्थेकडून मार्क्स यांच्या चरित्राचा हा ग्रंथ प्रकाशित होणे याला एक वेगळेच महत्त्व आहे. कारण, समाजवादी प्रबोधिनीचा स्वतंत्र व वेगळा असा वाचक वर्ग आहे, ज्याची नाळ मार्क्सवादाच्या मुशीत घडलेल्या शाहू-फुले-आंबेडकरांच्या समताधिष्ठीत समाजवादी विचारांशी आहे. अशा संस्थेने प्रकाशित केलेला हा ग्रंथ त्या परंपरेचाच एक भाग व वारसा होईल व भावी पिढ्यांना तो दीपस्तंभासारखे मार्गदर्शन करेल.

## लेखकांविषयी

प्रस्तुत ग्रंथामध्ये संपादक व लेख ज. फा. पाटील सरांसह २८ लेखकांनी लेखनामध्ये सहभाग घेतलेला आहे. यातील स्वत: संपादक व लेखक ज. फा. पाटील हे आज वयाच्या ८० च्या घरात असूनही पंचविशीतल्या तरुण अभ्यासकालाही मागे टाकेल एवढा त्यांचा उत्साह दांडगा आणि लेखणी प्रभावी आहे. त्यांचा व्यासंग शब्दापलीकडे जाऊन पोहचला आहे. इतर लेखकांमधील सर्वच त्यांचे शैक्षणिक वारसदार आहेत. यातील बहुतेक विद्यार्थी, विद्यार्थ्यांचे विद्यार्थी आहेत. त्यामध्ये कुणी संशोधक, प्राध्यापक, विभाग प्रमुख, प्राचार्य आहेत. मात्र, या सर्वांना जोडणारे सूत्र म्हणजे ज. फा. पाटीलसर. त्यातून मार्क्सवादाची ही विचार सरीता मराठीच्या प्रांतात वाहती झाली. हा ग्रंथ जरी मार्क्स आणि मार्क्सवादावर आधारित असला तरी, यातील लेखक हे कोणी हार्डकोअर मार्क्सिस्ट संपूर्ण डाव्या विचार सरणीचे अथवा क्रांतिकारी नाहीत. मात्र, शूंपीटरच्या नव-प्रवर्तनवादाने भारलेली आणि मार्क्सच्या प्रेमात पडलेले अर्थशास्त्राचे अभ्यासक असलेली ही सर्व मंडळी आहेत.

अखेरीस प्रेषित अर्थशास्त्री कार्ल मार्क्स या पुस्तकाविषयी शि. ना. माने यांच्या ताबडतोबीच्या किंवा तत्क्षणिक (Instant) नोंदलेल्या मताचा उल्लेख करून या पुस्तक परिचयाला पूर्ण विराम देतो. त्यांच्या शब्दात नोंदीचा गोषवारा पुढीलप्रमाणे : कार्ल मार्क्स हे औद्योगिक किंवा प्राकृतिक भांडवलशाहीचे महान भाष्यकार होते. सर्वसाधारणपणे मागील सहा-सात दशकांपासून संक्रमण अर्थशास्त्राचे (From Marx To Market) पर्व सुरू आहे. आधुनिक भांडवलशाही तंत्रविद्यानिष्ठ किंवा संख्यांक भांडवलशाही (Digital Capitalism) भिन्न स्वरूपाची आहे. या संक्रमण अर्थशास्त्राचा (Transition Econamics, WDR, 1996) संदर्भ देऊन माने यांनी दृष्टे (Prophet) व नोबेल विजेते अर्थशास्त्री सॅम्युअलसन यांच्या पुढील एका विधानाचा (१९७३) दाखला उद्धृत केला. अर्थशास्त्रातील तत्त्वाइतकीच त्या तत्त्वाची प्रस्तुतता (Relevance) महत्त्वाची असते. हे स्पष्ट करताना सॅम्युअलसन जोर देऊन सांगतात की, आपल्या अर्थशास्त्रात 'अंतिम व अक्षय' (Finished and embalmed) असे काही नसते. स्थिर / कायमस्वरूपी असतो तो बदल. ही तथाकथित प्रस्तुतता पुस्तकात क्वचितच आढळते. विशेषत: मार्क्स यांच्या आर्थिक विचारांवरील लेखांत ही उणीव प्रकर्षाने जाणवते.

कालौघात अप्रस्तुत व कालबाह्य ठरलेल्या सिद्धांतांना आपण कुरवाळत बसलो तर अर्थकारणात 'नवप्रवर्तन' कसे घडणार? प्रस्तुततेविषयी वाद-संवाद

घडल्याने कोणा महान अर्थशास्त्रज्ञाच्या प्रतिमेला धक्का पोहोचतो, हा एक गोड गैरसमज आहे. उलट, प्रत्यक्ष व प्रतिमा यांच्यातील दरी वाढत जाणे जास्त धोकादायक आहे. मार्क्स मार्क्सच होते. एंजल्स यांच्या शब्दात, मार्क्स जिनिअस होता... बाकी आपण सर्व 'टॅलेंटेड' होतो.

आज मालकीपेक्षा (Ownership) स्पर्धा महत्त्वाची असते; ही उपपत्ति सिद्ध होऊन देखील चोहोबाजूंनी स्पर्धेचे दमन चालू आहे. (उदाहरणार्थ, क्रोनी कॅपिटॅलिझम किंवा आभासी भांडवलशाही किंवा साटेलोटे भांडवलशाही किंवा पारिवरिक भांडवलशाही किंवा घराणेशाही यांचा विस्तार). आज गरज आहे ती आभासी भांडवलशाहीच्या जागी 'स्पर्धेच्या सद्‌गुणांचा पुनर्शोध' घेण्याची; तेथे कोणत्या 'इझम'ची वस्त्रे लागू पडतात हा प्रश्न दुय्यम आहे. कारण तो एक भ्रम आहे.

**सारांश**

कार्ल मार्क्स सारख्या महान अर्थतज्ज्ञाला, तत्त्ववेत्त्याला, क्रांतिकारकाला संपादक ज. फा. पाटीलसर व त्यांच्या सर्व सहयोगी लेखकांनी आणि प्रकाशक समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी यांनी कार्ल मार्क्स यांच्या द्विजन्मशताब्दी निमित्ताने दिलेली ही शब्दभक्तीयोग स्वरूपातील आदरांजली म्हणजेच 'प्रेषित अर्थ शास्त्र : कार्ल मार्क्स' हा ग्रंथ होय. तसे पाहिले तर कार्ल मार्क्स यांच्या कार्याचे मराठीत यथार्थ दर्शन घडविणारे साहित्य दुर्मीळच आहे. या ग्रंथाने ती उणीव भरून निघाली. एवढेच नव्हे; तर या ग्रंथांच्या निमित्ताने मार्क्स यांच्या कार्याचा ज्या ज्या पैलूंवर प्रकाश टाकलेला आहे त्यातून अनेक अभ्यासकांना, संशोधकांना, लेखकांना व लोकांना प्रेरणा व मार्गदर्शन करणारे ठरेल असा विश्वास वाटतो.

- ग्रंथ : प्रेषित अर्थशास्त्री : कार्ल मार्क्स (१८१८-२०१८)
- संपादक : ज. फा. पाटील
- प्रकाशक : समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी
- पृष्ठे : २६८
- किंमत : रु. ३००/-
- ISBN : 978-93-5281-361-2

◆

अर्थिक शहाणपण ही एक महान गोष्ट आहे, आपणास माहित नाही काय माहित आहे.

**- जॉन केनेथ गॉल्ब्रिथ**

---

मानवी विकासात गुंतवणुकीशिवाय आर्थिक विकास अशक्य आहे आणि अनैतिक आहे.

**- अमर्त्य सेन**

---

दारिद्र्य हे केवळ पैशाचे नसून मनुष्य म्हणून पुर्ण क्षमतेची जाणीव करण्याचीच क्षमता नसणे.

**- अमर्त्य सेन**

# डिझास्टर मायोपिआ

**शि. ना. माने †**
माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद,
निवृत्त प्राध्यापक, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा.

- Disaster Myopia : वित्तीय संस्था व जोखीम व्यवस्थापन यांच्या संबंधात या संज्ञेचा वारंवार दुरुपयोग केला जातो. ज्यावेळी राशीचे रसदीकरण (Quantitative Easing) होते, ऋणाचे प्रतिभूतीकरणात (Securitisation) परिवर्तन अधिकाधिक फायद्याचे ठरते, त्यावेळी जोखीम व्यवस्थापक बोथट होते आणि त्याचा परिणाम म्हणून परत ऋणाचे प्रतिभूतीकरण जास्त वेगवान होते. अखेरीस संबंधित बँकेची संस्थावादी संरचना कमकुवत होऊन तिची दिवाळखोरीकडे वाटचाल सुरू होते.
- ऋणाचे प्रतिभूतीकरण व अतिरेकी प्रतिभूतीकरणातून जोखीम व्यवस्थापनाचे बोथटीकरण असे आवर्त (Spiral) सुरू होते. प्रतिभूतीकरणाचा हा उघड दुरुपयोग आहे. एकाच वास्तव मालमत्तेच्या गहाणखतावर तीन वेगळ्या बँकांकडून कर्जे उचलण्याचे प्रमाण व प्रकार वाढले. दुसऱ्या बाजूला जास्तीत जास्त फायद्याच्या हेतूने काही बँकांनीदेखील त्यांच्या सामान्य भाग भांडवलाच्या ३७ पट कर्जे पुरविली. कर्जदार व कर्जपुरवठादार यांच्यातील कमी कष्टात जास्त फायदा मिळविण्याचे प्रलोभन उफाळून वर आले. या प्रवृत्तीला किंवा उपरिनिर्दिष्ट आवर्ताला इंग्लंडच्या मध्यवर्ती बँकेच्या वित्तीय स्थैर्य विभागाचे प्रमुख अँडी हाल्डेन यांनी प्रथम डिझास्टर मीयोपिआ असे संबोधले आणि दी इकॉनॉमिस्ट नियतकालिकाने ('स्पेशल रिपोर्ट ऑन द फिनान्शिअल रिस्क', फेब्रुवारी १३, २००६, पृ. ३) त्याची नोंद घेतली.

**दूरगामी परिणाम**

१. मागील पाच-दहा वर्षांत झटपट श्रीमंत होण्याची ईर्षा बाळगणाऱ्या उद्योग-व्यवसायांची जोखमीकडे नावडतीचे मीठ अळणी (Risk Aversion) म्हणून पाहाण्याची वाढती प्रवृत्ती.

२. वास्तव मालमत्तेपेक्षा तिच्या गहाणखताचे (कागदाचे) अनाठायी वाढलेले महत्त्व. नाकापेक्षा मोती जड.

३. वाईट कर्जपुरवठादारांची चांगल्या कर्जपुरवठादारांना परिघाबाहेर फेकून देणारी हानिकारक प्रवृत्ती.

- म्हणूनच हाल्डेन यांची संज्ञा लक्षणीय आहे. तिचा आपत्तीकारक लघुदृष्टी हा मराठी पर्याय सुचविला आहे. तो रूढ व्हावा.

◆

† आजीव सभासद क्र. : १०८, भ्रमणध्वनी : ७७३८३५६७८१

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## ४२ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, चंद्रपूर

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४२ वे वार्षिक अधिवेशन सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर (विदर्भ) येथे साधारणतः नोव्हेंबर २०१८ मध्ये आयोजित केले आहे. अधिवेशनाचे अध्यक्षस्थान प्रा. चारुदत्त गोखले, जळगाव (खानदेश) हे भूषविणार आहेत. अधिवेशनातील चर्चासत्रासाठी खालील विषय निश्चित करण्यात आले आहेत.

१) कार्ल मार्क्स काल, आज आणि उद्या

२) कृषिमूल्य व व्यय उद्योग - एक चिकित्सक अध्ययन

३) महाराष्ट्रातील सामाजिक संरचना : सद्यःस्थिती व आव्हाने

चर्चासत्रातीलच चवथा विषय ऐनवेळेचा असून तो परिषदेचे मा. अध्यक्ष अधिवेशनापूर्वी जाहीर करतील. ऐनवेळेच्या विषयाकरिता शोधनिबंध मागविले जात नाहीत. तेव्हा उपरोक्त तीन विषयावरील शोधनिबंध मा. अध्यक्षांचे खालील पत्त्यावर दि. १५ सप्टेंबर २०१८ पूर्वी पाठवावेत. कृपया निबंध वेळेतच पाठवा. अधिवेशनास उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

**टीप -** चंद्रपूर शहर निसर्गरम्य असून जंगलव्याप्त परिसरामध्ये आहे. ताडोबा व्याघ्रप्रकल्प, मा.बाबा आमटे यांचे आनंदवन (वरोरा), डॉ. अभय बंग यांचा गडचिरोली जिल्ह्यातील प्रकल्प, डॉ. प्रकाश व विकास आमटे यांचा हेमलकसा येथील प्रकल्प, मार्कंडेश्वर मंदिर (पाच नद्यांचा संगम), महाकाली मंदिर चंद्रपूर इत्यादी जवळ आहेत.

**प्रा. चारुदत्त गोखले**
अध्यक्ष

**डॉ. आर.बी.भांडवलकर**
कार्यवाह-खजिनदार

**प्राचार्य डॉ. आर.पी. इंगोले**
स्थानिक कार्याध्यक्ष

**डॉ. के.के.पाटील**
कार्याध्यक्ष

**डॉ. राहुल म्होपरे**
संपादक

**डॉ. शरयू मनिष पोतनुरवार**
स्थानिक कार्यवाह

**प्रा. चारुदत्त श्रीधर गोखले**
१०, प्राध्यापक कॉलनी,
जिल्हा उद्योग केंद्रामागे, जळगाव (खा.)
मुपोताजि, जळगाव (खानदेश) ४२५००१
९४२२६१८४१०, (०२५७-२२५२३७५)
charudattasgokhale@gmail.com.

# जाहीर निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सन्माननीय आजीव सदस्यांना नम्र विनंती करण्यात येते की, परिषदेच्या आजीव सभासदांची सूची अद्ययावत करून ४२ व्या वार्षिक अधिवेशनात प्रकाशित करण्याचा मानस आहे. आपण यापूर्वी सूची फॉर्म भरून दिलेले आहेत. त्यामध्ये बऱ्याच बाबी समाविष्ट नाहीत, म्हणून पुढील नमुन्यात संपूर्ण माहिती रंगीत छायाचित्रासह पुढील मेलवर दिनांक ३१ ऑगस्ट २०१८ पूर्वी पाठवावी. हे सर्व करणे वेळेत शक्य व्हावे, याकरिता आपण वेळेपूर्वी माहिती पाठवावी. त्यानंतर आलेल्या माहितीचा विचार करणे शक्य होणार नाही. जेवढी माहिती उपलब्ध होईल, त्यावर आधारित सूची प्रकाशित करण्यात येईल.

माहिती पाठविण्याचा पत्ता :
डॉ. आर. बी. भांडवलकर, कार्यवाह
मेल : rajendra4615@gmail.com

**सूची फॉर्म**

रंगीत अद्ययावत फोटो

आजीव सभासद क्रमांक : जिल्हा : ______________

सभासदाचे संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) : ______________

जन्मदिनांक : ______________ शैक्षणिक पात्रता : ______________

महाविद्यालय/संस्था/ कार्यालय पत्ता : ______________

घराचा पत्ता (पिनकोडसह) : ______________

मोबाईल : ______________ ई-मेल : ______________

विद्यापीठाचे क्षेत्र : ______________

पीएच.डी. प्रबंधाचा विषय : ______________

इतर विशेष माहिती : ______________

कृपया सहकार्य करावे ही विनंती.

आपला विनीत

**डॉ. आर.बी. भांडवलकर**

कार्यवाह-खजिनदार

# महाराष्ट्र शासन
## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)

**रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५**

दूरध्वनी : ०२२-२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२-२४३२ ५९३१ ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in

संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in


### मंडळाच्या योजना

१. पुस्तक प्रकाशन योजना-विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

### मंडळाची निवडक प्रकाशने

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित-संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व - डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) – स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास-रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश - संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला-के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) – स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज - श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई-बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

### मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोंदिया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी अॅन्ड बुक डेपो, गडचिरोली

### शासकीय ग्रंथागारांचे पत्ते
### महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३११०९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५ २६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

Sarvodaya Shikshan Mandal's

# SARDAR PATEL MAHAVIDYALAYA, CHANDRAPUR

**(Affiliated to Gondwana University, Gadchiroli)**

**Reaccredited with grade "A" by NAAC (CGPA-3.05)**
**(Place in Best 100 Colleges in India Today Ranking - 2018)**





## IMPORTANT FEATURES OF THE INSTITUTION

- Best College Award in Gondwana University, Gadchiroli.
- Expert and Efficient Teaching Staff
- Well-Equipped Laboratory with LCD Projector
- Various Training Under Vocational Courses.
- Study Center for YCMOU
- Guest Lecture of eminent personality
- Hostel Facility for Girls.
- Well-Equipped Gymnasium.
- Spoken English Classes in Language Lab.
- Book Bank Facility.
- Student aid fund facility
- Blood Collection Centre
- Excellent Sports, culture with summer coaching and gymnasium
- Well equipped Library with latest Computers.
- International and National Journals.
- Internet Facility for Students.
- Best Results in University exam.
- Placement Facility.
- Research Journals for students.
- e-learning facility
- Bank Facility in College Campus
- 45 K.V. Generator Facilities.
- NCC & NSS unit for Boy's & Girl's
- Centre for Higher Learning & Research
- Scholarship for Hindustan Petroleum.

## COURSES UNDERTAKEN

**1) Junior (11th & 12th)**

Arts, Commerce, Science,
MCVC : (Cookery, Purchasing & Storekeeping, Accounting& Auditing),
Vocational Courses : (Banking & Marketing)

**2) Senior (Graduation)**

Arts : B. A. (Marathi & English),
Commerce : B. Com. (Marathi & English),
Science : B. Sc.
Home Science : B.FD.
Library Science : B. Lib. Sci.
Computer Sci. : B.C.C.A. (Commerce), B.C.A. (Sci.), B.Sc.(I.T.),

**3) Post Graduation**

Arts : English, Marathi, Hindi, History, Economics, Home Economics, Geography, Political Science, Sociology, Mass Communication
Commerce : **M. Com.** : (English & Marathi Medium)
Science : **M. Sc.** : (Physics, Chemistry, Zoology, Computer Science, Environmental Science, Mathematics, Microbiology, Biotechnology)
Library Science : M. Lib. Sci.
Home Science : M.F.D.

**4) Diploma Courses**

- Certificate Courses in Library Science

**5) P. G. Diploma Course**

- PGDCSA

**6) Professional Course**

- MCA • MCM • M. Phil (Commerce)

**7) Research Center**

- Commerce, Economics, History, Geography, Hindi, Marathi, English, Microbiology, Zoology, Computer Science, Chemistry, Environmental Science

**President**
Sarvodaya Shikshan Mandal,
Chandrapur

**Secretary**
Sarvodaya Shikshan Mandal,
Chandrapur

**Principal**
Sardar Patel Mahavidyalaya,
Chandrapur

BHARATI MUDRANALAY, KOP I 0231-2654329